**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी.**: जीवनावश्यक वस्तूंच्या दरात होत असलेली प्रचंड वाढ

**मु.शी.**: जीवनावश्यक वस्तूंच्या दरात होत असलेली प्रचंड वाढ
या विषयावर सर्वश्री अरविंद सावंत, पांडुरंग फुंडकर, सुरेश नवले, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री राजन तेली, कपिल पाटील, संजय दत्त, विनोद तावडे, एस.क्यु. जामा, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी, मधुकर चव्हाण, विक्रम काळे, प्रकाश शेंडगे, भास्कर जाधव, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

**उपसभापती** : प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी माननीय सदस्यांना सूचना करु इच्छितो की, या प्रस्तावावरील चर्चेची वेळ दोन तासाची असल्यामुळे माननीय सदस्यांना भाषण करण्याकरिता दीड तास व मंत्रिमहोदयांना उत्तराचे भाषण करण्याकरिता अर्धा तास वेळ देण्यात आलेली आहे, याची सर्व माननीय सदस्यांनी दक्षता घ्यावी.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, प्रस्तावावर ज्या माननीय सदस्यांची क्रमाने नावे दिलेली आहेत ते सदस्य सभागृहात उशिरा आल्यानंतर बोलण्याचा आग्रह धरतात. तेव्हा तसे न करता सुरुवातीपासून उपस्थित असलेल्या माझ्यासारख्या सदस्यांना प्राधान्याने बोलण्याची संधी दिली जावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : उशिरा आलेल्या माननीय सदस्यांनी प्रथम बोलण्याची परवानगी मागितली तर त्यावेळी आपण आपली हरकत नोंदवावी. आता माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करावी.

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प.नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"जीवनावश्यक वस्तूंच्या दरात झालेली व होत असलेली प्रचंड वाढ, परिणामी महागाईमुळे जनता त्रस्त होणे, भाज्या कडधान्य, डाळी, कांदे-बटाटे आदी वस्तूंची व्यापाऱ्यांव्दारे निर्माण केली जाणारी कृत्रिम टंचाई, त्यातच शिधापत्रिकेवरील धान्य व रॉकेलचा होत असलेला अपुरा व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. अरविंद सावंत....

अनियमित पुरवठा, सार्वजनिक वितरण व्यवस्थेत बोकाळलेला भ्रष्टाचार व गैरव्यवहार, वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवणे शासनास अशक्य होणे, त्यामुळे जनतेच्या मनात पसरलेली असुरक्षिततेची भावना व याबाबत करावयाची उपाय योजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या आणि ज्वलंत अशा सर्वसामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाला भिडणाऱ्या विषयावर मी हा प्रस्ताव मांडणार आहे. मनोजकुमारच्या एका गीतामध्ये म्हटले आहे की, "बाकी कुछ बचा तो महंगाई मार गई" हीच गोष्ट सर्वसामान्य माणसाला आज मारत आहे. याचा दाहक अनुभव गेल्या काही महिन्यापासून जनता घेत आहे. यामध्ये खुल्या बाजारातील अन्नधान्य, कडधान्य एवढयापुरती महागाई मर्यादीत नाही तर तेल, मटण यांचे भाव भयानकरित्या वाढत चालले आहेत. अशा परिस्थितीत जगायचे कसे? परवाच्या दिवशी "ई" टी.व्ही. वर सर्वसामान्य गृहिणींची मुलाखत घेण्यात आली. त्यांना विचारण्यात आले की, या महागाईमध्ये आपण काय करता? या महागाईच्या काळात आपण आपला संसार कशापध्दतीने चालविता? त्यावेळी त्यांचे मनाला वेदना देणारे उत्तर होते की, "पूर्वी महिन्यातून चार वेळा मटण आणत होतो, यापुढे महिन्यातून एकदाच मटण आणतो. पूर्वी महिन्यातून चार वेळा घरामध्ये गोड पदार्थ करीत होतो, आता महिन्यातून एकदाच गोड पदार्थ करतो." अशाप्रकारे या गृहिणींना आपला संसार चालवितांना अतिशय वाईट परिस्थितीतून जावे लागत आहे, याचे कोणत्या शब्दामध्ये वर्णन करावे हेच मला समजत नाही. या राज्यामध्ये शासन नावाची यंत्रणा शिल्लक आहे की नाही ? हे सरकार गेंडयाच्या कातडीचे आहे. मला आश्चर्य वाटते की, माननीय मंत्रिमहोदयांचे माझ्याजवळ असलेले भाषण वाचल्यानंतर राजकारणामध्ये परिस्थिती कशी बदलते हे कळत नाही. या बाजूला बसल्यानंतर आम्ही वेगळे बोलणार आणि त्या बाजूला गेल्यानंतर डिफेंड करणार. माननीय अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांचे भाषण वाचले आहे. ते वाचल्यानंतर कोणताही राजकीय अभिनिवेश न ठेवता खऱ्या अर्थाने माझे विचार मी याठिकाणी मांडणार आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

1990 मध्ये कै.राजीव गांधी हे देशाचे पंतप्रधान होते. त्यावेळी त्यांनी असे सांगितले होते की, आम्ही 100 दिवसात महागाई कमी करु. पण दुर्दैवाने त्यांची हत्या झाली. नंतर माननीय कै.श्री.नरसिंहराव यांचे सरकार सत्तेवर आले. परंतु 100 दिवसामध्ये महागाई कमी झाली नाही. पुढे "गरीबी हटाव" हा नारा दिला. त्यात गरीब माणूस हटला, मात्र त्याची गरिबी हटली नाही. सर्वच पक्ष वेगवेगळे नारे देत रहातात आणि प्रत्यक्षात येणारा अनुभव एवढा दाहक असतो की, आपण उलट दिशेने जात आहोत असे वाटते. मी मुद्दाम सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील यांचे एक वाक्य वाचून दाखवितो. त्यांनी असे म्हटलेले आहे की, "सामान्य माणसाला पिशवीतून पैसे आणि खिशातून धान्य घेऊन यावे लागेल." या स्थितीमध्ये आज कोणता फरक पडलेला आहे, हे मी त्यांना विचारु इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील यांचे हे वाक्य 10 वर्षापूर्वीचे आहे. त्यानंतर गेली 8 ते 9 वर्षे आघाडी सरकार सत्तेवर आहे. पण आज देखील ते वाक्य जसेच्या तसे लागू होत आहे. सरकार कोणाचेही आले आणि सत्तेवर कोणीही राहिले तरी या परिस्थितीमध्ये काहीही फरक पडलेला नाही अशी स्थिती आहे.तसेच सन्माननीय सदस्यांनी आणखी एक चांगले वाक्य म्हटले होते आणि ते खरोखरच चिंतनीय आहे.देशामध्ये शेतीच्या उत्पनाचा आणि औद्योगिक उत्पन्नाचा वेग जर कमी झाला असेल तर देशातील गरीब माणसावर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. मी याठिकाणी माहिती देऊ इच्छितो. "महाराष्ट्राची आर्थिक पाहणी" या पुस्तकामध्ये असा उल्लेख करण्यात आलेला आहे की, "राज्याच्या 1960-61 मधील एकूण पिकाखालील 188.2 लाख हेक्टर क्षेत्रात सुमारे 20 टक्के वाढ होऊन, ते 2005-2006 मध्ये 225.06 लाख हेक्टर इतके झाले. परंतु अन्नधान्याखालील क्षेत्रात उपरोक्त 45 वर्षाच्या कालावधीतील वाढीचे प्रमाण 4 टक्क्याच्या आसपास होते. मात्र तेवढया प्रमाणात उत्पन्न वाढलेले नाही. सर्वात वाईट गोष्ट कोणती वाटत असेल तर प्रमुख पिकांचे प्रती हेक्टरी उत्पादन पाहिले तर ती बाब खरोखरच चिंतनीय आहे. 2005-2006 मध्ये तांदूळाचे उत्पादन महाराष्ट्रामध्ये 1768 कि.ग्रॅ.प्रति हेक्टर झाले होते.कर्नाटकमध्ये 3868 कि.ग्रॅ.प्रति हेक्टर झाले आहे. आपल्या राज्यापेक्षा उत्तर प्रदेश पुढे आहे. आपल्या राज्यामध्ये तांदूळाचे उत्पादन 1768 कि.ग्रॅ.प्रति हेक्टर असून उत्तर प्रदेशमध्ये 1996 कि.ग्रॅ.प्रति हेक्टर आहे.गव्हाच्या बाबतीत महाराष्ट्रातील उत्पन्न 1393 कि.ग्रॅ.प्रति हेक्टर असून पंजाबमध्ये 4179 कि.ग्रॅ.प्रति हेक्टर आहे.ज्वारीचे उत्पादन महाराष्ट्रामध्ये 783 कि.ग्रॅ

. . . .बी-2





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

प्रति हेक्टर असून आंध्र प्रदेशमध्ये 1324 कि.ग्रॅ.प्रति हेक्टर आहे. बाजरीचे उत्पादन महाराष्ट्रामध्ये 650 कि.ग्रॅ.प्रति हेक्टर असून मध्य प्रदेशमध्ये 1491 कि.ग्रॅ.प्रति हेक्टर आहे.कापसाचे उत्पादन महाराष्ट्रामध्ये 187 कि.ग्रॅ.प्रति हेक्टर असून पंजाबमध्ये ते 731 कि.ग्रॅ.प्रति हेक्टर आहे. आपणच महाराष्ट्राची आर्थिक पाहणी हा जो अहवाल सादर केलेला आहे, त्यातील ही माहिती आहे. आम्हालाच शेतीच्या बाबतीत प्रचंड कळते, तुम्हाला शेतीतील काय कळते? असे राजकीय दृष्टीकोनातून उद्‌गार काढणे सोपे आहे. पण या लोकांनी देशामध्ये गेली 45-50 वर्षे सत्ता गाजविली आहे. अशा वेळी ही आकडेवारी तुमचा या बाबतीत जो अभ्यास आहे, तुमचे जे धोरण आहे, त्याची कशा प्रकारे अंमलबजावणी झाली आहे, त्याचे हे द्योतक आहे. जेव्हा बाजारामध्ये किंमती वाढतात, तेव्हा शासनाने काय केले पाहिजे ? तर ज्यावेळी बाजारामध्ये किंमती वाढतात, तेव्हा शासनाने हस्तक्षेप करुन वस्तुंच्या रास्त किंमती निश्चित करुन, त्याचे न्याय वितरण करण्याचे अधिकार अत्यावश्यक वस्तू कायदा 1955 अन्वये केंद्र शासन आणि राज्य शासनाला प्राप्त झालेले आहेत. मात्र त्या कायद्याचा आपण उपयोग का करीत नाही ? असा माझा प्रश्न आहे. आमचे देखील शासन सत्तेवर होते. आमच्याही चुका झाल्या असतील,आम्ही त्याचे कधीही समर्थन करणार नाही. पण काम करणाऱ्या माणसाच्या चुका होतात, काम न करणाऱ्या माणसाच्या चुका होत नाहीत. झोपलेल्या माणसाला जागे करता येते, पण झोपेचे सोंग घेतलेल्यांना जागे करता येत नाही. तुम्ही सर्वजण शेतीतील तज्ज्ञ आहात, परंतु सध्या झोपेचे सोंग घेतलेले आहे. त्यामुळे आम्ही तुम्हाला उठवू शकत नाही. रविवारी "गुढी पाडवा" आहे.अशा वेळी जर त्यादिवशी महिलांना घरी श्रीखंड करावयाचे असेल तर आज साखर महाग झाली आहे.साखर महाग म्हणून श्रीखंड देखील महाग अशी स्थिती आहे. बाजारामध्ये गोष्टी महागल्या तर त्याचा सर्व बाबींवर परिणाम होतो. आज विजेचे दरही वाढलेले आहेत. या माध्यमातून आपल्याला सर्वांना एम.एस.ई.बी.आणि रिलायन्स कंपनी कसे छळत आहेत याची सर्वांना कल्पना आहे.विजेचे दर वाढले तर पिठाच्या गिरणीतील दळणाचे दर देखील वाढतात. गरीब माणूस रेडीमेड गव्हाचे पीठ विकत घेत नाही. तर गरीब माणूस गहू घेऊन त्याचे पीठ करण्यासाठी गिरणीमध्ये जातो. पण तेथील दर देखील वाढत आहेत.

यानंतर कु.गायकवाड . . . .

DVG/ KGS/ MMP/ प्रथम श्रीमती रणदिवे... 10:10

श्री. अरविंद सावंत...

सभापती महोदय. प्रट्रोल, डिझेल व केरोसिनचे भाव वाढविल्यामुळे सर्वच जीवनावश्यक वस्तुंचे भाव आज वाढत आहेत. या भाव वाढीचे परिणाम सर्वसामान्य जनतेला भोगावे लागत आहेत. मुंबईमध्ये खूप गर्दी वाढली, ट्रॅफिक वाढली म्हणून मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समिती शासनाने मुंबई येथून नवी मुंबई येथे हलविली. त्यामुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या शेतकऱ्यांना गेरसोयीचे होऊ लागले. पालघर वरुन येणारा एखादा शेतकरी असेल त्याला देखील नवी मुंबई येथे यावे लागते. यामुळे वाहतुकीचा खर्च वाढतो व त्यामुळे भाज्यांचे दर वाढत आहेत. आता भाज्यांचे दर किती वाढले आहेत हे मी येथे वाचत नाही. आपणा सर्वांनाच त्याची माहिती असेल. आता भेंडीचे भाव देखील 40 ते 50 रु किलो एवढे झालेले आहेत. सर्वसामान्य माणसाने कसे जगायचे असा प्रश्न पडत आहे. शहरातील माणसाची परिस्थिती तर वाईट आहेच परंतु शेतकरी व सर्वसामान्य माणसाची परिस्थिती देखील सर्वात वाईट आहे. शेतकरी ऊस पिकवितो मात्र ऊसाला भाव मिळत नाही. याच ऊसापासून तयार होणारी साखर मात्र बाजारात 20 ते 25 रु प्रति किलोला मिळत आहे. शेतकऱ्याच्या ऊसाला 550 रु क्विंटल एवढाच भाव मिळत आहे. म्हणजेच प्रति किलो साधारण 5 ते 5.5 रुपये शेतकऱ्याला मिळत आहे. केंद्र शासनाने स्टँडर्ड मिनिमम प्राईस घोषित केली होती. परंतु साखर कारखाने या धोरणानुसार शेतकऱ्यांना दर देत नाहीत. शेतकऱ्याकडून कमी दराने ऊस खरेदी करतात, त्यांच्या ऊसाला योग्य तो भाव मिळत नाही. ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्याला भाव मिळत नाही म्हणून तो दु:खी आहे तर ग्राहकाला माल स्वस्त दरात मिळत नाही म्हणून तो दु:खी आहे. हा सर्व फायदा मात्र मधल्या दलालांना होत आहे त्यामुळे केवळ दलाल आज सुखी आहेत. हे राज्य दलालांचे संरक्षण करीत आहे याचे द:ख होत आहे.

सभापती महोदय, मी आपणास आणखी एक मजेशीर गोष्ट सांगू इच्छितो. दुसऱ्या महायुध्दानंतर भीषण अन्नटंचाई निर्माण झाली होती. त्यावेळी सार्वजनिक वितरण व्यवस्थेची संकल्पना समोर आली. त्या पूर्वी सर्व जनता खुल्या बाजारातून धान्य खरेदी करीत होती. त्यानंतर सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरु करण्यात आली. महाराष्ट्र शासनाने 1995 पासून जीवनावश्यक वस्तुंच्या वाढत्या किमतीपासून जनतेला विशेषत : गरीब लोकांना संरक्षण देऊन, त्यांना दिलासा

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

देण्याच्या दृष्टीने पाच जीवनावश्यक वस्तुंचे भाव स्थिर ठेवण्याचा निर्णय घेतला होता. गहू, तांदूळ, साखर,तेल, डाळी या 5 वस्तुंचे भाव आमच्या शासनाने स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला होता. केंद्रामध्ये देखील आमच्याच पक्षाचे सरकार त्यावेळी होते. त्यावेळी देखील जीवनावश्यक वस्तुची भाव वाढ झाली होती. परंतु आमच्या शासनाने साखर, तेल,तूर डाळ, तांदूळ, गहू, या पाच जीवनावश्यक वस्तुंचे भाव राज्यात स्थिर ठेवले होते. त्यावेळी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत गहू 5 रु किलो या दराने मिळत होता. बाजारामध्ये हाच गहू 11 रुपये किलो या दराने मिळत होता. अदिवासी भागामध्ये,3 रु किलो व अवर्षण क्षेत्रात 4 रु प्रति किलो या दराने गहू दिला जात होता. आमच्या शासनाने अन्नपूर्णा योजना सुरु केली होती. त्या योजनेमधून 2 रु किलो या दराने 10 किलो धान्य दरमहा दिले जात होते. अतिउत्तम दर्जाचा तांदूळ सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये 7.90 रु. या दराने दिला जात होता तर अवर्षणप्रवण क्षेत्रामध्ये 7.50 रु. या दराने तसेच आदिवासी भागामध्ये 5.50 रु प्रति किलो दराने वितरित केला जात होता त्यावेळी तांदळाचे खुल्या बाजारातील दर 16.25रु किला इतके होते. उत्तम प्रतीचा तांदूळ सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये, 7.50 रु, किलो, अवर्षणप्रवण क्षेत्रामध्ये 7 रुपये किलो व आदिवासी क्षेत्रमाध्ये 5.20 रु दिला जात होता आणि खुल्या बाजारामध्ये 15.25 रु या दराने वितरित केला जात होता. तसेच साधारण तांदूळ सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये,6.60 रु, प्रति किलो, अवर्षणप्रवण क्षेत्रामध्ये 6.00 रु प्रति किलो. आदिवासी भागामध्ये 4.40 रुपये व खुल्या बाजारामध्ये13.50 रुपये या दराने विक्री केली जात होता. साखर सार्वजनिक क्षेत्रामध्ये 9.05 रु, अवर्षण क्षेत्रामध्ये, 9.05 रु व खुल्या बाजारातील दर रुपये 18.00 इतका होता.तसेच खाद्यतेल सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये 32 रु, अवर्षण प्रवण क्षेत्रामध्ये 32 रु,प्रति किलो व आदिवासी क्षेत्रामध्ये 26 रु प्रति किलो तसेच खुला बाजारात साखरेचे दर 52 रु. प्रति किलो होते. तूर डाळ अवर्षणप्रवण खेत्रामध्ये 18 रु. आदिवासी क्षेत्रामध्ये 12 रु व खुल्या बाजारातील दर 36.75 रुपये इतका होता. या पाच जीवनावश्यक वस्तु जरी शासनाने योग्य दरात सर्वसामान्य जनतेला उपलब्ध करुन दिल्या तरी सर्वसामान्य जनतेचे भले होईल. या ठिकाणी काल एक मुद्दा मांडण्यात आला होता.

यानंतर श्री. बरवड..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .......

यवतमाळ जिल्ह्यामध्ये गहू तांदूळ नव्हे तर मका खा अशा पध्दतीची बातमी वर्तमानपत्रात आलेली आहे. मी जाणीवपूर्वक अगदी स्पेसिफिक उदाहरण देतो. या बातमीमध्ये असे म्हटले आहे की, जिल्ह्याच्या शासकीय धान्य पुरवठ्यात गेल्या चार महिन्यांपासून 1139 मेट्रीक टनाची कपात करण्यात आली. प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. चंद्रकांत जाजू यांनी तशी आकडेवारी वर्तमानपत्रांना दिली. जिल्ह्यात दारिद्र्य रेषेखाली जगणाऱ्या कुटुंबांची संख्या 1 लाख 39 हजार आहे. या कुटुंबांना रेशन कार्डावर स्वस्त धान्य दुकानातून दरमहा 35 किलो धान्य दिले जाते. त्या त्या क्षेत्रातील प्रचलित धान्य आणि बहुतांश गहू तांदूळ देण्याचे शासनाचे निर्देश आहेत. गव्हाचा साठा कमी असेल तर तांदूळ वाढविण्याचे किंवा तांदूळ कमी असेल तर गहू वाढवून देण्याची तरतूद आहे. मात्र बीपीएलमधील कुटुंबास कोणत्याही परिस्थिती मासिक 35 किलो धान्य देणे बंधनकारक आहे. जिल्ह्यात दरमहा 4471 मेट्रीक टन धान्य लागते. त्यात 2218 मेट्रीक टन गहू तर 2253 मेट्रीक टन तांदळाचा समावेश आहे. शासकीय धान्य पुरवठा सुरळीत सुरु असतानाच डिसेंबर, 2007 मध्ये अचानक शासनाकडून बीपीएल कार्ड धारकांना मका आणि बाजरी सक्तीने देण्याचे आदेश धडकले. त्यासाठी सर्व 16 तहसीलदारांना मागणी नोंदविण्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर जिल्ह्यात कोणीही मक्याचा धान्य म्हणून वापर करीत नसल्याचे शासनास कळविण्यात आले. मात्र डिसेंबर ते मार्च या दरम्यान बीपीएल कार्ड धारकाना मका आणि बाजरीशिवाय कोठलेच धान्य उपलब्ध करुन दिले जात नाही. हे मी लेटेस्ट सांगत आहे. पुढे असे म्हटले आहे की, यवतमाळ जिल्ह्यासाठी डिसेंबर ते मार्च या दरम्यान चार महिन्याकरिता 1634 मेट्रीक टन बाजरी व 486 मेट्रीक टन मक्याचे नियतन मंजूर केले गेले. त्यामुळे जिल्ह्याच्या बीपीएल धान्य नियतनात मासिक 1139 मेट्रीक टनाची कपात करण्यात आली. बीपीएल कार्डधारक नागरिकांना सुध्दा एवढ्या कमी प्रमाणात धान्य दिले जाते. एका बाजूला महागाई आहे. स्वस्त धान्य दुकानात जावे तर धान्य उपलब्ध नाही. रेशनिंगच्या बाबतीत तर बोलावे तितके थोडे आहे. माननीय मंत्रिमहोदयांकडे मी स्वत: गेलो होतो. आपल्याला कल्पना आहे. आपण मला निश्चितपणे चांगला प्रतिसाद दिला. त्याबाबतही मी या ठिकाणी जाणीवपूर्वक सांगेन. पण दुर्दैवाने आपले नियंत्रण

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

नाही. रॉकेल पोहोचल्यानंतर दोन तासामध्ये कोणी रॉकेल आहे काय म्हणून विचारावयास गेले तर नाही असे सांगितले जाते. मी अहमदनगर जिल्ह्यातील स्पेसिफिक उदाहरण दिले होते. मी सगळी प्रकरणे घेऊन गेलो होतो. त्या ठिकाणी अधिकाऱ्यांना पकडले. आमच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात काय झाले ? तेथील जिल्हा पुरवठा अधिकाऱ्याला लाच घेताना पकडले. अनेक अधिकाऱ्यांना पकडले. तहसीलदारांना पकडले. कालपरवा त्या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांचे जे आंदोलन झाले ते रेशनवर धान्य उपलब्ध नाही यासंदर्भात झाले होते. रेशनवर धान्य उपलब्ध नाही म्हणून तेथील महिला त्या ठिकाणी गेल्या. त्यांना भेटण्याची तसदी सुध्दा तहसीलदाराने दाखवली नाही. आपण त्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत काय केले ? जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना अटक झाली. त्यांना जेलमध्ये ठेवले. ते 48 तास जेलमध्ये राहिले. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेब, आपले सरकार कसे वागत आहे ते पहावे. शासकीय नियमाप्रमाणे 48 तास जेलमध्ये राहिल्यानंतर त्यांना निलंबित करणे आवश्यक होते. दोन वर्षे होऊन गेली. कोणाचाही प्रश्न आला तरी सगळ्या प्रश्नांचे उत्तर माननीय महसूल मंत्री देतात. ते आमचे पालकमंत्री आहेत. परवा सुध्दा त्यांनी बसून सांगितले की, श्री. मातोंडकर यांना सस्पेंड होऊ देणार नाही. 48 तास जेलमध्ये राहिलेल्या अधिकाऱ्याला आजपर्यंत सुध्दा सस्पेंड होऊ दिले नाही. त्यांना सरकार निलंबित करु शकले नाही असे हतबल शासन आम्ही पाहात आहोत. आम्ही अर्धांगवायू झालेले शासन पाहात आहोत. आम्ही, दुर्बल शासन पाहात आहोत. मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले. माननीय मुख्यमंत्र्यांनी सदनामध्ये उत्तर दिले की, आम्ही नियमाप्रमाणे कारवाई करु. आजतागायत त्यांना सस्पेंड केले नाही. सन्माननीय उपसभापतींनी सुध्दा पुण्यातील पोलिसांचा हाच अनुभव घेतला. शासनाची हिंमत नाही. कोणाचाही अवमान करा. तुमचा करा, आमचा करा, कोणाचाही अवमान करा. आम्ही भ्रष्ट अधिकाऱ्यांना प्रोटेक्शन देण्यास बसलो आहोत. जोपर्यंत आपण अशा अधिकाऱ्यांना प्रोटेक्शन द्याल तोपर्यंत सर्वसामान्य माणसांना न्याय मिळणार नाही. म्हणून मी हा जो विषय मांडलेला आहे तो खूप महत्वाचा आहे. आज कार्डधारकाला रेशनवर जीवनावश्यक वस्तू मिळत नाहीत. माझी आपल्याला विनंती आहे. आपण संगणकीकरण करण्याचा प्रयत्न करीत आहात. त्या वितरण

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS

श्री. अरविंद सावंत .....

व्यवस्थेच्या संस्थेकडे किंवा वितरण व्यवस्था करणाऱ्या व्यक्तीकडे किंवा त्याच्या दुकानामध्ये धान्य गेल्यानंतर ते किती कालावधीत वितरित झाले याची आपण रँडम तपासणी करावी. ज्यांच्या विभागातील ते रेशन होते त्यांच्या घरी जाऊन महिलांना विचारणा करावी की, आपण आज रेशन घेतले का ? आपल्याला असे कळेल की, त्या दुकानातील धान्य संपले आहे. त्या महिला म्हणतील की, आम्ही गेलो पण आम्हाला काहीच मिळाले नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

ही वस्तुस्थिती एका जिल्हयापुरती नाही तर उभ्या महाराष्ट्रामध्ये आहे. मंत्रिमहोदयांना या प्रश्नासंबंधी किती तळमळ आहे, याची मला कल्पना आहे. आपण व्यक्तिश: किती प्रयत्न करीत आहात हेही मला माहिती आहे. परंतु अधिकारी तुम्हाला साथ देत नाहीत, केवळ गोड बोलतात, गोड बोलून त्यांचे जे काम चालू ते तसेच सुरु आहे. राज्यात एकूण स्वस्त धान्य दुकानांची संख्या किती आहे ते सांगतो. ग्रामीण भागामध्ये 3,818 दुकाने आहेत, त्यांची संख्या वाढली की कमी झाली हे माहीत नाही. शहरी भागात 10,898 आणि एकूण 42,716 सार्वजनिक वितरण व्यवस्थेची दुकाने आहेत. या सर्वांवर नियंत्रण ठेवणारी शासनाकडे कोणती व्यवस्था आहे ? आपल्या राज्यामध्ये अनेक समाजाकडे रेशन कार्ड नाही. त्यामध्ये एक वैदू समाज आहे. आदिवासी भागातील सर्व जाती व जमातींची नावे घेता येतील. हा समाज उंदीर खातो, कोल्हे खातो, साप खातो. आजही महाराष्ट्रातील आदिवासी भागात ही दुरावस्था आहे. मोखाडयामध्ये ट्रकच्या ट्रक सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे धान्य पकडले गेले. स्वस्त धान्य दुकानांमधून धान्य मिळत नाही म्हणून अलिकडेच कोल्हापूर जिल्हयामध्ये महिलांनी लाटणे मोर्चा काढला, तो मोर्चा कोणत्याही पक्षाचा नव्हता. तरी सुध्दा झोपी गेलेल्या शासनाचे डोळे उघडत नाहीत. सभापती महोदय, हा जो प्रस्ताव मांडला आहे त्याद्वारे मला एवढेच सांगावयाचे आहे की, निदान जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करुन द्याव्यात, त्या रास्त भावामध्ये उपलब्ध होतील असे प्रयत्न करावेत. बी.पी.एल.मध्ये समाविष्ट नसलेल्या मध्यमवर्गीयांना श्रीमंत समजू नका. त्यांची तर ससेहोलपट होते. त्यांची अवस्था तर घर का ना घाट का अशी झाली आहे. हे जे व्यवसाय कर भरणारे कर्मचारी बसले आहेत त्यांची अवस्था तर ना घर का ना घाट का अशी आहे. ना धड खाली ना धड वर. त्यांचे हाल तर त्यापेक्षा भयंकर आहेत. बाजारात गेले तर मासे महाग, मटण महाग, कोंबडी महाग, या महागाईमुळे कोणाचे पोट भरते ? दुस-या बाजूला लोकसंख्येचा प्रश्न आहेच. लोकसंख्येचा प्रश्न या प्रश्नाशी निगडीतच आहे. त्यावर काही नियंत्रण नाही. सर्वसामान्य सुशिक्षित माणूस कुटुंब नियोजन करतो, इतर करीत नाहीत. विजेचा प्रश्न या प्रश्नाशी निगडीत आहे. पेट्रोल व डिझेलचा प्रश्न याला लागून आहे. या सगळया प्रश्नातून सोडवणूक करण्यासाठी राज्य सरकारने केंद्राकडे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

बोट दाखवू नये. 1995 मी युतीच्या काळातील जीवनावश्यक दर उद्‌धृत केले आहेत. त्या कायद्यातील तरतुदीनुसार राज्य सरकारला अधिकार आहेत. युतीचे सरकार राज्यात सत्तेत असताना आम्ही केंद्र सरकारकडे बोट दाखविले नव्हते. त्यावेळी आम्ही राज्याच्या बजेटमध्ये अन्नपूर्णा योजना आणि जीवनावश्यक भाव स्थिर ठेवण्यासाठी दोन वेळा 100 कोटींची तरतूद केली होती. अशाप्रकारची तरतूद हे सरकार करणार की नाही हा महत्वाचा सवाल मी यानिमित्ताने विचारु इच्छितो. असे प्रसंग येतच राहणार आहेत. सभापती महोदय, 20-20 वर्षे अशाप्रकारचे प्रस्ताव येत आहेत. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढू लागतात त्यावेळी सरकारने हस्तक्षेप केला पाहिजे. पण त्यासाठी संवेदनशील सरकारची आवश्यकता असते. या प्रस्तावाच्या प्रसंगी मला बहिणाबाईंच्या कवितेच्या ओळी आठवितात. त्या आपल्या कवितेत असे म्हणतात, वळखिले नाही कान्हा तिले गाय म्हणू नये, जिले नाही फुटे पान्हा तिले माय म्हणू नये, निजे भुकेपोटी तिला रात म्हणू नये, आखडला दानासाठी तिला हात म्हणू नये. सरकारचा हात आखडला तर माणसे अशीच भुखेपोटी उपाशी निजणार आहेत. तो हात जरा ढिला करावा. आम आदमी के साथ आता दो हाथ, हे दो हाथ गळा घोटण्यासाठी तयार आहेत. यापूर्वी एक हाथ होता, आता दोन हाथ. आम आदमी के साथ हमारे दो हाथ. वो दो हाथ तुम्हारे गले पर है.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, मंहगाई जैसे महत्वपूर्ण विषय पर सभागृह में चर्चा हो रही है और विरोधी पक्ष के बड़े नेता और श्री. फुंडकर जी यहां पर उपस्थित नहीं हैं.

श्री. अरविंद सावंत : उसकी चिन्ता आप न करें. मैं यहां पर उपस्थित हूँ. आप केवल कहते हैं "कांग्रेस का हाथ, आम आदमी के साथ". मैं उसी आम आदमी की बात यहां पर कर रहा हूँ.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. अरविंद सावंत : सभापति महोदय, मैं सभागृह में आम आदमी की वेदना को प्रकट कर रहा हूँ. माननीय सदस्य उस वेदना को समझने की कोशिश करें. दर्द क्या होता है, यह आपकी समझ में आएगा.

नंतर श्री.शिगम



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत....)

माननीय उपसभापती महोदय, या जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीच्या संदर्भात चर्चा चालू असताना आपणाकडे पाहिल्यानंतर मला भाजी विकणा-या आपल्या मातोश्रींची आठवण होते. माझ्या आईची मला आठवण होते. आम्ही लहान असताना आमची आई आम्हाला सांगायची की, जा रे, बाजारातून कोथिंबीरीची जुडी घेऊन ये. मग आम्ही बाजारात जायचो. त्यावेळी एका आण्याला कोथिंबीरीची जुडी मिळत असे. एक आणा देऊन कोंथिबीरीची जुडी घेतल्या नंतर त्या भाजीवाल्याकडे थोडा कढीपत्ता मागायचो, थोडे आले मागायचो, मग तो कढीपत्त्याचा एक टहाळा आणि आल्याचा तुकडा फुकट देत असे. त्यावेळी एका आण्याला कोंथिबीरची झुडी आणि चार आण्याला नारळ मिळत असे. आता नारळ 10-15 रुपयाला मिळतो. सामान्य माणसाने कसं जगायचं हा मोठा प्रश्न आपल्या सर्वांपुढे आ वासून उभा राहिलेला आहे. वा ! सुनील भाऊ क्या कमाल है ! किती दु:ख आहे ! सन्माननीय मंत्री महोदय श्री. सुनील तटकरे यांची सर्वत्र प्रशंसा केली जाते. त्यांचे सगळीकडे नाव घेतले जाते. त्यामुळे त्यांच्याकडून आम्हाला फार मोठ्या अपेक्षा आहेत. माननीय मंत्री महोदय श्री. सुनील तटकरे हे संवेदनाशील आहेत. मी हे मनापासून बोलतो. मी त्यांचे भाषण वाचलेले आहे. त्यांच्या भाषणाला राजकारणाचा स्पर्श नव्हता. माझी त्यांना हात जोडून विनंती आहे की, या महागाईमध्ये आम आदमीला तुम्ही जगू द्या. या महागाईच्या संदर्भाने केवळ शहरातील माणसाचाच तुम्ही विचार करु नका तर, ग्रामीण भागातील आदिवासी, शेतमजूर आणि तळागाळातील गोरगरिबांचाही विचार करा. त्यांना रेशनवरचे धान्य वेळेवर मिळाले नाही तर ते कसे जगू शकतील ? वीज मिळाली नाही तर चक्की चालणार नाही. चक्की चालली नाही तर पीठ मिळणार नाही आणि चक्की चाललीच दर महागाईमुळे गरिबांना दर परवडत नाही. म्हणून या सर्वातून सामान्य माणसाची सुटका व्हावी यादृटीने मी हा प्रस्ताव येथे मांडलेला आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी या महागाईच्या संदर्भात लवकरात लवकर निर्णय घेऊन महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेला दिलासा द्यावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महागाईच्या संदर्भातील प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

वेगवान भाववाढ ही केवळ आर्थिक व राजकीय चिंतेची बाब आहे आणि ती एक व्यापक सामाजिक समस्या आहे. तिचे निराकरण हे वाढीव कृषी उत्पादन व अन्न धान्याच्या वाढीव पुरवठ्यातून होऊ शकेल. केवळ आर्थिक किंवा केवळ राजकीय दृष्टीने या विषयाकडे न पाहता या महागाईवर नियंत्रण आणण्याच्या संदर्भातील विचार हा केन्द्र शासन आणि राज्य शासनाला करावा लागेल. नेमेची येतो मग पावसाळा, त्याप्रमाणे दरवर्षी महागाईच्या संदर्भातील चर्चा या सभागृहामध्ये केली जाते. परंतु या वर्षातील महागाई ही फार वेगळया प्रकारची आहे. ती केवळ अन्नधान्यापुरती मर्यादित नाही. सिमेंटची दरवाढ झालेली आहे, लोखंडाची दरवाढ झालेली आहे, सोन्या-चांदीची दरवाढ झालेली आहे. एक वस्तू अशी नाही की जिची भाववाढ झालेली नाही. त्यामुळे ही केवळ अन्न व नागरी पुरवठा खात्याच्या संदर्भातील चर्चा आहे असे मी मानत नाही. शेअर्स्चे भाव कमी जास्त होतात. स्टॉक एक्स्चेंजमध्ये शेअर्स्च्या संबंधात जी तेजी मंदी असते तिचा संबंध केवळ अर्धा टक्का जनतेशी आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 10:30

श्री. अरुण गुजराथी...

पण महागाईचा चटका आणि महागाईचा फटका हा सर्वसामान्य माणसापासून ते श्रीमंत माणसांपर्यंत येऊन पोहोचतो. राज्यातील गरीब आणि मध्यमवर्गीयांना महागाईचा चटका बसू नये म्हणून ही चर्चा अत्यंत महत्वाची आहे. मागणी आणि पुरवठा यांचा समतोल याचा महागाईशी संबंध येतो. मागणी आणि पुरवठा यासंदर्भात आपण फक्त भारतापूरतचा विचार करीत होतो. पण लिबरलायझेशननंतर, ग्लोबलायझेशननंतर,जागतिकीकरण झाल्यानंतर एका देशात जे भाव असतील ते भाव सर्वच देशात समान राहतील अशातला भाग नाही. याचे प्रतिसाद संपूर्ण देशात आणि जगात उमटतात. आपली सेफ बाजू कशी राहील याचा विचार करणे गरजेचे आहे. जागतिकीकरण स्वीकारल्यानंतर किंवा ती लादल्यानंतर देखील भारताने विशेषत: महाराष्ट्राने आपल्या येथील महागाईच्या बाबतीत विचार करणे आवश्यक आहे. महागाईचा फटका गरीब आणि मध्यमवर्गीयांना मोठया प्रमाणात बसतो. तो विकसनशील आणि अविकसनशील राज्यातील आणि देशातील लोकांना मोठया प्रमाणात बसतो. विकसित झालेले देश आहेत. अमेरिका सारखा देश आहे त्याला महागाईचा फटका बसत नाही अशातला भाग नाही. अमेरिकेचे देखील अर्थशास्त्र आज बिघडलेले आहे. परंतु आपण आपल्या देशाचा आणि राज्याच्या बाबतीत विचार करु की, या महागाईच्या संदर्भातील आपले धोरण काय असणार आहे ? विकासदराची वृध्दीच्या बाबतीत बोलले जाते. प्रत्येक व्यक्ती ग्रोथ रेट, ग्रोथ रेट याचा उल्लेख करीत आहे. आमचा ग्रोथ रेट 8 टक्के आहे, 8.50 टक्के आहे. 9 टक्के आहे, 9.50 टक्के आहे. परंतु ग्रोथ रेट विचारात घेत असताना महागाईचा इंडेक्स वाढणार नाही, विकासाची फळे सर्वसामान्य माणसाला चाखावयाला मिळत्तील. यासंदर्भात सामाजिक न्यायाची भूमिका या बाबी अत्यंत महत्वाची आहे. केंद्र सरकारने महागाईच्या संदर्भात मागील आठवडयात एक समिती नेमली. त्या समितीने काही निर्णय घेतले. तेलाच्या संदर्भात आयात कर कमी केला, निर्यातीच्या संदर्भातील काही कर कमी जास्त केले. पण तेवढया निर्णयाने ही महागाई कमी होईल असे मला वाटत नाही. राज्य सरकारने महागाईच्या संदर्भात विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. आधी एक काळ असा होता की, या देशात सेलर्स मार्केट होते. गेल्या चार, पाच वर्षामध्ये बायर्स मार्केट आले. सेलर्स मार्केट असताना इतकी भाववाढ कधीच झाली नाही, बायर्स मार्केट आल्यानंतर देखील एवढी प्रचंड भाववाढ होते ही अतिशय चिंतेची बाब आहे आणि ती बाब शासनाने लक्षात घेतली पाहिजे अशी माझी विनंती आहे. मी मघाशी सांगितल्या

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी...

प्रमाणे रोजी, कपडा आणि मकान याची महागाई नाही. रिअल इस्टेट पासून ते भाजी पर्यंत या सगळया गोष्टींत महागाई वाढलेली आहे. महागाईतून एकही वस्तू सुटलेली नाही. कोणत्या वस्तूवर भाववाढ झाली नाही असे एखाद्या व्यक्तीने सांगितले तर त्यास कदाचित बक्षीस देता येईल. मध्यंतरीच्या काळात कांदा आणि साखर स्वस्त होते. या देशात कांदा कधी 20 रुपये किलो विकला जातो, तर कधी तो 1 रुपयाने सुध्दा विकला जातो. यासंदर्भात नियोजन करणे किती कठीण आहे याची सर्वांना कल्पना आहे.

सभापती महोदय, रियल इस्टेटचे भाव वाढले आहेत. सदनिकांचे भाव वाढले आहेत. किचन कॅबीनेटमधील वस्तुंच्या देखील किंमती मोठया प्रमाणात वाढल्या आहेत. स्वयंपाकासाठी अन्नधान्य लागते. किचन कॅबीनेटमधील वस्तुंच्या बाबतील मी शासनाचे लक्ष वेधणार आहे. 100 रुपये उत्पन्न असेल तर किचनचे बजेट 20 ते 25 रुपयांपर्यंत असले पाहिजे. परंतु सध्या महागाई एवढी वाढली आहे की, किचनचे बजेट 40 ते 50 रुपयांपर्यंत गेलेले आहे. किचन बजेट वाढल्यामुळे मागणी आणि पुरवठयावर त्याचा परिणाम होतो आहे. खाद्यवस्तुंचे भाव वाढले तर इतर वस्तुची खरेदी कमी होते. कोणाला फ्रीज घ्यावयाचा असेल, किचनसाठी दुसरी कोणती वस्तू घ्यावयाची असेल तर त्या वस्तुंची मागणी कमी होते. या गोष्टींचा संपूर्ण अर्थशास्त्रावर देखील फार मोठा परिणाम होतो. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी शेती संबधीचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला. बियाण्यापासून सुरुवात केली पाहिजे. बियाणे चांगल्या प्रतीचे कसे मिळेल याचा गांभीर्याने विचार केला गेला पाहिजे. केंद्र शासन बियाण्याच्या बाबतीत एक कायदा आणणार होते. या अधिवेशनात तो कायदा आला पाहिजे होता. परंतु केंद्राने बियाण्यासंबंधीचा कायदा अजून आणलेला नाही. बियाणे चांगल्या प्रतीचे मिळणे ही अत्यावश्यक गोष्ट आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आकडेवारी दिली. महाराष्ट्रातील शेतीची आकडेवारी पाहिली तर....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

कापूस महाराष्ट्रात पिकतो त्याच्या तीनपट पंजाबात आणि पाकिस्तानात पिकतो आणि त्याच्या तीनपट चीनमध्ये पिकतो. महाराष्ट्रातील शेतीच्या दृष्टीने विचार केला तर फार महत्वाची बाब म्हणजे पावसाची दया, पावसाची माया, निसर्गाची लहर आणि नजर यावर अवलंबून असलेली अशी ही महाराष्ट्रातील शेती आहे. त्या शेतीच्या संदर्भात एक लाँग टर्म प्लॅनिंग होणे आवश्यक आहे. त्याचा महागाई वाढीवर परिणाम होईल अशातला भाग नाही. परंतु याबाबीकडे लक्ष ठेवावे लागेल. महागाईला जी अनेक कारणे आहेत त्यामध्ये मागणी आणि पुरवठा यामधील असमतोल हे एक महत्वाचे कारण आहे. मागणी ठिकठिकाणी वाढली आणि पुरवठा कमी झाला तर महागाई वाढीवर निश्चितपणाने त्याचा परिणाम होईल. पुरवठा वाढविला तर निश्चित परिणाम होईल. पुरवठा वाढविण्याच्या संदर्भात इतर राज्यातून काही वस्तू आयात कराव्या लागतील, इतर देशातून काही वस्तू आयात कराव्या लागतील त्याबाबत देखील विचार केला पाहिजे. दुसरे एक प्रमुख कारण म्हणजे विजेची टंचाई हे आहे. आणि 15-20 टक्के कृषी पंपाचा वापर विजेच्या तुटवडयामुळे कमी झालेला आहे. 15-20 टक्के कृषी पंपाची वीज कमी वापरली जाते. त्यामुळे त्याचा परिणाम कृषी उत्पादनावर होऊन ते घटलेले आहे. म्हणून महागाई वाढण्यासाठी वीज टंचाई हे देखील एक महत्वाचे कारण आहे. महागाई वाढण्याचे तिसरे कारण म्हणजे डिझेल आणि पेट्रोलची झालेली दरवाढ हे आहे. डिझेल आणि पेट्रोलचे भाव इतक्या मोठया प्रमाणावर वाढले आहेत की, वाहतुकीमध्ये इतका पैसा जातो आहे की त्याठिकाणी माल विकणे आणि 300-400 कि.मी.अंतरावरुन मालाची वाहतूक करणे यामध्ये त्याच्या दुप्पट किंमतीएवढा पैसा वाहतुकीसाठी द्यावा लागतो. ही बाब लक्षात घेतली पाहिजे. तेल आणि इतर वस्तूंची वाहतूक मोठया प्रमाणावर होत असते त्यामुळे त्यांच्या किंमती वाढतात. म्हणून महागाई वाढण्यामध्ये मालाची वाहतूक हाही महत्वाचा विषय लक्षात घेतला पाहिजे.

बाजाराचे झालेले जागतिकीकरण आणि औद्योगिकरण हा सुध्दा यासंदर्भातील एक महत्वाचा मुद्दा आहे. केंद्र शासनाचे आयात आणि निर्यात धोरण आहे त्यासंदर्भात 3 दिवसापूर्वी एक बैठक झ ाली होती आणि त्याबैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयांमुळे खाद्यतेलाचे भाव काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. आयात आणि निर्यातीचे कर देखील अत्यंत महत्वाचे आहेत आणि त्यानंतरचा व्हॅट. खाद्यतेलांची मोठया प्रमाणावर वाढ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

झालेली असेल तर तात्पुरते काही कालावधीसाठी म्हणजे 4, 6, 9 महिन्यांकरिता म्हणजे नवे पीक येईपर्यंत त्याच्यावर व्हॅट कमी केला तर त्याचा देखील फायदा होऊ शकेल. जे सट्टयाचे व्यवहार होत आहेत आणि वायदे बाजाराचा वापर हेजिंगसाठी केला तर त्याला काही हरकत नाही. बाजाराचा देखील परिणाम होत आहे. वायदे बाजाराचा वापर हेजिंगसाठी केला तर काहीच हरकत नाही. परंतु वायदे बाजाराचा वापर जर सट्टेबाजारासाठी होत असेल तर निश्चितपणे त्याचा महागाईवर परिणाम होतो. म्हणून हेजिंग करणे अत्यंत उत्तम. व्यापाऱ्याकडे माल पडून आहे तो विकाला जात नाही म्हणून डिसेंबरमध्ये जो माल विकला जाणार आहे तो त्याने आज विकला त्याचा विमा "Hedging is a work sort of insurance to the traders and to the business." तर त्याचा उपयोग व्हायला पाहिजे. वायदा बाजाराच्या माध्यमातून कृत्रिम टंचाई किंवा सट्टेबाजाराच्या माध्यमातून केली जाते आणि इतके व्होलाटाईल मार्केट आहे की, अन्नधान्याच्या बाबतीत नाही तर सर्वच बाबतीत सट्टे बाजारामध्ये 1000 रुपये कमी-जास्त होणे कोणाला आश्यर्य वाटत नाही. त्याच पध्दतीने खाद्यतेल असतील, खाद्य वस्तू असतील किंवा इतर बाबी असतील तर मार्केटची टेंडन्सी आहे की फार मोठया प्रमाणावर तेजी आणायची,फार मोठया प्रमाणावर मंदी आणायची आणि सट्टयाच्या माध्यमातून पैसे कमवायचे यावर कुठेतरी बंधन आणणे अत्यंत गरजेचे आहे. हे राज्य शासनाच्या हातात नाही. परंतु केंद्र शासनामार्फत याबाबत निश्चितपणाने निर्णय घ्यावा लागेल. अनेक वर्षापासनू विधानसभेत आणि विधानपरिषदेत चर्चा झाली होती त्यावेळी आपण म्हण्तो की, "Remunerative prices to the farmers and reasonable prices to the consumers" पण हे स्वप्न स्वप्नच राहिलेले आहे. एकीकडे शेतकऱ्याला खर्चावर आधारित भाव देत असताना त्याला रिझनेबल रेटमध्ये लोन देण्यासाठी मधली यंत्रणा महत्वाची आहे.

सभापती महोदय, मंत्रिमहोदयांना मी विनंती करतो की, उत्पादन, वाहतूक, साठवण आणि वितरण या चार प्रमुख बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. उत्पादन आपल्या हातात नाही. उत्पादित शेतीच्या माध्यमातून जे येत असेल ते. आज ट्रान्सपोर्टेशन देखील आपल्या हातात राहिलेले नाही. त्याचे दर वाढलेले आहेत. ट्रान्सपोर्टेशनच्या नंतरचा जो भाग आहे म्हणजे जो माल

.....3





श्री. अरुण गुजराथी ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गोडाऊनमध्ये साठवून ठेवतो त्याच्यामध्ये 15-17 टक्के घट त्या साठवणुकीमध्ये येते. एवढा माल वाचविला तर पुरवठा वाढू शकेल.मध्यल्या काळात वेअर हौसिंगच्या माध्यमातून शेतीमध्ये गोडाऊन बांधण्या सबसिडी देणे आवश्यक आहे. यापेक्षा प्रत्येक प्रत्येक शेतकऱ्याला माल साठवून ठेवण्यासाठी गोडाऊन तयार करण्यासाठी नाबार्डच्या माध्यमातून किंवा अन्य माध्यमातून गोडाऊन काढून

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी........

त्यासाठी जास्तीत जास्त अनुदान देऊन शेतकऱ्यांना त्याच ठिकाणी त्यांचा माल ठेवता आला पाहिजे, त्यांना वाहतुकीची गरज भासणार नाही. माल विकल्यानंतर व्यापारी वाहतूक करुन माल घेऊन जाईल. साठवणुकीकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. त्यासाठी अनुदान दिले जावे. कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये गोडावूनसाठी अनुदान देण्यात यावे. आज साठवणुकीमध्ये जो 15 ते 20 टक्के मालाचा ऱ्हास होतो तो वाचविण्यासाठी प्रयत्न करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, ज्यावेळी एखादे राज्य विकसित असते, ज्यावेळी उत्पादन वाढत असते त्यावेळी जर खरेदी शक्ती वाढली नाही, तर भाव वाढतात. उत्पादन वाढत असताना खरेदी शक्ती वाढली पाहिजे. त्याच पध्दतीने महागाई वाढत असताना गरिबांची आणि मध्यमवर्गीयांची खरेदी शक्ती कायम ठेवणे हा देखील अत्यंत महत्वाचा भाग आहे. ज्याला फिक्स इंकम ग्रूप म्हणतो, दरमहा ज्यांना पगार मिळतो, त्यांच्या पगारात प्रत्येक महिन्यात वाढ होत नाही. परंतु खाद्य वस्तूमध्ये होणाऱ्या वाढीमुळे तो अत्यंत अडचणीत येतो. म्हणून खरेदी शक्ती कशी वाढेल? उत्पादन वाढीबरोबर खरेदी शक्ती वाढविणे महत्वाचे आहे. महागाई वाढते त्या प्रमाणात खरेदी शक्ती वाढणे महत्वाचे आहे. काल सभागृहात अंत्योदय योजनेच्या माध्यमातून ज्यांना रेशन कार्ड दिले जाते त्या रेशन कार्डावर कमी दरात वस्तू पुरविल्या जातात. महाराष्ट्रामध्ये अशा रेशन कार्डांची संख्या 34 लाख असल्याचे काल सभागृहात सांगण्यात आले. या रेशन कार्डांची संख्या वाढविण्याच्या संदर्भात प्रयत्न झाला तर गोरगरिबांना जीवन जगणे सुसह्य होईल. त्या संदर्भातील शासनाची जबाबदारी पार पाडण्याबाबत मंत्रीमहोदयांनी प्रयत्न करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, एकीकडे भाववाढ होत आहे अशावेळी सन्माननीय मंत्रीमहोदयांना माझी विनंती आहे, अन्न व नागरी पुरवठा विभाग आपल्याकडे आहे. महागाई वाढत असताना स्वस्त धान्य दुकानातील पुरवठा वाढविला तर बरे होईल. मी टीकात्मक बोलत नाही. परंतु एक तर स्वस्त धान्य दुकाने बंद असतील, उघडत नाहीत. उघडली तर माल नसतो. माल असेल तर चांगल्या पध्दतीचा नसतो. विकत घेतलेले धान्य चुलीवर ठेवले तर शिजत नाही. खाल्ले तर पचत नाही अशी अवस्था आहे. म्हणून स्वस्त धान्य दुकाने कमी असतील तर ती ताबडतोब वाढविण्यात यावी. या स्वस्त धान्य दुकानांबाबत सहकारी चळवळीचा जास्तीत जास्त सहभाग असला पाहिजे. आताच्या काळात महिला बचत गटांकडे ही व्यवस्था दिली पाहिजे. स्वस्त धान्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ 10:40

श्री.अरुण गुजराथी........

दुकानात काळाबाजार होणार नाही ही जबाबदारी शासनाला टाळता येणर नाही. केंद्र शासनाच्या हस्तक्षेपाची गरज नाही. स्वस्त धान्य दुकानातील केरोसीन, साखर खुल्या बाजारात जाणार नाही, तेथील चांगल्या प्रतीचा गहू खुल्या बाजारात जाणार नाही या संदर्भात कडक धोरण स्वीकारले पाहिजे. सन्माननीय मंत्री हे कर्तव्यदक्ष आहेत, 7-8 वर्षापासून मंत्री असल्यामुळे त्यांना चांगल्या प्रकारचा अनुभव आहे. निर्णय चांगले घेत असल्यामुळे या संदर्भात अंमलबजावणी करणे महत्वाचे राहील. ज्यावेळी बाजारात भाववाढ होते त्यावेळी स्वस्त धान्य दुकानातून पुरवठा वाढविला गेला तर निश्चितपणे ग्राहकांना लाभ मिळेल. केंद्र शासनाची या संदर्भात सिलेक्टिव्ह क्रेडिट पॉलीसी आहे. ओपन मार्केट बॉरोईंग आणि बँक इंटरेस्ट रेट हा देखील महत्वाचा भाग आहे. बँकांच्या कर्जावरील व्याज कमी करावे की वाढवावे? न वाढविता ते आहे तसेच राहू द्यावे का? म्हणून निर्णय घेण्यात आला की, महागाई वाढत आहे त्यामुळे व्याजाचा दर कमी करण्यात येऊ नये. सिलेक्टिव्ह क्रेडिट पॉलीसी, ओपन मार्केट बॉरोईंग आणि बँक इंटरेस्ट रेट या महत्वाच्या बाबी आहेत. या बाबी राज्य शासनाच्या अखत्यारित येत नसल्यातरी केंद्र शासनाला सांगता येईल आणि त्या पध्दतीने जास्तीत जास्त यावर नियंत्रण आणणे हे देखील महत्वाचे आहे. शासकीय हस्तक्षेप ज्याठिकाणी करणे गरजेचे आहे तिथे तो केला पाहिजे. कृत्रिम टंचाई अजिबात निर्माण होणार नाही या संदर्भात प्रयत्न केला पाहिजे. वितरण व्यवस्था बळकट करणे हे या भाववाढीला उत्तर आहे. सभागृहाच्या माध्यमातून मी विनंती करतो की, झालेली भाववाढ ही केवळ खाद्य वस्तूंची नाही. ओव्हरऑल, ऑलराऊंड, स्पाईरलिंग प्राईजेस अशी ही भाववाढ आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

पण आपण या खाद्य वस्तुंच्या संदर्भातील आपली जबाबदारी चांगल्याप्रकारे पार पाडणार असामला विश्वास वाटतो. म्हणून त्या प्रमाणात आपण उत्पादन वाढवू, साठवणुकीची व्यवस्था करु तसेच वितरण व्यवस्था देखील चांगल्या प्रकारे बळकट केली तर याचा फायदा सर्वासामान्यांना मिळू शकेल. कारण आजची कंझुमर इंडेक्स प्राईज पाहिली तर शेतमजुरांचा प्राईज बेस इंडेक्स सुमारे 12 टक्क्यावर पोहचला आहे. भविष्यात तो 11, 10 आणि 9 टक्क्यावर कसा आणता येईल, याचाही विचार करणे आवश्यक आहे. घाऊक किंमत निर्देशांक आज 6.05 टक्क्यापर्यंत आला आहे तो सुध्दा कसा कमी होईल, यादृष्टीनेही विचार करणे, उत्पादन वाढविणे आणि पुरवठा करणे व त्याच्या माध्यमातून महागाईवर रोख आणणे या सर्व बाबी विचारात घेता येतील असे या ठिकाणी मी सांगू इच्छितो. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

-------------

......2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, जीवनावश्यक वस्तुंच्या दरात झालेली प्रचंड वाढ, परिणामी महागाईमुळे जनता खासकरुन महिला त्रस्त झालेल्या आहेत. या विषयाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत आणि इतर सन्माननीय सदस्यांनी जो नियम 260 अन्वये प्रस्ताव आणला आहे त्यात जे म्हटले आहे की, बोकाळलेला भ्रष्टाचार, गैरव्यवहार, वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवणे शासनाला अशक्य होणे आणि त्यामुळे जनतेच्या मनात पसरलेली असुरक्षिततेची भावना व याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी असा जो उल्लेख केला आहे, त्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी व माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, गेल्या 13 महिन्यात 6.8 टक्क्याने भाववाढ झालेली आहे आणि त्याची तुलना केली तर मुख्यत: चार गोष्टींमध्ये त्याची विभागणी आपण करु शकतो. त्यात प्रथम धान्याची झालेली भाववाढ हा एक भाग. दुसरा भाग म्हणजे भाज्यांचे भाव देखील पराकोटीचे वाढलेले आहेत आणि दुसऱ्या बाजूला शेतकऱ्याला किंवा भाज्या उत्पादित करणाऱ्या लोकांना भाजी हा पदार्थ नाशिवंत असल्यामुळे आणि त्याची साठवणुकीची व्यवस्था नसल्यामुळे त्याचा भाव मिळत नाही. या बाबींचा वितरण विभागाशी जसा संबंध येतो तेवढाच पणन विभागाशी सुध्दा संबंध येतो. एका अर्थाने ही दोन्ही विभागांची सामुहिक जबाबदारी आहे असे म्हटले तरी चुक ठरणार नाही. कारण भाज्यांचे भाव देखील पराकोटीला गेले आहेत. त्याची तुलना केली तर सध्या भाज्या बाजारात उपलब्ध नाहीत असेच चित्र दिसून येते. त्यानंतर मांसाहाराच्या बाबतीत सुध्दा भाववाढ झालेली असून या विषयावर सदनात अनेक वेळा मांसाहारात झालेली भाववाढ आणि त्याचा तुटवडा याबाबतची चर्चा केली व करण्यात येते. तसेच छोट्या व महत्वाच्या अशा जीवनावश्यक वस्तू, ज्या वस्तुंबाबत फारसे आपण बोलत नाही अशा चहा, मीठ अथवा मसाले आणि अगदी साधी कुंकवासारखी गोष्ट म्हटली तरी या वस्तुंमध्ये सुध्दा भाववाढ झाल्याचे दिसून येते. यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांना मी विचारले तर ते कदाचित यावर प्रकाश टाकू शकतील परंतु कुंकवामध्ये सुध्दा भेसळ करणाऱ्या व्यापाऱ्यांची साखळीच तयार झाल्याचे दिसून येते. माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे की, ज्यावेळी आपला गावागावात सत्कार होतो, स्वागत करण्यात येते त्यावेळी पाच वर्षापूर्वीचा विचार केला आणि पाच वर्षानंतर म्हणजे आताची परिस्थिती यात फार मोठा बदल दिसून येईल. कारण पूर्वी कपाळाला कुंकू लावल्यानंतर ते आपण

.......3

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

थोड्या वेळाने धुऊन टाकले अथवा त्याला पाणी लावले तर स्कीनला जळजळ होत नव्हते, खाज येत नव्हती परंतु आताचे कुंकू काढल्यानंतर मात्र जळजळ होते आणि खाज सुध्दा येते आणि त्याचे डाग पडतात, आणि ॲलर्जी होते. त्याचे कारण म्हणजे त्यात अशी घाणेरडी वस्तू मिसळलेली असते की ज्याचा माणसाला त्रास होईल, या गोष्टीकडे लक्ष घातले पाहिजे. त्याचबरोबर रॉकेल, गॅस आणि तेल यांची सुध्दा गंभीर परिस्थिती आहे. रॉकेल अनेक दुकानात मिळतच नाही. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी अत्यंत परखडपणे आपले मत मांडले. दुर्देवाने त्यांचे परखड मत बऱ्याचशा लोकांनी विमानात कापसाचे बोळे घालून बसतात त्याप्रमाणे या काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या सरकारने सुध्दा कानात कापसाचे बोळे घातले असल्याने ऐकले नाही, म्हणून त्यांच्या परखड बोलण्याचा उपयोग काहीच होत नाही. मला अभिमानाने उल्लेख करावासा वाटतो की, शिवशाही सरकार असतांना राज्यात पाच जीवनावश्यक वस्तुंच्या बाबतीत निर्णय घेऊन त्या किंमती स्थिर ठेवण्यात यश मिळविले होते. परंतु आता केंद्रात यु.पी.ए. सरकार आणि राज्यात आघाडी सरकार यांनी साठे बाजाराला अनुकूल धोरण घेतल्यामुळे सामान्य माणूस व मध्यमवर्गीयांच्या दुःखाला तर पारावारच राहिला नाही. या संपूर्ण विश्वात आता गुन्हेगारांचा शिरकाव झालेला आहे त्यात भेसळ करणारे, रॉकेलचा साठा करणारे लोक त्याचबरोबर ठराविक वेळी ठराविक धान्य बाजारातून गायब करणारे यांचे सूत्रधार व संरक्षक कोण आहेत असा विचार केला तर त्यांची चार बोटं बाहेर असले तरी एक बोट मात्र शासनामध्ये आहे, अन्यथा वर्षानुवर्षे त्यांना संरक्षण मिळणार नाही.

<u>(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. अरविंद सावंत)</u>

यानंतर श्री. जुन्नरे........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

म्हणून सार्वजनिक वितरण व्यवस्थेबरोबरच गव्हाच्या किमतीच्या संदर्भात देखील मी माझे विचार व्यक्त करणार आहे. या विषयावर बोलत असतांना ब-याच वेळेस मनाची द्विधा मन:स्थिती होते. आंतरराष्ट्रीय स्थिती, चंगळवाद , आर्थिक उदारिकरण याची आपण उदाहरणे देतो. परंतु संवेदनहिनता आणि अंतकरणामध्ये दुस-याच्या बद्दलची चांगली भावना यासंदर्भात उदारीकरणावर आपल्यावर कोणी बंधने आणलेली नाहीत. हिंदुस्थानमध्ये 11 मिलियन टन गव्हाचे उत्पादन होत असतांना हिंदुस्थानमध्ये मध्ये गव्हाची गरज 15 मिलियन टन आहे अशी आकडेवारी शासनानेच दिलेले आहे तसेच डीएनए सारख्या वृत्तपत्रात देखील ही आकडेवारी आलेली आहे. गव्हाची थोडी कमतरता असल्यामुळे आपण 1.8 मिलियन टन गव्हाची आयात केली. शिवसेनेने विधीमंडळात आणि रस्त्यावर यासंदर्भात आंदोलन केले होते, शिवसेना महिला आघाडीने महागाईच्या संदर्भात मंत्रालयावर धडक देखील मारली होती त्यावेळेस आपण दरवाजे लावून आतमध्ये बसला होता, त्या दिवशी मंत्रालयातील दालनातून कोणीही मंत्री बाहेर आले नव्हते. किती वेळ दरवाजे बंद होते हे या ठिकाणी समजले पाहिजे कारण सरकार म्हणते की, आम्ही दरवाजे बंदच केले नव्हते. ठीक आहे. आपण गहू विथ्ड्रा केला असे म्हणता परंतु हा गहू परत कसा आणावयाचा हे आपण व्यापा-यांना सांगितले नाही. परिणामी व्यापा-यांनी सगळया लोकांवर सक्ती केली की, तांदूळ पाहिजे असेल तर तुम्हाला गहू घ्यावाच लागेल. मालेगाव, नाशिक, लातूर, सोलापूर थोडक्यात म्हणजे आम्ही जेथे जेथे गेलो तेथे तेथे येऊन लोक आम्हाला सांगत होते की, आम्हाला तांदूळ पाहिजे होते परंतु सक्तीने आम्हाला गहू सुध्दा घ्यावा लागला. आम्हाला ही माहिती लोक देतात तशी माहिती आपल्याकडे का आली नाही? ही बाब जनतेने आपल्याला सांगितली होती परंतु आपल्या कानात कापसाचे बोळे घातलेले असल्यामुळे जनतेचे म्हणणे आपल्या कानावर आलेच नाही. ही बाब आम्ही विधीमंडळात उपस्थित केली होती तरी सुध्दा आपल्या कानात बोळेच घातलेले होते. आपण बाहेरगावी जातात तेव्हांही आपल्या कानात कापसाचेच बोळे असतात म्हणजे आपले कान बंद करुन तोंड आणि हातच उघडे आहे काय? वाढत्या किंमतीची आणि गव्हाच्या सक्तीच्या तक्रारी गृहिणी करतात त्याची माहिती आपल्या पर्यंत पोहचतच नाही का? आज रेशन दुकानदारांसमोर जनता असहय आणि अगतिक झालेले आहेत. अकोला या ठिकाणी लता देशमुख या बाईने आत्मदहन केले. त्यांची मागणी होती की,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ KGS/ प्रथम श्री. खर्चे...... 10:50

डॉ. नीलम गो-हे...

विधवा-निराधार ज्या एकटया स्त्रिया आहेत, ज्यांनी काम केले नाही तर घरातील चूल पेटत नाही अशा 88 लाख स्त्रिया पूर्ण महाराष्ट्रात आहेत. ही आकडेवारी 2002 मधील मानव विकास अहवालातील आहे. रेशनवर 2 किलो धान्य मोफत मिळावे अशी या स्त्रियांची मागणी होती. माननीय हर्षवर्धन देशमुख यांनी अकोला या ठिकाणी स्वत: जाऊन माहिती घेतली परंतु अन्नव नागरी पुरवठा मंत्री श्री. सुनील तटकरे यांना या ठिकाणी जाण्यासाठी काही वेळ मिळाला नाही. परंतु यासंदर्भातील निवेदन माननीय तटकरे साहेबांपर्यंत तरी आलेले आहे काय? या लोकांनी डिसेंबरच्या अधिवेशनात सरकारकडे निवेदन दिले होते. परंतु यासंदर्भात एकही अधिकृत घोषणा शासनाकडून झाली नाही. पूर्वीच्या काळी दुष्काळात लोक आपल्या मुलांना विकत होते त्यामुळे असे जे निराधार लोक आहेत, जे रस्त्यावर हाल हाल होऊन मरत असतांना देखील शासनाकडून साधे एक स्टेटमेंट येत नसेल तर ते योग्य नाही. आम्हाला 2 किलो धान्य देण्यामध्ये या या अडचणी आहेत असे काही तरी स्टेटमेंट शासनाकडून व्हावयास पाहिजे होते परंतु कसल्याही प्रकारचे स्टेटमेंअ शासनाकडून झाले नाही.

सभापती महोदय, शिवसेना महिला आघाडीला माननीय गृहमंत्र्यांनी दिवाळीच्या वेळेस सणासुदीच्या वेळेस पॅकेज देऊ असे आश्वासन दिले होते. या पॅकेजमध्ये रेशनमध्ये रवा, साखर अशा वस्तू सणावारी देऊ. परंतु माननीय गृहमंत्र्यांनी जे आश्वासन दिले होते ते आश्वासन हे सरकार पूर्णपणे विसरुन गेलेले आहे. मंत्रालयात जे आश्वासन आम्हाला दिले होते त्याची सुध्दा अंमलबजावणी करण्यात आली नाही.

सभापती महोदय, मी आजच्या डीएनए या वृत्तपत्रात माननीय शरद पवार साहेबांचे स्टेटमेंट वाचलेले आहे. त्यांनी असे स्टेटमेंट केलेले आहे की, "दक्षिणेकडील लोक जास्त चपात्या खावयास लागले आणि उत्तरेकडील लोक जास्त तांदूळ खावयास लागले." सभापती महोदय, लोकांनी काही खायचच नाही का? वर्षानुवर्षे जे लोक तांदुळ खात होते त्यांनीच तांदुळ खाल्ला पाहिजे का? गहू खाणा-यांनी फक्त गहूच खाल्ला पाहिजे काय? आपण मात्र चिकन, थाई कबाब खाण्यास मोकाट सुटलेला आहात. एखाद्या वर्तमानपत्राने चूक केली असेल तर त्यासंदभा माननीय मंत्रीमहोदयांनी कृषी मंत्र्यांच्या स्टेटमेंटच्या संदर्भात स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता आहे. एक मोठया राजकीय नेत्याच्या संदर्भात परत परत वक्तव्य येत असल्यामुळे मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी त्यासंदर्भात

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता आहे. आम्ही राज्यवादी आहोत आणि तुम्ही राष्ट्रवादी आहात असे आपण सांगत असतात त्यामुळे आपण अशी स्टेटमेंट कशी काय चालवून घेत आहात? आपण काय डोळयावर पट्टया बांधून घेतलेल्या आहेत काय? त्यामुळे यासंदर्भात आपले काय मत आहे यासंदर्भातील खुलासा सभागृहात होण्याची आवश्यकता आहे. मला शेवटी सांगावयाचे आहे की, हा प्रश्न 5 प्रश्नाच्या संबंधात आहे. हातामध्ये वेळ कमी आहे याची मला जाणीव आहे. त्यामुळे महागाईच्या संदर्भात धोरण बदलण्याची आवश्यकता आहे, कारभार स्वच्छ करण्याची आवश्यकता आहे, रेशन दुकानावरील रॉकेल आणि धान्याला पाय फुटतांना दिसत आहेत. रॉकेल कोठे जाते, कोणत्या पेट्रोल पंपावर जाते याची माहिती संपूर्ण महाराष्ट्राला आहे

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 10.55

डॉ.नीलम गो-हे..

सभापती महोदय, यानंतर मला पणन व्यवस्थेसंबंधी येथे बोलावयाचे आहे.सकाळ या वर्तमानपत्राने "ॲग्रोवन" नावाची जी पुरवणी सुरु केलेली आहे त्यातील अग्रलेख मला एका कार्यकर्त्याने पाठविला आहे. त्यामध्ये मध्यंतरी एक बातमी प्रसिध्द झाली होती. नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये श्री.गोडसे नावाच्या एका शेतकऱ्याने दलालांची रिंग तोडली म्हणून या बाजारातील दलालांनी त्याला मारहाण केली होती . या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की शासनाने जो मॉडेल ॲक्ट आणला आहे त्यातील दहा किलोमिटरच्या अंतरासंबंधी जी त्रृटी राहिलेली आहे ती दूर करण्यात आली पाहिजे. तसेच फळांचे उत्पादन करणा-या शेतकऱ्यांनासुध्दा नाशिकच्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आतमध्ये मारहाण करण्यात आली आहे. कृषी उत्पन्न बाजार समतीमध्ये पोलीस स्टेशन ठेवण्यात येईल असे सांगण्यात आले होते परंतु ते ठेवण्यात आलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी हे उत्तर महाराष्ट्रातील आहेत सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत भाषण करीत असतांना बहिणाबाईच्या कविता सांगत होते. त्यावेळी आमच्या मनात जे काही भाव होते त्यापेक्षासुध्दा अधिक उदात्त असे भाव आपल्याही मनामध्ये होते नाशिक हे उत्तर महाराष्ट्रामध्ये आहे तेव्हा तेथे जर शेतक-याचे रक्त सांडत असेल ,त्यांना मारहाण केल जात असेल तर त्यांना आपण कशा पध्दतीने न्याय देणार आहात ? सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.सुनील तटकरे याची या बाबतीत जेवढी जबाबदारी आहे तेवढीच जबाबदारी माननीय पणन मंत्र्यांची देखील आहे. आज जीवनावश्यक वस्तुंची भाववाढ झालेली आहे त्यामुळे सामान्य गृहिणींचे हाल होत आहेत.. एका बाजूला शेतकऱ्यांनी उत्पन्न केलेल्या शेंतमालाला योग्य किंमत मिळत नाही आणि दुसऱ्या बाजूला सर्व सामान्य ग्राहकांना महाग वस्तू घ्याव्या लागत आहे. तेव्हा या बाबतीत माननीय पणन व्यवस्थेशी संबंधित देखील शासनाने आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये काही त्रृटी आहेत त्याप्रमाणे भेसळ करणारे जे लोक आहेत त्यांच्या कारखान्यावर नियंत्रण आणण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे याबाबतीत देखील खुलासा करावयास पाहिजे.. या संदर्भात प्रश्न विचारण्यात आल्यानंतर माननीय मंत्री महोदय सांगतात की फूड ॲन्ड ड्रग्ज कन्ट्रोल मार्फत भेसळीवर व किंमतीवर नियंत्रण घालण्याचा प्रयत्न केला जातो परंतु आज औषधांच्या किंमती मोठया प्रमाणावर वाढलेल्या आहेत. औषध कंपन्याबरोबर त्यांचे साटेलोटे असते हे आपल्याला माहीत आहे. त्यामुळे

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे..

किंमती नियंत्रित ठेवण्यासाठी काहीही प्रयत्न होत नाही या ठिकाणी मी मोठया कंपन्याच्या वस्तूच्या किंमती किती वाढलेल्या आहेत याचे एक दोन उदाहरणे देऊ इच्छिते. 250 ग्रॅमच्या चहा पावडरसाठी मागच्या वर्षी 50 रुपये द्यावे लागत होते परंतु आता 60 ते 65 रुपये द्यावे लागत आहेत. भांडी घासण्याची पावडर 15 रुपये भावाने मिळत होती आता त्यासाठी आता 20 रुपये द्यावे लागत आहे त्याचबरोबर टाटाचे मीठ गेल्यावर्षी पाच ते सहा रुपये किलो या दराने विकले जात होते परंतु आता त्यासाठी 10 रुपये द्यावे लागत आहे. ज्या मोठ मोठया कंपन्या आपल्या मालाच्या किंमती सतत वाढवत असतात तेव्हा याबाबतीत त्यांना शासन काही विचारणार आहे किंवा नाही ? की त्यांनी कितीही किंमती वाढवाव्यात यासाठी त्यांना मोकळे रान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. कोणत्याही वस्तूची किंमत वाढवत असतांना त्याबाबतीत काय कारणमिंमासा आहे याची विचारणा त्या कंपन्याना किंवा त्यांच्या प्रतिनिधींना शासनामार्फत केली जाणार आहे किंवा नाही ? शासनामध्ये जर हिंमत असेल आणि शासनामध्ये जर सक्षमता असेल तर अमुक वस्तू तयार करण्यासाठी किती खर्च येतो आणि ती वस्तू विकण्यासाठी किती किंमत ठरविण्यात आलेली आहे या बाबतीत मोठया कंपन्यांना जाब विचारला जाणार आहे किंवा नाही . कोणत्याही वस्तूची भाववाढ करण्याची कारणे काय आहेत याबाबतीत त्या कंपन्याच्या प्रतिनिधींना शासनामार्फत विचारणा केली जावी असे मला सांगावयाचे आहे. केवळ ग्राहकाना वाऱ्यावर सोडून देता कामा नये.सभापती महोदय, ज्या काही मल्टी नॅशनल कंपन्या आहेत त्यांनी दिल्लीमध्ये वाटा दिल्यानंतर संपूर्ण देशातील लोकांनी घाटा सहन करावयाचा काय ? त्या कंपन्याना वस्तूचे भाव वाढविण्यासाठी मोकळे रान उपलब्ध करुन दिलेले आहे काय ? तेव्हा भाव वाढीच्या संदर्भात त्या कंपन्यावर निर्बंध आणले पाहिजेत व त्यांना या बाबतीत विचारणा केली गेली पाहिजे.जीवनावश्यक वस्तूच्या वाढलेल्या किंमतीमुळे शिवसेना महिला आघाडी गुढीपाडव्याच्या दिवशी आंदोलनाची गुढी उभारणार आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेमध्ये भाग घेत असतांना शेवटी मला एवढेच सांगावयाचे आहे की, सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.सुनील तटकरे हे आमच्या समोर उपस्थित आहेत. ते आमचे स्नेही आहेत. ते चांगले आहेत. त्यांच्याकडे मी व्यक्ती म्हणून पहात नाही तर श्री. सुनील तटकरे आता स्नेहीच्या भूमिकेपासून दु:शासनाच्या भूमिकेकडे चालले आहेत. म्हणून मी आता त्यांच्या राजीनाम्याची मागणी करीत आहे.जनतेच्या मनामध्ये जो काही राग आहे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

त्यामध्ये कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेस भस्मसात झाल्याशिवाय राहणर नाही अशा प्रकारे जनतेच्या मनामध्ये जी अस्वस्थता आहे ती व्यक्त करण्याची संधी आम्हाला सभागृहामध्ये चर्चेच्या निमित्ताने मिळालेली आहे. या सभागृहामध्ये चांगले वातानुकुलीत वातावरण आहे परंतु बाहेर मात्र तसे वातावरण नाही याची मला मुद्दाम जाणीव करुन द्यावयाची आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते. धन्यवाद. जय महाराष्ट्र.

----

**तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत)** : सर्व सन्माननीय सदस्यांना मला एक विनंती करावयाची आहे की,या प्रस्तावावरील माननीय मंत्री महोदयांचे उत्तर 11.30 वाजता सुरु करावयाचे आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात भाषण करावे.

श्री. सय्यद जामा :सभापति महोदय, जो सम्माननीय सदस्य पहले बोलते हैं उन्हें बोलने के लिए असीमित समय मिलता है और जो बाद में बोलने के लिए खड़े होते हैं उन्हें कम समय मिलता है, उनके लिए समय का बंधन डाल दिया जाता है. यह भेदभाव न हो इसलिए आप कोई उपाय करें या कामकाज सलाहकार समिति द्वारा इस संबंध में कोई उपाय किया जाना चाहिए. क्योंकि हम सदस्यों के साथ अन्याय हो रहा है, ऐसा मुझे लगता है.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सभापतींच्या दालनात सकाळी 11.30 वाजता एका महत्वाच्या विषयासंबंधी बैठक बोलाविण्यात आली आहे. तेव्हा ही चर्चा 11.30 वाजता थांबविण्यात यावी आणि दुपारी पुन्हा ही चर्चा सुरु करावी. या चर्चेत भाग घेण्यासाठी ज्या सन्माननीय सदस्यांनी नावे दिलेली आहेत त्यांनाच फक्त बोलण्याची संधी द्यावी .नवीन नावे दिलेल्या सन्माननीय सदस्याना बोलण्याची संधी द्यावी असे मी आपल्याला सांगत नाही.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, नियम 260 अन्वये विजेच्या प्रस्तावावर दुपारी चर्चा ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे सध्या ज्या प्रस्तावावरील चर्चा सुरु आहे ती सकाळच्या सत्रात संपवावी लागणार आहे. अन्यथा दुपारी त्या प्रस्तावावर चर्चा होऊ शकणार नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात भाषण करावे आणि मुद्दांची पुनरावृत्ती टाळावी.यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवले यांनी भाषण सुरु करावे.

नंतर श्री.सुंबरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, या विषयावर मी माझे मत मांडण्यासाठी उभा आहे. एखाद्या इमारतीचे भवितव्य तिच्या पायावर अवलंबून असते, एखाद्या वृक्षाचे अस्तित्त्व त्याच्या मूळावर अवलंबून असते तसेच राज्याचे अस्तित्त्व हे सर्वसामान्य माणसाच्या पाठिंब्यावर अवलंबून असू शकते. या बाबतीत राज्य शासनाला सर्वसामान्य माणसांचा पाठिंबा आहे त्यामुळे या महागाईचा विचार करीत असताना सर्व सामान्य माणसाचा विचार सरकारने करावा अशी आग्रहाची विनंती मी या निमित्ताने राज्य सरकारला करणार आहे. कारण सामान्य माणसांच्या हिताकडे थोडे दुर्लक्ष झाले तर अनेक राज्ये उन्मळून पडले आहेत तेव्हा हा इतिहास लक्षात घेतल्यानंतर या गोष्टीचा आपण गांभीर्याने विचार करावा अशी आग्रहाची विनंती मी माननीय मंत्री महोदयांना करणार आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.अरूणभाई गुजराथी यांनी या विषयावर त्यांचे विचार मांडले आहेत. ते अर्थतज्ज्ञ आहेत त्यामुळे आर्थिकदृष्ट्या आणि शास्त्रीयदृष्ट्या चांगल्या प्रकारे याबाबत विवेचन करू शकतात, तितके मी करू शकणार नाही. परंतु ढोबळमानाने काही गोष्टी माझ्या डोळ्यासमोर येतात त्या मी येथे मांडणार आहे. त्यापैकी पहिली गोष्ट म्हणजे लोकसंख्येचा विचार या संदर्भात आपण गांभीर्याने केला पाहिजे. कारण शेवटी राष्ट्राचे धोरण ठरवित असताना खाणारी तोंडे वाढली आणि हाताला काम मिळाले नाही तर महागाई वाढत जाणार आहे. त्यामुळे लोकसंख्येचा कधी तरी विचार करून, या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी आपण काही राष्ट्रीय धोरण ठरवून त्याचा अवलंब करणार आहोत की नाही ? हा महत्त्वाचा आणि गांभीर्यपूर्वक प्रश्न आज आपल्यासमोर उभा आहे. त्यामुळे हा शिवसेनेचाच केवळ विचार नाही तर याबाबत राष्ट्रीय धोरण ठरविण्याची वेळ आहे असे मला सांगावयाचे आहे. तेव्हा लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीनेही राज्य सरकारने विचार करावा. कारण या राज्याचे शेतीतील उत्पन्न वाढल्याशिवाय, शेतकरी सुखी झाल्याशिवाय महागाईला आळा बसणार नाही. म्हणूनच मला या ठिकाणी गांभीर्यपूर्वक काही सूचना कराव्याशा वाटतात.

सभापती महोदय, राष्ट्रीय धोरणात नद्या अडविण्याचे काम आपण करणार आहोत असे मध्यंतरी वर्तमानपत्रांतून आमच्या वाचनात आले होते. आता देशातील सगळ्याच नद्या केव्हा अडविल्या जातील हे आता सांगता येणार नाही. परंतु किमान आपल्या राज्यातील नद्या तरी अडविता येऊ शकतात काय याचा विचार आपण निश्चितपणे करावा.

**तालिका सभापती** (श्री.अरविंद सावंत) : नद्या अडविणे नव्हे, नद्या जोडणे ...

...... एम 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश नवले : नद्या अडविणे आणि नंतर जोडणे असे व्हायला पाहिजे. कारण शेवटी त्या कोठे तरी अडविल्या जातात म्हणूनच त्या जोडल्या जाऊ शकतात. तेव्हा नद्या जोडण्याचे हे काम आपण आपल्या राज्यात केले तर चंद्रभागा गोदावरीला मिळेल आणि गोदावरी ही वैनगंगेपर्यंत जाईल. अशा प्रकारे हातामध्ये हात घालून या सगळ्या नद्या आपल्या राज्यात सर्वत्र भ्रमंती करू लागल्या तर कदाचित उत्पन्न वाढेल आणि उत्पन्न वाढल्यानंतर शेवटी महागाईच्या भस्मासूराला आळा घालता येऊ शकेल. सभापती महोदय, यामध्ये दोन पर्याय आहेत. एक म्हणजे नैसर्गिकरित्या नद्यांना अडविणे आणि दुसरा पर्याय म्हणजे कृत्रिमरित्या पाणीसाठे तयार करणे, पाण्याचे साठे उभे करणे. ज्याप्रमाणे गावतलाव वा शेतीतळी आहेत, ती महाराष्ट्र शासन तयार करीत आहे. अशा तऱ्हेने शेती तळ्यांची संख्या राज्यात वाढली, गावा-गावामध्ये आणि शेता-शेतामध्ये विहिरींची संख्या वाढविली तर भूगर्भातील पाण्याची पातळी वाढेल आणि पर्यायाने शेतीतील उत्पन्न वाढून राष्ट्रीय उत्पन्नात भर पडेल आणि महागाईला आळा घालता येऊ शकेल. सभापती महोदय, या निमित्ताने जे साठेबाज आहेत त्यांच्याबाबतीतही गांभीर्याने विचार आपण केला पाहिजे. कारण लोकांच्या पोटात जाणार असलेल्या अन्नाचा या साठेबाजांनी साठा करायचा आणि पोटावर मारायचे आणि गोरगरीबांकडे दुर्लक्ष करायचे असे त्यांचे उद्योग असतील त्यांना कठोरपणे तुरूंगात डांबण्याची काही तरतूद करता आली तर आपण करावी आणि ते 5-10 वर्षे बाहेर पडू शकणार नाहीत अशी व्यवस्था त्यातून आपण करावी. असा दरारा निर्माण करण्याचे सामर्थ्य राज्य शासनामध्ये आहे यावर माझा विश्वास आहे. तेव्हा असा दरारा आणि वचक आपण निर्माण करावा की, साठेबाजांना वाटले पाहिजे की, आपण साठा केला, गोरगरीबांचे अन्न चोरले, लपवून ठेवले तर आपल्याला 10 वर्षे तुरूंगातून बाहेर पडता येणार नाही. अशा प्रकारची कारवाई आपण केली तर महाराष्ट्रात आणि गोरगरीबांमध्ये एक चांगल्या प्रकारचा संदेश जाऊ शकतो. त्यादृष्टीने खरे तर प्रयत्न करणे गरजेचे आहे. सभापती महोदय, आता बुद्धिमंतांनी या संदर्भात राज्य सरकारला सूचना कराव्यात. बुद्धिवंतांचा आक्रोश हा सरकारला मार्गदर्शक ठरू शकतो. परंतु या देशातील बुद्धिवंत कोठे लपून बसले आहेत काही कळत नाही. बुद्धिवंतांची सगळी सक्रियता महत्वाची आहे. शेवटी एखादे अरूण गुजराथी साहेब असतीलही, पण बहुतांशी बुद्धिवंत हे तसे शांत आहेत. तेव्हा बुद्धिवंतांची

..... एम 3 ..

.



KBS/KGS/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 11:00

श्री. नवले .....

क्रियाशीलता नेहमीच राज्य सरकारला सहाय्यकारी ठरू शकते. तेव्हा त्यांनी क्रियाशीलता दाखविली तर महागाईवर आपण नियंत्रण ठेवू शकू. सभापती महोदय, या राज्यात उंदीर आणि रानमांजरे खाऊन जगणारीही काही मुले-माणसे आहेत. त्यासाठी त्यांनी पिंजरे लावायचे, उंदीर, रानमांजरांची वाट पहावयाची आणि ते मिळाले की त्यावर पोट भरायचे हा उद्योग ही माणसे करीत असतात. आपणही आपल्या भाषणामध्ये तो उल्लेख केला आहे आणि यापूर्वीही या महाराष्ट्रात तसे चित्र पहावयास मिळत होते. ...

( यानंतर श्री.सरफरे ....एन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले....

आणि त्यामुळे पक्ष कोणताही असो, राज्य कुणाचेही असो परंतु मानवाला हा लागलेला कलंक पुसून टाकण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. एकीकडे आपण मंगळावर पाऊल ठेवण्याच्या गोष्टी करतो दुसऱ्या बाजूला आपल्याला पोट भरण्यासाठी उंदराची प्रतिक्षा करावी लागते. मग गणपती डोळयासमोर उभा राहतो, कुणी सांगतो गणपती दूध पितो. हे प्रकार आता आपल्याला बदलावे लागतील याकरिता मी राज्य सरकारला विनंती करणार आहे. दारिद्रय रेषेखालील जीवन जगणाऱ्या लोकांची इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये संख्या कमी असली तरी दारिद्रय रेषेखालील लोकांची संख्या कमी झाली पाहिजे. कारण दारिद्रय रेषेची सरहद्द ओलांडून लोक बाहेर येतील त्यावेळी जगाचे नेतृत्व करण्याचे सामर्थ्य या राज्यामध्ये आणि केंद्रामध्ये येईल. जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता व सामर्थ्य या देशामध्ये यावे अशी मी अपेक्षा करतो. हे केव्हा होईल? जेव्हा या देशामध्ये गरीबी नांदणार नाही. आज देवासमोर गेल्यानंतर नारळाचा विचार बाजूला पडतो आणि नवरा बायकोला म्हणतो की, आता आपण चार चुरमूरे देवासमोर ठेवू. असा विचार ज्यावेळी पुढे येतो त्यावेळी महागाई आपल्या घरामध्ये निश्चितपणे नांदत आहे असे गृहीत धरावे लागेल. आणि म्हणून अनाहूतपणे येणाऱ्या महागाईला सांगावे लागेल की, "मी तुला बोलावले नाही तरी तू नांदायला आली, तुझ्याबरोबर संसार करण्याची माझी इच्छा नाही तू चालती हो." त्यावेळी आपण खऱ्या अर्थाने "हे गोरगरीबांचे राज्य आहे" असा संदेश देवू शकतो. तेव्हा या दृष्टीने आमच्या नेत्या श्रीमती सोनियाजी गांधी यांनी महागाईविषयी अत्यंत गांभीर्याने शासनाला काही सूचना केल्या. त्यादृष्टीने राज्य शासनाने स्वत:ची क्रियाशीलता दाखवावी आणि पाठिंबा दर्शवावा. शेवटी देवासमोर दिवा लागला पाहिजे, कंदिलाच्या प्रकाशात समई प्रज्वलित झाली पाहिजे, दिवाळीचे मिणमिणते दिवे लोकांच्या डोळयासमोर दिसले पाहिजेत त्यासाठी आपण प्रयत्न करावेत. तसे केले तर निश्चितपणे या राज्य सरकारच्या पाठीमागे सर्वसामान्य माणसाचा पाठिंबा राहील. गोरगरीबांची चूल पेटल्याशिवाय राज्याचा कारभार गोरगरीबांसाठी आहे असे होणार नाही. त्यामुळे हे राज्य गोरगरीबांचे आहे.प्रसंगी माझा खजिना रिता करावा लागला तरी चालेल,परंतु मी गोरगरीबांसाठी प्रयत्नशील राहीन असे म्हणणारे हे शासन आहे असे आम्ही गृहीत धरतो व खात्री बाळगतो. त्यामुळे त्यादृष्टीने आपण पाऊल टाकावे अशी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, 9 वर्षाच्या कालखंडानंतर मी या सभागृहामध्ये आलो

...2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. सुरेश नवले...

आहे. त्यामुळे माजी आमदारांच्या व्यथा काय असतात याची मला पूर्ण जाणीव आहे. आज केंद्र सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू केला आहे. परंतु महाराष्ट्रातील अनेक माजी आमदारांची दयनिय परिस्थिती आहे? अनेक माजी आमदारांच्या सौभाग्यवती रोजगार हमी योजनेच्या कामावर आढळतात. त्यामुळे याबाबत आपण गांभीर्याने विचार करावा. ज्याप्रमाणे कर्मचाऱ्यांकरिता सहावा वेतन आयोग लागू केला आहे त्याप्रमाणे महाराष्ट्रातील माजी आमदारांकरिता एखादा मानधन आयोग गठीत करावा. आणि त्यादृष्टीने विचार करुन त्यांचा प्रश्न सोडवावा . याचे कारण या महागाईची झळ त्यांनाही सहन करावी लागत आहे. त्यादृष्टीने आपण विचार करावा. आपण मला बोलण्याकरिता संधी दिल्याबद्दल आपले मन:पूर्वक आभार मानून माझे भाषण संपवितो.

-----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथीसर आणि सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवले यांनी शासनाला घरचा आहेर दिलेला आहे. बजेटनंतर महागाई एवढया टोकाने वाढण्याची ही पहिलीच वेळ आहे. गेल्या दहा वर्षामध्ये ज्या-ज्या वेळेला केंद्र शासनाने अर्थसंकल्प मांडला, तेव्हा कधीही एवढी टोकाची महागाई वाढली नव्हती. केंद्र शासनाने एका बाजूला कर्जमाफी जाहीर केली आणि दुसऱ्या बाजूला महागाईचा वणवा पेटवला आहे. गेली अनेक वर्षे आपण महागाईचे चटके सहन करीत आहोत. पण यावर्षी केवळ चटके नाहीत, तर संपूर्ण देशामध्ये महागाईचा वणवा पेटलेला आहे. दुसऱ्या बाजूला देशातील अन्नधान्याचे उत्पादन देखील वाढलेले नाही. लोकसंख्या वाढीचे आकडे पाहिले तर दुसऱ्या बाजूला त्या प्रमाणात उत्पादनाचे आकडे वाढलेले नाहीत असे दिसून येते. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी गव्हाच्या बाबतीत उल्लेख केला. गेल्या वर्षभरामध्ये गव्हाचे उत्पादन एक दशलक्ष टन इतके घटलेले आहे आणि पुढच्या काळामध्ये ते आणखी घटण्याची शक्यता असल्याचे आपल्याच पाहणी अहवालामधून निदर्शनास आणून दिलेली आहे. गेल्या काही दिवसामध्ये बजेटनंतर जी महागाई वाढली आहे. भाज्यांचे दर वाढले, डाळींचे दर वाढले. मध्यमवर्गीय माणूस मूगाची डाळ खातो. सर्वसामान्य माणूस तुरीची डाळ खातो. पण आज त्याला तुरीची डाळ दुरापास्त झालेली आहे आणि गरीब माणसे मसूरीची डाळ खावयास लागली आहेत. दारिद्रय रेषेखालील माणसे तर केवळ भातावर डाळीचे केवळ पाणी वाढून घेतात आणि आपला उदरनिर्वाह करीत आहेत, इतकी वाईट स्थिती आहे. मुंबईमध्ये तर आता विजेचे दर वाढण्याची शक्यता आहे. पण सुरुवातीला अनेक सन्माननीय सदस्यांनी जी आकडेवारी दिलेली आहे, ती मी परत सांगत नाही. पण ती आकडेवारी पाहिली तर असे लक्षात येईल की, तीन महिन्यापूर्वी तांदूळाचा असलेला दर आणि आता वाढलेला दर पाहिला तर सध्याचा दर 25 ते 28 रुपये इतका आहे म्हणजे तो पूर्वीपेक्षा 8 ते 10 रुपयांनी वाढलेला आहे. गेल्या वर्षी गव्हाचा दर 21 रुपये होतो, पण आता तो 30 रुपये आहे, म्हणजे हा दर 9 रुपयांनी वाढलेला आहे. गेल्या वर्षी चणाडाळ 28 ते 34 रुपये होती, ती आता 34 ते 40 रुपयापर्यंत गेली आहे. तूरडाळ 43 रुपये झाली आहे. म्हणजे कडधान्य असो, तांदूळ असो, गहू असो, प्रत्येक वस्तुंचे भाव अत्यंत वेगाने वाढत आहेत आणि त्यामुळे सामान्य माणूस आपली रोजची

. . . .ओ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील . . . .

भाकरी सुध्दा पोटभर खाऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. याचे मुख्य कारण म्हणजे आज शेतीचे वेगाने कमर्शिअलायझेशन होत आहे. पण याबाबतीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेची जबाबदारी आहे. ती सरकारला टाळता येणार नाही. शेतीचे वेगाने व्यापारीकरण होत आहे. त्यामुळे देशभरामध्ये गेल्या अनेक वर्षापासून अन्नधान्याच्या उत्पादनामध्ये सातत्याने घट होत आहे आणि महाराष्ट्र देखील अन्नधान्याच्या उत्पादनाच्या बाबतीत पुढे नाही तर खूप मागे आहे. महाराष्ट्रामध्ये सिंचनाची व्यवस्था पाहिली तर 17 टक्के सिंचन क्षेत्र आहे. अन्य राज्यांच्या तुलनेमध्ये आपण अतिशय मागे आहोत. आपल्या राज्यामध्ये अनेक मोठे पाटबंधारे प्रकल्प झाले, तरी सुध्दा महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये सिंचन क्षेत्र वाढलेले नाही आणि अन्नधान्याचे उत्पादनही वाढू शकलेले नाही, याकडे आपल्याला दुर्लक्ष करता येणार नाही. तसेच महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीमध्ये जो समग्र आढावा घेण्यात आलेला आहे. त्यातील काही आकडेवारी सांगतो म्हणजे आपण किती मागे आहोत हे लक्षात येईल. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी ग्राहक किंमतीचा निर्देशांकाबाबत मघाशी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी 6 टक्के आहे असा उल्लेख केला होता. पण तो 7.8 टक्के वाढला आहे आणि ग्रामीण भागामध्ये 10.05 टक्क्यांनी वाढलेला आहे. दुसऱ्या बाजूला सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या बाबतीत काय अवस्था आहे ? आताच माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांनी सांगितले की, सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये भ्रष्टाचार आहे. ही गोष्ट त्यांनीच सांगितली हे बरे झाले. या व्यवस्थेतील भ्रष्टाचार गृहीत धरुन जी आकडेवारी दिलेली आहे, त्यातून काय दिसते तर दारिद्रय रेषेखाली असलेल्या कुटुंबांनी गव्हाची उचल 89 टक्के आहे आणि अन्न योजनेमध्ये ती 81 टक्के आणि 45 टक्के आहे. म्हणजे 15 ते 20 टक्के लोकांनी अन्नधान्य उचललेले नाही. यातील भ्रष्टाचार लक्षात घेतला तर प्रत्यक्षात ही आकडेवारी आणखी खाली जाईल आणि ती 70 ते 75 टक्क्यापर्यंत येईल. म्हणजे 25 टक्के लोक रेशन दुकानापर्यंत पोहोचू शकत नाहीत एवढी या राज्यामध्ये वाईट स्थिती निर्माण झालेली आहे. महागाईचे चटके हे दारिद्रय रेषेखालील लोकांना सोसावे लागतात. आज महाराष्ट्रामध्ये साडेतीन कोटी लोक दारिद्रय रेषेखालील आहेत. देशामध्ये 30 कोटी लोक दारिद्रय रेषेखालील आहेत. या बाबतीत केंद्र शासनाने जे निकष निश्चित केलेले आहेत, तेच मुळामध्ये चुकीचे आहेत. ज्या पध्दतीने याबाबतीत पाहणी केली आहे, ती चुकीची आहे. म्हणजे गरिबीचा कोटा ठरवून दिलेला आहे.



APR/ SBT/ MMP/ 11:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत)** : सन्माननीय सदस्यांनी 11 वाजून 15 मिनिटांनी आपले भाषण संपवावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी दोन-तीन मिनिटांमध्ये भाषण संपवितो. मी फक्त मुद्दे आणि आकडेवारी मांडत आहे. काहीही फाफटपसारा बोलत नाही.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ MMP/ SBT/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 11:15

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या विषयासंदर्भात मी पूर्वी देखील सभागृहामध्ये बोललो आहे. कोणताही प्रस्ताव चर्चेला घेताना वेळ सुरुवातीला ठरविली जाते. चर्चेचा वेळ ठरविला जाताना, निम्मा वेळ सत्ताधारी पक्षाला व निम्मा वेळ विरोधी पक्षाला दिला जातो. या निम्म्या वेळेमध्ये माननीय मंत्री महोदयांचे देखील भाषण होते. चर्चेच्या सुरुवातीला जे सन्माननीय सदस्य बोलतात त्यांना कोणत्याही प्रकारचे बंधन घातले जात नाही, त्यांना बोलण्याकरिता मुभा दिली जाते. मात्र त्या नंतर इतरांना बोलण्याकरिता वेळेचे बंधन घातले जाते. यामुळे आमच्यावर अन्याय होत आहे. त्यामुळे चर्चेच्या सुरुवातीपासूनच वेळेचे बंधन सर्व सन्माननीय सदस्यांवर घातले पाहिजे.

**तालिका सभापती** : जो सन्माननीय सदस्य चर्चेला सुरुवात करतो त्याला बोलण्याकरिता अधिक वेळ दिला जातो हे मला मान्य आहे. या चर्चेवर बोलण्याकरिता सत्ताधारी पक्षाकडून सुरुवातीला 10 नावे होती व विरोधी पक्षाकडून एकूण 7 नावे देण्यात आली होती. सत्ताधारी पक्षाकडून अधिक नावे आल्यामुळे अडचण झाली आहे. आपल्याला वेळेचे बंधन असल्यामुळे सर्वांनी थोडक्यात मुद्दे मांडावेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, काल या संदर्भात 93 ची सूचना दिल्या नंतर मी व सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी चर्चेची मागणी केली होती. त्यामुळे या विषयावर बोलण्याकरिता आपण मला वेळ द्यावा. मी येथे महत्वाची आकडेवारी देत आहे. माहिती सांगत आहे. कोणतीही उपमा, उत्प्रेक्षा व अलंकार वापरत नाही.

**तालिका सभापती** : आता 11.16 झालेले आहेत. चर्चेची वेळ आपण 11.30 पर्यंत ठरविलेली आहे. डॉ. दीपक सावंत, श्री प्रकाश शेंडे व श्री. सुरेश जेथलिया यांना अजून या विषयावर बोलायचे आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी त्यांची मते मांडतांना मुद्दयांची पुनरावृत्ती करु नये. आपण द्वीरुक्ती करीत आहेत असे मला वाटते.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी कोणतीही द्वीरुक्ती करीत नाही. मी येथे कोणत्याही मुद्याची पुनरावृत्ती करीत नाही. माझा बोलण्याचा वेळ आपणच घेत आहात. राज्यातील दारिद्रय रेषेखालील लोकसंख्या 12 लाख आहे असे सांगण्यात येते मात्र प्रत्यक्षात ही संख्या बरीच जास्त आहे. प्रत्येक राज्याला दारिद्रय रेषेखालील जनतेचा कोटा केंद्र शासनाने ठरवून दिलेला आहे. तसेच प्रत्येक जिल्हयाचा कोटा कलेक्टराकडून ठरविला जातो. या संदर्भात परवा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील .....

श्री. बाबा आढाव पुण्याच्या कलेक्टरांना भेटायला गेले होते तेव्हा त्यांना असे सांगण्यात आले की, आम्हाला दारिद्रय रेषेखालील जनतेचा कोटा ठरवून देण्यात आलेला आहे तो वाढविता येणार नाही. ही संख्या किती वाढवायची हे प्रथम ठरविले जाते व त्यानंतर कार्ड वाटप करण्याचे काम केले जाते. अशी स्थिती सध्या राज्यामध्ये आहे. अशी कामे करुन शासन जनतेच्या डोळयात धूळफेक करीत आहे. प्रत्यक्षात दारिद्रय रेषेखालील जनतेची आकडेवारी बरीच जास्त आहे. संपूर्ण देशामध्ये दारिद्रय रेषेच्या लोकसंख्येमध्ये उत्तर प्रदेश व बिहारच्या पाठोपाठ महाराष्ट्र राज्य हे तिसऱ्या क्रमांकावर आहे. प्रगतीशील अशा महाराष्ट्र राज्याकरिता ही अतिशय लाजीरवाणी गोष्ट आहे. तसेच मानवी विकास निर्देशांकामध्ये संपूर्ण जगामध्ये, महाराष्ट्र राज्याचा क्रमांक 114 वा आहे. जगामध्ये आपले राज्य प्रगतीशील मानले जाते. परंतु या राज्यामध्ये अशी परिस्थिती आहे. अशी परिस्थिती जर राज्यात असेल तर येथील सर्वसामान्य माणसाची आज काय स्थिती असेल याची आपण केवळ कल्पना केलेलीच बरी. सर्वसामान्य माणसाला जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणे हे शासनाची जबाबदारी आहे. पूर्वी रेशन दुकानामधून साबणाच्या वडया व कापड देखील वितरीत केले जात होते. परंतु आता जनतेच्या ज्या मुलभूत गरजा आहेत त्यांच्याकडे देखील शासन लक्ष देत नाही. आता शासन वाईनची दुकाने काढीत आहे.

सभापती महोदय, केंद्र शासनातील कॉंग्रेसमधील मंडळी म्हणतात की भाव वाढीची जबाबदारी केंद्रीय कृषी मंत्र्यांची आहे. कृषी मंत्री म्हणतात ही जबाबदारी शासनाची आहे. त्यामुळे या दोघांमध्ये सध्या वाद सुरु आहे. दोधेही शासनामध्ये आहे त्यामुळे भाववाडीच्या संदर्भातील जबाबदारी ही दोघांचीही आहे. माननीय केंद्रीय वित्त मंत्री यांनी महागाई संदर्भात असे वक्तव्य केले होते की, महागाई हे जागतिक फिनॉमिना आहे. संपूर्ण जगातच महागाई सध्या वाढत आहे. सर्वसामान्य जनतेला चांगले जीवन जगता यावे, चांगले शिक्षण मिळावे, चांगले कपडे घालता यावे अशी त्याची अपेक्षा असते.

यानंतर श्री. बरवड

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

या चार गोष्टींवर मानव विकास निर्देशांक निश्चित केला जातो. या मानव विकास निर्देशांकामध्ये आपण खूप मागे आहोत. माझी महाराष्ट्र सरकारकडे मागणी आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्था जी भ्रष्टाचाराने किडलेली आहे ती मूठभर व्यापाऱ्यांकडून सन्माननीय सदस्य अरुण गुजराथी यांनी सांगितल्याप्रमाणे बचत गटाकडे द्यावीत किंवा बेरोजगारांकडे द्यावीत. लोकांच्या हातात सार्वजनिक वितरण व्यवस्था गेली तर नीट धान्य मिळेल. आता रॉकेल उपलब्ध असले तरी देत नाहीत. ती स्थिती यामुळे बदलू शकेल. रॉकेल मिळत नाही म्हणून संपूर्ण ग्रामीण भागामध्ये लोक लाकूडफाटा जाळावयास लागले आहेत. गरीब माणसाची चूल पेटावी असे शासनाला वाटत असेल तर सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये ताबडतोब बदल करण्याची आवश्यकता आहे. तो बदल शासन करणार की नाही असा सवाल करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, भडकलेल्या महागाईविषयी आणि बोकाळलेल्या भ्रष्टाचाराविषयी जो प्रस्ताव आपण मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. दोन दिवसानंतर गुढीपाडवा आहे. या गुढीपाडव्याला गृहिणींनी डाळीमध्ये पाणी जास्त घालावे की, श्रीखंड आणू नये असा प्रश्न पडला आहे. गेल्या दीड महिन्यापासून महागाईचा उच्चांक वाढत आहे. केंद्र सरकारमध्ये काय चालले आहे हे आताच सन्माननीय सदस्यांनी सांगितले. आपले राज्यच नव्हे तर संपूर्ण आशिया खंडामध्ये महागाई वाढलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी याबाबत सांगितले. आशिया खंडातील आकडेवारी पाहिली तर सिंगापूरमध्ये 6.5 टक्के महागाई वाढली आणि गेल्या 26 वर्षातील उच्चांक मोडला. चीनमध्ये 7.1 टक्के महागाई वाढली आणि गेल्या 11 वर्षाचा उच्चांक मोडला. व्हिएतनाममध्ये 15.7 टक्के महागाई वाढली आणि गेल्या 12 वर्षाचा उच्चांक मोडला. इंडोनेशियामध्ये 7.36 टक्के महागाई वाढलेली आहे. माझा केंद्र सरकारला आणि राज्य सरकारला सवाल आहे. हा सगळा ग्लोबल फिनॉमिना आहे असे गेल्या पंधरा महिन्यांपासून जर केंद्र सरकारला माहीत होते तर केंद्र सरकार झोपले होते काय ? दोन दिवसापूर्वी रात्री अचानक कॅबिनेटची बैठक घ्यावयाची आणि नवीन निर्णय जाहीर करावयाचा, पाम तेलावरील आयात शुल्क कमी करावयाचे आणि तेल स्वस्त झाले आहे असा लोकांपुढे देखावा उभा करावयाचा असे चालले आहे. जर हे सरकार दूरगामी विचार करणारे आहे आणि जर या सरकारला येणाऱ्या सर्व संकटाची चाहूल अगोदर लागते तर या संकटाची चाहूल लागली नव्हती काय ? या महागाईमुळे अनेक सरकारे कोसळलेली आहेत. कांद्याने लोकांच्या डोळ्यात, राज्यकर्त्यांच्या डोळ्यात पाणी आणले होते. त्याने सत्तेचा सारीपाट उधळून लावला. ज्यावेळी अर्थसंकल्प मांडला त्यावेळी खूप काही बोललो होतो. अतिशय चांगल्या गोष्टी दिलेल्या आहेत असे सांगितले होते. परंतु केंद्र सरकार आणि राज्य सरकार चलनवाढीचा दर वाढला आहे असे सांगून त्याच्या नावाने बोटे मोडत आहे. जी.डी.पी. वाढला असे सांगण्यात आले. परंतु औद्योगिक क्षेत्रातील वाढीचा दर 5.3 टक्क्याने घसरला तर पायाभूत क्षेत्रातील वाढीचा दर 4.2 टक्के घसरलेला आहे. याचा कोणीच विचार करीत नाही.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. दीपक सावंत ......

सभापती महोदय, आपण मघाशी वस्तूंच्या भावाच्या बाबतीत तक्ता वाचून दाखवला. जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढलेले आहेत त्याचबरोबर भाज्यांचेही भाव वाढलेले आहेत. फ्लॉवर 20 रुपये किलो, कोबी 16 रुपये किलो, वांगी 26 रुपये किलो, टोमॅटो 16 रुपये किलो, हिरवा वाटाणा 32 ते 40 रुपये किलो असे भाज्यांचे दर झालेले आहेत. आज लोकांवर कांदा, बटाटा आणि वरणभात खाण्याची पाळी आलेली आहे. आता लोक चपात्या खावयास लागले आहेत. दक्षिणेतील लोक चपात्या खावयास लागले आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी अशी घोषणा केली आहे की, सर्वांना रेशन कार्ड ऐवजी स्मार्ट कार्ड देऊ. आपल्याकडे 1 कोटी 8 लाख रेशन कार्डधारक आहेत. त्या सर्वांना स्मार्ट कार्ड देणार आहात. याबाबत स्पॅको कंपनीला कंत्राट दिलेले आहे. परंतु हे स्मार्ट कार्ड कधीपर्यंत देणार याचा कालावधी निश्चित केलेला नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/ श्री.बरवडनंतर 11:25

डॉ.दीपक सावंत.....

मुंबईमध्ये रेशन कार्डधारकांची संख्या 36 लाख इतकी आहे. बोगस रेशन कार्डधारकांचा प्रश्न या सभागृहात अनेक वेळा उपस्थित केलेला आहे. त्यांच्याविरुध्द शासनाने काय कारवाई केली आहे ? त्याबाबतची आजही माहिती उपलब्ध नाही. हे सर्व विषय महागाईशी संबंधित आहेत. आपण बोगस रेशन कार्डधारकांची संख्या आज तरी सांगू शकाल काय ? साधारणपणे 1 लाख 6 हजार 740 कार्डधारकांसाठी बारकोड तयार केले जाणार आहेत. त्याद्वारे शिधापत्रिकेवर किती तांदूळ दिला जाणार आहे, गहू दिला जाणार आहे त्याची माहिती दिली जाणार आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय धाडसी निर्णय घेतात. परंतु भ्रष्टाचार बोकाळलेला आहे, त्याच्याबाबत कोणीही काळजी घेत नाही. या भ्रष्टाचाराला आपण उत्तेजन देता असे मी म्हणत नाही. परंतु आपल्याला अधिकारी माहिती देतात त्याच्यावर आपण अवलंबून राहता, ही दुर्दैवी गोष्ट आहे. म्हणून कुडाळ तालुक्याचे मी उदाहरण दिले. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये धान्य घोटाळा झाला, सभापती महोदय, त्याचा आपणही उल्लेख केला होता. त्या तालुक्यातील श्री.भूषण चव्हाण आणि श्री.संतोष मळवणी या दोन ग्रामसेवकांना निलंबित केले होते. ही माझी माहिती नाही तर शासनाची माहिती आहे. या दोन ग्रामसेवकांना 8 दिवसातच पुन्हा सेवेमध्ये घेतले गेले. मी जाणीवपूर्वक सांगतो की, मंत्रिमहोदयांचे निर्णय चांगले असतात, पण आपण दबावाखाली काम करता हे यावरुन सिध्द होते. आज मुंबईतील मध्यमवर्गीय लोकांचा पगार किती आहे ? मुंबईतील या लोकांचा सरासरी पगार 6 ते 12 हजार रुपये इतका आहे. या महागाईने सर्वात जास्त मध्यमवर्गीय होरपळत आहे. आज रॉकेलचा काळा बाजार होतो. रॉकेलचा साठा केला जात आहे. साठे करणारे कोण आहेत ? या तेरा महिन्यांच्या काळात महागाई वाढली आहे असे गृहित धरुन धान्याचे साठे करण्यात आले आहेत. ते धान्य आता चढया भावाने विकले जात आहे. हे चढे भाव कसे कमी करणार हा खरा प्रश्न आहे. या साठेखोरांवर धाडी घालून त्यांच्याविरुध्द कारवाई करणार काय ? धान्याचे साठे पकडून शासन साठेखोरांवर कडक कारवाई करणार काय ? त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करणार काय ? कारण लोकांचे जीवनमान त्यांनी खुंटवले आहे, लोकांच्या पोटाला लागणारे अन्न धान्याचा त्यांनी साठा केलेला आहे. सभापती महोदय, अनेक रेशन दुकानाच्यामागे गोदाम आहेत. त्या गोदामांवर धाडी टाकाव्यात. माझे सरकारला आव्हान आहे, सरकारने त्यावर धाडी टाकल्या तर

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

50 टक्के धान्याचा साठा तेथे सापडेल. सरकारला खरोखरच सामान्य माणसांना दिलासा द्यावयाचा असेल तर काही प्रमाणात सार्वजनिक वितरण व्यवस्था एन.जी.ओ.कडे द्यावी. त्यांना आवाहन करावे की, त्यांनी डायरेक्ट मार्केटमधून माल विकत घेऊन सामान्य माणसांना पुरवावा. मधल्या दलालांमुळे ही महागाई वाढत आहे. परंतु एन.जी.ओ.कडे ही व्यवस्था काही प्रमाणात दिली तर महागाईला निश्चितपणे आळा घालता येईल. माननीय मंत्रिमहोदयांबद्दल माझ्यापूर्वीच्या व्यक्त्यांनी चांगले मत व्यक्त केले. पण आपल्याकडून आम्हाला केवळ आश्वासन नको तर त्याला कृतीची जोड हवी. ही कृती आपण किती दिवसामध्ये करणार आहात आणि तिचे स्वरुप कसे असेल ते उत्तरातून सांगितले तर बरे होईल. दोन दिवसावर येऊन ठेपलेल्या गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर महागाई कमी केली तर ते अतिशय उचित होईल अशी आपल्याकडून अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

------

नंतर श्री.तालेवार/श्री.गिते .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम 11:30

श्री राजेन्द्र जैन (भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था):सभापति महोदय, मुझे बोलने के लिए आपने जो समय दिया है, उसके लिए मैं आपका धन्यवाद अदा करता हूं.

सभापति महोदय, सभी सम्माननीय सदस्यों ने अपने अपने तरीके से मंहगाई के बारे में अपने विचार व्यक्त किए हैं. सभी सम्माननीय सदस्यों ने सभी वस्तुओं के नाम लेकर यह बताया कि हर वस्तु की कीमत बढ़ रही है. लेकिन किसी ने यह नहीं पूछा कि किस वस्तु के दाम कम हुए हैं ? सभी वस्तुओं के दाम बढ़ रहे हैं, किसी भी वस्तु के दाम कम नहीं हो रहे हैं. इस बढ़ती महंगाई से सामान्य जनता, गरीब जनता परेशान है. यही भावना आज यहां पर सभी सम्माननीय सदस्य व्यक्त कर रहे हैं. मुंबई की समस्याओं के बारे में सभी बोलते हैं और यहां इस सदन में चर्चा होती है लेकिन मैं यह बताना चाहता हूं कि विदर्भ में जो आदिवासी जिले हैं, वहां आदिवासियों और गरीब लोगों तक अन्त्योदय योजना और बीपीएल योजना के अन्तर्गत मिलने वाला अनाज पहुंचता ही नहीं है. सालेकसा, देवरी और जो आदिवासी क्षेत्र है वहां पर अधिकारी भी पहुंचते नहीं है. इन क्षेत्रों को दिया जाने वाला अनाज बीच में ही कहीं चला जाता है जिसका पता नहीं चलता. इसलिए मेरा यह अनुरोध है कि सरकार अपने स्तर पर इस मामले की जाँच करें. मिट्टी के तेल(राकेल) के बारे में भी बहुत खराब हालत है. नागपुर डिपो से टेंकर निकल जाता है लेकिन गोंदिया, भंडारा और देवरी में न जाकर कहां चला जाता है इसका पता ही नहीं चलता. इतना भ्रष्टाचार चल रहा है कि इसकी जांच होनी चाहिए. इस मामले का पता लगाने के लिए दक्षता पथक को आदेश दिया जाना चाहिए. उसी प्रकार से जमाखोरों के खिलाफ सख्त कार्रवाई की जानी चाहिए. विदर्भ में जो पिछड़े इलाके है, आदिवासी क्षेत्र हैं, वहां की राशन दुकानों में अनाज पहुंचता ही नहीं है. आप सरप्राईज विजिट देकर प्रत्यक्ष रुप से इस स्थिति को देख सकते हैं. आपको सुबूत मिल जाएगा. वायदा बाजार आज सट्टे का बाजार हो गया है, जहां एडवांस में कीमत तय कर दी जाती है. वहां आगे की कीमतें तय हो गई है. मैंने एक-दो अखबार में पढ़ा है. देश की बड़ी-बड़ी कंपनियाँ भी अब वायदे बाजार में आ रही है जो और चिंता का विषय है.

(<u>सभापतीस्थानी माननीय उपसभापती</u>)

**उपसभापती** : या प्रस्तावावरील चर्चा दुपारी 12.00 वाजेपर्यंत चालेल. ही चर्चा दुपारी 12.00 वाजेपर्यंत पूर्ण झाली नाही तर, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी म.वि.प.नियम 260 अन्वये

.......2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ....

जो प्रस्ताव दिलेला आहे, त्या प्रस्तावावरील चर्चा व उत्तराचे भाषण पूर्ण झाल्यानंतर या प्रस्तावावरील उर्वरित चर्चा पूर्ण करण्यात येईल.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या प्रस्तावावर वेळेची मर्यादा घालून दिलेली आहे. या प्रस्तावावरील चर्चा दुपारी 12.00 वाजेपर्यंत संपवावयाची आहे. खालच्या सभागृहात देखील प्रस्ताव असल्यामुळे कृपया मला उत्तराचे भाषण करण्यास परवानगी द्यावी. या प्रस्तावातील विषयाच्या बाबतीत दोन्ही बाजुच्या सन्माननीय सदस्यांनी सर्वच मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यामुळे या विषयाच्या बाबतीत अजून काही नवीन मुद्दे असतील असे मला वाटत नाही.

**उपसभापती** : माननीय सभापती आणि मुख्यमंत्री यांची दालनात बैठक सुरु आहे. त्या ठिकाणी देखील उपस्थित असणे गरजेचे आहे.

श्री. सुनील तटकरे : माननीय सभापती आणि मुख्यमंत्री यांची दालनात बैठक सुरु आहे. त्या बैठकीत जे काही निर्णय घेतले जातील त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. परंतु या प्रस्तावावरील चर्चा थांबवून माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा सुरु करुन त्या चर्चेवरील उत्तराचे भाषण पूर्ण झाल्यानंतर या प्रस्तावरील चर्चा सुरु करणे हे योग होणार नाही.

श्री. दिवाकर रावते : या प्रस्तावावरील चर्चा अजून 15 ते 20 मिनिटे सुरु ठेवावी. सन्माननीय सदस्यांना तेवढा वेळ बोलू द्यावे. आज सभागृहापुढे कोणतेही कामकाज नसल्यामुळे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा सुरु करावी आणि त्या चर्चेचे उत्तराचे भाषण पूर्ण झाल्यानंतर या प्रस्तावावरील चर्चा पुन्हा सुरु करावी. हा देखील विषय गंभीर असल्यामुळे या प्रस्तावावरील चर्चा आज पूर्ण झाली पाहिजे.

श्री. कपिल पाटील : या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांची अतिशय चांगले मुदे मांडले आहेत, त्यामुळे माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांच्या उत्तरातचे भाषण लागलीच ठेवावे, अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे या प्रस्तावावरील चर्चेच्या उत्तरास 11.45 वाजता सुरुवात होईल.

...3



ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम 11:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत</u>**

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र जैन यांचे भाषण अपूर्ण होते, त्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

यानंतर श्री. शर्मा..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र जैन : सभापति महोदय, जैसा मैंने पहले बताया है कि एक तरफ आज एक समाचार पत्र में यह खबर आई है कि केन्द्रीय सरकार ने चावल के निर्यात पर प्रतिबंध लगा दिया है, लेकिन उसके बावजूद भी दूसरी तरफ मेरे पास यह जानकारी है कि मंत्री महोदय यदि आप यह जानकारी निकालेंगे तो मालूम पड़ेगा कि कुछ बड़ी कंपनियों को चावल के निर्यात की परमीशन केन्द्र सरकार द्वारा दी गई है. मैं आपसे अनुरोध करुंगा कि कम से कम महाराष्ट्र में जब तक कीमतें कम नहीं होती, तब तक महाराष्ट्र से चावल का निर्यात नहीं होना चाहिए. सरकार को इस बात की खबरदारी लेने की जरुरत है.

सभापति महोदय, आखिर में मैं एक ही बात कहना चाहता हूँ कि विशेष तौर पर विदर्भ के आदिवासी जिलों के बारे में राशन की दुकानों से केरोसिन और अन्य सामान की कालाबाजारी होती है. इसको रोकने के लिए निश्चित रुप से मंत्री महोदय को गौर करना चाहिए. मंहगाई की समस्या के ऊपर राज्य सरकार अतिशीघ्र ध्यान दे, ऐसी विनंती मैं माननीय मंत्री महोदय से करते हुए अपना भाषण पूर्ण करता हूँ.

.................

. . . भाषण पूर्ण, नंतर T-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, महागाईच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी जी चर्चा उपस्थित केलेली आहे त्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे. महागाई वाढल्याची चर्चा सर्व ठिकाणी सुरु झाली तसेच वर्तमानपत्रात देखील याबाबत रकानेच्या रकाने भरुन आले. तूरडाळ, मुगडाळ, उडीदडाळ, कांदा, बटाटा आदी वस्तूंचे भाव वाढल्याचे दिसते परंतु दुसऱ्या वस्तूंचे भाव देखील वाढले आहेत याबद्दल कोणी चर्चा करीत नाही ही दु:खाची गोष्ट आहे. भाववाढ झाल्याची चर्चा आपण सभागृहात बसून करीत आहोत पण दुसऱ्या बाजूला शेतकरी मरु लागला आहे आणि गावे ओस पडू लागली आहेत त्याकडे कोणाचे लक्ष नाही. गावातील माणसे जीवनावश्यक वस्तूंचे भाव 1/2 रुपयांनी वाढले तर चर्चा करतात आणि शेती अवजारांचे भाव वाढले तर चर्चा नाही ही दु:खाची गोष्ट आहे. गावातील लोकांना लागणाऱ्या वस्तूचे भाव वाढले याची चर्चा करीत असतानाच किटनाशकाचे दर 170 रुपये लिटरवरुन 260 रुपये लिटर झाले आहेत, खताची पिशवी 300 रुपये होती ती 600 रुपये झाली आहे, पाईपची किंमत 350 रुपयांवरुन 900 रुपयांवर गेली आहे. पाण्याच्या मोटरची किंमत 20000 रुपयांवरुन 24000 रुपये झालेली आहे, केबलची किंमत 40 रुपये मिटरवरुन 75 रुपये मिटर झालेली आहे, पाण्याचा पंपाची किंमत 5000 रुपयांवरुन 10 हजार रुपये झालेली आहे, चपलेची किंमत 180 रुपयांवरुन 380 झालेली आहे. सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे या सर्व गोष्टींचे भाव वाढून देखील त्याचा विचार कोणी करीत नाही. फक्त जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढल्याची चर्चा गावातील लोक करतात हे अत्यंत निषेधार्ह आहे. सगळी चर्चा सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील वस्तूंवर चाललेली आहे. माझा स्वत:चा पेट्रोल पंप आहे. दोन टँकर डेली येतात. पण माझ्या पेट्रोल पंपाच्या बाहेर रोज 8 टँकर रॉकेल बेकायदेशीरपणे विकले जाते. अधिकाऱ्यांना सांगितले की मी याबाबत वरच्या पातळीवर आवाज उठवीन तर अधिकारी सांगतो की, वर कळवून आणखी नवीन पार्टनर कशाला वाढविता ?

सभापती महोदय, लोखंडाच्या किंमती वाढलेल्या आहेत. 27000 रुपये टन लोखंडाचा भाव 54000 रुपये टन झालेला आहे. 26000 रुपये टन मिळणारी सळई आता 46000 रुपये टन झाली आहे. सगळया गोष्टींचे भाव वाढले तसेच अन्नधान्याचे भाव वाढले. यासंदर्भात केंद्रातील कृषीमंत्री आणि जाणता राजा श्री. शरद पवार यांनी चिंता व्यक्त केली आणि महागाईवर नियंत्रण आणण्यासाठी परदेशातून आयात होणाऱ्या वस्तूवर इंपोर्ट डयूटी कमी केले. त्यामुळे परिणाम असा

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झाला की, सोयाबीनचा भाव 3700 रुपयांवरुन 3000 रुपये झाला, करडईचा भाव 2500 रुपयांवरुन 2200 रुपये झाला, सूर्यफुलाचा भाव 4000 रुपयेवरुन 3200 रुपयांवर आला आहे. त्यामुळे फटका शेतकऱ्याला बसला आहे. लोखंडाचे भाव वाढले, केबलचे भाव वाढले, घासलेटचे भाव वाढले तरी त्याची शासन दखल घेत नाही .....

नंतर श्री. भोगले

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 11:40

श्री.पाशा पटेल.........

कोणीच काही करीत नाही. फक्त बळीचा बकरा शेतकरी. एका बाजूला शेतकरी मरु लागला आहे, त्या शेतकऱ्याला वाचवायचे आहे असे म्हणता, शेतकऱ्याचे कर्ज माफ करायचे आहेअसे म्हणता आणि दुसऱ्या बाजूला शेतकऱ्याच्या माना कापायचे काम चालले आहे. छत्रपती शिवरायांचे नाव घेऊन तुम्ही राज्य चालवित आहात. परंतु ज्यावेळी मोगलांचे राज्य होते त्यावेळी कोकणामध्ये चिंचवड गणपती मंदिराचे प्रमुख नारायण देव होते. हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली त्यावेळी कोकणामध्ये तांदूळ व नारळ सबसिडीवर मिळत होते. खंडाळ्याच्या घाटामध्ये लेव्ही नव्हती. शिवरायांचे राज्य आले त्यावेळी नारायण देव गणेशोत्सवासाठी नारळ आणि तांदूळ खरेदी करावयास गेले त्यावेळी सबसिडी मिळणार नाही असे सांगण्यात आले. तुम्हाला कमी पैशात नारळ आणि तांदूळ मिळणार नाही असे सांगितले गेले. नारायण देवांनी शिवरायांकडे तक्रार केली. मोगलांचे राज्य होते त्यावेळी तांदूळ आणि नारळ सबसिडीवर मिळत होते. लेव्ही नव्हती. आता हिंदूंचे राज्य आले आणि गणेशोत्सव साजरा करण्यासाठी सबसिडीवर तांदूळ आणि नारळ मिळणार नसेल तर आम्ही काय केले पाहिजे? त्यावेळी छत्रपती शिवरायांनी नारायण देवांना सांगितले की, गणेशोत्सव साजरा करावयाचा असेल तर सरकारी गोडावूनमधून लागेल तेवढे धान्य फुकट न्या आणि उत्सव साजरा करा. त्या छत्रपती शिवरायांच्या राज्यात तुम्ही शेतकऱ्यांना पावलोपावली मारण्याचे पाप करणार असाल, अन्नधान्याच्या किंमती वाढणार असतील तर तुम्ही अन्नावाचून तडफडून मरणार आहात. आपण काय बोलतो, आपण काय निर्णय घेतो, कोणासाठी निर्णय घेतो या सगळ्या गोष्टींचा मंत्रीमहोदयांनी गंभीरपणे विचार करावा एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

-----

(नंतर हिंदी भाषण....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

04-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) U.2

श्री जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपुर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ):सभापति महोदय, नियम 260 के तहत इस सदन में सम्माननीय सदस्य श्री अरविंद सावंत जी ने जीवनावश्यक वस्तुओं के बढ़ते भाव के संबंध में जो प्रस्ताव रखा है, मैं उस पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हूं.

सभापति महोदय, सब्जी, अनाज के भाव रोज बढ़ रहे हैं, जिससे गरीब, सामान्य जनता त्रस्त हो गई है. किसान अनाज और सब्जी पैदा करते हैं उनको फायदा मिलना चाहिए, लेकिन किसानों को कोई फायदा नहीं हो रहा है. इसी वजह से किसान आत्महत्या कर रहे हैं. कौन रेट बढ़ा रहा है ? यह कृत्रिम मूल्य वृध्दि है. सरकार ने कानून बनाए है् लेकिन इन कानूनों की कोई परवाह नहीं कर रहा है, कोई दखल नहीं ले रहा है. किसानों को खाद, बीज नहीं मिल रहे हैं जिससे किसान परेशान है.सरकार ने कानून बनाए हैं, यंत्रणा बनाई है, अधिकारी नियुक्त किए गए हैं, बीडीओ, कृषि अधिकारी हैं लेकिन सरकारी सुविधाओं का फायदा किसानों को नहीं मिल रहा है. किसानों को सरकारी योजनाओं का फायदा मिलना चाहिए. यह भी देखने को मिलता है कि जब उत्पादन ज्यादा हो जाता है तो माल सस्ता हो जाता है लेकिन ज्यादा मुनाफा कमाना के लिए व्यापारी जमाखोरी करते हैं जिससे माल पड़े पड़े सड़ जाता है. अनाज के मामले में दिल्ली की सरकार गिर जाती है. इसलिए मैं यह कहना चाहता हूं कि कानून का सख्ती से अमल किया जाएगा तो मंहगाई नहीं बढ़ेगी. उदाहरण के लिए मैं यह बताना चाहता हूं कि, किसान भी माल पैदा करता है और उद्योगपति भी माल पैदा करता है लेकिन किसान अपने माल के उत्पादन पर 700 रुपये खर्च करता है तो उसे उसके बदले 600 रुपये भाव मिलता है और उद्योगपति अपने माल के उत्पादन पर 6 हजार रुपये खर्च करता है तो उसे उसके बदले 40 हजार रुपये भाव मिलता है. इस संबंध में सीमेंट का उदाहरण देता हूं. आज सरकार का सीमेंट पर कोई नियंत्रण नहीं है. लाईमस्टोन 200 रुपये टन मिलता है. 10 टन की कीमत 2000 रुपये होती है. इस कीमत में टैक्स और अन्य चीजे शामिल की जाए तो 50 रुपये में सीमेंट मिलना चाहिए लेकिन उद्योगपति 200 रुपये से भी ज्यादा कीमत ले रहे हैं. हमारे देश से सीमेंट और लोहा चीन देश में जा रहा है. पाकिस्तान से सीमेंट लाने की अनुमति दी गई है. पाकिस्तान में सीमेंट 100 रुपये के भाव से मिलता है. लेकिन उद्योगपति संबंधित आधिकारियों से मिलीभगत करके पाकिस्तान से जो सीमेंट आता है उसे मार्केट में आने नहीं देते, माल को शीघ्र क्लियर नहीं होने देते. अगर 15

..3





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुद्दीन जव्हेरी....

दिन के अन्दर सीमेंट का उपयोग नहीं किया जाए तो वह पत्थर हो जाता है. यह सीमेंट मार्केट में 125 रुपये में मिल सकता है. कभी कभी मेरे मन में यह सवाल उठता है कि सरकार कौन चला रहा है, उद्योगपति या जनप्रतिनिधि ?काश्तकारों का माल रिलायंस ने लेना शुरु कर दिया है, किसानों से सस्ते दामों पर लेकर जनता को मंहगे दामों में बेचना शुरु कर दिया है. इस प्रकार से रिलायंस जैसी कंपनी 500 रुपये तक मुनाफा कमा रही है. यह दोषपूर्ण नीति है. सरकार का कोई अंकुश नहीं है. इसलिए मुझे इतना ही कहना है कि यह कृत्रिम मूल्य वृध्दि है इसलिए इस ओर सरकार गंभीरता से ध्यान दें. कानून सख्त करें और कड़ाई से क्रियान्वयन करें. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

........

यानंतर श्री खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा : अध्यक्ष महाराज या प्रस्तावावर बोलण्याची मलाही संधी मिळावी.

**तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत)** : आपण कृपया खाली बसावे, मी आपल्याला बोलण्याची संधी देतो.

श्री. प्रकाश शेंडगे : महोदय, आपण माझे नाव पुकारले होते, कृपया मला बोलण्याची संधी द्यावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे, आपण खाली बसावे. आपल्याला 12.30 वाजेपर्यंत माननीय मंत्री महोदयांचे या प्रस्तावावरील उत्तर संपवून नियमित सभागृह सुरु करावयाचे आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जेथलिया हे बोलतील.

श्री. सुरेश जेथलिया (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, जीवनावश्यक वस्तूंची जी दरवाढ आणि त्यात होत असलेला भ्रष्टाचार यासंदर्भात जी चर्चा उपस्थित केली आहे यावर बोलण्यासारखे भरपूर आहे, पण वेळ कमी असल्यामुळे मी फक्त एक उदाहरण देऊन या विभागात काय सुरु आहे हे माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. आपले जिल्हा पुरवठा अधिकारी सुध्दा यामध्ये किती बरबटलेले आहेत हे ज्वलंत उदाहरण मी देऊ इच्छितो. जिल्हा पुरवठा अधिकाऱ्याची चौकशी झाली आणि त्याच्या बदलीचे आदेश 26 तारखेला निघाले. त्यानंतर त्याने एक परवाना, जो निलंबित केलेला होता त्यानंतर उपायुक्तांनी हा निर्णय योग्य असल्याचे योग्य आहे असे मत दिले. नंतर याच पुरवठा अधिकाऱ्याने 2 एप्रिल रोजी जे माननीय मंत्री महोदयांचे अधिकार असतात त्या अधिकाराचा वापर करुन पुन्हा सुरु केला आहे. जेणेकरुन पुरवठा अधिकाऱ्यांना अधिकार नाहीत, अन्नधान्य काळ्या बाजारात जात असते, रॉकेल जास्त भावात विकले गेले म्हणून आरोप होतात असे प्रकार सर्रास होत असताना जीवनावश्यक वस्तूंच्या दरवाढीवर कंट्रोल केले नाही तर निश्चितच अशा प्रकारचा काळा बाजार चालूच राहील व जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ होत राहणार आहे. तसेच या प्रकरणाची सन्माननीय मंत्र्यांनी चौकशी करावी व संबंधित अधिकाऱ्याला बदलीचे आदेश देऊन त्यांना निलंबित करणार काय, अशी माझी सूचना आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-------------

यानंतर श्री. सय्यद जामा यांचे भाषण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जामा (विधानसभा द्वारा निर्वाचित ): सभापति महोदय, मंहगाई के बारे में सभी सदस्यों की चिंता वाजिब है. सब के पास आंकडे है कि किस वस्तु के भाव कितने बढ़े हैं. मैं तो कहूंगा कि यह ग्लोबल फिनॉमिनन है और इस बात से कोई इंकार नहीं कर सकता है. इसका मतलब यह नहीं है कि बढ़ती मंहगाई को रोकने के लिए कोई उपाय न किए जाए. मैं इस बारे में यह सुझाव देना चाहूंगा कि जिस प्रकार से विद्युत विभाग के अन्तर्गत नियामक मंडल (MERC) बनाया गया है, जो बिजली के दर निर्धारित करता है, उसी प्रकार का रेगूलेटरी कमीशन जीवनावश्यक वस्तुओं के संबंध में भी बनाया जाना चाहिए. ताकि यह रेगूलेटरी कमीशन जीवनावश्यक वस्तुओं की कीमतों पर कंट्रोल रख सके और इसी से संबंधित अन्य चीजों का ध्यान रख सके. दूसरी बात यह है कि फुड एंड ड्रग डिपार्टमेंट को स्वतंत्र करना चाहिए. तीसरी बात यह है कि भ्रष्टाचार बहुत बढ़ रहा है. सार्वजनिक वितरण व्यवस्था में भ्रष्टाचार करने वालों को सजा नहीं हो रही है. इस मामले में भ्रष्टाचार करने वालों को बचने के लिए इतने उपाय है कि, जैसे कि एक जगह उन्हें सजा मिल जाती है तो अपील करके या किसी नेता से सहायता लेकर अपना भला कर लेते है. इसलिए मैं यह सुझाव देना चाहता हूं कि मिलावट करने वालों से, चोरी करने वालों से और जमाखोरी करने वालों से सख्ती से निपटने के लिए रेगूलेटरी कमीशन बनाया जाए. यह कमीशन ऐसे मामलों की जांच करेगा.

सभापति महोदय, इस वर्ष के बजट में यह बताया गया है कि 4 प्रतिशत एग्रीकल्चरल ग्रोथ का टार्गेट पूरा किया गया है. लेकिन मैं यह बताना चाहूंगा कि जब तक आप ग्रामीण अर्थव्यवस्था में सुधार नहीं करेंगे तब तक किसानों की दशा में सुधार नहीं होगा, ग्रामीण अर्थव्यवस्था में सुधार नहीं होगा. कृषि का उत्पादन कम होते जा रहा है. 1982 में कृषि का सकल उत्पादन 36.40 प्रतिशत था, इस वर्ष 18.5 प्रतिशत है. यानी कृषि का सकल उत्पादन कम हो गया है. इसलिए मेरा यह सुझाव है कि कृषि का उत्पादन बढ़ाने के लिए कदम उठाए जाए और ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत की जाए. सम्माननीय सदस्य श्री नवले जी ने जैसा बताया कि जनसंख्या पर नियंत्रण करने के लिए कड़े उपाय किए जाए, नदियों को जोड़ा जाए, सिंचाई प्रोजेक्ट किए जाए, बॅकलॉग दूर किया जाए, मैं उनके इस सुझाव से सहमत हूं. सरकार इन सुझावों पर गौर करें.

...3





श्री सय्यद जामा ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापति महोदय, मेरा यह भी सुझाव है कि हर जिले में दक्षता समिति गठित की जाए. कई जिलों में आज तक दक्षता समिति गठित नहीं हुई है. चार साल हो गए हैं, नागपुर में दक्षता समिति गठित नहीं की गई है. इसलिए जिन जिलों में दक्षता समिति का गठन नहीं किया गया है, वहां शीघ्र दक्षता समिति का गठन किया जाए. जमाखोरों, मिलावट करने वालों के खिलाफ सख्त से सख्त कदम उठाए जाए, कड़े कानून बनाए जाए. जो लोग जीवनावश्यक वस्तुओं की कृत्रिम रुप से अभाव पैदा करके कीमतें बढ़ाते हैं उनके खिलाफ कड़ी कार्रवाई की जाए. कानून में सुधार करने की आवश्यकता हो तो कानून में सुधार किए जाए. जमाखोरों, मिलावट करने वालों और चोरी करने वालों के खिलाफ कड़ी कार्रवाई होनी चाहिए, केपिटल पनिशमेंट होनी चाहिए. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

.......

यानंतर श्री जुन्नरे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, जीवनावश्यक वस्तूंच्या दरात झालेली प्रचंड वाढ यासंदर्भात जो प्रस्ताव या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेला आहे त्यावर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. खरे म्हणजे या महागाईचा फटका धनदांडग्यांना बसला नसून तो गरीब, मध्यमवर्गीय,रोज काम करुन पोट भरतो अशा लोकांना या महागाईचा फटका बसलेला आहे. भाववाढ कशी झालेली आहे यासंदर्भात मी काही उदाहरणे देणार आहे. सन 2007 मध्ये रॉकेलचा दर 8.50 रु. होता तो आता 9.50 रु. झालेला आहे. स्वयंपाकाच्या गॅसची किंमत 295 रु. होती ती आता 330 रुपये झालेली आहे. साखर 14.00 रुपये किलो होती ती आता 18.00 रुपये किलो झालेली आहे. रिफाईन्ड शेंगदाणे तेल 85 रुपये किलो होते ते आता 96.00 रुपये किलो झालेले आहे. खोबरेल तेलाची किंमत मागील वर्षी 76 रुपये किलो होती ती आता 85 रुपये किलो झालेली आहे. तुरडाळीची किंमत 37 रुपये किलो ंवरुन 46 रुपयांवर गेलेली आहे. गव्हाची किंमत 14.50 रुपयांवरुन 16.50 रुपयांवर गेलेली आहे. मटनाची किंमत 150 रुपयांवरुन 180 रुपयांवर गेलेली आहे. ब्रॉयलर कोंबडीची किंमत 120 रुपयांवरुन 140 झालेली आहे. पापलेटची किंमत 150 रुपयांवरुन 200 रुपये झालेली आहे. एका अंडयाची किंमत 1 रुपया होती ती आता दीड रुपयावर गेलेली आहे. सर्व जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीत भरमसाठी वाढ झालेली आहे. गरीब लोकांना त्यामुळे जगणे अवघड झालेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 11.55

श्री.प्रकाश शेंडगे ..

संपूर्ण महाराष्ट्रासाठी गव्हाचे वितरण केन्द्र सरकार मार्फत होत असते. तीन महिन्यापूर्वी केन्द्र सरकारने राज्य सरकारला असे कळविले होते की," महाराष्ट्राची गव्हाची एकूण जी मागणी आहे त्या मागणीच्या 50 टक्के गहू केन्द्र सरकार देईल आणि उर्वरित 50 टक्के गहू महाराष्ट्र सरकारने आयात करावा " आपल्याला लागणा-या गव्हाची व्यवस्था आपण करावी. अशा प्रकारची सूचना केन्द्र सरकारने राज्य सरकारला दिल्यानंतर त्या संदर्भात आम्ही प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाला उत्तर देत असतांना शासनाने असे सांगितले की, " अशा प्रकारे केन्द्र सरकारचे पत्र राज्य सरकारला आले होते परंतु आपण गव्हाची आयात करु शकत नाही आमच्याकडे तशी यंत्रणा नाही असे त्यांना कळविण्यात आलेले आहे." राज्य सरकारकडे गव्हाची आयात करण्यासाठी यंत्रणा नाही हे केन्द्र सरकारला माहीत असतांना देखील त्यांनी अशा प्रकारचे पत्र् का पाठविले आहे आणि 50 टक्के गहू केन्द्र सरकारकडून कमी आलेला आहे त्यास हे शासनच जबाबदार आहे. सध्या राज्यातील गव्हाच्या साठयाची सद्यस्थिती काय आहे ? राज्य सरकारने केन्द्र सरकारला असे कळविले होते की ,आम्ही गव्हाची आयात करु शकत नाही त्यामुळे उर्वरित 50 टकके गव्हाचा साठा केन्द्र सरकारने राज्य सरकारला द्यावा असे उत्तर राज्य सरकारने मागच्या अधिवेशनात दिले होते. त्याप्रमाणे 50 टक्के केन्द्र सरकारचा साठा मिळाला आहे काय ?

I सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. नॅशनल कमॉडिटी एक्सचेंजमध्ये व्यापा-यांची सट्टेबाजी सुरु असते त्याचा परिणाम भाववाढीमध्ये होत असतो.सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मध्यंतरी 900 कोटी रुपयांचा रॉकेल घोटाळा उघडकीस आणाला होता . त्यासंबंधी चौकशी करण्यात आली आहे काय ? त्यामध्ये मोठे मासे गळाला लागले आहेत काय ? की फक्त लहान मासे गळाला लागले आहेत ? एकूण 900 कोटी रुपयांचा रॉकेल घोटाळा झाला होता त्यामध्ये जे कोणी गुंतलेले असतील त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, याठिकाणी मी फक्त एक सूचना करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी वितरण व्यवस्थेमध्ये जे काही गैरप्रकार होतात ते थांबविण्यात यावेत असे सांगितलेले आहे. या निमित्ताने मला एवढेच म्हणावयाचे आहे की,
महाराष्ट्रात महिला बचत गट स्थापन झालेले आहेत तेव्हा 50 टक्के महिला बचत गटांकडे वितरण व्यवस्थेचे काम देण्यात यावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्यात काय चालले आहे ? असा प्रश्न आमच्या पुढे निर्माण होतो. याचे कारण असे की कालच मला लातूरहून एका व्यक्तीचा फोन आला होता व त्याने मला असे सांगितले की, "शेंगदाणे 80 रुपये किलो भावाने विकले जात आहेत तेव्हा या महागाईसंबंधी तुम्ही सभागृहात काही आवाज उठविणार आहात किंवा नाही ?" तेव्हा महागाई वाढू नये या दृष्टीने शासनाने उपाययोजना केल्या पाहिजेत. त्याचबरोबर वितरण व्यवस्थेमध्ये ज्या काही त्रृटी आहेत त्या त्वरित दूर केल्या पाहिजेत. रॉकेलच्या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, रॉकेल विक्रीच्या दुकानामध्ये स्टॉक आणि दराच्या संदर्भात बोर्ड लावण्याची सक्ती सबंधित दुकानदारावर करावयास पाहिजे तेव्हा अशी सक्ती करण्यात येणार आहे काय ?

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माननीय अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मंत्री येथे उपस्थित आहेत त्यांनी वितरण व्यवस्थेसंबंधी मागच्या अधिवेशनामध्ये अतिशय चांगला निर्णय जाहीर केला होता परंतु त्या संदर्भात त्यांनी आदेश काढलेले नाहीत . अधिवेशनमध्ये आम्ही त्यांना विचारल्यानंतर त्यांनी कारवाईसंबंधी जाहीर केले होते परंतु त्यानंतर ही कारवाई पूर्ण करण्यात आलेली नाही. तेव्हा ही कारवाई किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे त्याचबरोबर काही बोगस रेशन कार्ड धारक आहेत तेव्हा बोगस रेशन कार्ड राहणार नाहीत या दृष्टीने कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.केशवराव मानकर :सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मला एकच मुद्दा मांडावयाचा आहे.चलनामध्ये सोन्याला जास्त किंमत आहे. सोन्याच्या आणि चांदीच्या दरात भाव वाढ
झाल्यानंतर इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढत असतात. सोन्याच्या किंमती दररोज 300 ते 400 रुपयानी वाढत आहेत त्यामुळे महागाई वाढते. सोन्या चादीच्या किंमती जर स्थिर असतील तर महागाई स्थिर राहते. तेव्हा माननीय मंत्री महोदय सोन्याच्या आणि चांदीच्या किंमतीवर


VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 11.55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियंत्रण ठेवून भाववाढ होणार नाही या दृष्टीने प्रयत्न करणार आहेत काय, त्याचबरोबर ज्या साठेबांजाकडे धान्याचे साठे आहेत ते जप्त करणार आहेत काय ?

---

नंतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत, विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर, श्री. सुरेश नवले आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये राज्यातील आणि देशातील सर्वसामान्य नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने जो प्रस्ताव येथे मांडला आहे त्यावर राज्य सरकारचे धोरण आणि उत्तर देण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, या चर्चेत भाग घेत असताना सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत, श्री.अरुणभाई गुजराथी, श्री.सुरेश नवले, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.कपिल पाटील आणि अन्य सदस्यांनी आपल्या भावना येथे व्यक्त केल्या आहेत. सभापती महोदय, या ठिकाणी एक गोष्ट निश्चितपणे खरी आहे की, गेल्या वर्षभरात सर्व स्तरावर महागाईचा जो एक उच्चांग गाठला गेला आहे, त्यामुळे सर्वसामान्य जनता ही त्रस्त झालेली आहे. परंतु जेव्हा अशा प्रकारची परिस्थिती देशात आणि राज्यात निर्माण होते ती काही अचानक उद्भवलेली परिस्थिती नसते. अशा प्रकारची परिस्थिती जेव्हा निर्माण होते तेव्हा त्या संदर्भात थोडासा मागोवा घेणे आवश्यक असते, कशामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली, कोणत्या गोष्टींमुळे परिस्थितीत अचानक फेरबदल झाला याचा सूक्ष्मपणे अभ्यास करणे आणि त्यावर उपाय योजना करणे हेच राज्य आणि केंद्र सरकारचे प्रथम कर्तव्य असते. सर्व सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी या संदर्भात जनतेच्या भावना येथे व्यक्त केल्या तेव्हा पक्षीय अभिनिवेश अजिबात मनात न ठेवता, सामान्य माणसाच्या हिताच्या दृष्टीने सरकारला जे काही करणे शक्य आहे त्याबाबतीत आपल्या भावना सभागृहात व्यक्त केल्या. सभापती महोदय, खरे तर या ठिकाणी हे सांगितले पाहिजे की, गेल्या 2-3 वर्षात कोणत्या पक्षाचे सरकार राज्यात आहे, कोणत्या आघाडीचे सरकार देशात आहे हा प्रश्न या संदर्भात जितका महत्त्वाचा आहे तसेच केंद्र आणि राज्य सरकारची धोरणे ही अनेक वेळा या सर्व गोष्टींमध्ये कोठे तरी कारणीभूत ठरत असतात. महागाई आज एका परीने मोठ्या प्रमाणात वाढली याचे कारण शेतीमालाचे उत्पादन ज्या गतीने वा क्षमतेने पूर्वी होत होते ते मधल्या काळात दुर्दैवाने होऊ शकले नाही हेही त्यामागील एक महत्त्वाचे कारण आहे. गेल्या 2-3 वर्षात केंद्र सरकारने एक महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय घेतला त्याचा उल्लेख या ठिकाणी अत्यंत अभिमानाने करणे मी माझे कर्तव्य समजतो. देशामध्ये युपीए सरकार सत्तेवर आल्यानंतर केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार आणि केंद्रीय अर्थमंत्र्यांनी या गोष्टीचा साकल्याने विचार केला की, कृषीप्रधान असलेला हा देश आहे, या कृषीप्रधान देशामध्ये

..... वाय 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.तटकरे ....

कृषी उत्पादनात जी काही घट झालेली आहे, त्या शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनामध्ये वाढ होण्यासाठी आपल्याला नेमके काय करता येईल वा काय करावे लागेल याचा सर्वंकष विचार गेल्या 3-4 वर्षात केंद्र सरकारच्या पातळीवर प्राधान्याने केला गेला. मला या निमित्ताने देशाच्या कृषी मंत्र्यांचे अभिनंदन केले पाहिजे की, चार वर्षापूर्वी कृषी मंत्रालयाची सूत्रे हाती घेण्यापूर्वी देशातील शेतकऱ्यांची पतमर्यादा जी काही होती ... सभापती महोदय, मी आमच्या समोरच्या मित्रांना सांगू इच्छितो की, आपण जेव्हा आपल्या भाषणातून केंद्र सरकारच्या धोरणावर बोललात तेव्हा केंद्र सरकारने जी काही चांगली पावले उचलली आहेत तेही मला येथे सांगणे आवश्यक आहे. उदा. पूर्वीच्या कालखंडामध्ये जे काही आयात-निर्यातीच्या बाबतीत निर्बंध होते, ते त्या काळात उठविले गेले. त्याचा परिणाम फार मोठ्या प्रमाणात शेतीमालाच्या उत्पादनावर निश्चितपणे झाला. सभापती महोदय, जेव्हा अशा प्रकारे परिणाम होतो तेव्हा त्या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणून महागाई वाढण्यात होतो. म्हणून देशातील शेतकऱ्याची पतमर्यादा वाढविण्याच्यादृष्टीकोनातून गेल्या तीन वर्षात जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले. पहिल्यांदा ही पतमर्यादा सबंध देशभर 60 ते 65 हजार कोटीपर्यंत होती. पहिल्या वर्षात म्हणजे 2004 मध्ये ती 1लाख 15 हजार कोटीपर्यंत गेली आणि आज ती जवळपास अडीच लाख कोटीपर्यंत केंद्र सरकारने वाढविली आहे. जेणे करून शेतकऱ्यांना आर्थिक पत निर्माण करून दिली गेली. साहजिकच त्यांचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीकोनातून ती एक पूरक गोष्ट ठरू शकेल. असा हा एक महत्त्वाकांक्षी निर्णय त्या काळात घेतला गेला. सभापती महोदय, फुलशेती वाढली गेली पाहिजे, फळशेती वाढली गेली पाहिजे, शेतीशी पूरक व्यवसाय जे आहेत तेही वाढले पाहिजेत. उदा. दूध उत्पादन वाढविले गेले पाहिजे. भात असेल, गहू असेल, त्याचे उत्पादन वाढले पाहिजे हे धोरण आखण्यामध्येदेखील चांगल्या प्रकारचे निर्णय देश पातळीवर घेतले गेले. हे निर्णय घेतले जात असताना शेतकऱ्यांची वर्गवारी करण्यात आली आणि शेतकऱ्यांना देखील मोठ्या प्रमाणात अनुदान देऊन, शेती आणि शेतीशी निगडित असे पूरक व्यवसाय वाढविण्याच्या बाबतीत नेमक्या काय उपाययोजना करता येतील, ते उपाय योजना करण्याचे धोरण गेल्या 3 वर्षात प्रामुख्याने राबविले गेले. परंतु या धोरणाचे परिणाम काही लगेच दिसून येतील असे नाही. आज निर्णय घेतला आणि लगेच 24 तासात त्याचे परिणाम दिसतील असे म्हणता येणार

..... वाय 3 ...



KBS/SBT/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 12:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही. शेवटी केंद्र सरकारने एखादे धोरण राबविले ते शेतकऱ्यांच्या पचनी पडल्यानंतर शेतकऱ्यांनी त्याबाबत अधिक आस्था दाखवून उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न केले तर त्याचे परिणाम मिळण्यासाठी वर्ष-दोन वर्षे जाऊ शकतात. पण एक गोष्ट निर्विवादपणे सत्य आहे की, युपीए सरकारने घेतलेल्या निर्णयामुळेच, आज महागाईचे चटके जरूर बसत आहेत पण ....

( यानंतर श्री. सरफरे .... झेड 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

वर्ष दोन वर्षात अशी स्थिती निश्चितपणे निर्माण होईल की, या देशामध्ये उत्पादित केलेला माल निर्यात करण्याची पाळी आपल्यावर येईल. इतक्या मोठया प्रमाणावर कृषी उत्पादन येत्या दोन-तीन वर्षाचे आर्थिक धोरणाबाबत घेतलेल्या निर्णयामुळे आपल्याला पहावयास मिळेल. माननीय सदस्य श्री. पाशा पटेल म्हणाले असले तरी आपल्या अंतर्मनाला माहीत आहे की, शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने आमच्या जाणता राजाने निश्चितपणे निर्णय घेतल्यामुळे आपले अस्तित्व धोक्यात येईल म्हणून आपण हे सांगत आहात. आणि म्हणून पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून तेलाच्या बाबतीत भूमिका मांडली तर आपण म्हणणार की, आता शेतकऱ्यांचे नेमके काय होणार आहे? उरलेल्या इतर धान्यांच्या बाबतीत भूमिका मांडली तरी त्याचे उत्पादन राज्यामध्ये आणि देशामध्ये शेतकरी करीतच आहेत. एकीकडे भाववाढीवर नियंत्रण करण्यासाठी केंद्र सरकारने धोरण स्वीकारल्यानंतर दुसऱ्या बाजूला शेतकऱ्याचा फार मोठा कळवला आहे अशाप्रकारची टीका करुन भाववाढीवर नियंत्रण ठेवण्याची जी उपाय योजना केली जाते तिच्यावर आपण प्रहार करीत आहोत अशाप्रकारचे प्रकार घडत आहेत. आणि म्हणून कृती आणि ऊक्ती यामध्ये विसंगती राहता कामा नये. शेवटी या प्रश्नाच्या बाबतीत तुमची आणि आमची सर्वांची सारखीच भावना आहे, तिचा मी आदराने याठिकाणी उल्लेख करतो.आपण सर्वसामान्य जतनेसाठी याठिकाणी आपल्या भावना मांडल्या. त्या दृष्टीकोनातून कोणत्या परिणामकारक उपाय योजना करता येतील याबाबत सर्वंकष विचार करणे आवश्यक आहे. आज केंद्र सरकारने याबाबत जे धोरण स्वीकारले आहे त्याचा फायदा निश्चितपणे होईल. परंतु महागाईच्या संदर्भात सुध्दा देश पातळीवर फार मोठया प्रमाणात गांभीर्याने नोंद घेतली आहे. त्या नोंदीचा परिणाम म्हणून केंद्र सरकारने नवे धोरण जाहीर केले आहे. त्याचा परिणाम निश्चितपणे येत्या दोन-तीन महिन्यात आपल्याला पहावयास मिळेल.

सभापती महोदय, आपण याठिकाणी दोन-तीन गोष्टी बोललात. माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सांगितले की, जीवनावश्यक वस्तूंचे दर त्या काळात स्थिर ठेवण्याचा आम्ही प्रयत्न केला.परंतु एक गोष्ट स्पष्ट आहे की, पूर्वीच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधून सर्वांनाच धान्य वितरण होत होते. 1997 मध्ये केंद्रामध्ये कोणत्या पक्षाचे सरकार होते याचा उल्लेख मी करु इच्छित नाही. परंतु 1997 मध्ये लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्था लागू करण्यात आली. ती लागू केल्यानंतर लाभार्थ्यांच्या संख्येचा आपण वांरवार उल्लेख केला. गरीबांची संख्या निश्चित करुन त्यानंतर त्यांना धान्य देण्याबद्दल निर्णय घेणे. अशाप्रकारचा निर्णय 1997 साली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या बाबतीत घेण्यात आला. त्यापूर्वी सर्वांना धान्य उपलब्ध होत होते. त्यानंतर जे नवीन टारगेट देण्यात आले, त्या अनुषंगाने कारवाई करणे अभिप्रेत होते. त्यादृष्टीकोनातून आपण अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न केले. गेल्या चार-पाच वर्षामध्ये अंत्योदय योजनेसंबंधी आपण सांगितले. सभापती महोदय, सन 1997 मध्ये अंत्योदय योजना अस्तित्वात नव्हती. माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत साहेब आपण दर नियंत्रित करण्यासंबंधी सांगितले. त्यावेळी ही अंत्योदय योजना नव्हती. त्यानंतर सन 2001 मध्ये ही अंत्योदय योजना अस्तित्वात आली. त्यावेळी आपण आणि माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी दोन आणि तीन रुपये या नियंत्रित दराने वस्तूंचे भाव सांगितले होते. जीवनावश्यक वस्तूंचे भाव सांगत असतांना शहरी भागामध्ये आणि आदिवासी भागामध्ये वस्तूंचे काय भाव होते हे आपण सांगितले. त्या संदर्भात अंत्योदय योजनेची अंमलबजावणी करण्याचे धोरण 2001 मध्ये राबविण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला. त्यामधून या योजनेची अंमलबजावणी करीत असतांना दोन-तीन रुपये दराने स्वस्त धान्य गरीबातील गरीबाला मिळाले पाहिजे. त्या दिशेने अंमलबजावणी झाल्यामुळे मला अभिमान वाटतो की, 2004 पासून या योजनेच्या लाभार्थी संख्येमध्ये अडीचशे पट वाढ करण्यात आली. त्यावेळी 10 लाख लाभार्थ्यांचे इष्टांक होते, आता ही संख्या 25 लाखापर्यंत गेली आहे. याचा अर्थ गेल्या तीन वर्षामध्ये 15 लाख कुटुंबे अंत्योदय योजनेमध्ये समाविष्ट केली. आणि त्या प्रत्येक कुटंबातील 5 लाभार्थी गृहीत धरले तरी जवळपास 1 कोटी किंवा 75 लाख लोकांना दोन-तीन रुपये भावाने धान्याचा फायदा निश्चितपणे मिळेल.

सभापती महोदय, आमचे सन्माननीय नेते श्री. अरुण गुजराथी यांनी सार्वजनिक वितरण व्यवस्थेबद्दल सांगितले. त्याचप्रमाणे अनेक माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांच्याशी मी सहमत आहे. मी या विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर माझ्या लक्षात आले की, ज्या कारणासाठी ही सार्वजनिक वितरण व्यवस्था निर्माण केली त्याव्दारे सामान्यातील सामान्य ग्राहकांना, गरीबातील गरीब लोकांना किमान धान्य योग्य रितीने आणि योग्य वेळेत मिळाले पाहिजे असे धोरण राज्य सरकारने ठरविले. परंतु त्या धोरणाची अंमलबजावणी होत असतांना मोठया प्रमाणात भ्रष्टाचाराच्या गोष्टी घडत असल्याचे मला निश्चितपणे जाणवले. म्हणून गेल्या 3-4 वर्षामध्ये या विषयावर गांभीर्याने उपाय योजना करण्यासाठी आम्ही पाऊले टाकली. आणि या विभागामध्ये पूर्णपणाने पारदर्शकता आणली. केरोसीन अन्य कारणांसाठी वळविले जात आहे हे सत्य मी नाकारीत नाही. (यानंतर सौ. रणदिवे)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे . . . .

पण केरोसीन दुसरीकडे वळविणे थांबले पाहिजे, यासाठी सुध्दा गेल्या तीन वर्षामध्ये कठोर उपाययोजना करण्यात आल्या. याबाबतीत कोणत्या उपाययोजना केल्या . . . .

श्री.प्रकाश शेंडगे (खाली बसून) : यातील मोठया माशांचे काय ?

श्री.सुनील तटकरे : मी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगेसाहेबांना सांगू इच्छितो की, मी मोठया माशांच्या बाबतीत देखील उल्लेख करणार आहे. मला डिस्टर्ब करु नका. मी याठिकाणी गांभीर्याने बोलत आहे. त्यामध्ये तुम्ही देखील सहभागी आहात. या सर्व गोष्टी दूर करण्यासाठी, यावर नियंत्रण ठेवण्यामध्ये तुमचाही सहभाग असावयास पाहिजे. सन्माननीय सदस्य कोणत्या पक्षाचे आहेत ? यापेक्षाही ते विधीमंडळाचे सन्माननीय सदस्य म्हणून निवडून आले आहेत, त्यांना सुध्दा समान अधिकार मिळाला पाहिजे. म्हणूनच 288 आमदारांपैकी मंत्री वगळता,बाकीचे सन्माननीय सदस्य हे आपापल्या कार्यक्षेत्रामध्ये या सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे अध्यक्ष आहेत आणि आपले तालुका पातळीवर नियंत्रण असावयास पाहिजे अशी स्पष्ट आणि स्वच्छ भूमिका आम्ही घेतली. त्यामुळे विधान परिषदेतील सन्माननीय सदस्य ज्या भागातून निवडून आले असतील, त्या-त्या ठिकाणी त्यांना या सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे सह अध्यक्ष म्हणून नेमण्यात आले पाहिजे ही भूमिका आम्ही दोन-तीन वर्षापासून पूर्णपणे स्विकारलेली आहे आणि त्याची त्याप्रमाणे अंमलबजावणी देखील करण्यात आली. ग्राम पातळीवर पारदर्शकता आणली पाहिजे.

डॉ.नीलम गोऱ्हे (खाली बसून) : सगळया ठिकाणी तसे झालेले नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, तसे झाले नाही असे आपले म्हणणे आहे. पण तुमची नेमणूक करण्यात आली असेल. मात्र कदाचित तुम्हाला माहिती नसेल, तुम्हाला ते पहाण्यासाठी, त्या बैठकीला जाण्यासाठी वेळ मिळाला नसावा. आपण मला यातील त्रुटी सांगाव्यात. जर त्याठिकाणी अंमलबजावणी झाली नसेल तर मी तेथील अधिकाऱ्यांवर कारवाई करीन. परंतु यासंबंधात आम्ही ग्राम पातळीपासून सुरुवात केली. एखाद्या ग्रामीण भागामध्ये जर दुकान असेल तर त्याठिकाणी कार्डे किती आहेत? त्याचे लाभधारक कोण आहेत ? तसेच अंत्योदय योजनेच्या संबंधात कार्डे किती आहेत आणि त्याचे लाभधारक कोण आहेत ? बी.पी.एल.चे कार्डधारक कोण आहेत ? मी प्रत्येक ग्रामपातळीवर असलेल्या दुकानांच्या नावासहित या कार्डधारकांची नावानिशी यादी प्रसिध्द केली.ती यादी चावडी-

. . . .2ए-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वर, सरपंचांना उपलब्ध करुन दिली. ही यादी पंचायत समितीच्या सदस्यांना, जिल्हा परिषदेच्या सदस्यांना, विधानसभा, विधान परिषदेच्या सदस्यांना उपलब्ध करुन दिली. तसेच लोकसभेच्या सदस्यांना सुध्दा त्यांच्या मतदार संघापुरती ही यादी उपलब्ध करुन दिली. एवढेच नव्हेतर प्रत्येक योजनेनिहाय प्रत्येक दुकानामध्ये जे धान्य येते, त्याबाबतीत सांगावयाचे तर अन्नपूर्णा योजनेअंतर्गत, अंत्योदय योजनेअंतर्गत किती धान्य येते ? बी.पी.एल.साठी किती धान्य येते ? आपल्या गावामध्ये केरोसीन किती उपलब्ध होते ? याची माहिती ग्रामपंचायतीच्या सरपंचापासून, विधानमंडळाच्या सन्माननीय सदस्यांपासून लोकसभेच्या सन्माननीय सदस्यांपर्यंत उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत गेल्या दोन वर्षापासून तरतूद करण्यात आली. त्याप्रमाणे ती येत नसेल तर सांगावे. आपणही सर्वजण जागरुक आहोत. केवळ सरकारला बोलून उपयोग नाही. शेवटी ही सर्वांची सामुदायिक जबाबदारी आहे. अशा वेळी आपापल्या क्षेत्रामध्ये असणाऱ्या गरीब लोकांना धान्य, केरोसीन मिळालेच पाहिजे अशी आग्रहाची भूमिका मी या विभागाचा प्रमुख झाल्यानंतर स्विकारली आणि त्यामध्ये पूर्णपणे पारर्शकता आणली. एवढेच नव्हेतर गेल्या तीन-चार वर्षामध्ये असेही ठरविले की, प्रत्येक जिल्हयामध्ये समान प्रमाणात केरोसीनचे वाटप झाले पाहिजे. म्हणून मी एक वेळ कार्यप्रणाली निश्चित केली. त्यानुसार डिसेंबर 2004 मध्ये याची कार्यप्रणाली निश्चित केली आणि आता 2008 सुरु झाले आहे. मी मधल्या काळामध्ये एकाही वर्षामध्ये, एकाही महिन्यामध्ये कोणत्याही जिल्हयातील केरोसीनच्या नियतनामध्ये बदल केला नाही. उलट पंढरीची वारी आहे, शेगाव येथे एखादा कार्यक्रम होतो, त्यावेळी जे काही जादा केरोसीन लागते, तेवढे जास्त नियतन देण्याच्या बाबतीत कार्यवाही केली. अन्यथा आम्ही प्रत्येक जिल्हयाला समान केरोसीनचे वाटप झाले पाहिजे अशी प्रभावीपणे भूमिका घेतली. एखाद्या भागामध्ये केरोसीन आल्यानंतर घाऊक परवानाधारकाला किती मिळते ? अर्ध घाऊकधारकाला किती मिळते ? तालुक्यामध्ये जे नियतन पाठविले जाते, त्यातील किरकोळ विक्रेत्याला किती मिळते? यासंबंधी जिल्हा माहिती कार्यालयामार्फत दरमहा माहिती घेऊन ती सर्व वर्तमानपत्रांमध्ये देण्याची खबरदारी गेल्या वर्ष-दोन वर्षापासून आम्ही प्रामुख्याने घेतली आहे. जेणेकरुन लोकांना कळले पाहिजे की, आपल्या भागामध्ये किती केरोसीन आले आहे ? शेवटी येथे बसून 1 लाख दुकानांवर नियंत्रण ठेवणे मला शक्य होणार नाही हे आपल्याला सर्वांना माहिती आहे. सन्माननीय सदस्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये सुध्दा 200-

. . . .2 ए-3



श्री.सुनील तटकरे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

300 दुकाने असू शकतील. त्यामध्ये 400 ते 500 गावांचा समावेश असू शकेल. मुंबईसारख्या ठिकाणी अनेक दुकाने असतील. आपल्याला त्या सर्व ठिकाणी लक्ष देणे शक्य होईल असे म्हणत नाही. पण त्या-त्या ठिकाणी असलेल्या दुकानांमध्ये जे धान्य आणि केरोसीन आलेले आहे, ते लोकांना मिळत आहे की नाही हे पहाण्याचे काम तेथे असणाऱ्या संघटनेच्या मार्फत करता येईल.सन्माननीय सदस्यांनी लाभार्थ्यांची नावे खरी आहेत की खोटी आहेत ? याबाबतीत मुद्दा उपस्थित केला होता. ही वस्तुस्थिती खरी आहे. त्यामुळे 1997 मध्ये जेव्हा या सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये बदल करावयाचे ठरविले, तेव्हा रेशन कार्डच्या रंगामध्ये फरक केला. पण सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटीलसाहेब, रेशन कार्डाचे पुनर्विलोकन झाले नाही. पण मी याबाबतीत धाडसीपणे निर्णय घेतला आणि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये रेशन कार्डाचे पुनर्विलोकन करण्याची मोहीम वर्षभर राबविली. या मोहिमेअंतर्गत 27 लाख रेशन कार्ड निलंबित केली. ज्याला आपण बोगस रेशन कार्ड म्हणतो, ती ही बोगस रेशन कार्ड आहेत का ? याची माहिती अजून यावयाची आहे. त्याचीही आकडेवारी निश्चितपणे समोर येईल. पण संपूर्ण महाराष्ट्रामध्ये गेल्या वर्षभरामध्ये आम्ही हा कार्यक्रम राबविला. त्यानुसार पहिल्या टप्प्यामध्ये महानगरपालिका क्षेत्रामध्ये राबविला, दुसऱ्या टप्प्यामध्ये जिल्हा मुख्यालय आणि "अ" "ब" नगरपालिका क्षेत्रांमध्ये राबविला आणि तिसऱ्या टप्प्यामध्ये "क" वर्ग नगरपलिका आणि ग्रामीण भाग येथे हा कार्यक्रम राबविण्यात आला.

यानंतर कु.गायकवाड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे..

हे करीत असताना 26 लाख रेशन कार्डे रद्द करण्यात आली. राज्यामध्ये जवळपास 2 कोटी 16 लाख रेशन कार्ड धारक आहेत. रेशन कार्ड सगणकीकृत करावे असा प्रस्ताव विभागाकडे पाठविण्यात आला होता. यासंदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांनी अत्यंत पोटतिडकीने मते मांडली आहेत. आता सार्वजनिक वितरण व्यवस्था संगणकीकृत करण्यात येणार आहे.

**तालिका सभापती** ( श्रीमती उषाताई दराडे ) : पूर्वी या चर्चेची वेळ 12.15 पर्यंत वाढविली होती. आता ही वेळ 12.40 पर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, केरोसीनचे वाटप होत असताना त्याचे वाटप सर्वांना सम प्रमाणात व्हावे अशी शासनाची भूमिका आहे. घाऊक परवाना धारक व अर्धघाऊक परवाना धारक या सर्वांना याची माहिती मिळाली पाहिजे. तसेच या योजनेमध्ये, सर्व लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घेतले पाहिजे अशी शासनाची भूमिका आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री अरविंद सावंत यांना मी सांगू इच्छितो की, ग्रामीण पातळीवर दक्षता समित्या स्थापन केल्या आहेत. या समित्या स्थापन करताना कोणताही पक्षीय दृष्टीकोन आम्ही ठेवला नाही. या समितीमध्ये विधी मंडळाच्या सन्माननीय सदस्यांना अधिकार दिलेले आहेत. सध्या 110 ते 115 सन्माननीय सदस्य हे विरोधी पक्षातील आहेत. हे लोकप्रतिनिधी ज्या कार्यक्षेत्रामधून निवडून आलेले आहेत तेथे ग्राम समित्या स्थापन करताना सदस्य निवडण्याचा अधिकार त्यांना देण्यात आलेला आहे. सध्या राज्यामध्ये 32 हजार ग्रामसभा समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. जिल्हा दक्षता समित्या व तालुका दक्षता समित्या स्थापन करीत असताना त्या समित्यांमध्ये अशासकीय सदस्य नेमले जातात. हे सदस्य अनेक वेळा पक्षीय दृष्टीकोन समोर ठेवून नेमले जाऊ शकतात म्हणून यासंदर्भात प्रत्येक जिल्हयाच्या पालक मंत्र्यांना विनंती केलेली आहे की, अशासकीय सदस्य नेमले जात असताना ते सदस्य बीपीएलचे लाभार्थी असावेत अशी एक अट घालण्यात यावी. यामुळे ज्यांना या योजनेचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांचा प्रतिनिधी या समितीमध्ये राहील. त्यामुळे धान्य, केरोसीनचे वाटप होत असताना प्रत्यक्षात जनतेला कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते, कोणता त्रास सहन करावा लागतो याची जाणीव या सदस्याला असणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. सय्यद जामा यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी

2..

श्री. सुनील तटकरे ...

मघाशी सांगितले होते की, त्यांच्या जिल्हयामध्ये, ग्राम सभा स्थापन करण्यात आलेल्या नाहीत. मी त्यांना सांगू इच्छितो की, कोणत्या ठिकाणी ग्राम सभा स्थापन करण्यात आलेल्या नाहीत त्याची माहिती घेतली जाईल. तसेच या मध्ये काही त्रुटी राहिली असेल तर नागपूरच्या माननीय पालक मंत्र्यांना बोलावून योग्य ती उपाययोजना निश्चित प्रकारे केली जाईल.

सभापती महोदय, वितरण व्यवस्थेमध्ये सर्व व्यवस्था केल्यानंतर यामध्ये निश्चित प्रकारे चांगले बदल झालेले आहेत. तरी देखील सर्व व्यवस्था संपूर्णपणे नियंत्रणात नाही हे मी आपणास सांगू इच्छितो. अन्नधान्याची व रॉकेलची गळती होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या गोदामामधून निघालेले धान्य व ऑईल कंपनीकडून आलेले रॉकेल, शासकीय गोदामामध्ये आल्यानंतर व हा माल रेशन दुकानातून ग्राहकापर्यंत जाताना त्यामध्ये बरीच गळती होत असते. आता संगणीकृत व्यवस्थेमध्ये या सर्व गोष्टींची अद्ययावत नोंद ठेवली जाणार आहे. या सदनामार्फत महाराष्ट्रातील सर्व जनतेला मी ग्वाही देऊ इच्छितो की, एका वर्षामध्ये सर्व व्यवस्था संगणीकृत केली जाईल. एक लिटर रॉकेल देखील इकडे तिकडे जाणार नाही. संगणीकृत व्यवस्थेमुळे सर्व गोष्टींची बारकाईने नोंद घेतली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांना मी सांगू सांगू इच्छितो की, पूर्वी पाच वर्षाच्या कालवधीकरिता रेशन कार्ड जनतेला देण्यात येत असे. आता ही मुदत वाढविण्यात येत असून दहा वर्षाच्या काळाकरिता रेशन कार्ड दिले जाणार आहे. तसेच या रेशन कार्डामध्ये बार कोडची व्यवस्था करण्यता आलेली आहे. या रेशन कार्डावर जिल्हयाचा , तालुक्याचा क्रमांक निश्चित केलेला आहे. तसेच रेशन दुकानातून जो ग्राहक वस्तु घेणार आहे त्या दुकानाचा देखील नंबर कार्डावर असणार आहे. या ग्राहकाकडे गॅस सिलिंडरची संख्या एक आहे की दोन आहे याची नोंद असणार आहे. तसेच कुटुंब प्रमुखाचा फोटो देखील कार्डवर असणार आहे. पूर्वी रेशन कार्डच्या माध्यमातून जो गैर व्यवहार होत असे तो आता बार कोडमुळे हेणार नाही. डिपार्टमेंट स्टोअर मध्ये ज्याप्रमाणे पावती दिली जाते तशी पावती रेशन दुकानातून देण्याची व्यवस्था केली जाणार आहे. पूर्वी रेशन दुकानातील पावत्या फितवल्या जात, रजिस्टरमधील नोंदी बदलल्या जातात. धान्य, केरोसीन संपले असे सांगितले जात असे. परंतु आता बार कोड मुळे या

..3..



DVG/ 12:15

श्री. सुनील तटकरे..

सर्व गैरव्यवहारांवर नियंत्रण आणण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे. याच्याही पुढे बिलींग व्यवस्था मशीनद्वारे केली जाणार आहे. ग्रामीण भागामध्ये रेशन दुकानांना या व्यवस्थेच्या अंतर्गत बिल पुरविले जाणार आहे. असे अनेक बदल सध्या शासनाकडून केले जात आहेत. या संदर्भात आपल्या मौलिक सूचना असतील तर त्याचा देखील विचार केला जाईल. या बदलांमुळे जनतेला अतिशय चांगला फायदा होणार आहे. सध्या अंत्योदय योजनेमध्ये 25 लाख लाभाधारक आहेत व बीपीएल कार्ड धारक कुटुंबांची संख्या 65 लाख आहे.

यानंतर श्री. बरवड...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

आता नवीन यादी केलेली आहे त्याचाही उल्लेख करण्यात आला. त्याची अंमलबजावणी करावयाचे ठरविले तर पुन्हा अनेक प्रश्न निर्माण होतील. मंत्रिमंडळामध्ये माननीय मुख्यमंत्री असतील, माननीय उपमुख्यमंत्री असतील, माननीय अर्थमंत्री असतील त्यांच्यापुढे हा विषय गांभीर्याने आणणार आहे की, आता जो इष्टांक आहे त्याप्रमाणे आपण वाटप करतो परंतु नवीन यादी लागू केली तर काही लोकांना फायदा मिळेल परंतु फार मोठ्या प्रमाणावर लोक या योजनेपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण होणार आहे. अशा वेळी राज्य सरकारने नेमके काय धोरण स्वीकारले पाहिजे याचा विचार भविष्य काळामध्ये निश्चितपणे करण्याचा प्रयत्न करु. भाववाढ झालेली आहे असे सर्व सन्माननीय सदस्यांनी सांगितले. जीवनावश्यक वस्तू तसेच अन्य वस्तू दुकानांमध्ये मिळत नाहीत असे सांगितले. केंद्र सरकारने आता एक धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे की, एका कार्डावर महिन्याला 1 लीटर पामतेल उपलब्ध करुन दिले जावे आणि ते करीत असताना 25 टक्के अनुदान राहणार आहे. या ठिकाणी उल्लेख करण्यात आला की, बाहेर 65 रुपये दर झालेला आहे. त्यामध्ये 25 टक्के अनुदान मिळाले तर हे तेल 40 ते 45 रुपये दराने उपलब्ध होईल. एप्रिल महिन्यामध्ये जरी नाही तरी मे महिन्यापासून पामतेल या ठिकाणी उपलब्ध करण्याची अंमलबजावणी 100 टक्के केली जाईल असा विश्वास मी या सदनाच्या मार्फत महाराष्ट्रातील जनतेला देऊ इच्छितो. हे करीत असताना डाळीच्या बाबतीत केंद्र सरकारने निर्बन्ध शिथिल केलेले आहेत. डाळ आयात करण्याच्या बाबतीत राज्य सरकारला जी पावले उचलावयास पाहिजे ती उचलण्याचा निश्चितपणे प्रयत्न करु. सन्माननीय सदस्यांनी वायदे बाजाराबाबत सांगितले. वायदे बाजारात जे व्यवहार घडतात त्याबाबतीत केंद्र सरकारने काही धोरण स्वीकारणे आवश्यक आहे. त्याचा साकल्याने विचार करुन केंद्र सरकारने वायदा बाजाराच्या बाबतीत स्पष्टपणे धोरण घेण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारला निश्चितपणे विनंती करण्यात येईल. साठे बाजाराच्या बाबतीत सांगण्यात आले की, पूर्वी निर्बन्ध शिथिल केले गेले. पूर्वी जीवनावश्यक वस्तू 18 होत्या. आता केंद्र सरकारने 24 वस्तूंचा अंतर्भाव जीवनावश्यक वस्तूंमध्ये केलेला आहे. यामध्ये काही भाज्या आणि फळांचाही समावेश आहे जेणेकरुन या सगळ्या वस्तूंच्या बाबतीत नियंत्रण करण्यासाठी सरकारला जी पावले उचलावयाची



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ......

असतील ती उचलण्याच्या बाबतीत कठोरपणे कार्यवाही करता येईल. मुंबईमध्ये जे घडते त्याबाबत मघाशी उल्लेख करण्यात आला. मुंबईमध्ये जे घडते तसे ग्रामीण भागामध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणावर घडते. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, रेशन दुकानाच्या पाठीमागे काही गोदामे आहेत त्या ठिकाणी तपासणी केली तर साठा मिळेल. मी याबाबतीत कठोरपणे पावले उचलण्यास तयार आहे. जी गोदामे असतील, रेशन दुकानदारांची गोदामे असतील किंवा मोठ्या धान्य व्यापाऱ्यांची दुकाने असतील त्यांना साठा ठेवण्याच्या बाबतीत जेवढी मर्यादा दिलेली आहे त्या मर्यादेपेक्षा जास्त क्षमतेचा साठा त्या ठिकाणी असेल तर त्यांच्यावर सुध्दा या कायद्याच्या अंतर्गत कठोर कारवाई करण्यासाठी ताबडतोब पावले उचलली जातील असे मी आपल्याला या निमित्ताने सांगू इच्छितो. रेशन कार्डाच्या बाबतीत जसा धडक कार्यक्रम घेतला तसा याबाबतीत सुध्दा कालबध्द कार्यक्रम करुन संबंध महाराष्ट्रामध्ये, मुंबई रेशनिंग एरिया असेल, ठाणे रेशनिंग एरिया असेल किंवा महाराष्ट्रातील एरिया असेल त्या ठिकाणी महिनाभराचा धडक कार्यक्रम आखून ज्या ज्या ठिकाणी साठे असतील त्याची तपासणी करता येईल. सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या त्या सर्व सूचनांचा जेवढा शक्य होईल तेवढा विचार करु. शेवटी हा सगळ्यांचा प्रश्न आहे. आम्हाला लोकाभिमुख प्रशासन चालवित असताना सर्वसामान्य माणसे ज्या गोष्टीमुळे त्रस्त होऊ शकतात त्याबाबतीत उपाययोजना करण्यासाठी शासनाने जी पावले उचलली पाहिजेत ती उचलण्याच्या बाबतीत राज्य सरकार निश्चितपणे विचार करील. डाळ, पामतेल दिल्यानंतर अन्य काही गोष्टींच्या बाबतीत सुध्दा नियंत्रण करण्याच्या बाबतीत राज्यसरकारला स्वत:चा हिस्सा उचलावा लागला तरी तो उचलण्याची तयारी राज्य सरकार ठेवील असे मी सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्यांनी भावी स्थीर ठेवण्याच्या बाबतीत या ठिकाणी सांगितले परंतु त्यावेळची परिस्थिती वेगळी होती. जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थीर ठेवले जात असतील....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय उत्तर देत असताना सरकार म्हणून उत्तर देत आहेत. मी दुसऱ्या कामात असल्यामुळे मला या प्रस्तावावर भाषण करण्याची संधी मिळाली नाही. हा विषय केंद्रापासून चिंतेचा झालेला आहे. पक्षाचा विषय म्हणून नव्हे तर सरकार

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते .....

तर सरकार म्हणून आम्ही हे करु, ते करु असे माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत. खुद्द माननीय पंतप्रधानांनी देशातील साऱ्या मुख्यमंत्र्यांना कामाला लावले असून आपापल्या राज्यातील व्यापाऱ्यावर बारीक नजर ठेवणे, त्यांच्यातील साठेबाजी आणि काळाबाजार करणाऱ्यांना हुडकून काढणे याबाबतीत पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीमध्ये निर्देश दिले. याचा अर्थ केंद्र सरकारला हे माहीत आहे की, आपल्या राज्यामध्ये अशा प्रकारचे व्यापारी, काळाबाजारवाले आजही अस्तित्वात आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/ श्री.बरवडनंतर 12:25

श्री.दिवाकर रावते....

आपण महाराष्ट्रामध्ये ही परिस्थिती येण्यापूर्वी ठोस कार्यवाही केली पाहिजे. आघाडी सरकार मागील 8-9 वर्षापासून सत्तेत आहे. या कालावधीत वाढत्या महागाईचा विषय पाचव्यांदा सभागृहात आलेला आहे. या महागाईला हे शासन का रोखू शकले नाही त्यामुळे ही चर्चा उपस्थित करावी लागली आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी माझ्या उत्तराला सुरुवात केली त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे कदाचित सभागृहात उपस्थित नव्हते. मी सुरुवातीलाच केंद्र सरकार आणि राज्य सरकारने या प्रश्नासंबंधी उचललेली पावले आणि आता निर्माण झालेली परिस्थिती याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. जी पावले उचलली आहेत त्यापेक्षा कठोर पावले उचलण्याची आवश्यकता आहे हे मी नाकारत नाही. शासनाने घेतलेल्या निर्णयांची विशिष्ट कालावधीत अंमलबजावणी केली जावी आणि काळया बाजारामध्ये साठा करुन ठेवतात, कृत्रिम टंचाई निर्माण करणा-या व्यापाऱ्यांना शोधून त्यांच्याविरुध्द निश्चितपणे कठोर कारवाई केली जाईल असे सांगितले आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे काही प्रमाणात काम एन.जी.ओ.कडे देण्याचा मुद्दा मांडला. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी या कामामध्ये महिलाचा सहभाग असावा यादृष्टीने सूचना केली आहे. महाराष्ट्रातील सर्व दुकाने बचत गटांकडे सोपविण्याचा निर्णय घेतला होता, त्या निर्णयाला सर्व स्तरावरुन विरोध झाला. शेवटी हायकोर्टाने तो निर्णय रद्द ठरविला. विधानसभेमध्ये असा निर्णय घेऊ नये अशी भावना अनेक सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली हे रेकॉर्डवर आहे. त्या निर्णयाच्या दिशेने शासनाने पावले टाकली होती, पण एकाच वेळी हा निर्णय घेतला तर अनेक कुटुंबे बेकार होतील असे सांगण्यात आले, त्याबाबत आकडेवारी सांगण्यात आली. त्यामुळे शासनाने त्या निर्णयात अंशत: बदल केला. याऐवजी निलंबित असलेली दुकाने किंवा लोकसंख्येच्या प्रमाणावर आधारित महिला बचत गटांना ही दुकाने देण्याचा सरकारने नवीन निर्णय घेतला होता. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली. पण काही दुकानदार हायकोर्टात गेले. काही ठिकाणी त्याला स्थगिती मिळाली, तरी सुध्दा त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे सरकारचे धोरण स्पष्ट आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.सुनील तटकरे....

त्यानुसार 4 हजार रेशन दुकाने आणि 4 हजार किरकोळ परवाने, देण्याचाही सरकारने कार्यक्रम आखला होता. ग्रामसभेसमोर जाण्यासाठी तारीख ठरविली होती. त्यासंबंधी राज्य स्तरावर किती अंमलबजावणी झाली त्याचा आढावा घेत आहोत. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये महिलांचा सहभाग असावा हा सन्माननीय सदस्य श्री.गडाख यांनी केलेल्या विनंतीचा सरकारने यापूर्वी स्वीकार केलेला आहे. त्याची अंमलबजावणी करीत असताना त्यातील त्रुटी दूर करुन त्याची अंमलबजावणी प्रभावी करण्याच्या दृष्टीने निश्चित प्रयत्न केला जाईल. या प्रस्तावावर सर्व सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळी भूमिका मांडली. विदर्भामध्ये अंत्योदय योजनेत धान्य मिळत नाही, असे सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन यांनी म्हटले होते. सन्माननीय सदस्य श्री.जव्हेरी, सन्माननीय सदस्य श्री.जामा यांनी लेखी स्वरुपात आपले म्हणणे माझ्याकडे दिले आहे. त्यांच्या भागांमध्ये अंत्योदय योजनेतील धान्य मिळत नसेल तर त्यासंबंधी कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने पावले उचलले जातील. शेती मालाचे उत्पादन वाढावे यासाठी शेतकरी चिंतेमध्ये होता. माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग, माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार, केंद्रीय अर्थमंत्री माननीय श्री.पी.चिदम्बरम आणि युपीएच्या अध्यक्षा माननीय श्रीमती सोनिया गांधी या सर्वांनी घेतलेल्या निर्णयामुळे कर्जमाफीचे धोरण स्वीकारण्यात आले, त्यामुळे मी युपीए सरकारचे अभिनंदन करीन. त्याचा फायदा शेतक-यांना निश्चितपणे होईल. यासंबंधी कोणी आंदोलन केले आणि कोणी धोरण स्वीकारले हा विषय येथे चर्चेसाठी नाही. आज जी परिस्थिती उद्‌भवली आहे त्यावर नियंत्रण आणण्याचे धोरण केंद्र सरकार आखत आहे. पहिल्यांदाच संपूर्ण देश पातळीवर कर्जमाफीचा निर्णय घेण्यात आला आणि देशातील महागाई कमी करण्याचे धोरण त्याच्या पाठीमागे होते. त्यासाठी मी युपीएच्या सर्व नेत्यांचे अभिनंदन करु इच्छितो. त्याचे परिणाम येत्या दोन वर्षात पहावयास मिळतील. शेवटी मला हेही सांगितले पाहिजे की, केंद्र सरकारकडून आधारभूत किंमत ठरविली जाते. केंद्राने भाताचे दर दुप्पट केले आहेत. गव्हाच्या दरात वाढ केली आहे. यापूर्वीच्या काळात दरवर्षी 10-20 रुपयांची वाढ होत होती. गेल्या 3 वर्षामध्ये आतापर्यंत आधारभूत किंमतीत वाढ झाली नव्हती. ही वाढ करण्याचे केंद्र सरकारने धोरण स्वीकारले आहे. त्यासंबंधी मी केंद्र सरकारचे अभिनंदन करु इच्छितो.

नंतर श्री.गिते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

04-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) EE-1

ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. खंदारे 12:30

श्री. सुनील तटकरे....

भाताचे उत्पादन वाढू शकेल. गव्हाचे उत्पादन वाढू शकेल. मी पुन्हा नम्रपणे सांगू इच्छितो की, शासनाने याबाबतीत अतिशय चांगले धोरण स्वीकारलेले आहे.

डॉ.दीपक सावंत : भाववाढ कधी कमी होणार यासबंधीचे आम्हाला उत्तर हवे आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, भाववाढ रोखण्यामध्ये, तसेच डाळ आणि पामतेल उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून राज्य शासन निश्चितपणे पाऊले उचलीत आहे. अन्य वस्तुंवरील भाव नियंत्रणात आणण्याच्या दृष्टीने देखील अनेक सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. यासंदर्भात माननीय माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली आहे. त्या समितीची बैठक येत्या चार, पाच दिवसात घेण्यात यावी अशा प्रकारची विनंती मी माननीय मुख्यमंत्र्यांना केली आहे. भाववाढ नियंत्रण करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाकडून निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या बाबतीतील दोष या ठिकाणी सांगितले गेले. सार्वजनिक वितरणाच्या बाबतीत काही दोष निश्चितपणे आहेत. ते दोष दुरुस्त करण्यासाठी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी आम्हाला सहकार्य करावे.

श्री.दिवाकर रावते : भाववाढ कमी कशी होईल यादृष्टीने माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

डॉ.दीपक सावंत :भाववाढ कधीपर्यंत कमी होईल याबाबतची माहिती माननीय मंत्र्यांनी सदनात दिली पाहिजे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी या ठिकाणी पुन्हा नम्रपणे सांगू इच्छितो की, येत्या मे महिन्यापासून पामतेल सवलतीच्या दरात देण्याची योजना आम्ही राबविणार आहोत. डाळ आयात करण्याच्या संदर्भात केंद्र शासनाने निर्बंध खुले केले आहेत, त्यासंदर्भात देखील राज्य सरकार निश्चितपणे विचार करील.

श्री. दिवाकर रावते : आम्ही आमच्या कार्यकाळात आम्ही पाच वस्तुंवर सबसिडी दिली होती. परंतु सबसिडीच्या बाबतीत सन्माननीय मंत्री महोदय काहीच बोलत नाहीत.

श्री. सुनील तटकरे : युतीच्या काळात जेवढया वस्तु सबसिडीच्या दरात दिल्या जात होत्या, तेवढया वस्तू देण्याच्या बाबतीत हे शासन प्रयत्न करीत आहे. महागाई कमी करण्याच्या बाबतीत निश्चितपणे राज्य शासनाकडून उपाययोजना केल्या जातील. महाराष्ट्रातील जनतेच्या

2...



श्री.सुनील तटकरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महत्वाच्या प्रश्नाच्या बाबतीत सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या, त्या सर्व सदस्यांच्या भावनांचा आदर व्यक्त करतो. भाववाढीवर नियंत्रण करण्यासंबंधीची कठोर अंमलबजावणी राज्य सरकारकडून निश्चितपणे केली जाईल अशा प्रकारचे आश्वासने देतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

**<u>सभापतीस्थानी माननीय उपसभापती</u>**

श्री. दिवाकर रावते : युतीच्या काळात आम्ही पाच वस्तुंवर सबसिडी दिली होती. सबसिडीच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी काहीही उल्ल्ेख केला नाही. माननीय मंत्र्यांनी ठोस असे उत्तर या ठिकाणी दिले नाही असे माझे म्हणणे आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी राईट ऑफ रिप्लायचे भाषण सुरु करावे.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचे संपूर्ण उत्तर मी अतिशय काळजीपूर्वक ऐकले आहे. विद्यमान परिस्थितीत या महागाईमुळे सर्व सामान्य जनता भरडली जात आहे, त्यावर तातडीने काय उपाययोजना केली जात आहे याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही. सन्माननीय मंत्री महोदयांची पूर्वीची हतबलता कशी होती, त्या अनुषंगाने त्यांचे 1998 या वर्षाचे भाषण या ठिकाणी मी वाचून दाखविणार आहे. माननीय मंत्र्यांना जे विचार 1998 साली सुचले होते तेच विचार 9 वर्षानंतर व्यक्त करीत आहेत. विद्यमान मंत्र्यांनी 1998 साली भाषण केले होते ते मी वाचून दाखवितो. मुंबई, पुणे सारखी प्रगत शहरे आहेत, त्या शहरांमध्ये राहणा-या माणसांना कमितकमी जीवनावश्यक मालाचा पुरवठा व्हावयास पाहिजे होता, त्याचा पुरवठा होऊ शकत नाही. अन्नधान्याच्या गोष्टी आहेत त्यांच्या बाबतीत नव्हे तर भाजीपालासुध्दा सामान्य ग्राहकांना घेण्यासारखी परिस्थिती राहिली नाही. मुंबईतील ग्राहकपेठांकडून सामान्य ग्राहकांची पिळवणूक केली जात आहे. त्या पिवळणुकीकडे गांभीर्याने पाहण्याच्या दृष्टीकोन आजच्या सरकारने घेतला नाही. हे तुमचेच वाक्य तुम्हाला लाभो. मुंबईतील बाजारपेठ नवीन मुंबईत नेल्यामुळे दरवाढ झाली आहे. आज जीवनावश्यक वस्तू शहरी भागामध्ये मिळत नाहीत, तसेच ग्रामीण भागात देखील दरवाढ मोठया प्रमाणात झाली आहे. त्यांचे सगळयात हे वाक्य मोठे आहे आणि ते वाक्य मी त्यांनाच ऐकवून दाखवितो आहे. ही अतिशय चीड आणणारी गोष्ट आहे. माननीय मंत्री महोदयांकडून आमची अपेक्षा नव्हती. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपल्याकडून अपेक्षा व्यक्त केली. महाराष्ट्रातील जनतेला न्याय देऊ शकत नाही म्हणून मंत्रीपद सोडा.

**उपसभापती** : महागाई कमी होणार असेल तर ते मंत्रीपद सोडतील...

श्री. अरविंद सावंत : 1998 साली सातत्याने भाषणे केली जात होती की, सत्तेवर युतीचे सरकार आले आहे, त्यांनी राज्याचे वाटोळे केले. पण या शासनाने 2008 पर्यंत काय केले हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. मी या ठिकाणी नम्रपणे सांगतो की, महागाई प्रचंड प्रमाणात वाढली आहे.
"सहन होत नाही आणि सांगताही येत नाही" अशी सत्ताधारी पक्षातील सदस्यांची अवस्था झाली आहे. तुमची वाक्ये तुम्हाला लखलाभ होवो.

यानंतर श्री. कानडे....



श्री. अरविंद सावंत ....

त्यावेळी तुम्ही जी वाक्ये उच्चारली होती ती आजही तशीच आहेत. अत्यंत असमाधानकारक असे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेले आहे. त्यांच्या उत्तरातून सामान्य जनतेला कोणताही न्याय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मिळणार नाही. जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ रोखण्यासाठी निश्चित असे कोणतेही धोरण मंत्रिमहोदयांनी स्पष्ट केलेले नाही. युतीच्या काळात जीवनावश्यक अशा 5 वस्तूंचे भाव स्थिर ठेवले होते तशीच घोषणा आज होईल अशी अपेक्षा होती पण ती झालेली नाही. मंत्रिमहोदयांनी केलेल्या व्यक्तव्याशी, सगळया भावनांशी आणि न दिलेल्या न्यायाच्या संदर्भात आम्ही नाराजी व्यक्त करतो तसेच सरकारचे जे भाववाढीकडे दुर्लक्ष होत आहे त्याबद्दल निषेध व्यक्त करुन सभात्याग करतो.

( विरोधी पक्षाचे सदस्य सभागृहातून बहिर्गमन करतात )

**उपसभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वा. भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.35 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-------

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती** श्री.उल्हास पवार)

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**राज्यात एड्‌सपेक्षा भयंकर अशा सिकल सेल रोग मोठ्या प्रमाणात पसरल्याबाबत**

**(१) * ३७४४३ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.सय्यद जामा , श्री.राजन तेली , श्री. शरद रणपिसे , श्री. सुरेशदादा देशमुख , डॉ. दिपक सावंत , श्री. मधुकर सरपोतदार , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. यशवंतराव गडाख , श्री. सुरेश जेथलिया , श्री. सुधाकर गणगणे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एड्‌सपेक्षाही भयंकर अशा सिकल सेल रोगाचा राज्यात विशेषत: विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रात फैलाव जलदगतीने होत असल्याचे माहे डिसेंबर, २००७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने त्यासाठी नेमलेला डॉ.बी.सी. मेहता समितीने माहे मे, २००६ मध्ये सादर केलेल्या अहवालात सिकल सेल हा महाभयंकर रोग असून तो झपाट्याने महाराष्ट्रात पसरत असून तातडीने उपाययोजना कराव्यात अशी शिफारस शासनास केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सिकल सेल आजाराने ग्रस्त झालेल्या रुग्णांची संख्या राज्यात एक कोटीच्या घरात गेल्याने याचा तातडीने अभ्यास करण्यासाठी आता पुन्हा शासनाने एक समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास त्याअनुषंगाने या रोगाला वेळीच रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता :** (१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) राज्यात १ कोटी रुग्ण सिकलसेल या आजाराने केवळ ग्रस्त नसून ते सिकलसेल या रोगाने ग्रस्त किंवा वाहक आहेत. दिनांक १५.२.२००८ च्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (वै.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे.

(४) या रोगावर उपचाराकरिता आणि प्रभावी आळा घालण्याकरिता पुढील प्रतिबंधक उपाययोजना केल्या आहेत:-

१) शासनाच्या अधिपत्याखालील ८ वैद्यकीय महाविद्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

२) सिकलसेल या रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग या विभागातील उपलब्ध यंत्रसामुग्री व सुविधांचा उपयोग करण्याचे ठरविण्यात आले.

३) सिकलसेल या आजारासाठी आरोग्य केंद्रावर येणाऱ्या रुग्णांची तपासणी करण्यात येणार आहे.

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

४) या कार्यक्रमासाठी सन २००७-०८ या वर्षी तूर्तास रु.३.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

५) सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे प्रत्येक जिल्ह्यात एका स्वयंसेवी संस्थेची निवड जागतीक बँकेच्या निवड पद्धतीने करण्यात येत आहे.

६) सिकलसेल रुग्णास दररोज फोलीकॅसिड गोळ्यांचा उपचार करण्यात येतो व उप जिल्हा तसेच जिल्हा रुग्णालयांमध्ये रक्त संक्रमणाची सोय सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे करुन देण्यात येत आहे.

७) या रोगाचे गांभीर्य लक्षात घेता तातडीने अभ्यास करण्यासाठी एक राज्यस्तरीय समिती शासनातर्फे नेमण्यात आली आहे.

८) तसेच केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत रु.१.६५ कोटी इतका निधी केंद्र शासनाकडुन सार्वजनिक आरोग्य विभागाला उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

या निधीचा वापर सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पुढीलप्रमाणे करण्यात येणार आहे.

* रु.५७.२२ लाख अनुदान स्वयंसेवी संस्थांना सहाय्य
* रु.११.४० लाख औषधे पुरवठा
* रु.७८.३६ लाख चाचण्यासाठीची उपकरणे, रसायने इत्यादीसाठी व
* उर्वरित अनुदान प्रशिक्षण व संनियंत्रणासाठी वापरण्यांत येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या अत्यंत महत्वाच्या विषयावर काल सभागृहात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून चर्चा झाली होती. सिकलसेल हा महाभयानक रोग ठरु पहात आहे. मागील काही वर्षात महाराष्ट्रात सिकलसेल आजार झालेल्या रुग्णांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. या प्रश्नासंबंधी माननीय राज्यमंत्री व्यक्तिशः इंटरेस्ट घेऊन पाठपुरावा करीत आहेत. सध्या या आजराने ग्रस्त झालेले 1 कोटी रुग्ण महाराष्ट्रात आहेत. त्या मानाने या कार्यक्रमासाठी जे अनुदान दिले गेले आहे ते अपुरे असल्यामुळे या अनुदानाच्या रक्कमेतून या भयंकर समस्येला कसे तोंड देता येईल? हे अनुदान वाढविण्याच्या संदर्भात शासन कोणती पावले उचलणार आहे? या कार्यक्रमाचे अवेरनेस, ट्रिटमेंट आणि प्रिव्हेन्शन अशा तीन टप्प्यात क्लासिफिकेशन केले जावे. या समस्येला तोंड देण्यासाठी विशेष कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, याच विषयावरील लक्षवेधी सूचनेला उत्तर देत असताना मी काल सभागृहात सांगितले होते की, 2007-08 मध्ये वैद्यकीय शिक्षण विभागाने 3 कोटी रुपयांची तरतूद या कार्यक्रमासाठी केली असून नॅशनल रुरल हेल्थ मिशनकडून रु.1.65 कोटीची

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तरतूद या कार्यक्रमासाठी करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्याचा कार्यक्रम 2008 मध्ये सुरु झाला असून त्यासाठी उपलब्ध करुन दिलेला निधी पुरेसा आहे. खरे म्हणजे हा विषय सार्वजनिक आरोग्य विभागाशी निगडित आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाने या संदर्भातील कार्यक्रम तयार केला होता.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, टेक्नीकल डिटेलमध्ये जाण्यापेक्षा समस्येचे गांभीर्य मंत्रीमहोदयांनी लक्षात घ्यावे. 1.65 कोटी रुपयांचे अनुदान दिले असून रुग्णांची संख्या 1 कोटी आहे. म्हणजे कार्यक्रमाच्या दृष्टीने प्रत्येक रुग्णाच्या वाट्याला 1.11 रुपये इतकीच रक्कम उपलब्ध होणार आहे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37445........

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 1.65 कोटी आरोग्य विभाग आणि 3 कोटी मेडिकल एज्युकेशनकडून असे 4.65 कोटी रुपये मी काल सांगितले होते. दुसरा प्रश्न विचारला की, हा कार्यक्रम आपण कसा राबविणार आहात तर त्याबाबत मला असे स्पष्टीकरण करावयाचे आहे की, यासंबंधी एक बुकलेट आम्ही तयार केले असून त्यामध्ये संपूर्ण विस्तृतपणे दिलेले आहे. त्या बुकलेटची एक प्रत प्रत्येक सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल. तसेच ते वाचून झाल्यानंतर सभागृहात केव्हाही या विषयाच्या अनुषंगाने अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने आपण चर्चा करु शकतो.

डॉ. दीपक सावंत : महोदय, 1.65 कोटी आपण एनआरएचएम या अभियानासाठी दिले असल्याचे म्हटले आहे. परंतु हा सर्व निधी सिकल सेल या रोगावर नियंत्रण आणण्यासाठीच वापरला जाणार की यामध्ये अन्य कार्यक्रम सुध्दा अंतर्भुत आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, हा निधी फक्त सिकल सेल या रोगावरील नियंत्रणासाठीच वापरला जाणार आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या विषयावर कालच सभागृहात लक्षवेधी सूचना चर्चेला आली असताना पुन्हा त्याच विषयावर प्रश्न ॲडमिट होतो कसा हा प्रश्न महत्वाचा आहे. म्हणून याबाबत काहीतरी समन्वय असणे महत्वाचे आहे. उत्तरात सांगितल्याप्रमाणे डॉक्टर मेहता समितीने ज्या शिफारशी केल्या आहेत, त्याव्यतिरिक्त आणखी कोणत्या शिफारशी केलेल्या आहेत काय ? तसेच ही समिती कधी स्थापन केली आणि त्या समितीचे कार्य कधी सुरु झाले व किती दिवसांचा कार्यकाल या समितीला दिलेला आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, या समितीचे चेअरमन श्री. अमिताभ चंद्र, प्रधान सचिव वैद्यकीय शिक्षण विभाग, डॉ. डब्ल्यू.बी.तायडे, डायरेक्टर सार्वजनिक आरोग्य, श्री. रणखांबे, श्री. उके, श्री. एन.जे.राठोड, डॉ. व्ही.एल.गुप्ता, डॉ.डी.पी.जैन, डॉ. सरिता जोशी, डॉ. रजनी पाटील, विजय बाविस्कर, जयंत जोगबंधू, डॉ. रणदिवे हे सर्व सदस्य आहेत. या समितीने ऑलरेडी आमच्याकडे अहवाल सादर केलेला आहे तो अहवाल आवश्यक असल्यास मी वाचून दाखवितो, अन्यथा पटलावर ठेवतो. डॉ. मेहता समितीने जो अहवाल दिला, त्यानंतर असे दिसून आले की, हे काम फक्त मेडिकल एज्युकेशन विभागाचेच नाही तर ट्रायबल वेल्फेअर, समाजकल्याण आणि सार्वजनिक

.....2

श्री. सुरेश शेट्टी .... ता. प्र. क्र. 37445........

आरोग्य अशा तीन चार विभागांचाही त्यात समावेश आहे. माननीय मंत्री महोदयांनी मेडिकल एज्युकेशन विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आणि या समितीने डॉ. मेहता समितीने ज्या शिफारशी केल्या होत्या त्यांची अंमलबजावणी कशी करावी आणि संबंधित सर्व विभागांशी समन्वय साधून या कार्यक्रमाची सुरुवात कशी करावी, याबाबत विचार करावा म्हणून समिती स्थापन केली असून त्या समितीच्या शिफारशी आल्यानंतरच आम्ही हा कार्यक्रम सुरु केला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ MMP/ प्रथम श्री. खर्चे...... 13.10

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, कल हमारे माननीय मंत्री श्री शेट्टी जी ने एक प्रशन के उत्तर में कहा था कि जो मरीज एडमिट हैं, उनके इलाज की उचित व्यवस्था की जाएगी. मैंने मरीजों के बारे में जानकारी मंत्री महोदय के पास भेजी है. बहुत सारे मरीजों का इलाज नहीं हो रहा है, उनको जो पार्ट रिप्लेसमेंट करना है, उसका खर्चा डी.एम.ई.आर. की ओर से मंजूर नहीं हो रहा है. मैं स्पेसिफिक प्रश्न पूछना चाहता हूँ कि नागपुर मेडीकल कॉलेज और इंदिरा गांधी मेडीकल कॉलेज में जो मरीज एडमिट हैं, क्या शासन उनके इलाज और पार्ट रिप्लेसमेंट के खर्चे को मंजूरी देगा ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापति महोदय, मैंने कल ही सभागृह में कहा था जो भी मरीज माननीय सदस्य बताएंगे, उनका इलाज का खर्चा जीवनदायी योजना के अन्तर्गत किया जाएगा. माननीय सदस्य द्वारा बताए गए मरीजों की यादी मेरे पास अभी तक नहीं आई है. मेरा उनसे अनुरोध है कि वे यह यादी मेरे पास दे दें.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, जहां तक मैं समझती हूँ सिकलसेल कम्युनिकेबल डिसीज नहीं है. यह जेनेटिक डिसीज है और जेनेटिक डिसीज होने की वजह से इसका प्रिवेंशन करना संभव नहीं है. मुश्किल तब पैदा होती है जब इसका गलत डॉयगोनेसिस किया जाता है और उससे मरीज का लिवर डेमेज हो जाता है. इसलिए सब पहली आवश्यकता इस बात की है कि इसकी जांच करने के लिए बड़े पैमाने पर उपाय-योजना की जाए. मेरा पहला प्रश्न यह है कि सिकलसेल बीमारी की जांच करने के बारे में एन.जी.ओ. की क्या भूमिका रहेगी ? इस बीमारी का ट्रीटमेंट "सेल सेपरेशन" है, इसलिए मेरा दूसरा प्रश्न यह है कि क्या "सेल सेपरेशन" की लॅब हर जिले में स्थापित की जाएगी ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापति महोदय, मैंने कल इस बारे में बताया था, लेकिन माननीय सदस्या उस समय सभागृह में उपस्थित नहीं थीं. मैं उनको बताना चाहता हूँ कि हमने यह जो प्रोग्राम तैयार किया है, प्रिवेंशन उसका एक बहुत बड़ा कम्पोनेन्ट है. "Prevention is the best cure." सब से पहले तो ब्लड की जांच करके हम यह आयडेन्टीफाय करेंगे कि वह इन्फेक्टेड है या कॅरियर है. हमने इनके लिए अलग अलग रंग का कार्ड देने का प्रोवीजन किया है. इन्फेक्टेड के लिए लाल रंग का कार्ड, कॅरियर के लिए पीले रंग का कार्ड और नॉर्मल के लिए सफेद रंग का कार्ड दिया जाता है. मेल या फीमेल में से एक इन्फेक्टेड होगा तो उसकी संतान

. . . 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सुरेश शेट्टी

भी इन्फेक्टेड रहेगी. इसलिए इस बीमारी के बारे में लोगों में जागरुकता पैदा करना, कॅरियर क्या होता है, इन्फेक्टेड क्या होता है, यह सब लोगों को समझाना सब से बड़ी बात है. यह हमारे प्रोग्राम का सब से पहला काम है. प्रिवेंशन के इस काम में सब से ज्यादा मुश्किल होती है, इसलिए एन.जी.ओ. की सहायता लेकर हर ट्रायबल एरिया में, हर गांव में जाकर लोगों को बताना है कि सिकलसेल बीमारी क्या होती है और हम इसको किस तरह से रोक सकते हैं. इसके लिए हम एन.एस.एस. और एन.सी.सी. के छात्रों की भी मदद लेंगे. अवेयरनेस क्रिएट करने के लिए हम एन.जी.ओ. और अन्य लोगों की मदद लेने वाले हैं.

डॉ. एन.पी. हिराणी : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. आपण एडस् या रोगाच्या संदर्भात बरेच उपक्रम राबवत असतो परंतु सिकलसेलच्या संदर्भात एडस् सारखे उपक्रम राबवत नाही. सिकलसेल हा अत्यंत भयावह रोग आहे. एका का सिकलसेल रोग झाला तर तो दुरुस्त करणे कठीण काम होऊन बसते. सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी अतिशय राईटली उत्तर दिलेले आहे. सिकलसेल या रोगाला प्रिव्हेंट केले तर काही प्रमाणात आळा बसू शकतो ही वस्तुस्थिती आहे. पुरतु दुर्दैवाने आदिवासी भागातील अनुसूचित जाती-जमातींना मोठया प्रमाणात सिकलसेल रोगाचा प्रार्दुभाव होत असतो. यवतमाळ जिल्हयात अनुसुचित जाती जमातींमध्ये सिकलसेल या रोगाचे प्रमाण मोठया प्रमाणात आहे. सिकलसेलला प्रतिबंध करण्यासाठी शासन आटोकाट प्रयत्न करीत आहे, नागपूरमधील इंदिरा गांधी मेडीकल हॉस्पिटल मध्ये सिकलसेलच्या संदर्भात उपकरणे असून या ठिकाणी सिलकलसेल रुग्णांवर चांगल्या प्रकारे उपचार होतात त्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु सिकलसेल रुग्णांची चाचणी करणे ही खर्चिक आणि त्रासदायक बाब आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ MMP/ KGS/ 12=55

ता.प्र.क्र.37443.. डॉ.एन.पी.हिराणी ..

या रोगावर उपचार करणारी पध्दत अत्यंत खर्चिक आणि त्रासदायक आहे. माझी शासनाला अशी विनंती आहे की, या रोगावर उपचार करण्याच्या दृष्टीने सर्व समावेशक अशा उपकरणासह लॅबरोटरी नागपूर मेडिकल कॉलेजमध्ये सुरु करण्याचा प्रस्ताव आहे काय ? त्या ठिकाणी अशी लॅबरोटरी सुरु करण्यात आलेली आहे काय , की नंतर सुरु करण्यात येणार आहे त्याचबरोबर ज्या ज्या भागात अशा प्रकारच्या रोगाचा प्रादूर्भाव मोठया प्रमाणावर आहे त्या त्या ठिकाणी अशा प्रकारची व्यवस्था करण्यात येणार आहे काय ? विशेषत: :यवतमाळ येथील कै. वसंतराव नाईक मेडिकल कॉलेजमध्ये ही व्यवस्था तातडीने करण्याची गरज आहे त्या ठिकाणी ही व्यवस्था केली आहे काय , आणि ही व्यवस्था केली नसेल तर किती दिवसात ही व्यवस्था कण्यात येणार आहे?

श्री.सुरेश शेट्टी :सभापती महोदय, राज्यातील आठ मेडिकल कॉलेजमध्ये एन.आर.एच.एम. मार्फत हा कार्यक्रम घेण्यात आला आहे. जीएमसी, नागपूर हे गडचिरोली, नागपूर आणि चंद्रपूर हे तीन जिल्हे कव्हर करणार आहेत. आयजीएमसी, नागपूर, भंडारा आणि गोदिंया हे जिव्हे कव्हर करणार आहेत. यवतमाळ, अकोला, धुळे, औरंगाबाद, नांदेड आणि मुंबई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये हा कार्यक्रम हाती घेण्यात आला . अशा प्रकारे आठ कॉलेजेसमधील पाच डॉक्टरांचे स्वयंसेवक म्हणून परळ येथील इन्स्टिटयूट ऑफ हयुमोटॉलॉजीमध्ये प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे. त्यांना प्रशिक्षण दिल्यानंतर प्रत्येक कॉलेजमध्ये हे डॉक्टर्स काम करणार आहेत. प्रत्येक कॉलेजमधील पाच डॉक्टरांना प्रशिक्षण देऊन त्याना तेथे पाठविण्यात आलेले आहे.

---

**ता.प्र.क्र.40001**

**( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )**

---

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील यंत्रमागधारकांना वीज दरवाढीत सवलत देण्याबाबत**

**(३) * ३७५६० श्री. दिवाकर रावते , श्री. मधुकर सरपोतदार , डॉ. दिपक सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील यंत्रमागधारकांना आतापर्यंत १७४ पैसे प्रति युनिट दराने वीजेची बिले देण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आता यंत्रमागधारकांना २०७ ते ३२५ पैसे प्रति या दराने वीजेची देयके देण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, इतकी प्रचंड वीजदर वाढ यंत्रमागधारकांना झेपत नसल्याने यंत्रमाग उद्योगाला मंदिचा फटका बसला आहे तसेच सोलापूर जिल्ह्यातील यंत्रमागधारकांनी वीज दरवाढीविरोधात बंद पुकारुन जिल्हाधिकारी यांचेकडे दरवाढ रद्द करण्याबाबत दिनांक ३१ जानेवारी, २००८ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यंत्रमागधारकांना सध्या ९ प्रकारचे दर लागू करण्यात आले असून राज्यातील ५० टक्के यंत्रमाग बंद पडण्याचा धोका निर्माण झाल्याने यंत्रमागधारकांना पूर्वीप्रमाणे वीज दरात सवलत देण्यात येणार आहे काय ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (१) दिनांक २८-८-२००६ च्या शासन निर्णयानुसार सन २००६-२००७ या वर्षासाठी राज्यातील यंत्रमागधारकांना प्रचलित वीजदरऐवजी १६० पैसे/युनिट या दराप्रमाणे होणारी देयकाची रक्कम भरण्याची सवलत देण्यात आली होती. या व्यतिरिक्त लागू होणारे विद्युत शुल्क (१० पैसे/युनिट) व वीज विक्रीवरील कर (४ पैसे/युनिट) विचारात घेता यंत्रमागधारक १७४ पैसे/युनिट या दराने देयकाचा भरणा करित असे. वर्ष २००७-२००८ साठी द्यावयाच्या सवलतीबाबत ऑक्टोबर २००७ मध्ये निर्णय घेण्यात आला. तोपर्यंत अंतरिम व्यवस्था म्हणून यंत्रमागधारकांना १६० पैसे/युनिट या दराने देयक भरण्याची अनुमती देण्यात आली होती.

(२) यंत्रमागधारकांना वर्ष २००७-२००८ साठी प्रचलित वीज दरात सवलत देण्याविषयी प्रथमत: ऑक्टोबर, २००७ मध्ये निर्णय घेण्यात आला होता. सदरचा निर्णय एप्रिल, २००७ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आला होता. तथापि, सदर निर्णयामध्ये फेब्रुवारी, २००८ मध्ये सुधारणा करण्यात आली असून यंत्रमागधारकांना सन २००६-२००७ या वर्षी लागू होणारा १६० पैसे/युनिट डिसेंबर, २००७ पर्यंत कायम ठेवण्यात आला असून जानेवारी २००८ पासून सुधारित सवलतीचा दर लागू करण्यात आला आहे. जानेवारी, २००८ पासून अंमलात आलेल्या सुधारित सवलतीच्या दराचा विचार करता व २६ पैसे/युनिट या दराने इंधन समायोजन आकार गृहीत धरल्यास, २७ अश्वशक्तीपर्यंत जोडभार असणाऱ्या यंत्रमागधारकांच्या बाबतीत सवलतीच्या वीज दरात सरासरी ३ ते १७ पैसे/ युनिट व अन्य लघुदाब यंत्रमागधारकांच्या बाबतीत सरासरी १०१ ते १११ पैसे / युनिट वाढ अपेक्षित आहे.

३..

(३) वरील तपशील विचारात घेता यंत्रमागधारकांच्या सवलतीच्या वीज दरात प्रचंड वाढ झाली आहे असे म्हणता येणार नाही. मात्र सोलापूर जिल्ह्यातील यंत्रमागधारकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दिनांक २९ जानेवारी, २००८ रोजी निवेदन दिले आहे.
(४) मा.विद्युत नियामक आयोगाने वेळोवेळी निश्चित केलेल्या प्रचलित वीज दरानुसार राज्यातील यंत्रमागधारकांना स्थिर आकार, वीज आकार, अतिरिक्त पुरवठा आकार, वाढीव अतिरिक्त पुरवठा आकार, इंधन समायोजन आकार, इत्यादी वेगवेगळे आकार लागू होतात. डिसेंबर, २००७ पर्यंत यंत्रमागधारकांना या सर्व आकारांऐंवजी सर्वसमावेशक १६० पैसे/युनिट असा सवलतीचा दर लागू होत असे. या पध्दतीत जानेवारी २००८ पासून बदल करण्यात आला असून स्थिर आकारात १०० टक्के सवलत व वर नमूद केलेल्या उर्वरित आकारमध्ये ४० ते ५० टक्के सवलत देण्यात येत आहे. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे यंत्रमागधारकांना जानेवारी, २००८ पासून लागू होणाऱ्या सवलतीच्या दरात झालेली माफक वाढ विचारात घेता यामुळे यंत्रमाग उद्योग बंद पडण्याचा धोका निर्माण झाला आहे असे म्हणता येणार नाही.

सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे

". उत्तर क्रमांक चार मधील पाचव्या ओळीत " या पध्दतीत जानेवारी 2008 पासून बदल करण्यात आला असून ".. च्या पुढे लघूदाब ग्राहकांना स्थीर आकारात 100 टक्के सवलत देण्यात आली आहे असे वाचावे.

श्री.मधुकर सरपोतदार :सभापती महोदय, आमचा मूळ प्रश्न अंत्यत स्पष्ट आहे. सुरुवातीला त्यांना 174 पैसे हा दर लावण्यात आला आहे आणि इतर विजेची दरवाढ करुन ती 325 पैशापर्यत गेलेली आहे .असा उल्लेख उत्तरामध्ये करण्यात आला आहे. सन्माननीय मत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे परंतु तेथील परिस्थिती नेमकी काय आहे हे त्यावरुन स्पष्ट होत नाही यंत्रमाग धारकांचे असे म्हणणे आहे की, अशा पध्दतीने जर दरवाढ करण्यात आली तर 4 लाख यंत्रमाग बंद होतील . या संदर्भात मला असे विचारावयाचे आहे की, सुरुवातीला 174 रुपये हा दर होता नंतर हा दर वाढवून 325 पर्यत करण्यात आला आहे. तेव्हा एवढी दरवाढ करण्यासबंधीचे स्पष्टीकरण दिले असते तर अधिक बरे झाले असते. टेकनिकल आस्पेक्टसंबंधी उत्तर दिल्यामुळे आम्हाला नेमकी स्थिती काय आहे हे समजत नाही. तेव्हा 174 चा दर 325 पर्यंत दर का वाढविण्यात आला आहे यासबंधीचा खुलासा मंत्री महोदय करतील काय ?

नतर श्री.सुंबरे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, यंत्रमागधारकांना जो वीज पुरवठा करण्यात येतो त्या संदर्भात महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने विजेचे दर निश्चित केले आहेत त्याप्रमाणे 27 एच.पी.पर्यंतचे जे यंत्रमागधारक आहेत त्यांना 3 रूपये आणि 27 एचपी पेक्षा जास्त वीज वापर क्षमता आहे त्यांना 4 रूपये असा दर आहे. विजेचा हा दर असला तरी या राज्यातील यंत्रमाग व्यवसाय टिकून रहावा म्हणून राज्य सरकारने वेळोवेळी काही निर्णय घेतले आहेत. त्यात सुरूवातीच्या काळात जे 27 एचपी पर्यंतचे ग्राहक होते त्यांना 3 रूपये असा दर भरावा लागत आहे त्यामध्ये 1.60 रूपया ग्राहकाने आणि 1.40 रूपये राज्य सरकारने द्यायचे तसेच 27 एचपी पेक्षा जास्त वीज वापर क्षमतेचे ग्राहक आहेत त्यांना 4 रूपये दराने आकारणी होते त्यात 1.60 रूपये ग्राहकाडून आणि 2.40 राज्य सरकारने पैसे भरायचे. याशिवाय 6 टक्के ड्युटी आणि 4 पैसे टॅक्स ऑन सेल अशा पकारे एकूण 1.74 रूपये त्यांना भरावे लागत होते. दरम्यानच्या काळामध्ये राज्य सरकारने एक भूमिका ठरविली होती की, या यंत्रमागधारकांना सवलत देताना त्यामध्ये दरवर्षी काही तरी वाढ दिली पाहिजे. या बाबतचा निर्णय राज्य सरकारने घेतला आणि त्यानंतर त्या निर्णयानुसार 27 एचपी पर्यंतचे जे ग्राहक आहेत त्यांना 3 रूपये दर लावण्यात आला. त्यातील 50 टक्के ग्राहकांनी आणि 50 टक्के राज्य सरकारने भरायचे तसेच 27 एचपी पेक्षा जास्त वापराचे ग्राहक आहत त्यांना ठरविलेल्या वीज दरामध्ये 60 टक्के ग्राहकांनी आणि 40 टक्के राज्य सरकारने भरायचे असा निर्णय घेतला. सभापती महोदय, राज्य सरकारचा आधीचा निर्णय होता त्यात इंधन समायोजन आकार असेल वा अतिरिक्त पुरवठा आकार असेल हे सगळे चार्जेस 1.60 रूपयामध्ये आपण धरीत होतो. परंतु नव्याने ठरविलेल्या धोरणानुसार आणि दरानुसार 27 एचपीच्या ग्राहकांच्या बाबतीत हे 100 टक्के त्यांना वगळले मात्र 27 एचपी पेक्षा जास्त वापर क्षमता असलेल्या ग्राहकांना मात्र हे चार्जेस आकारण्यास सुरूवात केली आहे, त्यात 60 टक्के आणि 40 टक्के असे आपण केले आहे. परंतु आपल्या मनामध्ये जी भीती आहे त्या बाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, राज्यामध्ये यंत्रमागाचे एकूण ग्राहक 86,600 इतके आहेत आणि त्यापैकी 82,996 ग्राहक हे 27 एचपीच्या खालचे आहेत. त्यामुळे रूपये 2.60 किंवा 3.25 हा जो भार आहे तो सगळ्यांना लागत नाही तर काही मर्यादित लोकांनाच लागतो. राज्य सरकारने यामध्ये अतिशय स्पष्टपणे निर्णय घेतला आहे आणि तो मान्य झालेला आहे त्यामुळे कोठलाही यंत्रमागधारक यामुळे

..... केके 2 ...



श्री. वळसे-पाटील (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 37560 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अडचणीत येईल असे होणार नाही. हे एक अतिशय चांगले पॅकेज या राज्यात आपण दिलेले आहे.

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने यंत्रमागधारकांच्या बाबतीत सतत सवलतीच्या घोषणा केलेल्या आहेत आणि नंतर काही कारणांमुळे त्या परतही घेण्यात आल्या आहेत. वीज दरवाढीच्या बाबतीत देखील अशा प्रकारच्या घोषणा केल्या गेल्या आहेत व काही काळासाठी सवलती दिल्या आहेत. राज्य सरकारचा या धंद्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन चांगला आहे. विशेषत: सोलापूर जिल्ह्यामध्ये यंत्रमागधारकांचा व्यवसाय मोठा आहे. आता माननीय मंत्री महोदयांनी यंत्रमागधारकांना दिलेल्या सवलतीची आकडेवारी सांगितली असली आणि ती त्यांच्या दृष्टीने योग्य असली तरी सोलापूरातील हा धंदा अडचणीत येणार आहे. म्हणून माझी या निमित्ताने विनंती राहणार आहे की, पूर्वीप्रमाणे हा व्यवसाय चालण्यासाठी पूर्वीच्या सवलती ज्या वीज दरवाढीबाबत दिल्या होत्या त्या आपण परत चालू ठेवणार काय ?

( यानंतर श्री. सरफरे ... एलएल 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37560...

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या संदर्भातील निर्णय राज्याच्या मंत्रिमंडळाने घेतला आहे. तो घेतांना वीज नियामक आयोगाने दर वाढविले. त्यातील 27 हॉर्स पॉवरच्या खालील जे ग्राहक आहेत, त्यांच्या दरातील 50 टक्के भार राज्य सरकारने सहन करण्याचे ठरविले. बाकीच्या ग्राहकांच्या बाबतीत 40 टक्के भार सहन करण्याचे ठरविले. त्यामुळे राज्य सरकारने या धंध्याला मदत करण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे यापेक्षा वेगळा निर्णय होईल असे वाटत नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपल्या उत्तरामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, "डिसेंबर 2007 पर्यंत यंत्रमागधारकांना या सर्व आकाराऐवजी सर्वसमावेशक 160पैसे/युनिट असा सवलतीचा दर लागू होत असे. या पध्दतीत जानेवारी 2008 पासून बदल करण्यात आला असून स्थिर आकारात 100 टक्के सवलत व वर नमूद केलेल्या उर्वरित आकारमध्ये 40 ते 50 टक्के सवलत देण्यात येत आहे". माझा प्रश्न असा आहे की, 100 टक्क्यावरुन एकदम 40 ते 50 टक्क्यापर्यंत येण्याचे कारण काय?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, यामध्ये स्थिर आकार 1.60 पैसे आहे. त्यामुळे 1.60 पैसे अधिक त्याला लागणारे वेगवेगळे आकार त्यामध्ये समाविष्ट आहेत. स्थिर आकारामध्ये 27 हॉर्स पॉवर्सपर्यंतचे जे ग्राहक आहेत त्यांना 100 टक्के स्थिर आकारावर सवलत दिली. परंतु वरचे जे ग्राहक आहेत त्यांना 100 टक्के सवलत न देता 60 टक्के, 40 टक्के रेश्योप्रमाणे स्थिर आकार वसूल करण्याचे ठरविले. त्यापूर्वी अशाप्रकारे वसूल करीत नव्हतो. तो मंत्रिमंडळाचा निर्णय आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मंत्रिमंडळासमोर संबंधित विभागातर्फे प्रस्ताव ठेवला जातो. हा प्रस्ताव ठेवण्यामागील आपली भूमिका काय आहे? यंत्रमागधारक तगले तर शासनाचे उत्पन्न वाढेल. तेव्हा मंत्रिमंडळासमोर ठेवण्याची भूमिका काय आहे?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, हा एक तांत्रिक विषय असल्यामुळे इथे गल्लत होत आहे. सन 2006-07 मध्ये मंडळाने निर्णय घेतला त्यामध्ये जे 27 हॉर्स पॉवर्सचे ग्राहक आहेत त्यांना एकत्रित 1.60 हा दर लागू होता, त्यामध्ये स्थिर आकार येत होता. त्यामध्ये एफ.ए..सी. येत होता, ए.एस.सी. येत होता. आज 1.20 पैसे इतका दर वाढविण्याचा निर्णय

DGS/ SBT/ MMP/

ता.प्र.क्र.37560....

श्री. दिलीप वळसे पाटील....

घेतल्यानंतर मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला. त्यामध्ये ज्यांचे वीजेचे बिल 3 ते 4 रुपये आहे त्यामध्ये 50/50 ...

श्री. मधुकर सरपोतदार : मंत्रिमंडळाने निर्णय घेण्याचे कारण काय?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या विभागाचा मंत्री म्हणून सांगतो की, पूर्वीच्या काळातील 3 रुपयापैकी 1.60 पैसे आणि 1.40 पैसे हा ब्रेकअप सांगितला. आता 27 हॉर्स पॉवर्सच्या खाली असलेल्या ग्राहकांच्या बाबतीत दर आकारणीमध्ये बदल झाला व तो 1.50 पैसे आणि 1.50 पैसे असा झाला. 27 हॉर्स पॉवर्सच्या वर जे ग्राहक आहेत त्यांना 50 / 50 देत होतो त्याठिकाणी आता 1.60 पैसे आणि 2.40 घेत आहोत. त्यामध्ये आपण रेश्यो बदलला आहे. हा ॲग्रिग्रेट बदल आहे. यामध्ये 27 हॉर्स पॉवर्सच्या वरचे जे ग्राहक आहेत त्यांना एक्स्ट्रा चार्ज लावण्यासंदर्भात निर्णय घेतला आहे. बऱ्याच वेळा आपण मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव घेऊन जातो त्यावेळी तो जसाच्या तसा मंत्रिमंडळामध्ये मंजूर होत नाही. त्यामध्ये वित्त व नियोजन विभागाच्या माध्यमातून भूमिका मांडण्यात येते. आपण गेल्या वर्षी या वर्गाला ज्या दराने सवलती देत होतो त्याप्रमाणे एप्रिल 2007 ते डिसेंबर 2007 पर्यंत 363 कोटी रुपयांची सबसिडी राज्य सरकारच्या माध्यमातून दिली आहे. आता वीजेचे दर वाढले आहेत. आणखी दर वाढीचे प्रस्ताव एम.ई.आर.सी.कडे गेले आहेत. कदाचित यामुळे आणखी वीजेची दरवाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचा ग्राहकांवर परिणाम होऊ नये म्हणून ठराविक टक्केवारी ठरविण्यात आली असून त्यानुसार मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे जानेवारी 2008 ते मार्च 2008 पर्यंत 100 कोटींचे बर्डन राज्य सरकारवर येणार आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:30

ता.प्र.क्र.37560 . . . .

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

एप्रिल 2007 ते मार्च 2008 पर्यंत 464 कोटी रुपयांचे राज्य शासनावर बर्डन येणार आहे. ज्यावेळेला मंत्रिमंडळासमोर जाऊन एखाद्या वर्गाला जास्त सवलत द्यावयाची आणि एखाद्या वर्गाला थोडेसे दर वाढवून द्यावयाचे असा विचार करीत असताना साधारणपणे आर्थिक उपलब्धता पाहूनच याबाबतीत निर्णय घेतला जातो. त्यामुळे जो लहान वर्ग आहे, त्याला संपूर्णपणे मदत करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे आणि जो थोडासा केपेबल वर्ग आहे, ज्यांची पैसे देण्याची शक्ती आहे, त्यांच्याकरता थोडी वाढ करण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतलेला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . .2 एम-2

**महिला बचत गटाला कमी व्याजाने कर्ज देण्याबाबत**

**(4) * 37816 श्री.परशुराम उपरकर , डॉ. नीलम गोऱ्हे , डॉ. दीपक सावंत : दिनांक 29 नोव्हेंबर, 2007 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक 12 मधील अतारांकित प्रश्न क्रमांक 30889 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महिला बचत गटाला कमी व्याजदराने कर्ज देण्याच्या मागणीबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(2) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(3) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे, श्री.विजयसिंह मोहिते पाटील यांच्याकरिता** : (1) अद्यापि अंतिम निर्णय झालेला नाही.

(2) निर्णयाचे स्वरुप निश्चित झालेले नाही.

(3) धोरणात्मक बाब असल्याने सखोल तपासणी आवश्यक आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, यापूर्वी प्रश्न विचारलेला होता, त्यामध्ये उत्तराच्या बाबतीत अधिक स्पष्टीकरण येणे अपेक्षित आहे म्हणून हा प्रश्न आता उपस्थित करण्यात आला आहे. आमच्या माहितीप्रमाणे जवळजवळ 2 कोटी महिलांशी संबंधित असा प्रश्न आहे. मागच्या दहा वेगवेगळया मेळाव्यांमध्ये म्हणजे श्रीमती रजनी पाटील यांनी आयोजित केलेला लातूरचा महिला मेळावा, श्रीमती सोनिया गांधी यांच्या उपस्थितीमध्ये झालेला बीड येथील महिला मेळावा, संभाजीनगर येथे माननीय श्री.शरद पवार आणि माननीय श्रीमती सूर्यकांता पाटील यांच्या उपस्थित झालेला महिलांचा मेळावा, तसेच पुणे येथील अॅग्रीकल्चर ग्राऊंडवर वेगवेगळया महिला बचत गटांचे पाच मेळावे झाले आहेत. त्यावेळी सर्व माननीय मंत्री महोदय उपस्थित होते. तसेच माननीय मंत्री श्री.विजयसिंह मोहिते-पाटील, माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील देखील उपस्थित होते.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा असा प्रश्न आहे की, एवढया सगळया मंत्र्यांनी आश्वासन दिलेले आहे. एवढया सगळया मेळाव्यांसाठी जे पैसे खर्च झाले, त्याऐवजी ते बचत गटांना वाटले असते तरी सगळयांची व्याजमाफी झाली असती. आपण एवढे मेळावे घेतले आहेत, त्या वेळी माननीय मंत्री श्री.हंडोरेसाहेब नव्हते. पण समाजकल्याण विभागाच्या बाबतीत सांगावयाचे तर मागासवर्गीय महिलांच्या बचत गटाचा देखील हा प्रश्न आहे. म्हणून माझा असा प्रश्न आहे की, "अद्यापि अंतिम निर्णय झालेला नाही" असे पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सांगितलेले आहे. तर हा

. . . .2 एम-3



APR/ SBT/ MMP/ 13:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निर्णय घ्यावयाचा नाही असे आपण ठरविलेले आहे काय ? जर निर्णय घेणार असाल तर तो कधी घेतला जाणार आहे आणि त्याचे स्वरुप काय असेल ? नाहीतर तुम्ही महिलांना केवळ आशा दाखवत आहात आणि त्यांनी पुढच्या मेळाव्याला यावे म्हणून हा निर्णय 2009 पर्यंत ढकलणार आहात काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, याबाबतीत सखोल अभ्यास सुरु आहे. हा अभ्यास झाल्यावर लवकरात लवकर निर्णय घेऊ.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी प्रश्न विचारल्यानंतर माननीय राज्यमंत्री महोदयांनी चेष्टेने उत्तर दिले आहे की, याबाबतीत सखोल तपासणी सुरु आहे.

श्री.रणजित कांबळे (खाली बसून) : अभ्यास सुरु आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करु इच्छिते की, त्यांनी एवढे लाईटली घेऊ नये. हा प्रश्न महत्वाचा आहे. हा प्रश्न दुसऱ्या वेळेस येथे चर्चेसाठी आलेला आहे आणि यामध्ये आपले अपयश आहे. तेव्हा याबाबतीत कोणत्या प्रकारची सखोल तपासणी सुरु आहे आणि ती कधी पूर्ण होणार आहे ?

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, महिलांच्या बचत गटाला सहा टक्के व्याजाने कर्जपुरवठा झाला पाहिजे असे माझे वैयक्तिक मत आहे आणि मंत्री म्हणून माझी असलेली भावना, आपल्या सर्वांच्या भावना मी अनेक कार्यक्रमामध्ये बोलूनही दाखविलेले आहे. त्याप्रमाणे सरकारने आणि विशेषत: माझ्या विभागाने त्यादृष्टीने कार्यवाही करण्यास सुरुवात केली होती. मी आपल्याला सांगू इच्छितो की, दि.22 जून 2006 रोजी समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, महिला बालकल्याण विभागाच्या सचिवांची, ग्रामविकास विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. त्या समितीने आपला रिपोर्ट देखील दिला आहे की, 6 टक्के व्याजाने कर्ज पुरवठा करण्यात यावा. आज आपण पाहिले तर महाराष्ट्रामध्ये अकरा टक्के,साडेअकरा टक्के,तेरा टक्क्यापर्यंत व्याज घेतले जाते, हे काही बरोबर नाही.म्हणून आपण जो प्रस्ताव तयार केलेला .....

. . . .2 एम-4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे, तो प्लॅनिंग आणि फायनान्स विभागाकडे गेलेला आहे. त्याबाबतीत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, या सभागृहाच्या सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आणि मी स्वत: या सर्वांनी वारंवार आवाज उठविलेला आहे. हिवाळी अधिवेशनाच्या वेळी या विषयावर अर्धा तास चर्चा देखील घेण्यात आली होती. याबाबतीत नेहमी अशी मागणी करण्यात आलेली आहे की, चार टक्के दराने कर्ज पुरवठा करावा. परंतु त्याचबरोबर शासनाने धोरण आखावयास पाहिजे. तसे ते करणार आहे काय ? बचत गटाच्या बाबतीत किती दिवसामध्ये धोरण जाहीर केले जाईल? एक खिडकी योजनेप्रमाणे यासाठी एक कक्ष कधी केला जाईल ? चार टक्के दराने किती दिवसामध्ये कर्ज दिले जाईल याचे स्पष्ट उत्तर दिले पाहिजे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ SBT/ MMP/ प्रथम श्रीमती रणदिवे. 13:35

ता.प्र.क्र. 37816..

श्री. विजयसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, याठिकाणी मी सांगितले आहे की, महिला बचत गटांना 6 टक्के या दराने व्याज देण्यात यावे अशी माझी भूमिका आहे. या संदर्भातील प्रोसेस सध्या सुरु आहे. याबाबत प्रस्ताव नियोजन विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. ही फाईल या विभागाकडे गेलेली आहे. नियोजन विभागाने या संदर्भात काही क्वेरीज काढल्या आहेत. दोन महिन्यामध्ये या संदर्भात निर्णय घेणे शक्य आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आताच सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी या ठिकाणी जो प्रश्न विचारला आहे त्या प्रश्नाला उत्तर देताना माननीय मंत्री महोदयांनी लवकरात लवकर निर्णय घेऊ असे उत्तर दिले आहे. मी या सभागृहामध्ये सहा वर्षापासून सन्माननीय सदस्य म्हणून काम करीत आहे. अनेक प्रश्नांना माननीय मंत्री महोदयांकडून असे उत्तर दिले जाते की, लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल. निश्चित टाईम बाऊंड उत्तर का दिले जात नाही ? लवकरात लवकर हा शब्द बदलण्याची आवश्यकता आहे. माझी अशी विनंती आहे की, माननीय मंत्री महोदयांनी निश्चित कालावधी सांगितला पाहिजे.

श्री. विजयसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, दोन महिन्याच्या कालावधीमध्ये निर्णय घेण्यात येईल असे उत्तर मी मघाशी दिले होते.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रश्नासंदर्भात उत्तर देताना माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, या बाबत सखोल अभ्यास सुरु आहे. ठाणे जिल्हयातील सहकारी बँकेच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमात माननीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी घोषणा केली होती की, महिला बचत गटांना चार टक्के या दराने व्याज देण्यात येईल. त्यांनी ही घोषणा अभ्यास न करता केलेली आहे असे आपल्याला म्हणता येणार नाही. कोणाच्या कन्येला नेता बनविण्यासाठी हे लांबविण्यात येत आहे हे मला माहीत नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी येथे जो मुद्दा मांडला आहे त्या विषयासंदर्भात बराच सखोल अभ्यास या पूर्वी झालेला आहे. हा प्रस्ताव मान्य व्हावा असे ग्रामीण विकास विभागाला वाटत आहे. मात्र अर्थ व नियोजन विभाग या प्रस्तावास परवानगी देत नाही. ही या मागील खरी अडचण आहे. त्यामुळे बचत गटातील

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

2..

श्री. विनोद तावडे ...

महिलांना 4 टक्के या दराने कर्ज मिळण्याबरोबरच त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठेची हमी देखील मिळाली पाहिजे. अशा प्रकारचे सर्वकष धोरण राज्य शासनातर्फे केले जाणार आहे काय हा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

श्री. विजयसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे, ही कमिटी ग्राम विकास विभागाने नेमलेली आहे. 22 जून 2006 मध्ये बचत गटाची निर्मिती करण्यात आली होती. या संदर्भात अभ्यास झाला आहे. तसेच 6 टक्के या दराने महिला बचत गटांना कर्ज देण्यासंदर्भातील निर्णय कमिटीने दिलेला आहे.फायनान्स व प्लानिंग डिपार्टमेंटकडे पाठविण्यात आलेले आहे. दिल्ली हट प्रमाणे पुणे, नागपूर येथे जिल्हा परिषदेच्या जागेमध्ये महिला बचत गट बांधण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. तसेच खारघर येथे ग्राम विकास भुवनामार्फत बचत गटाच्या मालाची विक्री करण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच बचत गटाच्या महिलांनी उत्पादित केलेला माल विक्री करण्याकरिता स्टॉल तयार करण्यात आले आहेत.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, सन 1999 मध्ये पहिला महिला मळावा घेण्यात आला होता त्यावेळी श्री. शरद पवार यांनी यांनी घोषणा केली होती की, महिला बचत गटांना 4 टक्के या दरांने कर्ज पुरवठा करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी विचारले आहे की, त्यांनी जे नाव पुकारले होते त्यातील बचत गटाच्या नेत्या कोण आहेत? त्यांना मी सांगू इच्छिते की, आम्ही सर्वच सन्माननीय सदस्या या महिला बचत गटाचे काम करीत आहेत...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला काही कळत नाही, राजकारणामध्ये या संबंधी बोलायचे नाही काय ?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : परभणी जिल्हयामध्ये जो मेळावा झाला होता त्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी असे म्हटले आहे की, कोणातरी पुढाऱ्याच्या कन्येला पुढारी बनविण्याकरिता केले जात आहे. हा भाग रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे अशी माझी मागणी आहे.

यानंतर श्री. बरवड...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37816 ....

श्रीमती मंदा म्हात्रे : मी माननीय मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करते की, त्यांनी नवीन मुंबईत खारघर येथे बचत गटासाठी जिल्हा महिला उद्योग केंद्र केलेले आहे. त्याचप्रमाणे राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये निर्णय घेणार काय ?

श्री. विजयसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, मी सांगितले की, दिल्लीला 'दिल्ली हट' आहे त्या पध्दतीने पुण्यामध्ये आणि नागपूरमध्ये जिल्हा परिषदेची जागा घेतलेली आहे आणि पैसे मिळण्याकरिता तो प्रस्ताव भारत सरकारकडे पाठविलेला आहे. औरंगाबाद तसेच नाशिक येथे जिल्हाधिकाऱ्यांकडे जागेची मागणी केलेली आहे परंतु जागा मिळाली नाही. भारत सरकार पैसे देण्यासाठी उत्सुक आहे. खारघरमध्ये बांधण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्रातील जिल्ह्याच्या ठिकाणी, तालुक्याच्या ठिकाणी विक्री स्टॉल बांधलेले आहेत.

-----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

**लातूर जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील**
**४८ शाळांत मुख्याध्यापकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(५) * ३७८३६ श्री.विक्रम काळे , श्रीमती उषाताई दराडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील ४८ शाळांत मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळेतील शैक्षणिक कामे व अध्यापनावर परिणाम होऊ नये म्हणून रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने काय कारवाई केली वा करण्यांत येत आहे ?

**श्री. रणजित कांबळे, श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता** : (१) होय.
(२) दिनांक ३१.१२.२००८ पर्यंत रिक्त होणाऱ्या मुख्याध्यापक पदावर निवड करण्यासाठी पदोन्नती समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून समितीच्या निवडीनंतर रिक्त पदावर पदस्थापनेचे आदेश देण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेकडून करण्यात येणार आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, ही पदे पदोन्नतीने भरली जात असतील तर त्यासाठी विलंब का होतो ? भविष्यामध्ये प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये निवड यादी तयार करणार काय ? मराठवाडा विभागातील औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, नांदेड, उस्मानाबाद जिल्ह्यात मुख्याध्यापकांची किती पदे रिक्त आहेत ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हा वेगळा प्रश्न आहे. या ठिकाणी लातूर जिल्ह्याच्या बाबतीत मूळ प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी संपूर्ण मराठवाड्याची माहिती विचारली ती माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही.

श्री. विक्रम काळे : लातूर जिल्ह्यातील रिक्त पदे आता भरलेली आहेत काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, लातूरमध्ये 48 पदे रिक्त आहेत. पदोन्नती समितीमध्ये 30.3.2008 ला यादी फायनल झालेली आहे आणि दोन आठवड्यांच्या आत ही सगळी पदे भरणार आहोत.

श्री. विक्रम काळे : महाराष्ट्रामध्ये गोरगरिबांच्या मुलांना जिल्हा परिषदेच्या शाळेतून शिक्षण दिले जाते. गाडीला प्रशिक्षित ड्रायव्हर नसेल तर गाडी कशी चालणार ? मराठवाड्यात प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये आज अशी परिस्थिती आहे की, औरंगाबादमध्ये मुख्याध्यापकांची 43 पदे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37836 ...... श्री. विक्रम काळे ....

रिक्त आहेत. लातूरमध्ये 69 पदे रिक्त आहेत. उस्मानाबादमध्ये 54 पदे रिक्त आहेत. नांदेडमध्ये 188 पदे रिक्त आहेत. ही पदे पदोन्नतीने भरली जातात. ज्यांची सेवा जास्त झालेली आहे त्यांना मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती दिली जाते. ही सेवा ठरलेली असते. एक महिन्यानंतर मुख्याध्यापक सेवानिवृत्त होणार असेल तर अगोदरच त्यासंदर्भात निवड यादी का तयार केली जात नाही आणि अशी पदे लवकर का भरत नाही ? याबाबत शासन ठोस पावले उचलणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी सांगितले की, लातूरमध्ये 48 पदे रिक्त आहेत ही पदे पदोन्नतीच्या माध्यमातून भरण्यात येतात. 30.3.2008 ला फायनल यादी तयार झालेली आहे. पंधरा दिवसांच्या आत लातूरची सगळी पदे आम्ही भरणार आहोत

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, या ठिकाणी फक्त लातूरच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे आणि मराठवाड्यातील बाकीच्या जिल्ह्यांची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती पटलावर ठेवण्यास काय हरकत आहे ? मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांची माहिती पटलावर ठेवणार काय ?

श्री. रणजित कांबळे : काही अडचण नाही. सन्माननीय सदस्या त्याबाबतीत वेगळा प्रश्न विचारु शकतात आणि त्या प्रश्नाला उत्तर देता येईल. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांना माहिती पाहिजे असेल तर ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्रीमती उषा दराडे : माननीय मंत्रिमहोदयांनी माझ्याकडे माहिती नाही असे म्हटले म्हणून मी प्रश्न विचारला.

श्री. रणजित कांबळे : आता माझ्याकडे माहिती नाही. तो वेगळा प्रश्न आहे. या ठिकाणी जो प्रश्न आलेला आहे त्या प्रश्नापुरते उत्तर मी देणार. आपल्याला प्रश्न विचारावयाचा असेल तर आपण वेगळा प्रश्न विचारु शकता.

यानंतर श्री. खंदारे ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37836...

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, हा लातूर जिल्हयाचा प्रश्न असला तरी संपूर्ण राज्यामध्ये मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत. अकोला जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत. ही पदे केव्हा भरण्यात येतील ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सर्वात वरिष्ठ शिक्षक असतात त्यांना पदोन्नती देऊन मुख्याध्यापकाचे पद भरले जाते. दरवर्षी किंवा दर महिन्याला काही लोक सेवानिवृत्त होतात, त्यातून जागा उपलब्ध होतात. ही सातत्याने चालू असणारी प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांची पदे लक्षात घेऊन मुख्याध्यापकांची जेवढी पदे रिक्त होतात तेवढी पदे भरण्यात येतात. पण असेही निदर्शनास आले आहे की, शिक्षकांना पदोन्नती दिल्यानंतर ते मुख्याध्यापक पदी रुजू होत नाहीत. त्यामुळे ही पदे रिक्त राहतात. त्यामुळे जसजशी परिस्थिती निर्माण होते तसतशी पदे भरली जातात.

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार )** : सन्माननीय मंत्रिमहोदय, हा गंभीर प्रश्न आहे. एवढया मोठया संख्येने मुख्याध्यापकांच्या जागा रिक्त राहणे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने योग्य नाही. त्यादृष्टीने सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी आपली भावना व्यक्त केली आहे. त्या अनुषंगाने या जागा त्वरित कशा भरल्या जातील यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत.

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : या जिल्हयात एकूण 543 मुख्याध्यापक आहेत. अध्यापनाचे काम अधिक कार्यक्षमतेने होण्यासाठी जे मुख्याध्यापक सेवानिवृत्त होतील त्या जागा 8-15 दिवसात भरल्या जातील. मुख्याध्यापकांची जेवढी पदे भरावयाची आहेत त्यापेक्षा दुप्पट यादी करण्याच्या सूचना आजच विभागाला दिलेल्या आहेत.

श्री.दिवाकर रावते : मुख्याध्यापकांच्या नियुक्तीकरिता सेवाज्येष्ठता विचारात घेतली जाते. मग ते शिक्षक योग्य असोत किंवा नसोत. राज्याच्या धोरणानुसार मुख्य सचिव पदी नियुक्ती करीत असताना सेवाज्येष्ठता विचारात घेतली जात नाही, तर कार्यक्षमता विचारात घेतली जाते. त्याप्रमाणे मुख्याध्यापकांना पदोन्नती दिली जाणार आहे काय ?

( उत्तर आले नाही )

-------



अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

**ठाणे जिल्ह्यातील तसेच नवी मुंबई येथील पाणी टंचाई दूर करण्याकरिता बारवी धरणाची उंची वाढविण्याबाबत**

**(६) * ३८३३० श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री.भास्कर जाधव , श्री.अरुण गुजराथी , डॉ. वसंत पवार , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली, ठाणे, मिराभाईंदर, उल्हासनगर, भिवंडी व नवी मुंबई येथे तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील बारवी धरणातून या शहरांना पाणीपुरवठा केला जातो, परंतु धरणातील मोठ्या प्रमाणात पाण्याचा उपसा सुरु असल्यामुळे पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बारवी धरणाची उंची वाढविल्यास पाणी पुरवठा सुरळीत होईल म्हणून बारवी धरणाची उंची वाढविण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री.रणजित कांबळे, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) होय. दिनांक ०१ जानेवारी २००८ पासून उल्हास नदीतून पाणी वापरणाऱ्या शहरी भागांस १४ टक्के कपात लागू करण्यांत आली आहे.

(२) नाही. तथापि, कृष्णा पाणी तंटा लवादानुसार आंध्र धरणातील पाणी भिवपूरी जलविद्युत प्रकल्पाद्वारे उल्हास नदीमध्ये सोडून पाणी वापरावर मर्यादा आल्यामुळे आंध्र तसेच बारवी धरणातील प्राप्त होणाऱ्या पाण्याचे नियोजन करण्यात आले असून त्यानुसार पाणी कपात केली असल्याने काही प्रमाणात पाणी टंचाई निर्माण झाली आहे.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून बारवी धरणाची उंची वाढविण्याचे काम सुरु आहे. त्या अनुषंगाने भूसंपादन व पुनर्वसनाचे काम नियोजित वेळेत पूर्ण करुन माहे मे, २०१० पर्यंत धरणाची सर्व कामे पूर्ण करण्याचा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा प्रयत्न आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, दोन आठवडयामध्ये हा प्रश्न तिस-यांदा चर्चेला आलेला आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.अजित पवार यांनी यापूर्वी सविस्तर उत्तर दिलेले आहे, तरीही हा प्रश्न येत आहे.

श्री.संजय केळकर : प्रश्न लागणे वा लावणे हे विधिमंडळाचे काम आहे. प्रश्न देणे हे सदस्यांचे काम आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या निदर्शनास आणून दिले आहे.

३.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

ता.प्र.क्र.३८३३०.....

श्री.संजय केळकर : एकदा ठाणे जिल्हयाचा पाण्याचा प्रश्न सोडवावा. बारवी धरणाची उंची वाढविण्याचे काम २०१० पर्यंत पूर्ण होईल असे उत्तर दिले आहे. त्या धरणाची उंची वाढल्यानंतर एकूण किती एमएलडी पाणी उपलब्ध होणार आहे हा पहिला प्रश्न आहे. काळू नदीवर मुंबई महानगरपालिका धरण बांधणार होती, परंतु मुंबई महापालिकेचा मध्य वैतरणा धरण बांधण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे ठाणे जिल्हयासाठी काळू धरणातून पाणी उपलब्ध होईल. ते धरण बांधण्यासाठी शासन पुढाकार घेणार आहे काय ?

नंतर श्री.गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. खंदारे 13:50

ता.प्र.क्र.38330...

श्री. संजय केळकर...

पोशीर धरणाशी चार,पाच महानगरपालिकांचा संबंध येतो. पोशीर धरण बांधले गेले तर या महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रातील लोकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठया प्रमाणात सुटणार आहे. पोशीर धरणाचे काम व्हावे म्हणून संबंधित महानगरपालिका, नगरपालिका आणि लोकप्रतिनिधी यांची एक संयुक्त बैठक घेऊन त्यासंबंधी शासन काही धोरण जाहीर करील काय ?

श्री. रणजित कांबळे : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, 700 एम.एल.डी.अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे. सन्माननीय सदस्यांच्या दुस-या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, सदरहू बाब तपासून योग्य तो निर्णय घेण्यात येईल. मी या ठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो की, आपण पाणी आरक्षित करीत असतो. त्यात पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य देतो. त्यानंतर उद्योगास पाणी उपलब्ध करुन देतो आणि त्यानंतर शेतीसाठी पाणी देतो. वाढत्या लोकसंख्येचे प्रमाण बघता पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी महानगरपालिकांना आणि नगरपालिकांना स्वत:ची धरणे बांधावीत अशा सूचना दिल्या आहेत. पोशीर धरणाचे काम शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. संजय केळकर : पोशीर धरणाचे काम पूर्ण करण्यात अडचणी काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे : पोशीर धरणाचे काम करण्यासाठी वन विभागाची अडचण आहे.

श्री. संजय केळकर : वैतरणा धरणाच्या कामाच्या वेळी देखील वन विभागाची अडचण निर्माण झाली होती. परंतु ती अडचण शासनाने दूर करुन त्या धरणाचे काम पूर्ण केले आहे. तशा पध्दतीने पोशीर धरणाचे काम पूर्ण करण्यास अडचण काय आहे ?

श्री. रणजित कांबळे : पोशीर धरण ठाणे शहराच्या जवळचे धरण आहे. या धरणांतर्गत वन जमीन येत असल्यामुळे धरणाचे काम पूर्ण करण्यास अडचण निर्माण झाली आहे. धरणाचे काम करावयाचे असेल तर वन विभागाची परवानगी घ्यावी लागणार आहे.

श्री.संजय केळकर : पोशीर धरण्याच्या बाबतीत संयुक्त बैठक माननीय मंत्री महोदय घेतील काय ?

श्री. रणजित कांबळे : या विषयाच्या बाबतीत संयुक्त बैठक घेण्यात येईल.

-----

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुनाडे (ता.उरण, जि.रायगड) येथील आदिवासीवाडीवर वीज पुरवठा होत नसल्याबाबत**

**(७) * ३७६०२ श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुनाडे (ता.उरण, जि.रायगड) येथील आदिवासीवाडीवर वीज पुरवठा करण्यासाठी सुमारे ४ महिन्यापूर्वी विद्युत पोल टाकण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाडीला विद्युत पुरवठा करण्यासाठी लागणारी उच्च दाबाची वायर शासनाकडून उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न क्र.१ व २ मधील परिस्थिती खरी असल्यास यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास या वाडीला वीजेचा पुरवठा किती कालावधीत केला जाईल ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पुनाडे (ता.उरण, जि.रायगड) येथीला आदिवासी वाडीचे विद्युतीकरण करण्यासाठी टाकाव्या लागणाऱ्या उच्च दाब वीज वाहिनी व लघुदाब वीज वाहिनीचे काम पूर्ण झाले असून, रोहित्र उभारणीचे काम प्रगती पथावर आहे. तथापि, नजीकच्या रोहित्रावरुन लघुदाब वीज वाहिनी कार्यान्वित करुन ह्या आदिवासी वाडीवर जानेवारी २००८ मध्ये वीज पुरवठा सुरु करण्यात आला आहे. अपुरे असलेले रोहित्र उभारण्याचे काम येत्या २ ते ३ महिन्यात पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी प्रयत्नशील आहे.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी समाधानकारक उत्तर दिलेले आहे. पुनाडे येथील आदिवासी वाडीचे विद्युतीकरण करण्यासाठी टाकाव्या लागणा-या उच्च दाब वीज वाहिनी व लघुदाब वीज वाहिनीचे काम पूर्ण झाले असून, रोहित्र उभारणीचे काम प्रगती पथावर आहे. तथापि नजकच्या रोहित्रावरुन लघुदाब वीज वाहिनी कार्यान्वित करुन हया आदिवासी वाडीवर जानेवारी, २००८ मध्ये वीज पुरवठा सुरु करण्यात आला आहे. ही व्यवस्था तात्पुरती आहे की कायम स्वरुपी आहे असा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, अपुरे असलेले रोहित्र उभारण्याचे काम येत्या दोन ते तीन महिन्यात पूर्ण करण्यात येईल काय ?

३...



ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. खंदारे १३:५०

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या आदिवासी वाडीवर सध्या नजीकच्या रोहित्रावरुन लघुदाब वीज वाहिनी कार्यान्वित केली आहे. या ठिकाणी सदरहू रोहित्रे आल्यानंतर पूर्वीच्या रोहित्रावरुन लघुदाब वीज वाहिनी खंडीत करण्यात येणार आहे काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : हे काम करण्यास विलंब होत आहे ही गोष्ट मान्य करतो. परंतु त्या भागातील ग्राहकांना वीज पुरवठा व्हावा म्हणून बाजुला असलेल्या ट्रान्सफॉर्मरमधून कनेक्शन देण्यात आले आहे. त्या भागात कायम स्वरुपी वीज पुरवठा व्हावा म्हणून नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम येत्या दोन, तीन महिन्यात पूर्ण करण्यात येईल. त्या भागात सध्या ज्या ट्रान्सफॉर्मरवरुन ग्राहकांना वीज कनेक्शन देण्यात आले आहेत, ती कनेक्शन्स तशीच ठेवून तेथे नवीन ट्रान्सफॉर्मर बसविला जाणार आहे, त्यावरुन अतिरिक्त ग्राहकांना वीज कनेक्शन्स उपलब्ध करुन देण्यात येतील. या ठिकाणचे अपूर्ण असलेले काम सत्वर पूर्ण करण्याच्या बाबतीत सूचना देण्यात येतील.

------

४....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**राज्यात एड्स नियंत्रणाच्या नावाखाली कोट्यावधी रूपयांची उधळण झाल्याबाबत**

**(८) * ३७३०० श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुधाकर गणगणे , श्री. शरद रणपिसे , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.राजन तेली :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एड्स नियंत्रणाच्या नावाखाली कोट्यावधी रूपयांची उधळण होत असतानाच दुसरीकडे जिल्ह्यातील ३६ व राज्यातील ६५० एचआयव्ही एड्स नियंत्रण केंद्रावर गेल्या तीन महिन्यापासून एड्स चाचणी उपलब्ध नसल्याची धक्कादायक माहिती माहे जानेवारी, २००८ मध्ये किंवा त्यासुमारास उघडकीस आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे,डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) एड्स रुग्णांवर उपचार करण्यासाठी राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था, नवी दिल्ली यांच्यामार्फत फस्ट रॅपीड टेस्ट किट्स पुरविल्या जातात. तथापी गेल्या तीन महिन्यापासून सदर किट्सचा पुरवठा गरजेपेक्षा कमी प्रमाणात झाला आहे. आवश्यक तेवढा पुरवठा होण्यासाठी सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. इतर राज्यातून काही प्रमाणात फास्ट रॅपीड टेस्ट किट्सचा पुरवठा प्राप्त करुन घेण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : एड्स रुग्णांवर उपचार करण्यासाठी राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था, नवी दिल्ली यांच्यामार्फत फस्ट रॅपीड टेस्ट किटस् पुरविल्या जातात. या संस्थेकडून नेमक्या किती किटस् पुरविल्या गेल्या ? गेल्या तीन महिन्यापासून सदर किटस्चा पुरवठा गरजेपेक्षा कमी प्रमाणात झाला. किटस्चा पुरवठा कमी प्रमाणात होण्याची नेमकी कारणे काय आहेत ? किटस्ची मागणी किती होती व प्रत्यक्षात पुरवठा किती झाला ? या किटस्चा पुरवठा वेळेवर होऊ शकला नाही म्हणून किती रुग्णांची चाचणी करण्यात आली नाही ? या प्रश्नांच्या संदर्भातील माहिती माननीय मंत्री महोदय देतील काय ?

यानंतर श्री. कानडे...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, एडस्च्या टेस्टसंबंधी ज्या किटचा वापर करण्यात येतो त्या किटस् नॅशनल एडस् कंट्रोल सोसायटीमार्फत पुरविल्या जातात. नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी या तीन महिन्यात किटस्चा पुरवठा कमी झाला. जवळपास 2 लाख 55 हजार किटस्ची आवश्यकता होती. साधारणत: दर महिन्याचे अॅव्हरेज काढले तर महाराष्ट्रात एचआयव्हीची टेस्ट करण्यासाठी जेवढी केंद्रे आहेत त्यातून साधारणत: 3 लाख पेशंट टेस्ट करण्यासाठी येतात. पेशंट टेस्ट करण्यासाठी आल्यानंतर फक्त टेस्ट करीत नाही तर टेस्ट करण्याच्या आधी पेशंटचे इंटीग्रेटेड कौन्सिलिंग करण्यात येते तसेच गर्भवती महिलांना टेस्टसाठी प्रथम प्राधान्य देण्यात येते. गर्भवती महिलांमध्ये एचआयव्ही विषाणू आढळून आला तर मातेपासून तो मुलाला होऊ नये म्हणून उपचार करता येतात. इतर जे एचआयव्ही बाधित पेशंट असतात ते तसेच राहतात. गर्भवती महिलांच्या बाबतीत तसे होत नाही. त्यांच्या मुलांना आपण ट्रीटमेंट देऊ शकतो. बाकीच्या केसमध्ये टेस्ट करण्यासाठी नोंद घेतो आणि किटस् आल्यावर पेशंटची टेस्ट करतो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तराच्या भाग-1 मध्ये अंशत: खरे आहे असे म्हटले आहे. माझा प्रश्न असा आहे की, राज्यातील 36 जिल्हयांमध्ये 650 एचआयव्ही टेस्ट केंद्रे आहेत. त्यापैकी नेमक्या किती केंद्रावर किटस् उपलब्ध नव्हत्या. तसेच मंत्रिमहोदयांनी आताच सांगितले की, गर्भवती महिलांना टेस्ट करण्यासाठी प्राधान्य देतो. सर्जरी करण्यापूर्वी एचआयव्ही टेस्ट राज्यामध्ये बंधनकारक करण्यात आली आहे काय ? त्यामुळे सर्जरी पुढे ढकलण्यात आल्या आहेत काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, नेमक्या किती केंद्रावर किटस् उपलब्ध नव्हत्या याची माहिती आता माझ्याजवळ नाही. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर नाही असे आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, 650 पैकी किती केंद्रावर पेशंटची टेस्ट करण्यासाठी किटस् उपलब्ध नव्हत्या ? 36 जिल्हयात 650 केंद्रे आहेत.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी जिल्हावाईज माहिती देऊ शकतो. परंतु 650 केंद्रांची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. ती पटलावर ठेवण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की 650 पैकी किती चाचणी केंद्रावर किटस् उपलब्ध नव्हत्या.

......2



ता.प्र.क्र. 37300 पुढे सुरु...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, राज्यातील 36 जिल्हयांमध्ये जवळजवळ 700 तपासणी केंद्रे आहेत. त्याबाबतची माहिती सन्माननीय सदस्यांना हवी असल्यास पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, एक गोष्ट स्पष्ट झालेली आहे की राज्यात एडस् हा रोग झपाटयाने पसरत आहे. दुसऱ्या बाजूला किटस् कमी पडण्याची पुन्हा शक्यता निर्माण होऊ शकते. माझा प्रश्न असा आहे की, आपल्या राज्यामध्येच एडस्ची चाचणी करणारी किटस् निर्माण करण्याचे धोरण शासन ठरविणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, नाही. नॅशनल एडस् कंट्रोल सोसायटीमार्फत ही किटस् पुरविली जातात.

------

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**परळी (जि.बीड) येथील वीजकेंद्रातील संच बंद पडल्याबाबत**

**(९) * ३८१११ श्रीमती उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी ( जि.बीड) येथील वीज केंद्रातील चार क्रमांकाचा संच नोव्हेंबर, २००७ पासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) हा संच वारंवार बंद होतो व त्यावर लाखो रूपये खर्च करण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हा संच त्वरीत दुरूस्त करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (१) व (२) परळी येथील वीज केंद्रातील संच क्रमांक ४ नियोजीत केल्याप्रमाणे नोव्हेंबर, २००७ पासून ५ फेब्रुवारी, २००८ पर्यंत मुख्य देखभालीसाठी बंद केला होता.

(३) सदर संच वारंवार बंद पडत नाही. परंतु काही तांत्रीक कारणामुळे संच बंद पडतात. तसेच संचाच्या मुख्य देखभालीसाठी व बॉयलरच्या कामाकरिता खर्च करावा लागतो.

(४) संच बंद करण्यात आलेल्या कालावधीत मुख्य देखभालीचे व दुरुस्तीचे काम करण्यात आले. तेव्हापासून संच चालू आहे.

श्रीमती उषा दराडे : परळी येथील थर्मल पॉवर स्टेशनचा जो संच आहे तो संच 2007-08 मध्ये किती वेळा बंद पडला होता? 2007-08 मध्ये किती मे.वॅट वीज निर्मितीवर त्याचा परिणाम झाला आणि मंत्रीमहोदयांनी तेथे जाऊन प्रत्यक्ष बैठक घेऊन संच बंद पडू नये असे प्रयत्न करुनही दुसऱ्या दिवशी संच बंद पडला. असे प्रकार वारंवार घडतात. यावर शासन काय उपाययोजना करणार आहे?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न स्पेसिफिक 4 क्रमांकाच्या संचाबाबत विचारला आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, नोव्हेंबर, 2007 पासून संच बंद आहे का? या प्रश्नाला 'नाही' असे उत्तर आहे. कारण संच देखभालीसाठी बंद ठेवण्यात आला होता. देखभालीनंतर संच सुरु करण्यात आला आहे. एकंदरीत आपल्या राज्यातील सगळी वीज निर्मिती पाहिली तर मोठया प्रमाणात असलेली विजेची मागणी आणि वीज पुरवठा करण्यासाठी संच चालवावे लागतात, त्यामुळे अनेकवेळेला या सर्व संचांचे ओव्हरऑईलिंग करावे लागते. या संदर्भात यापूर्वीच्या काळात संधी मिळत नव्हती. परंतु आता जे धोरण स्वीकारण्यात आले त्या नुसार ठराविक काळानंतर ॲन्युअल ओव्हरऑईलिंग करणे आणि ठराविक काळानंतर कॅपिटल

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ओव्हरऑईलिंग करण्याच्या संदर्भात भूमिका घेतली आहे. परळी येथील संच क्र.1 आणि 2 हे 1971-72 मध्ये स्थापन करण्यात आलेले असून संच क्र.3 हा 1980 साली, संच क्र.4 हा 1985 साली व संच क्र.5 हा 1987 साली स्थापन केलेला आहे. एका बाजूला तांत्रिक अडचणी आणि दुस-या बाजूला ट्यूब लिकेजचा प्रश्न आहे. जास्त काळ संच चालल्यामुळे सुध्दा बंद पडतात. परळी येथील पाचही संच आणि नव्याने स्थापन केलेला सहावा संच, या सहाही संचांमधून चांगल्या प्रकारे वीज निर्मिती करण्याच्या संदर्भात शासन सर्व ती काळजी घेत आहे. संच बंद पडतात हे बरोबर आहे. अनेकवेळेला त्यावर असलेला ताण, जूने झालेले संच, यापूर्वीच्या काळात ओव्हरऑईलिंगसाठी न मिळणारा वेळ आणि निधीची मर्यादा यामुळे पूर्वीच्या काळात अडचणी होत्या. या सर्व केंद्रातून वीज निर्मितीच्या संदर्भात योग्य पध्दतीने वीज निर्मिती करण्यासाठी काळजी घेण्यात येत आहे.

**तालिका सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचा सन 2002-2003 ते 2005-2006 चा लेखापरीक्षण अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचा सन 2002-2003 ते 2005-2006 चा लेखापरीक्षण अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याच्या मुद्यासंबंधीची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिनांक 4 एप्रिल, 2007 रोजी "सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये जमावावर झालेल्या लाठी हल्ल्याबाबत" या विषयावर उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यावरील चर्चेच्या वेळी सभागृहात दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती छापावी)

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लोकलेखा समितीचा आठवा अहवाल सादर करणे.

श्री.विनोद तावडे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा आठवा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

**सभापती** : लोकलेखा समितीचा आठवा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अंदाज समितीचा पंधरावा अहवाल सादर करणे

श्री.अरविंद सावंत (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा पंधरावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती महोदय, नियोजन विभागाकडून सध्याच्या प्रचलित पध्दतीऐवजी "जिल्हा नियोजन समितीने मान्य केलेल्या जिल्हा योजनासाठीची अर्थसंकल्पीय तरतूद नियोजन विभागाच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनात जिल्हानिहाय स्वतंत्र मागणीखाली विधीमंडळाला सादर करण्याबाबत तसेच विधीमंडळाने अर्थसंकल्पीय मान्यता दिल्यानंतर संबंधित जिल्हयांसाठी असलेल्या एकूण तरतुदीचे वितरण नियोजन विभागाकडून संबंधित जिल्हाधिकारी यांना विहित कार्यपध्दतीनुसार करण्याबाबत तसेच जिल्हाधिकारी हे त्या जिल्हयाच्या जिल्हा योजनेसाठी निधी वाटपासंबंधात नियंत्रक अधिकारी राहतील व संबंधित जिल्हाधिकारी हे त्यांना प्राप्त झालेल्या निधीचे कार्यान्वयीन यंत्रणेला पुनर्वाटप करण्यास सक्षम राहतील." या सुधारित कार्यपध्दतीचा प्रस्ताव दिनांक 7 फेब्रुवारी, 2008 रोजी अंदाज समितीच्या मान्यतेसाठी प्राप्त झाला.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत......

नियोजन विभागाच्या सदर प्रस्तावानुसार सुधारित कार्यपध्दती शासनास दिनांक 1 एप्रिल, 2008 रोजीपासून सुरु होणाऱ्या सन 2008-09 या आर्थिक वर्षापासून अंमलात आणावयाची असल्यामुळे सदर विषयास तातडी होती. म्हणून अंदाज समितीने विचार-विनिमय करुन दिनांक 13 फेब्रुवारी, 2008 रोजी नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सचिवांच्या साक्षी घेतल्या व त्या आधारे सुधारित कार्य पध्दतीस मान्यता देऊन त्याबाबतच्या अहवालास दिनांक 20 फेब्रुवारी, 2008 रोजीच्या बैठकीत मान्यता दिली. त्यामुळे नियोजन विभागाच्या सदरहू प्रस्तावास तातडीने मान्यता देऊन त्याबाबतचा अहवाल सभागृहास सादर करणे आवश्यक होते. तथापि, हा कालावधी नि:सत्र कालावधी असल्याने सदर अहवाल महाराष्ट्र विधानसभा नियम 186 व या अनुषंगाने माननीय अध्यक्षांनी दिलेले निदेश क्रमांक 9 (परि.क्र.6) अनुसार माननीय अध्यक्षांना आणि महाराष्ट्र विधानपरिषद नियम 181 व या अनुषंगाने माननीय सभापतींनी दिलेले निदेश क्रमांक 9 (परि.क्र.5) अनुसार माननीय सभापती यांना सादर करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सदर अहवाल माननीय अध्यक्ष, विधानसभा यांना दिनांक 29 फेब्रुवारी, 2008 रोजी व माननीय सभापती, विधानपरिषद यांना दिनांक 1 मार्च, 2008 रोजी सादर करण्यात आला व अहवाल छापणे, प्रसिध्द करणे, प्रसृत करण्यासंबधी कार्यवाही करण्यात आली. त्यानुसार अंदाज समितीचा (सन 2007-08) पंधरावा अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : अंदाज समितीचा पंधरावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---------------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/KGS पूर्वी श्री. भोगले...... 14:05

**पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वयेच्या सूचना**

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, जगदीश गुप्ता यांनी "यवतमाळ येथील नगरपरिषद शाळेतील सहाय्यक शिक्षिका श्रीमती सुनीता श्रीकृष्ण वाढवे यांचा तेथील केंद्र प्रमुख व इतर शिक्षकांकडून सतत 6 महिने मानसिक छळ केल्याने त्यांच्या तक्रारींची वरिष्ठांनी दखल न घेतल्याने सदर शिक्षिकेने दिनांक 17 मार्च, 2008 रोजी जाळून घेऊन केलेली आत्महत्त्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी "समाजकल्याण बोर्डाने केंद्रशासनाच्या कुटुंबकल्याण योजना बंद केल्याने सुमारे 251 कर्मचाऱ्यांना महिला व बालविकास विभागात सामावून घेणे, या कर्मचाऱ्यांना चौथ्या वेतन आयोगाप्रमाणेच वेतन मिळत असणे, सदर कर्मचारी शासनाच्या इतर आस्थापनेवर कार्यरत असूनही त्यांना प्रतिनियुक्तीवर दाखविण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी "चिपळूण तालुक्यातील गोंधळे व इतर आसपासच्या गावातील लोकांना समुद्राची भरती आल्यास त्याचे पाणी तांबी नदीमध्ये येऊन ओहोटी येईपर्यंत खोळंबून रहावे लागत असणे, सदर ठिकाणी पूल उभारावा अशी सुमारे 10 वर्षांपासून जनतेची व लोकप्रतिनिधींची मागणी असूनही त्यावर कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, डॉ. दीपक सावंत यांनी "दिनांक 3 एप्रिल, 2008 रोजी पुणे येथील ससून रुग्णालयाच्या शवागारातून शव विच्छेदन झालेल्या एका मृत देहाचे अज्ञात व्यक्तीने मुंडके कापून नेल्याने मृताच्या नातेवाईकात पसरलेला असंतोष, प्रशासनाने सुरक्षिततेच्या दृष्टीने दाखविलेला अत्यंत ढिसाळपणा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

......3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ..........

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "राज्य लोकसेवा आयोगामार्फत सन 1983 मध्ये विमुक्त जातीकरिता राखीव असलेल्या उप जिल्हाधिकारी पदावर श्री.बी.के.नाईक यांची नियुक्ती होणे, त्यांनी कर्नाटक राज्याचे रहिवाशी असल्याचे व ते विमुक्त जाती प्रवर्गाचे असल्याचे दर्शविणे, जात पडताळणी समितीने पाठविलेला त्यांच्या जातीचा अहवाल शासनाने दडवून ठेवणे, श्री. नाईक यांची केलेली नियुक्ती अवैध असल्यामुळे कर्मचाऱ्यात निर्माण झालेली अविश्वासाची भावना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "रत्नागिरी येथील फिनोलेक्स पी.व्ही.सी. रेग्झीन कंपनीने 43 मेगावॅट औष्णीक वीज निर्मिती प्रकल्प उभारल्यामुळे निर्माण होणारी फ्लाय ॲश उष्णता आणि प्रदूषित पाणी यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊन आंबा, बागायती आणि मत्स्य उद्योगाला निर्माण झालेला धोका" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जेथलिया यांनी "जालना जिल्हयात सेवली येथे दिनांक 3/4/2008 रोजी तेथील पान टपरीवर बनरायेंगे मंदिर या गाण्यामुळे दोन गटात झालेली मारहाण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, संजय केळकर यांनी " गोरेगांव चौपाटीवरील एच.2 ओ. व सॉल्ट वॉटर ग्रीन या रेस्टॉरंट मालकाने सागरी किनारा नियमांचे उल्लंधन करुन तेथे व्यावसायिक स्वरुपाचे बांधकाम करुन सर्वसामान्य नागरिकांचा रस्ता बंद करणे, सदर प्रकरणी तक्रार दाखल करुन घेण्यास पोलिसांकडून होत असलेली टाळाटाळ" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "परिवहन आयुक्त यांनी त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या वर्ग 1 व वर्ग 2 च्या अनेक अधिका-यांच्या देवाण-घेवाण करुन नियमाबाहय केलेल्या बदल्या, जुन्या वाहन नोंदणीचे स्मार्ट कार्ड तयार करण्याचे कंत्राट शौख टेक्नॉलॉजिज या सीबीआयने गुन्हे दाखल केलेल्या कंपनीस देण्यात येणे, अधिका-यांच्या बदल्या व स्मार्ट कार्ड योजनेत गैरव्यहार झाल्याने संबंधितांवर कार्यवाही करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

**सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आज 93 ची निवेदने घेतली जाणार आहेत याबाबत कालच आपण सभागृहाला माहिती दिलेली आहे. परंतु काल नियम 93 निवेदनाच्या संदर्भात माननीय पीठासीन अधिका-यांनी सांगितले होते की, सदर नियम 93 अन्वयेची निवेदन उद्या घेण्यात येईल. पुणे येथे कायम विनाअनुदानित शिक्षक एक तारखेपासून उपोषणाला बसलेले आहेत. आज जर नियम 93 च्या निवेदनावर चर्चा झाली नाही तर ती चर्चा सोमवारी होईल. सोमवारी चर्चा घेतली तर वेळ निघून जाईल.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत गंभीर प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. पुणे येथे कायम विनाअनुदानित शाळेतील शिक्षक उपोषणाला बसले असून त्यातील 7 उपोषणकर्ते अत्यावस्थ झाल्यामुळे त्यांना हॉस्पीटलमध्ये दाखल करावे लागले आहे. काल या विषयावर माननीय मंत्रीमहोदयांनी योग्य ते उत्तर न दिल्यामुळे सदर निवेदनावर उद्या चर्चा करण्यात येईल असे पीठासीन अधिका-यांनी निर्देश दिले होते. त्यामुळे आपण आज या 93 च्या निवेदनासाठी 10 मिनिटे वेळ दिला तर या विषयाला न्याय मिळू शकेल.

**सभापती** : काल मी सांगितले होते की, आज नियम 93 ची निवेदन घेतली जाणार नाहीत .परंतु सदर विषय महत्वाचा असल्यामुळे सदर निवेदन मी मागवून घेतो व सर्क्युलर करतो. निवेदन सर्क्युलर झाल्यानंतर सदर निवेदनावर चर्चा करण्यात येईल. निवेदन सर्क्युलर न करता चर्चा करण्यास सन्माननीय सदस्यांची व सन्माननीय मंत्रीमहोदयांची तयारी असेल तर काही प्रश्न नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : माननीय सभापती महोदय, निवेदन सर्क्युलर झाल्यानंतर निवेदनावर 5-10 मिनिटे चर्चा झाली तर या विषयाला न्याय मिळू शकेल.

**सभापती** : ठीक आहे. आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

-----------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>औचित्याचे मुद्दे</u>**

**सभापती** :सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी औचित्याचा मुद्दा दिलेला आहे. त्यांनी तो मांडावा.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 14.15

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

कल्याण शहराची लोकसंख्या सतत वाढत आहे. ही लोकसंख्या विचारात घेता 1996 पासून अतिरिक्त सत्र न्यायालय, जिल्हा न्यायालय, तसेच दिवाणी न्यायालय , वरिष्ठ स्तर व मोटार अपघात न्यायाधिकरण सुरु करण्यात आले आहे. कल्याण येथे ज्या जागेत हे न्यायालय सुरु करण्यात आले होते त्यांना जागा कमी पडावयास लागल्यामुळे नवीन इमारत बांधण्यात आली होती.गेल्या पाच वर्षापासून ही नवीन इमारत धूळ खात पडली असून या इमारतीची पुन्हा दुरुस्ती करावी लागेल काय अशी स्थिती निर्माण झाली आहे.न्यायालयाच्या आवारामध्ये पक्षकारांची व वकिलांची संख्या वाढली आहे. त्यामुळे तेथे शौचालय, प्रसाधन रुम ,कॅन्टीन, अभ्यासिका इत्यादी अनेक सुविधांची आवश्यकता आहे.अती जलद न्यायालयासाठी तेथे वास्तू देखील उभी करण्यात आलेली आहे. शासनाने त्यासाठी लक्षावधी रुपये खर्च केलेले आहेत परंतु या इमारतीमध्ये हे न्यायालय सुरु न झाल्यामुळे पक्षकार, वकील, न्यायाधीश यांना मोठया प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. औचित्याच्या मुद्याव्दारे मी ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामनाथ मोते सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाला 171 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता परतु त्यांच्या परीक्षेबाबत आता गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. या विद्यार्थ्यांनी सी.बी.एस.सी.बोर्डातून बारावीची परीक्षा पास केलेली आहे त्याचप्रमाणे अखिल भारतीय वैद्यकीय प्रवेश परीक्षासुध्दा त्यांनी पास केलेली आहे. त्यांना गुणांच्या आधारे वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळालेला आहे. प्रवेश परीक्षेमध्ये त्यांना 50 टक्क्यापेक्षा कमी गुण मिळाले होते ही वस्तुस्थिती आहे. या परीक्षेसाठी 17 हजार विद्यार्थी बसले होते त्यापैकी 3000 विद्यार्थी पास झाले होते त्यातील हे 171 विद्यार्थी आहेत. सभापती महोदय, कागदपत्रे आणि गुणपत्रिका पाहून त्यांना वेद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेश देण्यात आला होता पंरतु आता आरोग्य विज्ञान विद्यापीठाने असा निर्णय घेतला आहे हे विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र नव्हते त्यामुळे या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू देऊ नये. या विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा प्रश्न निर्माण झाला असल्यामुळे शासनाने याबाबत तातडीने दखल घ्यावी. या 171 विद्यार्थ्यांना प्रवेश कसा मिळाला ?आता जर या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू दिले नाही तर त्यांचे एक वर्ष वाया जाणार आहे. तेव्हा या मुद्याची दखल घेऊन तातडीने या विद्यार्थ्यांचा प्रश्न सोडवावा अशी मी आपल्या मार्फत शासनाला विनती करतो.

------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्याच्या संदर्भातच माझा औचित्याचा मुद्दा आहे. सांगली - मिरज - कुपवाड येथील हॉस्पिटलचे जे अधिष्ठता आहेत त्यांच्या व त्यांच्या मुलाच्या दंडेलशाहीमुळे मार्ड या असोसिएशने राज्यव्यापी एक दिवसाचा संप केला होता हा संप आज सकाळीच मागे घेण्यात आला होता. तेथील अधिष्ठता मुजोरीने वागतात तसेच त्यांनी काही डॉक्टरांना कार्यमुक्त करण्यात आलेले होते त्यामुळे तेथील हॉस्पिटलमधील सर्व डॉक्टरांनी संप केला होता.त्यांना पाठिंबा देण्यासाठी राज्यातील मार्ड या असोसिएशनने एक दिवसाचा लाक्षणिक संप केला होता. त्यामुळे राज्यातील रुग्णांचे जीवन धोक्यात आलेले आहे . राज्य सरकारने दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेऊन ताबडतोब योग्य ती कार्यवाही करावयास पाहिजे होती तसेच विद्यार्थ्यांना व डॉक्टरांना न्याय दिला पाहिजे होता परंतु दुर्देवाने शासनाने अधिष्ठतांची बाजू घेतली आणि डॉक्टरांना , विद्यार्थ्यांना तसेच रुग्णांना वा-यावर सोडले आहे.या औचित्याच्या मुद्याव्दारे मी माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती करतो की, त्यांनी या प्रश्नामध्ये तातडीने लक्ष घालावे . मार्ड असोसिएशनने आज एक दिवसाचा लाक्षणिक संप केला होता व पुढे राज्यव्यापी संप होण्याची शक्यता आहे तेव्हा या प्रश्नामध्ये लक्ष घालून सांगली-कूपवाड - मिरज येथील डॉक्टरांना न्याय द्यावा अशी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांना मी सांगू इच्छितो की, या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा प्रश्न निर्माण झालेला असल्यामुळे या प्रश्नामध्ये आपण स्वत: लक्ष घालावे . या मुलांनी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेऊन एक वर्ष होऊन गेलेले आहे व त्यांना आता परीक्षेला बसू दिले नाही तर त्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण होऊन त्यांचे आयुष्य बरबाद होणार आहे. म्हणून या प्रश्नाबाबत आपण स्वत: लक्ष घालून योग्य ती कार्यवाही तातडीने करावी आणि जी काही कार्यवाही करण्यात आलेली आहे त्याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी.

श्री.दिलीप वळसे- पाटील : होय

नंतर श्री.सुं बरे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने औचित्त्याचा मुद्दा येथे मांडत आहे. सभापती महोदय, राज्यामध्ये शासनाने डिसेंबर 2001 मध्ये कायम विनाअनुदान धोरण स्वीकारले आहे. परंतु त्या अगोदरही काही शाळा या कायम विनाअनुदान तर काही शाळांना अनुदान तत्त्वावर मान्यता देऊन शासनाने भेदभाव केलेला आहे. याबाबत ज्या शाळा न्यायालयात गेल्या त्यांना अनुदान द्या, भेदभाव करू नका असे न्यायालयाने सांगितले आहे. सभापती महोदय, सर्व विकासाचा पाया हे शिक्षण समजले जाते. ग्रामीण भागात ह्या शाळा चालविणे कठीण झालेले आहे. सरकारची आर्थिक परिस्थिती सुधारल्यास अनुदान देऊ असे प्रतिज्ञापत्र सरकारने न्यायालयात दाखल केलेले आहे. तसेच मागच्या हिवाळी अधिवेशनात माननीय शिक्षण मंत्र्यांनी, येत्या तीन महिन्यात याबाबत प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे ठेवू असे आश्वासन दिले होते. परंतु आजपर्यात त्याबाबत काहीही कार्यवाही झालेली नाही. महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदान कृती समितीने दिनांक 1 एप्रिल 2008 पासून शिक्षण संचालक कार्यालय, पुणे येथे या मागणीसाठी आमरण उपोषण सुरू केलेले आहे. तरी शासनाने तातडीने निर्णय घेऊन या सर्व शाळांना आजपासून का होईना अनुदान देण्याबाबत निर्णय घ्यावा अशी सूचना मी या औचित्त्याच्या मुद्याद्वारे मांडत आहे.

**सभापती** : माननीय शालेय शिक्षण मंत्री येथे उपस्थित आहेत, मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्याची दखल घेऊन ...

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी याच विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली असता आपण निदेश दिल्याप्रमाणे मला त्या विषयी निवेदन करावयाचे आहे आणि हे निवेदन आजच सदनामध्ये येणार आहे. तरीही आता आपण परवानगी देत असाल तर मी ते निवेदन आताही करू शकतो.

**सभापती** : ठीक आहे. मग नियम 93 च्या निवेदनाद्वारा या विषयी माननीय शालेय शिक्षण मंत्री निवेदन करणार असल्याने सन्माननीय सदस्यांचे त्यातून समाधान होईल असे मला वाटते.

...... डब्ल्यूडब्ल्यू 2 ..



सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने औचित्याचा मुद्दा मांडत आहे. सभापती महोदय, मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा सध्या सुरू आहेत. एम.एस.सी.च्या विद्यार्थ्यांना बुधवार, दिनांक 2 एप्रिल 2008 रोजी पर्यवेक्षकाने प्रश्नपत्रिका कोड तपासून योग्य असल्याचे खात्री करून सदर पेपर विद्यार्थ्यांना वितरित केले. मात्र काही क्षणातच विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आलेला पेपर हा जनरल मायक्रोबायॉलॉजी ऐवजी जेनेटिक विषयाचा असल्याचे कळून आले. परिणामी पाटकर कॉलेज परीक्षा केंद्रावर प्रचंड गोंधळ निर्माण झाला. शेवटी ही परीक्षा रद्द करून पुढे ढकलण्यात आली. अशीच घटना दिनांक 19 डिसेंबर 2007 रोजी घडली होती. अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांना इ-फायनान्स पेपर ऐवजी इ-कॉमर्स या पेपरचे वाटप केले होते. तसेच दिनांक 21 डिसेंबर 2007 रोजी इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग पेपर ऐवजी इलेक्ट्रिकल नेटवर्कींग या विषयाच्या पेपरचे वतिरण करण्यात आले होते. नुकत्याच पार पडलेल्या एस.एस.सी. बोर्डाच्या परीक्षेत देखील चेंबर आणि उल्हासनगर येथे सिंधी भाषा पेपरच्या बाबतीत अशाच प्रकारचा घोळ झाला होता. जगातील विद्यार्थ्यांचे आकर्षण असलेल्या मुंबई विद्यापीठाचा दर्जा दिवसेंदिवस घसरत असल्याचे समस्त विद्यार्थ्यांमध्ये चर्चा आहे. शासनाने वेळीच याबाबत लक्ष घालून अशा गैरप्रकारांना आळा घालण्याची गरज आहे. या सार्वजनिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या आणि ज्वलंत प्रश्नाबाबत औचित्याचा मुद्दा मी उपस्थित केला आहे. सभापती महोदय, संबंधित खात्याचे मंत्री महोदय आता येथे उपस्थित आहेत. त्यांना मी विनंती करतो की, त्यांची या गैरप्रकाराची त्वरित दखल घेऊन विद्यार्थ्यांना योग्य न्याय द्यावा.

**सभापती** : माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांनी यांनी या औचित्याच्या मुद्याची दखल घेऊन त्याबाबत कारवाई करावी.

श्री. दिलीप वळसे-पाटील : ठीक आहे.

..... डब्ल्यूडब्ल्यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नुकत्याच, 26 मार्च ला आपल्याकडे विधानसभेकडून विधान परिषदेत निवडून द्यावयाच्या सदस्यांची निवडणूक झाली. या संदर्भात आपल्याला कल्पना आहेच की, गेल्या वर्षी जुलै 2007 मध्ये मी औचित्त्याचा मुद्दा उपस्थित केला होता आणि परवा जेव्हा विधान परिषदेची निवडणूक झाली त्यावेळेस आपल्या सभागृहामध्ये सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनीही येथे मुद्दा मांडला होता. विधानसभेमधून विधान परिषदेसाठी जो उमेदवार निवडून दिला जातो त्या निवडणुकीमध्ये राज्यसभेमध्ये ज्या पद्धतीने लोकसभेतून उमेदवार निवडून दिला जातो त्याप्रमाणे म्हणजेच ओपन बॅलेट पद्धतीने निवडणूक व्हावी असे त्यांनी म्हटले होते. या संदर्भात डिसेंबर 2007 मध्ये मला माननीय मुख्यमंत्र्यांनी पत्र दिले त्यात त्यांनी असे सांगितले आहे की, त्यांनी यासंबंधात केंद्रीय गृहमंत्री श्री.शिवराज पाटील यांना पत्र दिले आहे. त्यात म्हटले आहे की, ही निवडणूक ओपन बॅलेट पद्धतीने व्हावी असा महाराष्ट्र विधान परिषदेचा ठराव आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... एक्सएक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

आणि त्या पत्रामध्ये शासनाने अशी शिफारस केली आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधान परिषदेवर निवडून येणारे जे सदस्य आहेत आणि विधानसभेमधून विधानपरिषदेवर निवडून येणारे जे सदस्य आहेत त्यांच्यासाठी राज्यसभा निवडणुकीच्या पध्दतीनुसार ओपन बॅलट पध्दत स्वीकारण्यात यावी. आता पूलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. शासनाने अजूनही त्याची गांभीर्याने दखल घेतली नाही. म्हणून बाहेर घोडेबाजार सुरु असल्याची चर्चा होते. पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीनंतर आणि नवीन विधानसभा अस्तित्वात आल्यानंतर पुन्हा विधानपरिषदेच्या निवडणुका होणार आहेत. आणि म्हणून नवीन विधानसभा अस्तित्वात आल्यानंतर शासनाने याची गंभीर दखल घेऊन सभागृहाची प्रतिष्ठा आणि राज्याचा कारभार चांगला होण्याच्या दृष्टीने आणि विधानसभेची प्रतिष्ठा राखण्यासाठी आपण स्वत: गंभीर असाल तर आपल्याला त्याचा फटका बसणार नाही. आणि संपूर्ण सभागृहाची शान राहील. म्हणून ओपन बॅलट पध्दत स्वीकारण्याच्या संदर्भात केंद्र सरकारकडे गांभीर्याने पाठपुरावा करुन लवकरात लवकर याबाबत निर्णय व्हावा म्हणून मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

**सभापती** : माननीय उच्च शिक्षण मंत्री, माननीय सदस्यांनी औचित्याच्या माध्यमातून अत्यंत महत्वाचा मुद्दा मांडला आहे.यासंबंधी सामान्य प्रशासन विभाग किंवा संबंधित अन्य विभागाने पाठपुरावा करावा अशी माननीय सदस्यांनी विनंती केली आहे. तेव्हा संबंधित विभागाला यासंबंधी दखल घेण्यास आपण सांगावे.

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, होय. शासनाला अशाप्रकारची सूचना करण्याची वेळ माननीय सदस्यांवर कां आली? या संदर्भात त्यांनी निवडणुकीमध्ये आलेला अनुभव सांगितला तर बरे होईल.

डॉ.दीपक सावंत : याबाबतीत ईकडच्या बाजूचा आणि तिकडच्या बाजूचा सर्वांचा अनुभव सारखा आहे.

श्री. दिलीप वळसे पाटील : यापूर्वीच्या काळात याद्या एक्सचेंज करुन त्या तपासल्या जात होत्या. तशाप्रकारची सोय केली तर बऱ्याच गोष्टी उजेडात येतील.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, नुकतेच केंद्र सरकारने 5 एकरापर्यंतच्या शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला. त्या निर्णयाचे महाराष्ट्रामध्ये स्वागत करण्यात आले. बीड जिल्हयात अशी परिस्थिती आहे की, मागील दहा-वीस वर्षापासून रस्त्यासाठी, पाझर तलावासाठी, साठवण तलावासाठी आणि लघुसिंचन तलावासाठी, विविध कारणांसाठी जमिनी संपादित करण्यात आल्या. या जमिनी अजूनही शेतकऱ्यांच्या नावे आहेत. त्यांचा मावेजा वाटूनही आणि कोर्टाचा निवाडा लागूनही दुसऱ्या वेळी पुन्हा वाढीव मावेजा मिळाला तरीसुध्दा त्या अजूनही शेतकऱ्यांच्या नावे आहेत. यामध्ये धागडगावचा प्रकल्प असेल, नारायणगडचा प्रकल्प असेल, परळीच्या रेल्वेकरीता घेण्यात आलेल्या जमिनी अजूनही 7/12 वर आहेत. या जमिनी विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांनी संपादित केल्याबरोबर त्याचे कमी जास्त पत्रक महसूल अधिकाऱ्यांना पाठवावयाचे असते. पण बीड जिल्हा त्याला अपवाद ठरला. विशेष भू संपादन अधिकाऱ्यांनी कमी जास्त पत्रक महसूल अधिकाऱ्यांना न पाठविल्यामुळे 7/12 वर जमिनीची मालकी कमी असतांना सुध्दा जास्तीची नोंद आहे. त्यामुळे कर्जमाफीचा लाभ शेतकऱ्यांना मिळणार नाही अशाप्रकारची भीती निर्माण झाली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी पत्र देऊन सुध्दा त्याबाबत विशेष पाऊल पुढे टाकण्यात आले नाही. त्यामुळे शासनाने यासंबंधी युध्द पातळीवर दखल घ्यावी. आणि महसूल विभागाला कमी जास्त पत्रक देऊन शेतकऱ्यांच्या 7/12 च्या उताऱ्यावरील जमिनी कमी कराव्यात आणि त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून ध्यावा अशाप्रकारचा औचित्याचा मुद्दा उपस्थित करु इच्छिते.

**सभापती** : माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री. राजेश टोपे यांना मी सांगू इच्छितो की, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला औचित्याचा मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे. शेतकऱ्यांकडील जमिनी भूसंपादित करुन संबंधित विभागाच्या ताब्यात देण्यात आल्या. परंतु संबंधित शेतकऱ्याच्या 7/12 च्या उताऱ्यावरील नोंदीमधून त्या जमिनींचे क्षेत्र कमी न झाल्यामुळे त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्यापासून ते वंचित रहाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामध्ये एखाध्या शेतकऱ्याकडील शेत जमीन 5 एकराच्या आतील असली तरी भूमि अभिलेखामध्ये त्यांसबंधीची दुरुस्ती न झाल्यामुळे त्या शेतकऱ्यावर अन्याय होण्याची शक्यता आहे. हा केवळ बीड जिल्हयापुरता मर्यादित प्रश्न नसून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

**सभापती**....

संपूर्ण राज्यामध्ये ज्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत, त्या शेतकऱ्यांच्या ताब्यातील जमिनीचे रेकॉर्ड दुरुस्त करुन त्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा फायदा कसा मिळेल यादृष्टीने आपण संबंधित विभागाच्या निदर्शनास ही बाब आणून द्यावी.

श्री. राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, याची नोंद घेण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिशन बाजोरीया यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. गोपीकिशन बाजोरीया : सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याकरिता परवानगी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देतो.

"मौजे मलकापूर, तालुका व जिल्हा अकोला येथील श्रीमती शकुंतला कोठारींचा हा प्रश्न आहे. त्यांच्या तक्रारीसंदर्भातील हा प्रश्न या सभागृहामध्ये दोन तीन वेळा मांडण्यात आला. या संदर्भात माननीय उपसभापतींनी दिनांक 29.11.2007 रोजी निर्णय दिला होता की, "सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिशन बाजोरीया यांनी या सभागृहामध्ये ही जी लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे त्या सूचनेवर या सभागृहात बरीच चर्चा झाली आहे. एकंदरीत जे उपलब्ध कागदपत्र आहेत ते पहाता या महिलेला ही जमीन परत मिळावयास पाहिजे. त्याकरिता त्यांनी विनंती अर्ज केला होता. तुमच्या म्हणजे मुख्याधिकारी, प्राधिकरण यांच्याकडून प्रधान सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांना दिनांक 26.11.99 रोजी पत्र गेले होते. त्यानुसार 4245 चौरस मीटर एवढी जमीन त्यांना परत करावयाचे त्यांनी मान्य केले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:30

श्री.गोपीकिशन बाजोरिया . . . .

इतकेच नव्हेतर मागील वेळीही ही लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्यांनी विचारली होती. त्यावेळी देखील सभागृहात उत्तर दिले गेले की, ही जमीन मूळ मालकाला परत करण्यात यावी. आता पुन्हा नव्याने केरळ हाय कोर्टाच्या निर्णयाचा दाखल देऊन जमीन देता येत नाही असे सांगण्यात आले. तो नियम याठिकाणी लागू होत नाही. त्यामुळे ही जमीन शासनाने यापूर्वी कबूल केल्याप्रमाणे येत्या 15 दिवसाच्या आत या महिलेला परत करण्यात यावी अशा प्रकारचे सुस्पष्ट निर्देश मी आपल्याला या सभागृहात देत आहे आणि यावर ॲडव्होकेट जनरलचा सल्ला घेण्याची गरज नाही. या निर्णयावर कुठल्याही परिस्थितीत अकौंटन्ट जनरलशी कन्सलटेशन होणार नाही, तरी सुध्दा आतापर्यंत याबाबतीत काही अंमलबजावणी झालेली नाही. म्हणून या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून आपल्याला विनंती करतो की, यामध्ये दिरंगाई का होत आहे अशी विचारणा करुन आपण याबाबतीत संबंधितांना तातडीने आदेश द्यावेत आणि जे अधिकारी यामध्ये कुचराई करीत असतील, त्यांच्यावर कारवाई करावी.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या प्रश्नामध्ये मी सुध्दा लक्ष घातलेले आहे. याबाबत सदनामध्ये यापूर्वी देखील लक्षवेधी सूचना किंवा अन्य माध्यमातून चर्चा झालेली आहे. कोर्टामध्ये कॉम्प्रमाईज झाले आणि जी संबंधित महिला आहे, त्यांना असे सांगण्यात आले की, तुम्ही सगळे पैसे भरावेत. त्यांना अशा पध्दतीने सांगितले की, आम्ही तुम्हाला हे पैसे परत करु. सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया, मी म्हणतो ते बरोबर आहे काय ?

श्री.गोपीकिशन बाजोरिया (खाली बसून) : होय.

**सभापती** : दुर्दैवाने हे कॉम्प्रमाईज होऊन सुध्दा केरळ हाय कोर्टाचा निर्णय आहे की, संपादन केलेली जमीन त्या व्यक्तीला न देता, त्याबाबतीत काही करावयाचे असेल तर त्याचा जाहीर लिलाव करावा किंवा एखाद्या सार्वजनिक कामासाठी द्यावी असे जनरल स्वरुपाचे आहे. पण त्यापूर्वीच जर कोर्टामध्ये कॉम्प्रमाईज झाले असेल तर या बाईंना हे पैसे मिळाले पाहिजेत. मी माझ्या दालनामध्ये याविषयाच्या संबंधात एक बैठकही घेणार आहे. सन्माननीय सदस्यांनी माननीय उद्योग मंत्र्यांना स्वत: ही संपूर्ण परिस्थिती समजावून सांगावी आणि गेल्या अनेक दिवसापासून त्यांचे जे प्रयत्न आहेत, ते कोणत्याही परिस्थितीत यशस्वी होतील आणि त्या महिलेला न्याय मिळेल

. . . .2 वाय-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** . . . .

यादृष्टीने आपण दोघेही जण प्रयत्न करु. मी स्वत: प्रयत्न करतो आणि सन्माननीय सदस्यांनी देखील करावेत.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, धन्यवाद.

----

. . . .2 वाय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ MMP/ KGS/ 14:30

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना औचित्याचा मुद्दा मांडावयाचा आहे, त्यांनी तो मांडावा.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून दोन मुद्दे उपस्थित करणार आहे. एकतर काल कामकाज सल्लागार समितीमध्ये झुणका भाकर केंद्राच्या संबंधात माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करण्यासाठी वेळ घेण्यात यावी आणि त्यासाठी आज दुपारची वेळ घेण्यात यावी असे ठरलेले होते. पण आज मी सकाळी 11.40 वाजता येथे आलो, तेव्हा माझ्या टेबलावर मला निमंत्रण मिळाले की, ही बैठक आज सकाळीच घ्यावयाची ठरलेले आहे. आम्ही ज्यावेळी एखादा विषय आग्रहाने मांडतो, त्याच्या पाठिमागे पोटतिडीक असते आणि तो प्रश्न सुटावा अशी त्यामागील भावना असते. या माध्यमातून सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब, मी, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत या सर्वांनी हा मुद्दा उपस्थित केला होता आणि आपणही अनेक वेळा त्याला न्याय दिलेला आहे. पण आज सकाळी या विषयाच्या संबंधात बैठक झाली आणि त्याचा रिझल्ट चांगला निघेल असे मला सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले, ही आनंदाची गोष्ट आहे. पण ठरते एक आणि बैठकीची वेळ दुसरीच ठरविली जाते हे योग्य नाही हे मला मुद्दाम आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा प्रोटोकॉलच्या संदर्भातील आहे. यासंदर्भात अनेक वेळेला येथे विषय मांडलेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत दोन-तीन वर्षापासून हा विषय मांडत आहेत. या प्रोटोकॉलच्या संबंधात एक बैठक घेऊन याचा एकदा काय तो निणय घ्यावा अशा प्रकारे आपणही सूचना दिलेल्या आहेत. पण प्रोटोकॉलच्या बाबतीत अद्यापही काहीही निर्णय झालेला नाही. सध्या जे लोकप्रतिनिधी आहेत आणि जे माजी लोकप्रतिनिधी आहेत त्यांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर काहीतरी व्यवस्था होण्याची आवश्यकता आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर (खाली बसून) : माननीय सभापतींनी याबाबतीत निर्देशही दिलेले आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, बरोबर आहे, याबाबतीत माननीय सभापतींनी निर्देशही दिलेले आहेत. लोकसभेमध्ये याबाबतीत पध्दत कशी आहे याबाबतीत मी पूर्वी औचित्याच्या माध्यमातून उल्लेख देखील केला होता. यासाठी मी मुद्दाम लोकसभेतील प्रोटोकॉलच्या संबंधातील

. . . .2 वाय-4



श्री.मधुकर सरपोतदार . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

माहिती आपल्या माहितीसाठी आणली आहे. कृपा करुन आपण तो पहावा आणि येथील परिवहन खात्याला याबाबतीत जाणीव करुन द्यावी.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अस्थारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार..

केंद्रामध्ये असे होऊ शकत असेल तर महाराष्ट्र राज्यामध्ये असे का होऊ शकत नाही हा माझा महत्वाचा प्रश्न आहे. तसेच इतक्या लहान गोष्टीकरीता इतका विलंब का होत आहे हे मी आपणास विचारु इच्छितो. हे पेपर्स मी आपल्याकडे माहिती साठी पाठवित आहे. या संदर्भात योग्य तो निर्णय घेण्यात यावा अशी मी या औचित्याच्या मुद्दयामार्फत विनंती करतो.

**सभापती** : झुणका भाकर केंद्राच्या संदर्भात काल मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये एक बैठक झाली होती . त्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांनी बैठकीची वेळ सकाळी 11.30 ची आहे असे कळविले होते. मात्र ही बैठक दुपारी 1.30 वाजता आहे असे आपल्याला अनावधानाने वाटत होते. हे अनवधानाने झालेले आहे. असे होता कामा नये या दृष्टीने नोंद घेण्यात येईल. माननीय मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाकडून जी वेळ कळविण्यात आली होती त्या वेळेला बैठक घेण्यात आली होती. ही बैठक दुपारी घेण्यात यावी अशी अनौपचारिक चर्चा झाली होती असे माझ्या कार्यालयाकडून मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाला कळविणे आवश्यक होते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, झुणका भाकर या विषयाला न्याय देण्याकरिता शासनाकडून चांगली भूमिका घेण्यात येईल असा दिलासा देण्यात आला आहे. माननीय मंत्री महोदयांनी त्यासंबंधी निर्देश दिलेले आहेत. माझी अशी विनंती आहे की, या संदर्भात शासनाने सुतोवाच्य केल्यास बाहेरील जनतेमध्ये चांगला संदेश जाऊ शकेल.

**सभापती** : प्रोटोकॉलच्या संदर्भात प्रिन्सिपल सेक्रेटरींशी माझी चर्चा झालेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रोटोकॉल संदर्भातील प्रश्न एक महिन्यात दूर व्हावा असा निर्देश यापूर्वी देखील देण्यात आला होता. परंतु शासनाने या विषयाची दखल घेतलेली नाही. या बाबत ताबडतोबीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे अशी मी विनंती करु इच्छितो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या संदर्भात अधिकारी टोकाची भूमिका घेत आहेत अशी आमची माहिती आहे.

**सभापती** : मध्यंतरी या संदर्भात संबंधित विभागाची एक बैठक घेण्यात आली होती. त्या वेळी असे सांगण्यात आले होते की, याबाबत काही कायदेशीर अडचणी आहेत. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, या बाबत ज्या काही कायदेशीर अडचणी असतील त्या आपण 8 ते 10 दिवसात

2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . .

दूर कराव्यात. लोकसभेमधील सन्माननीय सदस्यांना जसे राजशिष्टाचाराच्या पद्धतीने वागविले जाते तशाच प्रकारे दोन्ही सदनातील सन्माननीय सदस्यांना देखील वागविले गेले पाहिजे. त्या अनुषंगाने पासेस देणे गरजेचे आहे. लोकसभेमध्ये प्रोटोकॉलच्या संदर्भात काही अडचणी येत नसतील तर तशा अडचणी येथे येण्याचे काही कारण नाही. संबंधित विभागाचे जे मंत्री आहेत त्यांनी सोमवारी प्रोटोकॉल संबंधी सदनामध्ये माहिती पटलावर ठेवावी. लोकप्रतिनिधींची प्रतिष्ठा राखली गेली पाहिजे याकडे मी लक्ष देईन.

तसेच कालच या विषयासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी 93 ची सूचना दिलेली होती. आज हाच विषय औचित्याचा मुद्यामार्फत मांडण्यात आला आहे. मी आता असे ठरविले आहे की, या बाबतीत सन्माननीय सदस्य सर्वश्री अरविंद सावंत, पांडुरंग फुंडकर व श्री. चरणसिंग सप्रा यांनी लक्षवेधीची सूचना द्यावी.

या नंतर सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याकरिता परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माझा औचित्याचा मुद्दा मांडतो. या सदनाचे माजी सदस्य श्री. विनायकराव मेटे यांनी आज विधान भवनावर धडक मोर्चाचे आयोजन केलेले आहे तसेच त्यांनी काही मागण्या या निमित्ताने राज्य सरकारसमोर ठेवलेल्या आहेत. ते आपले सहकारी होते. त्यांनी जो विषय मांडलेला आहे त्याबाबत शासनाच्या स्तरावर चर्चा व्हावी आणि त्याची शासनाने तात्काळ दखल घ्यावी म्हणून मी हा विषय या औचित्याच्या मुद्याव्दारे आपल्या अनुमतीने सभागृहासमोर मांडत आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय पातळीवरचे स्मारक मुंबईतील गिरगाव चौपाटी समोरच्या समुद्रात उभे करण्याबाबत राज्यातील सर्वच जनतेची होत असलेली मागणी हा एक विषय त्यामध्ये आहे. ज्यावेळी हे शासन सत्तेवर आले त्यावेळी 1999 ला आम्ही जो जाहीरनामा तयार केला होता त्यामध्ये या स्मारकावर 100 कोटी रुपये खर्च करु आणि समुद्रामध्ये हे स्मारक उभे करु असा कार्यक्रम सत्ताधारी पक्षातील दोन्ही पक्षांनी जनतेसमोर ठेवला होता. माननीय राज्यपालांनी सुध्दा अभिभाषणामध्ये उल्लेख केला परंतु अद्यापपर्यंत त्याबाबतीत कार्यवाही झालेली नाही. याबाबत शासन कार्यवाही करणार की, नाही याबाबतची सुध्दा माहिती मिळालेली नाही. हा एक महत्वाचा विषय आहे. म्हणून या निमित्ताने मी या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय पातळीवरचे स्मारक मुंबईतील गिरगाव चौपाटी समोरच्या समुद्रात उभे करण्याबाबत राज्यातील सर्वच जनतेची होत असेलेली मागणी, यावर शासनाने अद्यापही निर्णय न घेणे, त्यामुळे राज्यातील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, तसेच मराठा व कुणबी हे दोन समाज नसून एकच समाज आहे, खुल्या वर्गातील सर्वच घटकातील आर्थिक दुर्बलांना सर्वच क्षेत्रात 25 टक्के आरक्षण अद्यापही देण्यात आले नाही तसेच शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव द्यावा या ज्वलंत प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी, जनतेच्या व शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी आज दिनांक 4.4.2008 रोजी शिवसंग्राम संघटनेने विधान सभेवर धडक मोर्चा आणलेला आहे. हे जे प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत त्यामध्ये शासनाने लक्ष घालावे आणि त्याबाबत शासन काय कारवाई करणार आहे याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी म्हणून मी या औचित्याच्या मुद्याव्दारे हा विषय आपल्या अनुमतीने उपस्थित करीत आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. दिलीप वळसे-पाटील यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी या औचित्याच्या मुद्याव्दारे दोन तीन मुद्दे मांडलेले आहेत त्याची नोंद घ्यावी आणि संबंधित विभागास यांची नोंद घेण्यास सांगावे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : ठीक आहे.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माझा औचित्याचा मुद्दा मांडतो.

गोंदिया जिल्ह्यातील सेवा खंडित कर्मचाऱ्यांनी 1.4.2008 पासून जिल्हा कचेरीसमोर आमरण उपोषण सुरु केलेले आहे. त्यातील दोन तीन उपोषणकर्त्यांना मेडिकलमध्ये भरती करण्यात आले आहे. माननीय उच्च न्यायालयाने पिटीशन क्रमांक 2813/2006 संदर्भात 15 जून, 2006 ला अंतिम निर्णय दिला असून त्यामध्ये जिल्हा परिषदेने त्यांना सेवेमध्ये सामावून घेण्यासंबंधी निर्णय दिला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी 4 ऑक्टोबरच्या पत्राव्दारे असे कळविले आहे की, शासनाकडून हजेरी सहाय्यक यांना सामावून घेण्याबाबत कोणत्याही प्रकारचे निदेश प्राप्त झालेले नाहीत त्यामुळे यासंदर्भात सध्या कोणतीही कारवाई करता येत नाही. या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मी शासनाला विनंती करतो की, उपोषणकर्त्या सेवा खंडित हजेरी सहाय्यकांना दिलासा देऊन हजेरी सहाय्यक म्हणून सेवेत सामावून घेऊन न्याय द्यावा. याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना व कार्यवाही करावी यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, आपल्या अनुमतीने मी माझा औचित्याचा मुद्दा मांडतो. सांगली-मिरजमधील डॉक्टरांचा संप सुरु आहे त्याबाबत सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे. मी हा विषय काल विशेष उल्लेखाव्दारे मांडलेला होता. सभापती महोदय, आज संपाचा आठवा दिवस सुरु आहे. मार्ड सारखी संघटना यामध्ये उतरलेली आहे. जे.जे. हॉस्पिटलमधील ओ.पी.डी. बंद पडण्याच्या मार्गावर आली होती. यामध्ये ताबडतोब सन्माननीय तोडगा काढणे आवश्यक आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा राज्याच्या आरोग्याचा प्रश्न आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, केवळ संचालकांच्या पातळीवर हा प्रश्न सुटणार नाही. यामध्ये दोन्ही बाजूच्या लोकांना बोलवून सन्माननीय तोडगा काढावा अशी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करीत आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या संदर्भात आजच सकाळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव आणि संचालक, वैद्यकीय शिक्षण यांना संबंधित निवासी डॉक्टरांबरोबर बसून तोडगा काढण्यासंबंधी वा मार्ग काढण्यासाठी सूचना केलेली आहे. काल जरुर मार्डच्या सदस्यांनी या घटनेला पाठिंबा देण्यासाठी एक दिवसाचा लाक्षणिक संप केला होता. परंतु ते सर्व डॉक्टर्स आज कामावर रुजू झाले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी काल सभागृहाची बैठक संपल्यानंतर संध्याकाळी जे.जे.रुग्णालय आणि के.इ.एम.रुग्णालयाला भेट देऊन रुग्णांची अवस्था पाहिली आहे. डॉक्टरांच्या संपामुळे रुग्णांचे अतोनात हाल झाले, काही रुग्णांना उपचार मिळाले नाहीत. काही डॉक्टरांबरोबर माझी चर्चाही झाली आहे. त्यावेळी त्यांनी मला असे सांगितले की, दोन दिवसात शासनाने निर्णय घेतला नाही तर आज आम्ही एक दिवसाचा लाक्षणिक संप केला आहे, पुढे बेमुदत संपावर जाऊ. त्यामुळे मंत्रिमहोदयांनी सचिवांना केवळ सूचना करुन चालणार नाही. मंत्रिमहोदयांना माझी विनंती आहे की, आपण दोन दिवसात निर्णय घेऊन हा प्रश्न तातडीने निकालात काढावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सचिव स्तरावर हा प्रश्न सुटणार नाही. त्यामुळे मंत्रिमहोदयांनी हस्तक्षेप करणे आवश्यक आहे.

**सभापती** : मंत्रिमहोदय, लोकांच्या आरोग्याशी संबंधित हा प्रश्न आहे. त्यामुळे आपल्या पातळीवर चर्चा केली तर मार्ग निघण्याची शक्यता आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, राज्याचे वैद्यकीय शिक्षण उपसंचालक त्यांच्याशी चर्चा करुन आलेले आहेत. पहिली फेरी म्हणून त्यांनी संचालक, आणि सचिवांशी चर्चा करणे आवश्यक आहे. ती चर्चा झाल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे यांना मी सांगू इच्छितो की, लक्षवेधी सूचना पुढे ढकलत असल्याचे मी कालच सभागृहात सांगितले होते. मी सर्व लक्षवेधी सूचना सोमवारी घेणार आहे, एकही लक्षवेधी सूचना मी लॅप्स करणार नाही.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "जळगाव जिल्हयातील भुसावळ नगरपालिकेच्या विशेष सभेत हरकत नोंदविण्याच्या कारणावरुन झालेली दंगल" या विषयासंबंधी सर्वश्री गुरुमुख जागवाणी व इतर वि.प.स.यांनी उपस्थित केलेल्या नियम 93 अन्वये सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिनांक 12 डिसेंबर, 2006 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी. )

------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्यासंबंधी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न होणे

**मु. शी.** : कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्यासंबंधी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न होणे याबाबत श्री.वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.जी.एल.अैनापुरे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख व श्री.जी.एल.अैनापुरे यांनी " कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्यासंबंधी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.वसंतराव खोटरे : महाराष्ट्र शासनाने सुरुवातीपासून कायम विनाअनुदानित तत्व स्वीकारले तेव्हापासून आजपर्यंत या शाळा अनुदानापासून वंचित राहिल्या आहेत. राज्यात अशा 4-5 हजार शाळा कार्यरत आहेत. अनुदानित शाळांना वेतनाचे अनुदान मिळते, त्या विद्यार्थ्यांना सवलती मिळतात, परंतु विनाअनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना व शिक्षकांना अनुदान मिळत नाही. त्यामुळे या शाळांमध्ये भेदभाव निर्माण होत आहे. कायम विनाअनुदानित शाळांना व विद्यार्थ्यांना अनुदान मिळण्यासाठी त्यांच्या कृती समितीने जवळपास 24 वेळा आमरण उपोषण केले, आंदोलन केले आहे. 1 एप्रिल पासून आमरण उपोषण करण्याबाबतचे निवेदन दिले आहे. उपोषणकर्त्या दोन शिक्षकांना पोलिसांनी अटक केली आहे. यासंदर्भात हायकोर्टाने सुध्दा आदेश दिलेले आहेत. या निवेदनात असे म्हटले आहे की, 'रिट याचिका क्र.138/2003 व रिट याचिका क्र.8736/2005 या याचिकांमध्ये माननीय उच्च न्यायालयाने कायम विनाअनुदान तत्वावरील शाळांना अनुदानापासून कायमस्वरुपी वंचित ठेवता येणार नाही.'

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. वसंतराव खोटरे....

आता राज्याची आर्थिक स्थिती सुधारलेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी 26 नाव्हेंबर 2007 रोजी "तीन महिन्याच्या आत निर्णय घेतो" असेही सांगितलेले आहे. परंतु अजून निर्णय घेतलेला नाही. म्हणून एक महिन्याच्या आत कायम विनाअनुदान शाळांना विनाअनुदान शाळांप्रमाणे अनुदान द्याल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : काल या सूचनेचे निवेदन वितरित केले होते. परंतु ते त्रोटक असल्यामुळे आज सविस्तर निवेदन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सभापती महोदय, हायकोर्टामध्ये शपथ पत्र दिलेले आहे. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा मिळून सुमारे 700 विनाअनुदान तत्वावरील शाळा अद्याप अनुदानावर यावयाच्या आहेत. त्याबाबतीत कार्यवाही सुरु आहे. हे अनुदान कसे द्यावे याबाबतीत आम्ही वित्त व नियोजन मंत्र्यांसमवेत मंत्रिमंडळासमोर जात आहोत. या शाळांना लवकरात लवकर अनुदान मिळावे असा प्रयत्न आम्ही करीत आहोत.

प्रा. बी.टी.देशमुख : आज वितरित केलेल्या निवेदनामध्ये सर्व मुद्यांची उत्तरे दिलेली आहेत, त्याबद्दल मी माननीय मंत्रीमहोदयांचा आभारी आहे. या निवेदनाच्या परिच्छेद दोन मध्ये रिट याचिका क्रमांक 138/2003 व रिट याचिका क्रमांक 8736/2005चा उल्लेख केलेला आहे. सभापती महोदय, हायकोर्टाने दिलेला निर्णय मी वाचून दाखवितो. "In other words, for all practical purposes, the recognition of a Petitioner's school on permanent no-grant basis has to be read and understood as recognition of a Petitioner's school on no-grant basis." "कामय विनाअनुदान" हा जो शब्द वापरलेला आहे त्याला "विनाअनुदान" असे समजले पाहिजे. अशा प्रकारचा निर्णय हायकोर्टाने या प्रकरणी दिलेला आहे हे खरे आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : ही गोष्ट खरी आहे, न्यायालयाने असे सांगितले की, कायम विनाअनुदान शाळांना कायम स्वरुपी वंचित ठेवता येणार नाही. राज्याची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर या शाळांना अनुदान देण्याचे धोरण ठरवावे.

..2..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी हायकोर्टाची जज्मेंट जशीच्या तशी वाचून दाखविली त्यामध्ये असे म्हटलेले आहे की कायम विनाअनुदान ही शब्दरचना "for all practical purposes, must be read and understood as no-grant basis." असे जज्मेंटमध्ये म्हटलेले आहे. यासंदर्भात माझा विनापैशाचा प्रश्न आहे. हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे 24 तासाच्या आत कायम विनाअनुदानित शाळांना विनाअनुदानित समजण्यात यावे अशा प्रकारचा शासन निर्णय आपण काढा. अशा प्रकारचा शासन निर्णय काढायला काय हरकत आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : अनुदान कधीही मिळो. "कायम" हा शब्द मंत्रिमंडळाने घातलेला असल्यामुळे मंत्रिमंडळासमोर जावे लागेल.

श्री. पांडुरंग फुंडकर : हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर "कायम" हा शब्द काढण्यासाठी मंत्रिमंडळासमोर जाण्याची काय आवश्यकता आहे ? हा अत्यंत महत्वाचा आणि गंभीर असा प्रश्न आहे. कायम विनाअनुदान तत्वावर चालणा-या शाळांमध्ये काम करणा-या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांची संख्या सव्वा लाखाच्या आसपास आहे आणि त्यांच्यावर 10 लाख लोक अवलंबून आहेत. या 10 लाख लोकांचा प्रश्न रेंगाळत ठेवणे योग्य नाही. त्या लोकांचे अजूनही आमरण उपोषण सुरु आहे. 25 लोक ससून हॉस्पिटलमध्ये दाखल झालेली आहेत. तेव्हा या संदर्भात वित्त विभाग अथवा मंत्रिमंडळासमोर जाण्याची आवश्यकता नाही. राज्यपालांच्या अभिभाषणावर भाषण करताना माननीय वित्तमंत्र्यांनी सांगितले की, आमची तिजोरी भरलेली आहे. तेव्हा याबाबतीत ताबडतोबीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ KGS/ SBT/ प्रथम श्री. शिगम 14:55

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे :सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जो प्रश्न विचारलेला आहे की, आपण जे कोट केलेले आहे ते हायकोर्टाच्या निर्णयात नाही. या ठिकाणी माननीय मंत्र्यांनी सांगितले की, तो सुध्दा निर्णय मंत्रिमंडळात घेऊ. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात म्हटले आहे की, दिनांक 24 नोव्हेंबर 2001 पासून कायम विना अनुदान तत्वाचे धोरण सुरु झाले.परंतु कायम विना अनुदान तत्वावरील शाळा 1997 या वर्षापासून दिल्या आहेत. 1997 ते 2001 या चार वर्षाच्या कालावधीतील शाळा ॲटोमेटीकच विना अनुदानीत होतील काय ? त्या विना अनुदानीत केल्याच पाहिजेत याचे कारण तुमचा निर्णय 24 नोव्हेंबर, 2001 रोजीपासूनचा आहे. या चार वर्षाच्या कालावधीत विना अनुदान तत्वावर शाळा दिल्या त्या आणि हया शाळा विना अनुदान करुन त्या शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्यात येईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय संवेदनशील आहे. विना अनुदान शाळा देण्यासंबंधीचे धोरण ठरले होते त्यावेळी राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. सन्माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे यांनी सांगितले की, 2001 साली धोरण ठरले. परंतु 2001 पूर्वी युतीचे शासन अस्तित्वात होते, त्यांनी काही शाळा विना अनुदान तत्वावर देण्याचा निर्णय घेतला होता. त्याही शाळांचा समावेश यामध्ये आहे. 2001 साली ज्यावेळी विना अनुदान तत्वावर शाळा देण्याचा निर्णय घेतला त्यावेळी संस्था चालकांकडून लिहून घेतले आहे आम्ही विना अनुदान शाळांसाठी अनुदान मागणार नाही. या प्रश्नाच्या बाबतीत जोपर्यंत मार्ग निघणार नाही, तोपर्यंत चांगले शिक्षण विद्यार्थ्यांना मिळणार नाही या गोष्टीची शासनाला पूर्ण कल्पना आहे. रोजी रोटीची भ्रांत शिक्षकांना आहे, ते शिक्षक मुलांना काय शिकवतील ? म्हणून याबाबतीत दोन, तीन टप्पे निर्माण करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, दोन, तीन विषय सांगून मी माझे बोलणे संपविणार आहे. मंत्रिमंडळापुढे जाताना 2000 पर्यंतच्या शाळांना अनुदान द्यावे काय असा एक प्रस्ताव मांडावा असा विचार आम्ही करीत आहोत. 2003-2004, 2004 नंतर 2007 असे करावे काय किंवा शिक्षण सेवकांप्रमाणे शिक्षकांचा पगार तरी देता येईल काय असाही विचार शासनापुढें आहे. ही धोरणात्मक बाब आहे. "कायम" हा शब्द जरी काढावयाचा असला तरी त्यासाठी मंत्रिमंडळासमोर जावे लागेल. कारण या प्रश्नाचा शासनाला सिरियनसेस कळलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझ्या स्पेसिफीक प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी अजून उत्तर दिलेले नाही. सदर प्रश्नाच्या उत्तराचा प्रवाह दुसरीकडे चालला आहे. म्हणून मी जो प्रश्न विचारलेला आहे, त्या प्रश्नाचे प्रथम उत्तर मिळावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : या प्रश्नाशी माझी ॲटॅचमेंट आहे. परंतु आता सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांना प्रश्न विचारण्याची परवानगी दिली आहे. त्यांना त्याचा प्रश्न विचारु द्यावा, त्यानंतर आपल्याला पुन्हा प्रश्न विचारण्याची संधी देण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, हा विषय अनेक वेळा सभागृहात उपस्थित झाला आहे. मागच्या अधिवेशनात या विषयासंबंधीची लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित करण्यात आली होती. त्या सूचनेवरील चर्चेच्या वेळी या विषयाच्या बाबतीत आपल्या दालनात बैठक घेण्याचे निश्चित केले होते. या विषयाच्या संदर्भात आपण आपल्या दालनात दिनांक 21 जून, 2007 रोजी बैठक घेतली. त्या बैठकीस माननीय शिक्षण मंत्री उपस्थित होते, शिक्षण सचिव उपस्थित होते. यासाठी एकूण किती खर्च येऊ शकेल ही माहिती जाणून घेण्यासाठी आपण माननीय वित्तमंत्र्यांना देखील बैठकीसाठी बोलाविले होते. वित्त सचिव देखील या बैठकीस उपस्थित होते. या बैठकीत सविस्तर चर्चा झाली आणि निर्णय झाला. त्या बैठकीत आपण शासनाला निर्देश दिले होते की, यासंदर्भातील कायम विना अनुदानीत शाळा देण्याचा निर्णय 24 नोव्हेंबर, 2001 रोजी घेण्यात आला आहे. तो निर्णय घेण्यापूर्वीचा सर्व शाळा जरी तुम्ही कायम विना अनुदान तत्वावरील दिल्या असल्या तरी त्या सर्व शाळांना अनुदान देण्यात यावे. तसेच नंतरच्या शाळा सुध्दा शासनाला डावलता येणार नाही, त्यांना सुध्दा टप्प्याटप्प्याने अनुदान देण्यात द्यावे लागेल. आपण या अनुषंगाने दिलेल्या निर्देशाचे शासन पालन करणार आहे किंवा नाही ? दुसरे असे की, 7 हजार शाळांना अनुदान द्यावे लागणार आहे असे शासनो म्हटले आहे. यामध्ये इंग्रजी शाळांचा देखील समावेश केलेला असे मला वाटते. जर इंग्रजी शाळांचा समावेश नसेल तरी ती गोष्ट चांगली आहे. महाराष्ट्रातील इंग्रजी माध्यमाच्या शाळांना अनुदान देण्यात येऊ नये अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतलेला आहे. किमान मराठी माध्यमाच्या शाळांची संख्या किती आहे?

यानंतर श्री. कानडे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासनाने 2001 साली धोरण ठरविले त्या आधीच्या शाळा आहेत त्यांचा सुध्दा अनुदानासाठी विचार करावा असा प्रस्ताव आहे. एकंदर शाळांची संख्या विचारात घेतली तर प्रतिवर्षी 362 कोटी रुपयांचा बोजा शासनावर पडणार आहे. राज्यामध्ये अशा प्रकारच्या जवळजवळ 7000 शाळा आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विचारल्याप्रमाणे यातील मराठी भाषिक शाळा किती आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सर्वच शाळा मराठी भाषिक आहेत. इंग्रजी शाळांना शासन अनुदान देतच नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मनापासून मला याचे वाईट वाटते की सभागृहामध्ये आश्वासन दिल्याप्रमाणे कारवाई होत नाही. हायकोर्टाच्या निर्णयानुसार कारवाई करण्यात येईल काय त्यावर मंत्रिमहोदयांनी 'होय' असे उत्तर दिले होते. त्याबाबतची जी काही प्रोसिजर आहे ती शासनाने पूर्ण करावी. परंतु हायकोर्टाने निकालात स्पष्ट म्हटले आहे की, कायम विना अनुदानित हा जो शब्द वापरला आहे तर For all practical Purposes विना अनुदानित असे समजावे. त्यानुसार बिनपैशाचा शासन निर्णय काढण्यासाठी काय अडचण आहे ? हा निर्णय शासन का निर्गमित करीत नाही ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हायकोर्टाच्या आदेशानुसार निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळासमोर जावे लागेल. याबाबतची कार्यवाही शासन लवकरात लवकर करील.

**सभापती** : याविषयाच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचा झालेला निर्णय आणि त्याबाबतचे जजमेंट सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी याठिकाणी वाचून दाखविले. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च यांच्या डायरेक्टीव्ह असतात किंवा जी जजमेंट असताता अथवा जजमेंटचा जो पार्ट असतो त्या बरहुकुम राज्य शासन कार्यवाही करीत असते. सर्वोच्च न्यायालयामध्ये आपण गेलो आहोत. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेब आणि या प्रश्नाशी निगडीत असलेल्या अन्य सन्माननीय सदस्यांची अशी इच्छा आहे की, कायम विना अनुदानित या शब्दामधील 'कायम' हा शब्द काढून टाकण्यात यावा. त्यामुळे मानसिक समाधान मिळेल आणि पुढील कार्यवाहीच्या दृष्टीने शासनाचे पाऊल पडेल.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात उच्च न्यायालयाने जरी निर्णय दिला असला तरी या राज्याचे याविषयासंदर्भातील जे धोरण आहे त्या धोरणाप्रमाणे कायम विनाअनुदानित, विना अनुदानित आणि अनुदानित अशा प्रकारच्या तीन कॅटॅगरीज् केलेल्या आहेत. कायम विनाअनुदानित तत्वावरील 7000 शाळा अनुदानित तत्वावर आल्यावर 4,5,6 वर्षांनी त्यांना अनुदान द्यावे लागेल. हा खर्चाचा नवीन बोजा राज्य सरकारवर पडणार असल्यामुळे त्यासाठी मंत्रिमंडळापुढे जावे लागेल. मंत्रिमंडळाचा यासंदर्भातील निर्णय झाल्याशिवाय मंत्रिमहोदयांना याचे उत्तर देता येणार नाही. न्यायालयाचा निर्णय जरी असला तरी तो निर्णय अंमलात आणताना यासंदर्भात कोणती भूमिका घ्यावी याबाबतीत मंत्रिमंडळाचा निर्णय घ्यावा लागेल. शासन अपिलात जाऊ शकते. न्यायालयाने जरी निर्णय दिला असला तरी निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रोसिजर फॉलो करावी लागणार आहे. सभागृहात चर्चा झाली म्हणून मंत्रिमंडळाने घेतलेला धोरणात्मक निर्णय बदलावयाचा असेल तर पुन्हा मंत्रिमंडळापुढे जावे लागेल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, शासनाला सुप्रीम कोर्टात जाण्याचा अधिकार आहे तो आम्ही नाकारीत नाही. माननीय उच्चशिक्षण मंत्र्यांनी 5 वर्षे खर्च करुन न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही म्हणून खात्याच्या उपसचिवांना दंड केला. त्याची तुम्ही अंमलबजावणी केली. आणि आता शालेय शिक्षण विभागाला न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करु नका हे सांगता हे बरोबर नाही. दोन गोष्टी वेगवेगळया आहेत. हायकोर्टाच्या निर्णयावर शासन अपिलात गेले. प्रोसिजर पाळण्यासाठी आमचा विरोध नाही. मागील वेळी शासनाने सांगितले होते की यासंदर्भातील कारवाई तीन महिन्यात पूर्ण केली जाईल. प्रोसिजर पूर्ण करण्यासाठी किती दिवस लागणार आहेत ? दोन वर्षापूर्वी हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. अजून अंमलबजावणी झाली नाही. हायकोर्टाने दोन गोष्टी वेगवेगळया केलेल्या आहेत. आर्थिक बाब हायकोर्टाने वेगळी केली आहे. शासनाने सर्वच शाळांना वेळेवर अनुदान उपलब्ध करुन दिले असेही नाही. कायम विना अनुदानित या शब्दातील कायम हा शब्द काढून टाकावा. सन्माननीय सभापती म्हणाले त्याप्रमाणे मानसिक समाधान तरी मिळेल.

नंतर श्री. भोगले

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख........

यासंबंधी अडचण काय आहे? शासनाने प्रोसिजर पूर्ण करावी. परंतु हायकोर्टाच्या निर्णयाची शासन अंमलबजावणी करेल असे सांगावे. प्रोसिजरसाठी जो वेळ लागेल तो घ्यावा.

श्री.हसन मुश्रीफ : मी यापूर्वी लवकरात लवकर म्हटले आहे. तीन महिन्याच्या आत 'कायम' हा शब्द वगळण्यासाठी मंत्रिमंडळापुढे ही बाब नेण्यात येईल.

**सभापती** : एका महिन्याच्या आत मंत्रिमंडळापुढे हा प्रश्न मांडण्यात यावा आणि मंत्रिमंडळाला उच्च न्यायालयाचा निकाल दाखवून 'कायम' हा शब्द कसा दूर होईल याची व्यवस्था करावी.

श्री.हसन मुश्रीफ : होय.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, उच्च शिक्षणमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. उच्च शिक्षण विभागाने दोन महिन्यापूर्वी निर्णय घेतला की,प्रत्येक तालुक्यात ज्या शाखेचे महाविद्यालय नाही त्या शाखेचे महाविद्यालय अनुदानित स्वरुपात स्थापन केले जाईल. शालेय शिक्षण विभागाची याबाबत अनास्था का आहे?

श्री.दिलीप वळसे पाटील : या संदर्भातील निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्यात किमान आर्टस्, सायन्स किंवा कॉमर्सची शाखा असावी अशा प्रकारची भूमिका त्यामागे आहे. त्या ठिकाणी 2001 सालापासून कधीही अनुदान मिळणार नाही या अटीवरच गेल्या चार-पाच वर्षात नवीन महाविद्यालयांना परवानगी देण्यात आली. या संदर्भातील कोणताही निर्णय मंत्रिमंडळालाच घ्यावा लागेल. एकट्या मंत्रीमहोदयांना निर्णय घेता येणार नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांना आपण सूचना केल्यानंतर मंत्रीमहोदयांनी एक महिन्यात मंत्रिमंडळापुढे ही बाब नेण्याचे आश्वासन दिले आहे. आज उपोषणकर्त्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. एक महिन्यात मंत्रिमंडळापुढे ही बाब सादर करण्यात येईल हे शासनातर्फे संबंधित उपोषणकर्त्यांना सांगावे. उपोषणकर्त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांची गाडी अडविली, 300 लोकांना पोलिसांनी अटक केली. देशाच्या घटनेने सोपविलेले काम शासन करायला तयार नाही. म्हणून माननीय सभापतींनी दिलेल्या आदेशानुसार हे आश्वासन दिले आहे त्याची कल्पना उपोषणकर्त्यांना देऊन त्यांना उपोषण थांबविण्याची विनंती केली जाईल काय?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : उपोषणकर्त्यांना कळवू. परंतु अद्याप निर्णय झालेला नाही. एका महिन्याच्या आत मंत्रिमंडळापुढे जाण्याबाबत निदेश दिले आहेत, त्याप्रमाणे मंत्रिमंडळापुढे जाणार आहोत. त्यानुसार उपोषणकर्त्यांनी उपोषण सोडावे अशी विनंती करण्यात येईल.

**सभापती** : या निवेदनावरील चर्चा संपली आहे.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ SBT/ 15:05

**पृ.शी.**: मुंबई न्यायालय फी (सुधारणा) विधेयक.

**मु.शी.**: L.C.BILL No.IX OF 2008

**(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY-COURT FEES ACT, 1959)**

श्री.हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2008 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक-9 मुंबई न्यायालय-फी अधिनियम, 1959 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक-9 मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आजविशेष उल्लेखाच्या सूचना मी विचारात घेऊ शकणार नाही. नियम 260 अन्वये सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे तो चर्चेला घेण्यापूर्वी मी 25 मिनिटांकरता सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे. दुपारी 3.35 वाजता नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा सुरु होईल. या चर्चेसाठी अडीच तासाचा कालावधी निश्चित केलेला आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी याची नोंद घ्यावी.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .......

आजच्या कामकाज पत्रिकेवर शासकीय विधेयके दाखविलेली आहेत. त्या अनुषंगाने मला शासनाकडून विनंती करण्यात आलेली आहे की, नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आहे त्यावरील अडीच तासाची चर्चा संपल्यानंतर विधानसभा विधेयक क्र. 2 हे विचारार्थ घेण्यात यावे. या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे "ऑन लेग" आहेत. ही बाब मी सभागृहासमोर मान्यतेसाठी ठेवत आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.35 वाजता पुनः भरेल.

( दुपारी 3.10 ते 3.35 मध्यंतर )

--------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती उषा दराडे )**

**तालिका सभापती** : नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाच्या अगोदर माननीय मंत्रीमहोदयांनी सन 2008 चे वि.प.वि. क्रमांक 8 मांडण्याची परवानगी मागितलेली असल्यामुळे सदर विधेयक आता मांडण्यात येईल.

**पृ. शी.** : मालकी हक्काच्या सदनिाकंबात (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. VIII OF 2008

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA OWNERSHIP FLATS (REGULATION OF THE PROMOTION OF CONSTRUCTION, SALE, MANAGEMENT AND TRANSFER) ACT, 1963.)

श्री. हर्षवर्धन पाटील ( ससदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 8- महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत ( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत ) अधिनियम, 1963 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक- 8 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात विजेच्या भारनियमनामुळे निर्माण झालेली परिस्थिती

**मु.शी.**: राज्यात विजेच्या भारनियमनामुळे निर्माण झालेली परिस्थिती या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, श्री. मधुकर चव्हाण, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री अरविंद सावंत, श्रीकांत जोशी, अनिल परब, परशुराम उपरकर, संजय केळकर, केशवराव मानकर, सय्यद पाशा पटेल, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"राज्यात सध्या निर्माण झालेला विजेचा प्रचंड तुटवडा, आघाडी शासनाने सत्तेवर येण्यापूर्वी मोफत विजेचे आश्वासन देणे आणि सत्तेवर आल्यानंतर आश्वासन पूर्ण करण्याऐवजी उलट भारनियमन व वीज दरात वाढ करणे, आजच्या घडीला राज्याच्या ग्रामिण भागात 14 ते 15 तासांचे तर शहरी भागात 7 ते 8 तासांचे भारनियमन सुरु असणे, नवीन वीज निर्मितीसाठी योग्य दिशेने प्रयत्न न झाल्यामुळे व वीज निर्मितीबाबत करारांची अंमलबजावणी न झाल्यामुळे मागणीच्या प्रमाणात वीज उपलब्ध न होणे व त्यामुळे प्रचंड प्रमाणात भारनियमन करावे लागणे, ज्या ठिकाणी शेतातील विहीरीत पाणी उपलब्ध आहे तेथेदेखील भारनियमनामुळे कृषी पंप बंद असल्याने शेतातील पीक जळून जाणे व शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, तीव्र उन्हाळ्यात पिण्यासाठीही पाणी न मिळणे, कृषी पंपाना वीज जोडणीचे लाखो अर्ज प्रलंबित असता सक्तीच्या वीज बिल वसुलीसाठी वीज ग्राहकांची वीज तोडण्यात येणे, जळालेले ट्रान्सफॉर्मर दुरुस्त करण्यासाठी वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून मोठया प्रमाणात लाच मागण्याच्या वाढत्या प्रकारामुळे सर्वसामान्य जनतेत निर्माण झालेली चीड, विजेअभावी हवालदिल झालेला शेतकरी वर्ग, भारनियमनामुळे उद्योगधंद्यावरही अतिशय विपरित परिणाम होऊन ते बंद पडल्यामुळे निर्माण झालेली बेकारीची समस्या, यामुळे राज्यातील आम जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ..

सभापती महोदया, या प्रस्तावावर बोलण्यास सुरुवात करण्यापूर्वी मला माननीय ऊर्जा मंत्र्यांचे अभिनंदन करावयाचे आहे. गेल्या चार वर्षापासून प्रत्येक अधिवेशनामध्ये विजेच्या प्रश्नांसबंधी बोलण्याची संधी ते आम्हाला उपलबध करुन देतात म्हणून मी त्यांचे प्रथम अभिनंदन करीत आहे.

सभापती महोदया, आघाडी सरकार राज्यामध्ये सत्तेवर येण्यापूर्वी त्यांनी राज्यातील जनतेला अनेक आश्वासने दिली होती. त्यापैकी त्यांनी एक आश्वासन असे दिले होते की, शेतकऱ्यांना मोफत वीज पुरविण्यात येईल. हे आश्वासन देत असतांना आघाडीच्या शासनाने एक चलाखी केली होती. या शेतकऱ्यांना विजेचे "झिरो बिल" देण्यात आले होते आणि शेतक-यांच्या मताचा गठ्ठा मिळवून हे सरकार सत्तेवर आरुढ झाले होते. हातामध्ये सत्ता आल्यानंतर या शासनाने दोन महिन्यात शेतक-यांना विजेची बिले देण्यास सुरुवात केली होती .त्यावेळी शेतकऱ्यांचे डोळे पांढरे होण्याची वेळ आली होती . आघाडीचे सरकार गेल्या आठ वर्षापासून राज्यामध्ये सत्तेवर आहे. या आठ वर्षाच्या कालावधीमध्ये दरवर्षी विजेचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. विजेचा प्रश्न दिवसेंदिवस कमी होण्याऐवजी उलट तो वाढत चालला आहे. त्यामुळे भारनियमन करावे लागत आहे. भारनियमनातून काही तास सूट मिळावी अशी राज्यातील जनतेची मागणी आहे. विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी वीज मिळावी म्हणून काही तास तरी भार नियमनातून सूट दिली जावी अशा प्रकारची मागणी संपूर्ण राज्यातील जनतेकडून केली जात आहे. भारनियमनाच्या संकटाचा त्रास राज्यातील विद्यार्थ्यांना सहन करावा लागत आहे. इतकेच नव्हे तर राज्यातील उद्योगधंद्याना वीज मिळत नसल्यामुळे ते बंद पडू लागले आहेत. पूर्वी एम.आय.डी.सी. एरियातील उद्योगांना भार नियमन लागू करण्यात आलेले नव्हते परंतु आता त्यांनासुध्दा भारनियमन लागू करण्यात आलेले आहे.

सभापती महोदया, निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी उद्ध्वस्त झालेला आहे त्याच वेळी मानवी संकटामुळे शेती व्यवसाय पूर्णपणे रसातळाला गेलेला आहे. शेती उत्पन्नाचा वेग शुन्यापर्यत येण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. युतीचे शासन सत्तेवरुन गेल्यानंतर भारनियमनामध्ये दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. सुरुवातीच्या काळात दोन तास भारनियमन केले जावयाचे त्यानंतर तीन तास केले जावयाचे, त्यानंतर चार तास केले जावयाचे आणि आता तर 15 ते 16



श्री.पांडुरंग फुंडकर ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तास भारनियमन केले जात आहे. माननीय उर्जा मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, मी ग्रामीण भागातून आलेलो आहे आमच्या ग्रामीण भागातीत लोकांना 17 ते 18 तास भार नियमनाचा त्रास सहन करावा लागत आहे. माननीय मंत्री महोदयांनी काही उपाययोजना केली नाही तर आघाडी सरकारचा कालावधी संपेल तेव्हा 24 तास भारनियमनाचा त्रास राज्यातील लोकाना सहन करावा लागेल की काय अशा प्रकारची भीती वाटू लागली आहे. गेल्या सात आठ वर्षात राज्यात भारनियमनाचा कालावधी वाढत चालला आहे. भार नियमनाच्या संदर्भात राज्याने जी प्रगती केलेली आहे ती लक्षात घेता मी आता व्यक्त केलेली भीती साकार होईल असे वाटते.

सभापती महोदया, 2001 साली राज्यात 10 हजार मेगॅवॅट विजेची मागणी होती आणि 9 हजार मेगावॅट वीज. उपलब्ध होती म्हणजे एक हजार मेगावॅट.विजेचा तुटवडा होता. त्यानंतर 2002 साली 10 हजार 815 मेगॅवॅट विजेची मागणी होती आणि 8 हजार 787 मेगॅवॅट वीज उपलब्ध होती, म्हणजे 2 हजार 28 मेगॅवॅट विजेचा तुटवडा होता .2003 साली 10 हजार 694 मेगॅवॅट विजेची मागणी होती आणि 9 हजार 610 मेगॅवॅट वीज उपलब्ध होती म्हणजे 1 हजार 384 मेगॅवॅट विजेचा तुटवडा होता .

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MMP/SBT. श्री. गायकवाड नंतर --- 15.50

श्री. फुंडकर ...

2003 मध्ये 10994 मे.वॅ.विजेची मागणी होती तेव्हा केवळ 9610 मे.वॅ.वीज आपण उपलब्ध करून देऊ शकलात आणि त्याही वेळेस 1384 मे.वॅ. विजेचा तुटवडा होता. त्यानंतर 2004 मध्ये 12103 मे.वॅ.ची मागणी असताना केवळ 9904 मे.वॅ. विजेची उपलब्धता आपण करून दिली त्यामुळे त्या वर्षी 2199 मे.वॅ. विजेची तूट भासली. 2005 मध्ये 12326 ची मागणी असताना केवळ 9572 मे.वॅ. विजेची उपलब्धता आपण करून दिली त्यामुळे त्या वर्षी 2754 मे.वॅ. विजेचा तुटवडा भासला. 2006 मध्ये 13000 मे.वॅ.पर्यंत विजेची मागणी वाढली आणि केवळ 9600 मे.वॅ. वीज आपण जनतेला देऊ शकलो, त्यामुळे त्याही वर्षी 3414 मे.वॅ. विजेचा तुटवडा भासला आणि आता 2007 मध्ये जवळपास 5000 मे.वॅ. विजेपर्यंत तुटवडा गेलेला आहे. सभापती महोदय, या वर्षी 2008 मध्ये विजेची मागणी 16 ते 17 हजार मे.वॅ. असताना साडेचार ते पाच हजार मे.वॅ. विजेची तूट आहे. सभापती महोदय, "लोकराज्य" मध्ये आपल्या मंत्री महोदयांनी याची कबुली दिली आहे. "लोकराज्य"ला मंत्री महोदयांनी जी मुलाखत दिली त्या मुलाखतीतील एक वाक्य मी या प्रसंगी आपल्याला वाचून दाखवितो. त्यात आपण म्हटले आहे की, "...अंदाजानुसार 2011-12 मध्ये विजेची मागणी ही 20000 मे.वॅ.च्या घरामध्ये जाईल. आता विजेच्या उपलब्धतेचा विचार करता सन 2001-02 मध्ये साधारणत: 9000 मे.वॅ.ची उपलब्धता होती आणि 2006-07 मध्ये या उपलब्धतेमध्ये फारसा फरक पडलेला नाही." म्हणजे मंत्री महोदयांनी कबूल केले आहे की, यात काहीही फरक पडलेला नाही. 2001 पासून ते 2007 पर्यंत कोठलाही फरक विजेच्या लोड शेडींगमध्ये आपण करू शकलो नाही हे मंत्र्यांनी मान्य केले आहे, त्याबद्दल देखील मी आपल्याला धन्यवाद देणार आहे. कारण आपण हे कबूल केले आहे, नाकारले नाही. सभापती महोदय, आजची राज्याची विजेची उपलब्धता लक्षात घेतली तर विजेचे स्रोत, महानिर्मिती कंपनी, औष्णिक केंद्राद्वारे मागणी 6425 मे.वॅ. असताना उपलब्धता फक्त 5140 मे.वॅ. इतकीच आहे. जलविद्युत द्वारे 2434 मे.वॅ. विजेची मागणी असताना उपलब्धता केवळ 1600 मे.वॅ. आहे. वायू-वीज निर्मितीमध्ये मागणी 912 मे.वॅ. असताना उपलब्धता केवळ 440 मे.वॅ. इतकीच आहे. अशा प्रकारे एकूण 9771 मे.वॅ.ची मागणी असताना केवळ 7180 मे.वॅ. वीज आपण उपलब्ध करू शकलो आहोत. केंद्रीय प्रकल्पातील राज्याचा वाटा 2925 चा असताना केवळ 2340 मे.वॅ. वीज आपल्याला मिळाली आहे. व्यापारी तत्त्वावर खरेदीद्वारा रत्नागिरी गॅस कंपनीकडून 720 मे.वॅ. विजेची आपल्याला अपेक्षा होती, पण

..... 3जे 2 ...

श्री. फुंडकर ....

650 मे.वॅ. वीजच आपल्याला मिळालेली आहे. महावितरण कंपनीकडे एकूण विजेची उपलब्धता ही 14416 मे.वॅ.ची होती, पण प्रत्यक्षात केवळ 10370 मे.वॅ. वीज आपल्याला उपलब्ध होऊ शकली. म्हणजेच ही तूट वाढत गेली आहे. सभापती महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी अनेकदा आपल्या भाषणातून तसेच बाहेरही भाषणांतून सांगितलेले आम्ही ऐकतो आहोत की, पारस टप्पा क्र.2 आणि परळी टप्पा क्र.2 या केंद्रातून 250 मे.वॅ. वीज निर्मिती प्रकल्पाचे काम झालेले नाही. म्हणजे आता तेथे काम चालू आहे. 250 मे.वॅ. वीज पारस केंद्रातून मिळणार आहे आणि 250 मे.वॅ. वीज परळी केंद्रातून मिळणार आहे. खापरखेड्याच्या 500 मे.वॅ. प्रकल्पासाठी कंत्राट आपण दिले असल्याचेही आपण येथे सांगितले आहे. हे कंत्राट कोणाला दिले आणि कधी काम सुरू झाले ते मात्र सांगितलेले नाही. सभापती महोदय, भुसावळच्या 500 मे.वॅ. वीज निर्मिती प्रकल्पाबाबत अजूनपर्यंत काहीच हालचाल दिसत नाही. चंद्रपूरचे 500 मे.वॅ.चे दोन आणि कोराडीचा 800 मे.वॅ.च्या प्रकल्पाबाबतही काहीच निर्णय अजून पर्यंत झालेला नाही. सभापती महोदय, वीज निर्मितीबाबत शासनाचे हे जे धरसोडीचे धोरण आहे त्यामुळे आणि एकूणच असलेल्या उदासिनतेमुळे राज्यात ही वीज टंचाईची समस्या निर्माण झाली आहे. देशामध्ये 8 राज्यांमध्ये महावीज प्रकल्प उभा करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम केंद्र सरकारने हाती घेतला आणि 4000 मे.वॅ. क्षमतेच्या या प्रकल्पासाठी जवळपास 17 हजार कोटी रूपयांची गुंतवणूक केली जाणार असून तेवढीच त्यातून रोजगार निर्मिती होणार आहे असेही सांगितले गेले. ...

( यानंतर श्री. सरफरे .... 3के 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

देशातील आठ पैकी चार प्रकल्प मार्गी लागले. त्यामध्ये आंध्र प्रदेश, गुजरात, छत्तीस गढ, मध्यप्रदेश ही चार राज्ये समाविष्ट आहेत. परंतु खेदाने नमूद करतो की, महाराष्ट्र सरकारकडून या बाबतीत अत्यंत उदासिनता दाखविली गेली. या प्रकल्पासाठी पर्यायी जागा देण्यासाठी पत्र व्यवहार करुन सुध्दा आपल्या राज्याने पुढाकार घेतला नाही. म्हणून तेथील ऊर्जामंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली असे मी स्पष्ट करतो. सभापती महोदय, इतर राज्यातील अपारंपारिक ऊर्जा वीज निर्मिती मंडळ महत्वाचे काम करीत आहेत. पवन आणि सौर अशा दोन अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतामध्ये गत वर्षी 350 ते 400 मेगावॅट इतकी वीज निर्मिती करण्यात आली. सातारा, पुणे, नाशिक, कोल्हापूर या भागामध्ये पवन ऊर्जा निर्मिती प्रकल्प कार्यान्वित आहेत. केरळ आणि तामिळनाडू या राज्यातील पवन ऊर्जा निर्मिती करणाऱ्या संस्थांना तेथील राज्य सरकारकडून संरक्षण मिळत असल्यामुळे त्या राज्यामध्ये अपारंपारिक वीज निर्मिती करण्यासाठी त्यांना मोठी संधी उपलब्ध असल्याचे दिसून येते. परंतु आपल्या राज्यकर्त्यांचे याकडे लक्ष गेले नाही. आर्थिक विकासामध्ये वीजेची उपलब्धता हा कळीचा मुद्दा असून त्याकडे आपले दुर्लक्ष झाले आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देतांना आबासाहेबांनी मोठया ताठ मानेने आणि अभिमानाने सांगितले. त्यांचे महत्वाचे वाक्य मी लक्षात ठेवले आहे. तेम्हणाले की, "एकेकाळी चार राज्यांना वीज पुरवठा करणारे आपले महाराष्ट्र राज्य आज आठ राज्यांकडून वीज घेत आहे." ही फार मोठी अभिमानाची गोष्ट आहे का ?. यापूर्वी आपण चार राज्यांना वीज देत होतो असे माननीय उपमुख्यमंत्री अभिमानाने सांगत होते. आज आठ राज्यांकडून आघाडीचे सरकार वीज घेत आहे. ही आघाडी सरकारच्या माननीय ऊर्जा मंत्र्यांची केलेली तारीफ आहे काय? खऱ्या अर्थाने या राज्याची प्रगती दर्शविणारी बाब आहे काय? माननीय मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील साहेब आपणास मारलेला हा शेरा आहे, त्यांनी आपणास शाबासकी दिली आहे. विद्युत निर्मिती कायदा 2003 अन्वये देशाच्या वीज निर्मिती विभागामध्ये परिवर्तन झाले. या कायद्यान्वये राज्याच्या तत्कालीन महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे विभाजन होऊन तीन वेगवेगळया कंपन्यांची निर्मिती झाली. त्या अन्वये महानिर्मिती, महावितरण आणि महापारेषण नावाच्या तीन वेगवेगळया कंपन्या निर्माण करण्यात आल्या. या तीन कंपन्या अस्तित्वात आल्यानंतर वीज निर्मितीमध्ये काही तरी प्रगती होईल, अधिक वीज निर्मिती होईल, भार नियमन कमी होईल, वीजेची क्षमता वाढेल, वीजेची गळती थांबेल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री.पांडुरंग फुंडकर...

अशी अपेक्षा होती, परंतु या उलट झाले आहे. मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे सन 2007 पर्यंत वीज निर्मितीमध्ये प्रगती झालेली नाही, विजेच्या वितरणामध्ये प्रगती झालेली नाही आणि आणि पारेषण प्रणालीमध्ये सुध्दा प्रगती झालेली नाही. अशाप्रकारे या तीन कंपन्या विजेच्या बाबतीत काहीही प्रगती करु शकल्या नाहीत.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने ग्राहकांसाठी पारेषण प्रणालीची उपलब्धता 98 टक्के गाठण्याचे उद्दिष्ट दिले होते. परंतु महापारेषणासाठी हे उद्दिष्ट गाठणे अशक्य झाले. मराठवाडयातील लातूर, बीड, उस्मानाबाद या सर्वच जिल्हयातील वितरणाच्या हानीचे प्रमाण 50 टक्के असून वीज चोरीचे प्रमाण अधिक आहे. सन 2006-07 मध्ये माननीय मुख्यमंत्र्यांच्या लातूर जिल्हयात वितरण हानीचे प्रमाण, विजेच्या चोरीचे प्रमाण 53.14 टक्के आहे, बीड जिल्हयात 58.19 टक्के आहे.एवढे वीज चोरीचे प्रमाण असून या कंपन्या अस्तित्वात आल्यानंतर वीज चोरीचे प्रमाण कमी झाले नाही तर ते वाढत गेले आहे. अशाप्रकारे या तीन कंपन्यांची वीज निर्मिती क्षेत्रातील अधोगती डोळयामध्ये भरण्यासारखी आहे. या कंपन्या अस्तित्वात येण्यापूर्वी वीज ग्राहकांना भरमसाठ वीज देयके येणे, विजेचे मीटर नादुरुस्त असणे अशा असंख्य तक्रारींचा सामना करावा लागत होता, वीज ग्राहकांना एवढा त्रास होत होता.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

विजेचे बिल स्वतंत्र येत होते. बिलाची आकारणीही बरोबर होत नव्हती. जे मीटर रिडींग घेतात, ते प्रत्यक्ष त्या-त्या ठिकाणी न जाता ऑफीसमध्ये बसूनच रिडींग घेऊन बिलाची आकारणी करीत होते. ज्यावेळी या तीन कंपन्या अस्तित्वात आल्या, तेव्हा यामध्ये काही सुधारणा होईल, समस्या सुटतील, खरे म्हणजे काही समस्याच राहणार नाहीत अशी अपेक्षा होती. पण महावितरण कंपनीचे वेगळे अस्तित्व निर्माण झाल्यानंतर पूर्वीच्या परिस्थितीमध्ये फरक पडण्याऐवजी वीज ग्राहकांना संकटांचा सामना करावा लागत आहे. पण महावितरण कंपनी ग्राहकांच्या तक्रारींची दखल देखील घेत नाही. त्यामुळे ग्राहकांना ग्राहक मंचाकडे जावे लागते आणि ही स्थिती चांगली नाही. आज अशी स्थिती आहे की, ग्राहकांना वीज कंपनीकडून न्याय मिळत नाही म्हणून ग्राहकांना ग्राहक मंचाकडे जावे लागत आहे. ग्राहकांना कशा प्रकारे विजेची बिले येत आहेत, याबाबतीत मी ठाणे येथील एक उदाहरण देऊ इच्छितो. त्याठिकाणी वीर सावरकर नगर येथे राहणारे श्री. जानू आमटे यांचे हे मजेशीर उदाहरण आहे. श्री.आमटे यांना 2004 पर्यंत 200 ते 500 रुपयांच्या दरम्यान बिल येत होते, त्यापेक्षा कधी जास्त बिल आले नाही. पुढे महावितरण कंपनीचे प्रभावीपणे, अफलातून अशा प्रकारचे काम सुरु झाल्यानंतर डिसेंबर 2004 मध्ये त्यांना अचानकपणे 25 हजार रुपयांचे बिल देण्यात आले, म्हणजे 500 रुपयावरुन एकदम 25 हजार रुपयांचे बिल दिले. पण एवढयावरच त्या कंपनीचे समाधान झाले नाही. तर त्यानंतर 56 हजार रुपयांचे, नंतर 75 हजार रुपयांचे अशी एकापाठोपाठ एक लॉटरी लागावी, त्याप्रमाणे बिले पाठवून श्री.आमटे यांना विजेचा शॉक देण्यात आला. अशा परिस्थितीत श्री.आमटे काय करणार ? 75 हजार रुपयांचे बिल पाठविल्यानंतर, ते बिल भरले नाही म्हणून दि.31 जानेवारी 2005 रोजी श्री.आमटे यांच्या घरची वीज महावितरण कंपनीने तोडली. मग ते काय करणार ? ते ग्राहक मंचाकडे तक्रार घेऊन गेले. मग ग्राहक मंचाने केवळ आदेशच दिला नाही तर महावितरण कंपनीला पाच हजार रुपयांचा दंड ठोठावला. एका ग्राहकाला अवाच्यासवा बिल लावण्यात आले म्हणून महावितरण कंपनीला पाच हजार रुपयांचा दंड लावला ही खरे म्हणजे शरमेची बाब आहे. श्री.आमटे यांचे केवळ हे एकच उदाहरण नाही तर अशी असंख्य उदाहरणे आहेत आणि त्यांची कोणी दाद घेत नाही. ग्रामीण भागामध्ये देखील असे घडते. मात्र तेथील गरीब माणूस ग्राहक मंचाकडे जाऊ शकत नाही. ग्रामीण भागामध्ये सुध्दा अवाच्यासवा बिले दिली जातात. माझ्याकडे अशी तक्रार आली आहे की,एका शेतकऱ्याला दोन

. . .3 एल-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

हजार रुपयांचे बिल देण्यात आले आणि ते बिल भरले नाही म्हणून महावितरण कंपनीने त्या शेतकऱ्यांला दोन हजाराच्या बिलावर पाच हजार रुपयांचा दंड ठोठावला. तसेच त्या शेतकऱ्याने विजेचे बिल आणि त्यावरील दंड भरला नाही तर त्या शेतकऱ्याची पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करुन, त्याला जेलमध्ये टाकण्याची देखील भाषा करण्यात आली. अशा प्रकारे ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांबरोबर महावितरण कंपनीचे लोक पोलीस स्टेशन मध्ये तक्रार करण्याची भाषा बोलतात आणि त्याप्रमाणे तेथील शेतकऱ्यांच्या विरोधात पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करतात. तेव्हा अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना जमानत घेऊन जेलमधून बाहेर यावे लागते.

सभापती महोदय, मी अकोला जिल्हयातून आलो आहे. त्याठिकाणी बोर्डी येथे अत्यंत दुर्दैवी घटना घडलेली आहे. तेथील श्रीमती लिलाबाई मानकर यांनी विहिरीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्यावर पंप बसविण्यासाठी 1986 मध्ये युनायटेड वेस्टर्न बॅंकेकडून कर्ज घेतले. परंतु पंप बसविल्यानंतर पाऊसच पडला नाही, त्यामुळे पंप सुरुच केला नाही. पण तरी देखील त्यांना 37 हजार रुपयांचे बिल देण्यात आले आहे. नंतर जेव्हा पाऊस पडला तेव्हा पंप सुरु झाला नाही. पंप बंद असताना एवढे बिल देण्यात आले आणि त्यांनी ते बिल भरले नाही म्हणून त्यांचे विजेचे कनेक्शन देखील तोडण्यात आले आणि दंड लावण्यात आला. अशा परिस्थिती श्रीमती लिलाबाई मानकर यांच्या मुलाने आत्महत्या केली. त्यानंतर या महिलेने मला पुढीलप्रमाणे पत्र लिहिलेले आहे. "माननीय श्री.पांडुरंग फुंडकर, विरोधी पक्षनेता, विधान परिषद, मुंबई. मी श्रीमती लिलाबाई मानकर, वय 62, आपणास कळवू इच्छिते की मला माझ्या मुलाच्या आत्महत्या प्रकरणी अजूनपर्यंत शासनाकडून मदत मिळालेली नाही."

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर..

37 हजार रुपयांचे बिल त्या महिलेने भरले नाही. त्यामुळे महापारेषण कंपनीने ही तक्रार पोलीस स्टेशनमध्ये दाखल केली. तिच्या शेतातील विहिरीत पाणी नव्हते. पाण्याचा उपसा न होऊ शकल्यामुळे, शेतातील पिकाला पाणी पुरविले गेले नाही. पाण्याअभावी उभी पिके जळून गेली. या महिलेच्या मुलाने आत्महत्या केली. परंतु तरी देखील या महिलेला शासनाने कोणतीही मदत दिली नाही. अशी अवस्था या ठिकाणी निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, महापारेषण, महावितरण व महानिर्मिती या तीन कंपन्यांची निर्मिती झाल्यानंतर पूर्वीच्या परिस्थितीमध्ये सुधारणा होईल तसेच त्यातील कारभार हा सुटसुटीत होईल, व लोकांवर होणारा अन्याय कमी होईल अशी आमची अपेक्षा होती. परंतु तसे काहीही झाले नाही. मोफत वीज देण्यात येईल अशी घोषणा शासनाने सुरुवातीला केली होती. परंतु शेतकऱ्यांचा एक प्रतिनिधी म्हणून मी आपणास सांगू इच्छितो की, शेतकऱ्याला मोफत वीज नको आहे. परंतु त्यांना माफक दरामध्ये पुरेशी वीज हवी आहे. परंतु त्यांना पुरेशी वीज देण्याची धमक शासनाकडे नाही. म्हणूनच राज्यामध्ये आज 5 हजार मॅगावॅटचा तुटवडा निर्माण झालेला आहे. आता विजेचे दर आणखी वाढविले जाणार आहे. बाहेरील राज्यातून 7 रु प्रति युनिट या दराने वीज खरेदी करावी लागणार आहे असे सांगितले जाते. त्यामुळे आता वीजेच्या दरामध्ये वाढ होणार आहे. याचा सर्व भार सर्वसामान्य नागरिकांवर टाकण्यात येणार आहे.

सभापती महोदय, मुंबई उपनगर येथे सध्या रिलायन्स कंपनी वीजपुरवठा करीत आहे. या कंपनीचे दर भरमसाठ आहेत. आता हा दर प्रति युनिट 62 पैशांनी आणखी वाढणार आहे. म्हणजेच शासन मोफत वीज तर देऊ शकत नाही परंतु महागडया दराने दिवासतील केवळ 15 ते 20 तास वीजपुरवठा करीत आहे. अशा प्रकारे उर्जा खात्याची अतिशय दयनीय अशी अवस्था आज झालेली आहे.

सभापती महोदय, माननीय उर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील प्रत्येवेळी वीज दर वेळापत्रक जाहीर करतात. अशा पद्धतीने वीज पुरवठा करण्यात येणार आहे असे सांगितले जाते. त्यांच्या हेतूबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नाही. खरे तर त्यांच्या व्यक्तिमत्वाबद्दल आम्हाला नेहमीच आदर वाटत असतो. वीज पुरवठा सुरळित व्हावा या संदर्भात ते प्रयत्न करीत आहेत हे

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर..

मला माहीत आहे. सन 2011-2012 मध्ये कशी परिस्थिती असणार आहे याचे चित्र ते नेहमी रंगवित असतात. कधी कधी तर मला असे वाटते की हे सर्व "मुंगेरीलाल के हसीन सप्ने" प्रमाणे कागदावरच राहणार आहेत की काय ?. सन 2011-12 पर्यंत वीज पुरवठा कसा केला जाणार आहे या संदर्भात त्यांनी एक चार्ट दिलेला आहे. मागे लोकराज्य या मासिकात त्यांची मुलाखत छापून आली होती. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, सन 2011- 12 मध्ये 5956 मेगावॅट वीजेची उत्पादन वाढणार आहे. हे नियोजन केवळ कागदावर नसून या करिता प्रत्यक्षात प्रकल्पाचे काम सुरु झालेले आहे. सन 2011-12 मध्ये 20 हजार मेगावॅटची निर्मिती होणार आहे. त्यांचे हे भाषण गेल्या चार वर्षापासून मी सभागृहामध्ये ऐकतो आहे. तेच तेच मुद्दे माननीय मंत्री महोदय त्यांच्या भाषणात मांडत असतात. मी आता लायब्ररीत जाऊन त्यांच्या जुन्या भाषणाची कॉपी आणली तर आपल्याला दिसून येईल की त्यांचे आजचे भाषणही तसेच होईल. खरे तर माननीय मंत्री महोदयांच्या हेतूबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नाही.

सभापती महोदय, पाच वर्षापूर्वी पारस हे वीज निर्मिती केंद्र सुरु करण्यात येणार आहे असे सांगण्यात आले होते. या केंद्रापासून मी 20 किमी. अंतरावरच राहत आहे. त्यामुळे हे केंद्र कधी सुरु होणार आहे हे पहाण्यासाठी मी त्या केंद्रला आतापर्यंत कमीत कमी 10 वेळा तरी भेट दिली असेल. हे केंद्र जानेवारी महिन्यात सुरु होणार असे प्रथम सांगितले मग फेब्रुवारी व त्यानंतर डिसेंबर मध्ये सुरु होणार आहे असे सांगण्यात आले होते. परंतु तेथील कामातील परिस्थितीमध्ये अजूनही कोणतीही प्रगती झालेली नाही. पारस, परळी,खापरखेडा, कोराडी, चंद्रपूर येथे वीज निर्मिती प्रकल्प सुरु करण्यात येणार आहे असे वारंवार सांगितले जाते. परंतु या केंद्रातून कधी वीज मिळणार आहे ? खापरखेडा वीज केंद्रा मधून कधी वीज प्राप्त होणार आहे, कोराडी वीज केंद्रातून कधी वीज प्राप्त होणार आहे, कोराडी वीज प्रकल्पातून वीज कधी मिळणार आहे,चंद्रपूर वीज केंद्रामधून वीज कधी मिळणार आहे ? माननीय उर्जा मंत्री पाचच्या पटीमध्ये जी उत्तरे देत आहेत ती आता आम्हाला पाठ झालेली आहेत. पुढील पाच वर्षामध्ये ही समस्या सुटेल असे मानीनय मंत्री महोदय प्रत्येक वेळी सांगत असतात. माननीय मुख्यमंत्री यांनी देखील असे सांगितले आहे की, सन 2010 पर्यंत महाराष्ट्र वीजेच्या बाबत स्वयंपूर्ण होणार आहे. परवा माननीय

..3..



DVG/ MMP/ KGS/ SBT/ 16:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, 60 हजार कोटी रुपयांचे नवीन प्रकल्प महाराष्ट्रात येणार आहेत. मी त्यांना त्यावेळी विचारले की, हे प्रकल्प जरी राज्यात आले तरी देखील राज्यात पुरेशी वीज उपलब्ध नसल्यामुळे हे प्रकल्प कशावर चालतील, हे प्रकल्प कसे काय उभे राहणार आहेत ?

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

जे उद्योजक महाराष्ट्रामध्ये येतील त्यांना वीज कोठून देणार ? पाच वर्षात हे प्रकल्प महाराष्ट्र करु शकत नाही. जे प्रकल्प आहेत तेच बंद होत आहेत. मग नवीन प्रकल्प कसे येणार ? 20011-12 मध्ये 20 हजार मेगावॅट वीज निर्माण होईल असे स्वप्न आपण दाखवले आहे. चार वर्षापासून आम्ही हे ऐकत आहोत. माननीय केंद्रीय ऊर्जामंत्री सांगतात की, पुढील पंधरा वर्षात समस्या सुटेल. म्हणजे ते आपल्यापेक्षा आणखी पाच पटीने पुढे गेले आहेत. ते सांगतात की, पुढील 15 वर्षात विजेची समस्या सुटेल. हा पाचचा पाढा आहे. या पाचच्या पाढ्यावर आपले प्रेम आहे आणि त्यांचेही प्रेम आहे. आमचे सुदैव म्हणा किंवा दुर्दैव म्हणा, दोन्ही मंत्री महाराष्ट्रातील आहेत. आता हा पाढा आम्हाला असाच ऐकावा लागणार आहे काय याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सांगितले तर बरे होईल. सामान्य जनतेला भार नियमनाचा भार असाच सहन करावा लागणार आहे काय हे सांगितले तर बरे होईल. भार नियमनाची समस्या किती निर्माण होणार आहे हे सांगितले तर बरे होईल. जसे मी सांगितले की, ग्रामीण भागामध्ये 15-16 तासाचे भार नियमन आहे. आपण ज्या कंपन्या निर्माण केल्या त्यांचे काही नियोजन केले आहे काय ? शेतकऱ्यांना दिवसा वीज न देता रात्री वीज देतात. रात्री 11.00 वाजता वीज येते. आमच्या अकोल्यावरुन शेगावला लोक गजानन महाराजांच्या दर्शनासाठी वारीने जातात. एके दिवशी मी रात्री 12.00 वाजता रस्त्यावरुन जात असताना काही उघडी तरुण मुले रस्त्यावरुन जात होती. रात्री 12.00 वाजता गाडी थांबवून मी त्यांना विचारले की, आपण कोठे निघालात ? आपण शेगावला गजानन महाराजांच्या दर्शनाला निघाला आहात काय ? त्यांनी सांगितले की, आम्ही शेगावला जायला निघालो नसून आता रात्री 12.00 वाजता वीज येणार आहे म्हणून शेतावर गव्हाला पाणी देण्यासाठी जात आहोत. रात्री 12.00 वाजता उठून तरुण मुले शेतीला पाणी देण्यासाठी निघाली होती. अशी परिस्थिती ग्रामीण भागामध्ये आहे. किमान याबाबत तरी आपण नियोजन करावे. मी गुजरातमध्ये गेलो होतो. त्या ठिकाणी सुध्दा विजेचा तुटवडा आहे हे मी मान्य करतो. गुजरातमध्ये 24 तास वीज मिळते असे मी म्हणत नाही. मी त्या ठिकाणी प्रचारासाठी गेलो असताना एका ठिकाणी गाडी उभी करुन शेतकऱ्याला विचारले की, आपल्याकडे वीज आहे काय ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. पांडुरंग फुंडकर ....

तो म्हणाला की, आमच्याकडे विजेचा तुटवडा आहे परंतु सकाळी 6.00 वाजता वीज येते आणि संध्याकाळी 7.00 वाजता वीज पुरवठा बंद होतो. त्या ठिकाणी शेतकऱ्याला दिवसभर वीज मिळते परंतु रात्री 7.00 नंतर शेतीचा फिडर बंद केला जातो. संध्याकाळी 7.00 वाजल्यानंतर शेतकऱ्याच्या शेतीमध्ये वीज मिळत नाही परंतु दिवसभर तेथील शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये वीज पुरवठा होतो आणि त्या काळात एका मिनिटासाठीसुध्दा वीज जात नाही. असे नियोजन आपल्याला करता येणार नाही काय ? तसे नियोजन आपल्याकडे नाही. महाराष्ट्रामध्ये कोणतेच नियोजन नाही. वीज कधीही जाते आणि कधीही येते. एखाद्याच्या पत्नीला माहेरी जावयाचे असेल तर ती नवऱ्याला विचारुन तरी जाते पण वीज कधी जाईल आणि कधी येईल हे सांगता येत नाही अशी स्थिती आहे. त्याचा परिणाम काय होणार आहे ? आता एप्रिल महिना सुरु झालेला आहे. आज ग्रामीण भागातील ज्या पाणी पुरवठा योजनां आहेत त्या ठिकाणी वीजपुरवठा नसल्यामुळे पाणी पुरवठा करण्यासाठी करावयाचा पाण्याचा उपसा बंद होणार आहे आणि त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना सात आठ दिवस पिण्यासाठी सुध्दा पाणी मिळणार नाही अशा प्रकारची स्थिती निर्माण झालेली आहे. उद्योगधंदे बंद होत आहेत. कामगार बेरोजगार होत आहेत. अशा परिस्थितीमध्ये आपण हे राज्य कसे प्रगतिपथावर नेणार आहात ? कृपाकरुन आज आपण नेहमीचे भाषण करु नका. ग्रामीण भागातील परिस्थितीचे नियोजन आपण कसे करणार आहात हे आपण सांगावे. त्या ठिकाणी किमान 1 पंखा, 1 दिवा त्या शेतकऱ्याला लावता आला पाहिजे. शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये जी उन्हाळी पिके पेरलेली आहेत ती जगविण्यासाठी त्यांना दिवसभरामध्ये ठरवून वीज देणार की नाही ? त्याचे वेळेवर नियोजन करणार की नाही ? आपण याकडे थोडे लक्ष घालावे. विजेच्या बिलापोटी शेतकऱ्यांना जो दंड आकारतो त्यामध्ये 2 हजार रुपयांचे बिल असेल तर 4 हजार रुपये दंडाची आकारणी होते. एवढे पैसे शेतकरी कोठून भरणार ? आपण शेतकऱ्यांना कर्जमाफी करावयास निघाला आहात. आणखी किती शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागणार आहे ? मी आकोट तालुक्यातील एक उदाहरण देऊन माझे भाषण संपवणार आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

आतापर्यंत शेतक-यांनी कर्जामुळे आत्महत्या केल्या आहेत, यापुढे विजेअभावी आत्महत्या करु लागतील. सभापती महोदय, मी अकोट तालुक्यातील सातेगावच्या एका शेतक-याचे उदाहरण देतो. त्या शेतक-याने विजेच्या कनेक्शनसाठी अर्ज केल्यावर त्याला पैसे भरण्याचा सल्ला देण्यात आला. त्यानुसार त्याने पैसे भरले. पैसे भरल्यामुळे त्याच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. वाण धरणाचे पाणी त्याला मिळेल या आशेने त्याने शेतात गहू पेरला. त्या शेतक-याने वीज मंडळाच्या कार्यालयात जाऊन सांगितले की, मी शेतात गहू पेरला आहे. मी पैसे भरुन सहा महिने झाले आहेत, मला कनेक्शन द्यावे. त्यावर वीज मंडळाच्या अधिका-यांनी तुला विजेचे कनेक्शन मिळणार नाही असे उत्तर दिले. ते उत्तर ऐकून तो शेतकरी ढसाढसा रडला. त्या शेतक-याने कर्ज काढून शेतात गहू पेरला होता. पण तू कोठे गेला तरी तुला विजेचे कनेक्शन मिळणार नाही असे सांगून अधिका-यांनी त्याचा अपमान केला. त्यामुळे त्याने वीज मंडळाच्या कार्यालयासमोरच विष प्राशन करुन आत्महत्या केली. म्हणजे आता वीज मिळत नाही म्हणून शेतकरी आत्महत्या करु लागले आहेत. मी हे एक वानगीदाखल उदाहरण सांगितले आहे. राज्याच्या अनेक गावांमध्ये हीच स्थिती आहे. माननीय मंत्रिमहोदयांना मी इशारा देतो की, कर्जमाफीने तुम्हाला मते मिळणार नाहीत. शेतक-यांपर्यंत ही कर्जमाफी पोहोचलेली नाही आणि पोहोचेल की नाही अशी शंका आहे. कारण सन्माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी केंद्राचे अद्याप आदेश आले नसल्याचे सभागृहात सांगितले आहे. त्यामुळे एका बाजूला शेतक-यांच्या मनात संभ्रम आहे, या सरकारविरुध्द तीव्र चीड आहे. दुस-या बाजूला हे भारनियमन दिवसेंदिवस वाढत चालले आहे. जर विजेचे भारनियमन कमी झाले नाही तर तुम्हाला कर्जमाफीचा फायदा होणार नाही. कर्जमाफीपेक्षा भारनियमनाचा प्रश्न ज्वलंत होणार आहे. हा प्रश्न ज्वलंत झाला तर त्याचा शॉक सरकारला बसल्याशिवाय राहणार नाही. आता एप्रिल महिना सुरु झाला आहे, म्हणून या वीज कंपन्यांना एकत्र करावे. विजेचे योग्य नियोजन करावे. पारस या केंद्रातून वीज मिळेल तेव्हा मिळेल. पण आहे त्या विजेचे वाटप तरी नीट करावे एवढीच विनंती करतो आणि मी याठिकाणी थांबतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

------

2.....

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी राज्यातील विजेच्या तुटवडयाच्या संदर्भात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाचे समर्थन का करु नये असा माझ्यासमोर प्रश्न निर्माण झाला आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.खंदारे 16:20

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी....)

वस्तुस्थिती आहे ती नाकारता येत नाही. वस्तुस्थिती ही आहे की, आपण गेली 4 वर्षे या सभागृहामध्ये विजेच्या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा करीत आहोत आणि माननीय ऊर्जामंत्री हे चर्चेला उत्तर देत आहेत. यामध्ये माननीय मंत्री महोदयांचा काही दोष नाही. कारण एखादी जादूची कांडी फिरवून या राज्यामध्ये वीज निर्माण होणार नाही. वीज निर्माण करण्यामध्ये किती अडचणी आहेत हे मी समजू शकतो. तरी सुध्दा अशा परिस्थितीमध्ये गेली चार साडेचार वर्षे माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी या राज्यातील विजेचा प्रश्न चांगल्या कौशल्याने आणि संयमाने हाताळला आहे आणि हाताळत आहेत याबद्दल मी त्यांचे आणि त्यांच्या अधिकारी टीमचे अभिनंदन करतो. राज्यामध्ये विजेच्या संदर्भात इतकी भयानक परिस्थिती असताना त्यातून मार्ग काढण्याचे जे काम माननीय ऊर्जा मंत्री करीत आहेत ते कौतुकास्पद आहे. याठिकाणी केवळ विरोध करण्यासाठी किंवा विजेच्या संदर्भात अवास्तव असे चित्र निर्माण करण्यासाठी मी उभा नाही. विजेच्या संदर्भातील वस्तुस्थिती ही तुम्हा आम्हा सर्वांना आणि संपूर्ण महाराष्ट्राला माहीत आहे. मध्यंतरी अर्थसंकल्पावर बोलताना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते असे म्हणाले होते की, 1999 पर्यन्त या राज्यामध्ये वीज विपूल होती आणि या राज्यातील सरप्लस वीज ही इतर राज्यांना दिली जात होती. वीज निर्मिती आणि वितरणाच्या संदर्भातील मागील रेकॉर्ड पाहिला तर सरप्लस वीज असणारे महाराष्ट्र हे देशामध्ये एकमेव राज्य होते. हे राज्य आपल्या सर्व गरजा भागवून, शेतक-यांच्या गरजा भागवून, उद्योगधंद्यांच्या गरजा भागवून शेजारच्या गोवा, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि गुजरात राज्यांना वीज देत होते. परंतु आज तशी परिस्थिती राहिलेली नाही. ही पाळी या राज्यावर का आली ? ही परिस्थिती निर्माण होण्यामागे कोण दोषी आहे याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. परंतु सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, जेव्हा या राज्यात युतीचे सरकार आले त्यावेळी या राज्यामध्ये वीज विपूल होती हे जरी खरे असले तरी ती वीज युतीच्या सरकारने निर्माण केलेली नव्हती तर ती आधीच्या सरकारने केलेल्या नियोजनामुळे निर्माण झाली होती आणि ही वस्तुस्थिती तुम्हा आम्हाला नाकारता येणार नाही. 250-500 मेगावॉट वीज निर्मितीसाठी या राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये दरवर्षी तरतूद केली जात होती. पण आज ही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी....)

अशी परिस्थिती का निर्माण झाली ? ज्यावेळी एन्रॉन प्रकल्प आला त्यावेळी श्री.शरद पवारसाहेब हे मुख्यमंत्री नव्हते. त्यावेळी श्री. सुधाकरराव नाईक हे मुख्यमंत्री होते. जेंव्हा या देशामध्ये परदेशी भांडवली गुंतवणूक करण्याच्या संदर्भात चर्चा झाली त्यावेळी हा एन्रॉन प्रकल्प या राज्यामध्ये मुद्दामहून आणला गेला. या राज्यामध्ये 740 मेगावॅट वीज निर्माण करुन ती 2.40 रु. प्रतियुनिट दराने विकायची आणि त्या प्रकल्पामध्ये राज्य शासनाने एका पैशाचीही गुंतवणूक करावयची नाही, अशा प्रकारे एन्रॉन प्रकल्पाच्या माध्यमातून या राज्यामध्ये वीज निर्मिती करण्याचा कार्यक्रम आखला गेला होता.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी...

पण पुढे त्याचे काय झाले ? तो प्रश्न कशा पध्दतीने हाताळला गेला ? एन्रॉन प्रकल्पाच्या बाबतीत चर्चा झाली त्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी याला थोडे राजकीय स्वरुप देण्याचा प्रयत्न केला होता. या राज्यात एन्रॉन प्रकल्प आणून माननीय श्री. शरद पवार आणि त्यांचे सहकारी यांनी पैसे खाल्ले अशा प्रकारचा अपप्रचार त्यावेळी विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून केला गेला होता आणि एक नवा वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. मला आठवते की, नंतरच्या कालावधीत निवडणुका झाल्या. त्या निवडणुकीच्या प्रचारांमध्ये विरोधी पक्षाकडून जाहीरपणे सांगितले गेले की, आम्ही जर सत्तेवर आलो तर एन्रॉन प्रकल्प अरबी समुद्रात बुडवून टाकू. आम्ही त्यास कोणतीही हरकत घेतली नव्हती. प्रकल्प निर्मिती करण्यास बरेच श्रम लागतात, परंतु प्रकल्प बुडविण्यास जास्त श्रम लागत नाहीत. जे व्हावयास नको होते, ते दुर्देवाने या राज्यामध्ये घडले. या राज्यात सत्तांतर झाले. युतीचे सरकार सत्तेवर आले. ज्या लोकांनी हा प्रकल्प अरबी समुद्रात बुडवून टाकण्याची भाषा केली होती, त्यांनीच नंतर हा प्रकल्प पुन्हा चालू करण्याचा प्रयत्न केला. पूर्वी हा प्रकल्प 700 मे.वॅ.क्षमतेचा होता. परंतु नंतर एकूण 2200 मे.वॅ.क्षमतेचा प्रकल्प सुरु करण्याच्या निर्णय युती सरकारने पुन्हा घेतला. अरबी समुद्रात बुडविलेला प्रकल्प होता, तो युतीच्या काळात पुन्हा बाहेर काढण्यात आला आणि या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज एका युनीटची किंमत 1 रुपया 93 पैसे राहील अशा प्रकारचे चित्र राज्यातील जनतेसमोर ठेवण्याचा युती सरकारने प्रयत्न केला. युती शासनाने हा प्रकल्प पुन्हा सुरु करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यातून एक मे.वॅ.वीज युतीच्या काळात निर्माण केली गेली नाही. युतीच्या साडेचार वर्षाच्या कालावधीत एक युनीट सुध्दा वीजनिर्मिती झाली नाही. त्यानंतरच्या पाच वर्षाच्या काळात या राज्यावर एन्रॉनचे 27500 कोटी रुपयांचे भूत बसलेले होते. ते भूत सोडविण्याचा प्रयत्न या राज्यात झाला नसता तर 27500 कोटी रुपयांचा बोजा या राज्यावर पडला असता. हे राज्य त्यावेळी आर्थिकदृष्टया खूप अडचणीत सापडले असते. पर्यायाने हे राज्य रसातळाला गेले असते. वीज निर्मिती युती काळात झाली नाही आणि आमच्या काळातही झाली नाही यात मी कोणाला दोष देत नाही. वीज निर्मिती न करण्यात सन्माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांचा काहीही दोष नाही. विद्युत निर्मिती का होऊ शकली नाही याची कारणे शोधून काढली पाहिजेत. हे राज्य पूर्वी वीज निर्मितीसाठी 250 ते

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी....

300 कोटी रुपये बाजुला काढून ठेवीत होते. परंतु गेल्या दहा वर्षात एक युनीट सुध्दा वीजनिर्मिती आपण करु शकलेलो नाही ही वस्तुस्थिती आहे. वीज निर्मितीच्या बाबतीत जे प्रयत्न व्हावयास पाहिजे होते, ते झाले नाहीत ही गोष्ट सरकारला मान्य करावी लागेल. गेल्या दहा वर्षात एक युनीट सुध्दा वीज निर्मिती होऊ शकली या गोष्टीस तुम्ही आणि आम्ही जबाबदार आहोत. सन्माननीय ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील हे या विभागाचे प्रमुख आहेत त्यांना तसेच त्यांच्या विभागातील अधिका-यांना दोष देऊन चालणार नाही. या सभागृहात बसलेले सगळे सदस्य या गोष्टीस जबाबदार आहेत. दुर्देवाने ही गोष्ट या राज्यातील जनतेला पूर्णपणे माहिती झालेली आहे. फुकट वीज देण्याचा निर्णय घेण्यात यावा अशी मागणी केली जाते. परंतु या राज्यात एकही युनीट वीज निर्मिती होऊ शकली नाही तर फुकट वीज देण्याची आकडेवारी देण्यात काय अर्थ आहे. वीज निर्मितीचा प्रश्न अतिशय संयमाने सोडविण्याची आवश्यकता आहे. मघाशी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, जनरेशन, ट्रान्समिशन आणि डिस्ट्रीब्यूशन या नवीन कंपन्या शासनाने निर्माण केल्या. या खाजगी मालकाने निर्माण केलेल्या कंपन्या नाहीत.

यानंतर श्री.कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MMP/ प्रथम श्री.गिते 16:30

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ....

सभापती महोदय, 2003 च्या केंद्र शासनाच्या एनर्जी ॲक्टप्रमाणे जो तत्कालीन एनडीए शासनाने मंजूर केला होता त्यानुसार सर्व राज्यांनी अशा प्रकारच्या तीन कंपन्या निर्माण करावयाच्या होत्या. कायद्यातच अशा प्रकारची तरतूद असल्यामुळे प्रत्येक राज्यांनी अशा प्रकारच्या तीन कंपन्या केल्या. परंतु त्यातून काही मोठया प्रमाणावर वीज निर्माण होऊ शकली नाही. वीज मंडळामध्ये जी परिस्थिती होती ती कंट्रोल करण्याचा प्रयत्न या तीन कंपन्यांच्या माध्यमातून करण्यात आला. आज विजेची आवश्यकता आहे. राज्याचा विजेचा विचार केला तर आज जवळजवळ 5000 मे.वॅ. विजेचा तुटवडा आहे. गरजेपेक्षा वीज कमी आहे ही वस्तुस्थिती आहे. केवळ आपल्या राज्यातच ही परिस्थिती आहे असे नसून देशाच्या सर्व राज्यात ही परिस्थिती आहे. देशातील कोणतेही राज्य छातीठोकपणे असे म्हणू शकत नाही की आमच्या राज्यात सरप्लस वीज असून ही वीज आम्ही इतर राज्यांना देऊ शकतो. देशामध्ये विजेचा हा एक अत्यंत भयानक आणि महत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अमेरिकेबरोबर अणुकरार व्हावयाला पाहिजे किंवा होता कामा नये याबाबत आज देशभर चर्चा सुरु आहे. या देशाच्या पंतप्रधानांनी सांगितले की देशातील विजेचा प्रश्न सोडवायचा असेल तर अणुऊर्जेशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही. म्हणून माझी ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील आणि त्यांच्या खात्याच्या सर्व अधिकाऱ्यांना विनंती आहे की, विजेचा हा प्रश्न संयमाने सोडविण्याचा प्रयत्न करा. पारस येथील वीज निर्मिती केंद्र असेल किंवा परळी येथील असेल किंवा चंद्रपूर येथील अतिरिक्त वीज निर्मितीचे केंद्र असेल, वीज निर्मितीचे अनेक नवीन प्रकल्प शासनाने हाती घेतलेले आहेत. राज्यामध्ये असे प्रकल्प हाती घेऊन एक आशादायी चित्र निर्माण करण्याचा शासनाने प्रयत्न केला आहे. 2003 च्या केंद्राच्या ॲक्टप्रमाणे शासकीय कंपन्यांव्यतिरिक्त मोठया प्रमाणावर खाजगी कंपन्या देखील वीज निर्मितीच्या मैदानात उतरल्या आहेत. दुर्दैवाने या राज्यात पाहिजे त्या प्रमाणात वीज निर्मिती या कंपन्यांकडून होऊ शकली नाही. आजच वृत्तपत्रामध्ये एक बातमी वाचली. बेस्टचे महाव्यवस्थापक श्री. उत्तम खोब्रागडे यांनी रिलायन्स एनर्जीचा परवाना रद्द करा असे सांगितले आहे. टाटा आणि बेस्टच्या गेल्या 80 वर्षांच्या कराराप्रमाणे या मुंबई शहराचे संपूर्ण वीज वितरण हे टाटा कंपनीच्या माध्यमातून होत असते. एकंदरीत मिळणाऱ्या विजेव्यतिरिक्त 800 मे.वॅ.जादा वीज टाटा उपलब्ध करुन देणार आहे. श्री. खोब्रागडे यांनी सांगितले आहे की मुंबईमध्ये लोडशेडींग राहणार नाही. मंत्रिमहोदयांनी याबाबत उत्तरामध्ये खुलासा करावा.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ...

बीएसइएस होती त्यावेळी सुध्दा अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यांचे लायसन्स रद्द करा. वीज पुरवठयामध्ये नियमितपणा नाही. वीज जादा उपलब्ध होत नाही. एक डहाणूचा प्रकल्प सोडला तर दुसरा वीज निर्मितीचा कोणताही मार्ग नाही. रिलायन्स एनर्जीने आणि अंबानी बंधूनी कितीही वल्गना केल्या तरी ते जादा वीज निर्माण करु शकत नाहीत. म्हणूनच बेस्टने मागणी केली आहे की रिलायन्सचा परवाना रद्द करा. संपूर्ण शहराला वीज पुरवठा हा रिलायन्सच्या माध्यमातून होत आहे.

सभापती महोदय, असे असून सुध्दा मुंबईत 24 तास वीज उपलब्ध व्हावी याबाबतचे निदेश कोर्टाने सुध्दा दिलेले आहेत.

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ 16:35

श्री.गुरुनाथ कुळकर्णी........

सभापती महोदय, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे. या शहरामध्ये हॉस्पिटल्स आहेत, एअरपोर्ट आहेत, रेल्वेमार्ग आहेत. या शहराला अखंडपणे वीजपुरवठा केला जाईल यादृष्टीने व्यवस्था केलेली आहे आणि कोर्टाने देखील ते मान्य केले आहे. असे असताना मागील दोन वर्षाची परिस्थिती पाहिली तर या शहरामध्ये लोडशेडिंग केले जावे अन्यथा अतिरिक्त वीज उपलब्ध करुन दिली जावी अशी मागणी पुढे आल्यानंतर वीज मंडळाकडून ऐनवेळी 400 ते 500 मे.वॅट वीज मुंबई शहराला उपलब्ध करुन देण्यात आली आहे ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. खाजगी कंपन्यांनी वीज मंडळाशी एमओयू केले. परंतु या कंपन्या वीज निर्मिती करणार नसतील तर त्यांना सुध्दा दोषी धरले पाहिजे. कमिटमेंट देऊन, एमओयू करुन प्रत्यक्षात प्रगती काहीही केलेली नाही, प्रकल्प रेंगाळत ठेवले आहेत त्याबाबत मंत्रीमहोदयांनी सभागृहाला खुलासा करणे आवश्यक आहे. आज जे प्रकल्प पेंडिंग आहेत त्याबाबत काय करणार आहात, किती दिवसात हे प्रकल्प सुरु होतील, आजची स्थिती काय आहे या सर्व प्रश्नांची उत्तरे महाराष्ट्रातील जनतेला कळली पाहिजेत. अडचणीच्या काळात माननीय मंत्रीमहोदय, त्यांचे सर्व सहकारी अधिकारी चांगले काम करीत आहेत. ज्यांनी चांगले काम केले आहे त्याबाबत चांगलेच म्हटले पाहिजे. मी माझ्या व माझ्या पक्षाच्या वतीने माननीय मंत्रीमहोदयांचे, शासनाचे अभिनंदन करतो. विजेचा तुटवडा लवकर भरुन काढण्यासाठी मंत्रीमहोदयांनी अधिक चांगले काम करावे आणि महाराष्ट्राला अंधारातून, लोडशेडिंगच्या समस्येतून मुक्त करावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, एका अतिशय महत्वाच्या विषयावर या सभागृहामध्ये विरोधी पक्षातर्फे नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडला असून या प्रस्तावावर माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आपले विचार मांडले आहेत. माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी भाषण करीत असताना माननीय मंत्रीमहोदयांचे अभिनंदन केले. मी कोणाच्या भाषणाचा उल्लेख करणे हे माझे काम नाही. परंतु कोणताही विषय उपस्थित झाला की, प्रथम युती शासनाचा उध्दार करायचा आणि नंतर पुढे जायचे ही सत्ताधारी पक्षाची पध्दत मी गेली सहा वर्षे या सभागृहात पहात आहे. या शासनकर्त्यांना नेहमी असेच वाटते की, विरोधक असूच नयेत. चुकून विरोधक सत्तेवर आले तर त्यांचा उध्दार करुन आपणच पुन्हा सत्तेवर यायचे म्हणजे सत्ता राबविणे हे एकमेव काम आहे का? या देशातील सद्यपरिस्थिती पाहिली तर कोणताही एक पक्ष असा प्रबळ राहिलेला नाही, जो एकट्याच्या बळावर सत्तेवर येऊन सत्ता राबवू शकतो. ते दिवस निघून गेले आहेत. आता नवीन दिवस आले आहेत. या पार्श्वभूमीवर भाषण करताना सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, संयम राखूनच भाषण केले पाहिजे. याठिकाणी एन्रॉन प्रकल्पाचा उल्लेख करण्यात आला. मी त्या विषयात जाणार नाही. एन्रॉनचा विषय पहिल्यांदा उपस्थित झाला होता त्यावेळी मी विधानसभेचा सदस्य होतो. एन्रॉन प्रकल्पाचे राजकारण करण्यात आले. त्यासंबंधी मला पूर्ण माहिती असून मी चर्चेत भाग घेतलेले असल्यामुळे अधिकारवाणीने या संदर्भात बोलू शकतो. त्यावेळी विरोधकांचा मुद्दा हा डॉलर आणि रुपयाच्या विनिमय दराबद्दलचा होता. त्या कंपनीला पेमेंट डॉलरमध्ये द्यायचे होते. या मुद्यावर चर्चा झालेली आहे. त्याचा मी साक्षीदार असल्यामुळेच मी या संदर्भात वक्तव्य करीत आहे. मी त्या विषयात जाणार नाही. या सदनाचा मी एप्रिल, 2002 मध्ये सदस्य झालो.

(नंतर श्री.खर्चे..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

ऑगस्ट, 2002 मध्ये "महाराष्ट्र उर्जा क्षेत्रातील सुधारणा" या नावाने एक श्वेत पत्रिका सभागृहात सादर केली होती. ही श्वेत पत्रिका सादर केल्यानंतर त्यावर चर्चाही झाली होती. त्या चर्चेच्या अनुषंगाने काय काय होणार याविषयीची भाषणे सुध्दा झाली. आम्ही देखील त्या चर्चेत भाग घेतला होता. श्वेत पत्रिकेतील काही मुद्दे तसेच त्या बाबतीतील अचीव्हमेंट काय आहे यासंदर्भात मी या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. वास्तविक श्वेत पत्रिका म्हणजे "व्हाईट पेपर" आणि या व्हाईट पेपरला काही तरी अर्थ असतो. म्हणून या श्वेत पत्रिकेतून काय निष्पन्न झ ााले हे पाहण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यादृष्टीने उर्जा क्षेत्रात सुधारणांचा उद्देश जो त्यावेळी देण्यात आला होता त्यात कार्यक्षम व व्यापारीदृष्ट्या सक्षम व स्पर्धात्मक प्रकारे उर्जा क्षेत्राला प्रोत्साहित करणे, सर्व ग्राहकांना किफायतशीर किंमतीत अखंड व दर्जेदार वीज पुरवठा करणे हा दुसरा उद्देश आहे. आणि तिसरा उद्देश म्हणजे सामाजिक व पर्यावरणविषयक बाबींचे सर्वप्रकारे संरक्षण करणे असे तीन महत्वाचे मुद्दे त्यात होते. हे उद्देश साध्य करण्यासाठी काय करावयाचे, त्यासंदर्भातील मार्गदर्शन सुदैवाने श्वेत पत्रिकेत दिले होते. ते असे होते की, महाराष्ट्र वीज मंडळाने त्यांच्या निर्मिती, पारेषण आणि वितरण या तीन विभागांचे कार्य नफ्यात चालवावे. विभाजन न करता महाराष्ट्र राज्य वीज मंडळाने कार्पोरेटरायझेशन करावे. विभाजन आणि महाराष्ट्र वीज मंडळाचे कार्पोरेटरायझेशन करणे हे उद्देश आणि त्यानंतर कोणकोणत्या गोष्टींमध्ये अचीव्हमेंट करावयाची यासंबंधीचे मार्गदर्शनही त्यात केले होते. त्यापैकी एक म्हणजे "अंतर्गत सुधारणा" म्हणजेच मंडळाच्या कारभारातील सुधारणा. त्यात मग वीज हानी कमी करणे, वीज चोरीला प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणे, उर्जेचे लेखांकन व मीटरिंग करणे, ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रणाली निर्माण करणे ही त्यावेळच्या श्वेतपत्रिकेतील काही उद्दिष्ट्ये दिली होती. त्यानंतर विजेच्या दराचे सुसूत्रीकरण करणे या शिर्षकाखाली "वीज दरात अग्रक्रमाने वीज पुरवठ्याचा खर्च परिवर्तीत होईल याची काळजी घेणे, ग्राहकांना देण्यात येणारी क्रॉस सबसिडी कमी करणे, ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करणे" इ. श्वेत पत्रिकेतील ठळक उद्दिष्ट्ये होती. ही उद्दिट्ये कितपत यशस्वी झाली याचा आपण शोध घेत आहोत. ग्राहकांच्या हक्कासाठी शक्यतो 6 महिन्याच्या आत तरतूद केली जाईल असेही त्यावेळी सांगण्यात आले होते. तसेच त्यावेळी

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ........

बोलताना माननीय मंत्री महोदयांनी 11 के.व्ही. व त्यापेक्षा जास्त दाबाच्या सर्व वाहिन्यांतून डिसेंबर, 2002 पर्यंत मीटर लावले जातील. शहरी भागात तांत्रिक हानी 1 टक्का व वाणिज्यिक हानी 3 टक्के दरवर्षी या दराने कमी केली जाईल. ग्रामीण भागात तांत्रिक हानी 0.5 टक्के आणि वाणिज्यिक हानी 2 टक्के दरवर्षी कमी केली जाईल. सर्वसामान्यपणे वीज देयकाच्या वसुलीच्या कार्यक्षमतेत दोन वर्षात 24 टक्क्यांनी वाढ केली जाईल. सर्व कृषी ग्राहकांचे मीटरिंग सन 2000 अखेरपर्यंत पूर्ण केले जाईल. अशा प्रकारे महाराष्ट्र उर्जा क्षेत्रातील सुधारणांबाबत काढलेल्या श्वेत पत्रिकेतील ठळक उद्दिष्ट्ये व ठळक तत्वे आहेत. त्याची अंमलबजावणी झाली असती तर आजची परिस्थिती निर्माण झाली नसती, असे माझे मत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

श्वेतपत्रिकेची अंमलबजावणी झाली असती तर विजेच्या बाबतीत आज जी परिस्थिती निर्माण झालेली आहे ती निर्माण झाली नसती असे माझे स्वत:चे मत आहे. या श्वेतपत्रिकेचा मी एक साक्षीदार आहे. त्यानंतरचा वीज मंडळाचा कारभार मी जवळून पाहत आलेलो आहे. या सभागृहात जेव्हा जेव्हा विजेच्या संदर्भात चर्चा झालेली आहे तेव्हा तेव्हा मी या चर्चेत भाग घेतलेला आहे त्यामुळे माझ्या असे निदर्शनास आलेले आहे की, अंतर्गत सुधारणा करण्यामध्ये आपल्याला यश आलेले आहे काय? महामंडळाचे विभाजन केले जाणार नाही असे सांगितले जात होते परंतु प्रत्यक्षात आता विद्युत महामंडळाचे तीन भागात वीज महामंडळाचे विभाजन करण्यात आलेले आहे. पूर्वी वीज मंडळाचे एक एम.डी. होते आता तीन एम.डी. झालेले आहेत. भारतीय सेवेतील तीन सक्षम अधिकारी वीज मंडळात असल्यामुळे अधिक सक्षमपणे वीज मंडळाचा कारभार चालेल, लोकांना दिलासा मिळेल अशी सर्वसाधारण जनतेची अपेक्षा असते ती कितपत पूर्ण झाली आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी चर्चेच्या उत्तरात देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, वीज मंडळातील भ्रष्टाचार हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. वीज मंडळाच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात मी अनेक वेळा या प्रहार केलेले आहेत त्यामुळे याबाबतीतही काय सुधारणा झालेली आहे याचीही माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तराच्या भाषणात दिली तर फार चांगले होईल. या ठिकाणी मी भ्रष्टाचाराच्या संदर्भात उदाहरण देणार आहे. या ठिकाणी वीज मंडळाच्या तिन्ही कंपन्याचे अधिकारी उपस्थित आहेत. ते जरी उपस्थित असले तरी आपल्या दृष्टीने अदृष्य आहेत. एका कर्मचा-याने भ्रष्टाचाराच्या संदर्भात तक्रार केल्यामुळे संबंधित कर्मचा-याचे वीज मंडळातून निलंबन करण्यात आले. ही केस दोन वर्षापासून न्यायप्रविष्ट आहे. खरे म्हणजे दोन वर्षात या प्रकरणाचा निकाल लागावयास पाहिजे होता परंतु तसे काही झाले नाही. ही घटना सन 2005 मधील असून आता सन 2008 साल सुरु आहे. असे असतांनाही या कर्मचा-याला अद्यापपर्यंत न्याय मिळू शकलेला नाही. आमच्या अधिका-यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले असा आरोप या कर्मचा-यावर ठेवण्यात आलेला आहे. प्रत्यक्षात भ्रष्टाचाराचे आरोप करणारे वेगळेच होते पण म्हणतात ना "वडयाचे तेल वांग्यावर" असा प्रकार या ठिकाणी झालेला आहे. वीज मंडळाच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात कोणाचीही बोलण्याची हिंमत नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

भ्रष्टाचाराच्या संदर्भात कोणीही बोलत नाही थोडक्यात म्हणजे "तेरी भी चूप और मेरी भी चूप" असेच चालू आहे.

सभापती महोदया,वीज चोरी 39 टक्के आहे त्यावेळी 1 टक्का वीज चोरी झाली तर 120 कोटी रुपयांचे नुकसान होत होते परंतु आता नवीन आकडेवारीनुसार 1 टक्का विजेची चोरी झाली तर किती कोटी रुपये नुकसान होते, वीज चोरीचे प्रमाण आता किती टक्के आहे, वीज चोरी होऊ नये यासाठी आपण कोणते नियंत्रण आणले आहे याचीही माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, धर्मनिरपेक्ष लोकांच्या ज्या वस्त्या आहेत त्यांना मोफत वीज दिली जात आहे. किती धर्मनिरपेक्ष वस्त्यांना वीज दिली जाते, त्यांच्याकडून किती पैसे वसूल केले जातात यांसदर्भात रिलायन्स कंपनीकडे मी माहिती मागितली होती परंतु यासंदर्भातील माहिती त्यांच्याकडून आलेली नाही. भिवंडी, मालेगाव या ठिकाणी प्रचंड प्रमाणात वीज चोरी होत असते परंतु या धर्मनिरपेक्ष भागाच्या संदर्भात कोणीही बोलण्यास तयार नाही कारण ते राष्ट्रप्रेमी आहेत आणि आम्ही जातीयवादी. आमच्यावर जातीयवादीचा शिक्का मारण्यात आलेला आहे. जातीयवादींच्या हातात हात घातला जाणार नाही असे सांगितले जाते, कारण आमच्यामध्ये सगळेच श्रीमंत आहेत, आदिवासी श्रीमंत आहेत, आमच्यात एकही गरीब नाही असा आपण आपल्या फायद्यासाठी अर्थ काढून घेतलेला आहे. आमच्या आदिवासीच्या झोपडीपर्यंत लाईटच गेलेली नाही त्यामुळे तुम्ही आदिवासींना कसा काय फायदा देणार? आदिवासींना मोफत वीज कशी काय देणार? धर्मनिरपेक्ष लोकांसाठी तुम्ही सच्चर आयोग लागू करता परंतु आमच्या आदिवासी बांधवांसाठी कोणताही आयोग नाही, कोणत्याही शिफारसी नाहीत. त्यामुळे वीज चोरीच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी माहिती देण्याची आवश्यकता आहे. धर्मनिरपेक्ष वस्तीतील कारखाने, यंत्रमागांमध्ये किती टक्के वीज चोरी होते याची माहिती मी मागितली होती परंतु त्याची सुध्दा माहिती मला मिळू शकली नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 16.50

श्री.मधुकर सरपोतदार ..

सभापती महोदया, यानंतर मला मुळा प्रवरा सहकारी वीज वितरण सहकारी संस्थेसंबंधी बोलावयाचे आहे.1990-1991 साली या संस्थेची विजेची थकबाकी 150 कोटी रुपयांची होती . त्यांची जी एकूण थकबाकी होती त्यापैकी शासनाने किती थकबाकी माफ केली हे मला माहीत नाही परंतु त्यांना विजेची थकबाकी माफ केली जाते हे मला माहीत आहे. जे पैसे लुबाडतात त्यांचे कोटयावधी रुपयाचे बिल माफ केले जाते परंतु गरीब माणसाचे विजेचे बिल थकले की त्याचे कनेक्शन लगेच कट केले जाते. या कारभाराला सक्षम कारभार म्हणता येत नाही ? शासनाने जी श्वेतपत्रिका काढली होती त्यात असा उल्लेख करण्यात आला होता की, वीज मंडळ सक्षम कारभार करील. अशा प्रकारचे अभिवचन श्वेतपत्रिकेमध्ये देण्यात आले होते परंतु त्याप्रमाणे प्रत्यक्षात घडत नाही त्यामुळे सक्षम कारभार आम्ही कसा पहावयाचा असा आमच्या समोर प्रश्न निर्माण झाला आहे.

सभापती महोदया, विजेच्या प्रश्नासंबंधी पुष्कळ वेळ बोलता येण्या सारखे् मुद्दे आहेत पंरतु मी जास्त वेळ बोलणार नाही. वीज नसतांना देखील लोकांना विजेच्या बिलाचा शॉक बसतो. मला माननीय मंत्री महोदयाना प्रश्न विचारावयाचा आहे. त्याचे उत्तर त्यांनी उत्तराच्या भाषणात द्यावे. महाराष्ट्रात 15 तें 16 तास भारनियमन केले जाते. मी कोकणातून आलेलो आहे . कोकणामध्ये मोठे कारखाने नाहीत, तसेच लहान लहान उद्योगही नाहीत त्यामुळे कोकणामध्ये फारशी वीज वापरली जात नाही. कोकणामध्ये दिवसा काही वेळ वीज असते परंतु त्या विजेचा उपयोग फारसा होत नाही कारण दिवसा तेथील शेतकरी शेतामध्ये काम करण्यासाठी जातात आणि रात्रीच्या वेळी घरी आल्यानंतर दिवे वा फॅन लावावयाचे त्याने ठरविले तर विद्युत पुरवठा खंडित केलेला असतो. त्यामुळे कोकणामध्ये ज्या पध्दतीने भारनियमन केले जाते ती पध्दत अत्यंत अयोग्य आहे असे मला माननीय मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे. तेव्हा या पध्दतीमध्ये बदल करण्यात येणार आहे काय? विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र इत्यादी भागामध्ये ज्या पध्दतीने भारनियमन केले जाते त्याचा विचार करता आमच्याकडील भारनियमनाची पध्दत बदलावी लागेल.

सभापती महोदया, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी त्यांच्या भाषणात असे सांगितले होते की, सुरुवातीला कारखान्यांसाठी भारनियमन लागू करण्यात आले नव्हते परंतु आता कारखान्यांसाठी देखील भारनियमन केले जात आहे.त्यामुळे हे कारखाने बंद झाल्यामुळे तेथे काम करणारे कामगार बेकार झाले असून त्यांच्या पोटावर पाय देण्यात आला आहे.

2..

श्री.मधुकर सरपोतदार ..

एम.आय.डी.सी.मध्ये ज्या औद्योगिक वसाहती आहेत तेथील 70 ते 75 टक्के कारखाने बंद पडलेले आहेत त्यामुळे त्या कारखान्यांना वीज पुरवठा होत नाही . राज्यातील विविध बंद पडलेल्या कारखान्यांचा वीज पुरवठा थांबवण्यात आलेला असल्यामुळे तो वीज पुरवठा दुसरीकडे कोठे वळविण्यात आला आहे ? अन्य ठिकाणी कोठे जास्त वीज पुरवठा केला जात आहे याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी दिली पाहिजे. राज्यातील अनेक लहान लहान कारखाने बंद पडल्यामुळे त्या ठिकाणी काम करणारे लाखो कामगार बेकार झालेले आहेत. मुंबईमध्ये 60 कापड गिरण्या सुरु होत्या आणि त्यामध्ये जवळजवळ अडीच लाख कामगार काम करीत होते आता जेमतेम पाच ते सहा गिरण्या सुरु आहेत. बाकीच्या गिरण्या यापूर्वी बंद पडलेल्या आहेत. या कामगारांनी एक तारखेला मोर्चा आयोजित केलेला आहे. मुंबईतील अनेक कापड गिरण्या यापूर्वीच बंद पडलेल्या आहेत त्यात काम करणा-या कामगारांपैकी काही कामगार मृत्यू पावलेले आहेत. त्यामुळे त्यांना श्रध्दाजंली वाहणे एवढेच काम आपल्याला करावे लागणार आहे. परंतु या कापड गिरण्यामधील काम करणारे जे काही कामगार हयात आहेत त्यांनी हा मोर्चा आयोजित केलेला आहे. मला या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की, जे कारखाने आणि ज्या कापड गिरण्या बंद पडलेल्या आहेत त्याची वीज नेमकी कोठे जाते ? याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी मुंबईच्या वीज कंपनीसंबंधीचा एक मुद्दा मांडलेला आहे त्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की पूर्वीची बी.एस.ई.एस. म्हणजे आताची रिलायन्स कंपनी मुंबईतील उपनगराला वीज पुरवठा करीत असते तेव्हा या कंपनीकडून हे काम काढून घेऊन बेस्टकडे द्यावे अशी मागणी करण्यात येत आहे बेस्ट कपनीसुध्दा हे काम घेण्यास तयार आहे. रिलायन्स कंपनीने बांद्रा कुला कॉम्पलेक्समध्ये भूखड घेऊन मोठा टॉवर बांधलेला आहे. या कंपनीने विजेचे दर वाढविलेले असून आता आणखी विजेचे दर वाढविण्यात येणार असल्याची चर्चा लोक करीत आहेत. मध्यंतरी माननीय मंत्री महोदयांनी रिलायन्स कंपनीच्या अधिका-याना बोलावून त्यांच्याशी विजेच्या दरासंबंधी चर्चा केली होती तसेच ही दरवाढ कशी कमी करता येईल या दृष्टीने त्यावेळी विचार केला होता.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपण म्हटले आहे की, एमइआरसी म्हणून जी एक ॲथॉरिटी आहे तिच्यामार्फत हे सगळे होते. एमइआरसीने एकदा गाईडलाईन दिली की ते म्हणतील ती पूर्व, त्याच पद्धतीने पुढे जायचे. त्यांच्याकडे कोणी जाऊही शकत नाही. या एमइआरसीला देखील असे वाटत नाही की, कोणताही दरवाढीचा, भाववाढीचा निर्णय घेताना त्या संदर्भात लोकप्रतिनिधींशी चर्चा करावी, त्यासाठी आम्हा लोकप्रतिनिधींना बोलवावे. एमइआरसी ही एक जबाबदार ऑर्गनायझेशन आहे. म्हणूनच त्यांनी या दृष्टिकोनातून कोणताही निर्णय घेण्यापूर्वी आम्हा लोकप्रतिनिधींची मते देखील विचारून घेतली पाहिजेत. आम्ही येथे चर्चा करतो, पण तीही आले वारे, गेले वारे अशाच प्रकारे होते, म्हणजे एका कानाने ऐकायचे आणि दुसऱ्या कानाने सोडून द्यायचे. या पद्धतीने साऱ्या दरवाढी होत आहेत. पण त्याचे परिणाम काय होत आहेत हेही आपण तपासून पाहण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, मध्यंतरी आमच्या ऊर्जा मंत्र्यांनी एक मुलाखत दिली होती. वीज मंडळाच्या ज्या तीन कंपन्या झाल्या आहेत त्या तिन्ही कंपन्यांच्या व्यवस्थापकीय संचालकांच्याही मुलाखती आम्ही पाहिल्या आहेत. या मुलाखतीमधून माझ्याकडे जी माहिती आली आहे ती अधिकृत आहे असे मी मानले तरी आपण ते मानाल असे वाटत नाही. तसेच माझ्याकडील या आकडेवारीत काही चूक असण्याचीही शक्यता आहे, तसे असल्यास आपण जरूर ती दुरूस्त करावी. यामध्ये महावितरण कंपनीची माहिती आहे. मंत्री महोदयांचीही मुलाखत यात आहे. या साऱ्या मुलाखतींमधून जी माहिती समोर आलेली आहे ती मोठी इंटरेस्टिंग आहे. माझ्याकडे असलेली ही आकडेवारी अशी आहे की, राज्यातील विजेची उपलब्धता या शीर्षकाखाली माझ्याकडे जी माहिती उपलब्ध आहे ती आपल्यासमोर ठेवतो, चुकीची असल्यास जरूर दुरूस्त करावी. सभापती महोदया, आपल्याकडे एकूण औष्णिक केंद्रे किती आहेत ? या औष्णिक वीज निर्मिती केंद्रातून सुमारे 6425 मे.वॅ. वीज उपलब्ध करून देण्याची क्षमता आहे. पण प्रत्यक्षात उपलब्ध वीज ही 5140 मे.वॅ. आहे. म्हणजे यातून 80 टक्के विजेची उपलब्धता होते. त्यानंतर जी आपली जलविद्युत केंद्रे आहेत त्यांची वीज निर्मिती क्षमता 2434 मे.वॅ. इतकी आहे पण प्रत्यक्ष उपलब्धता ही 1600 मे.वॅ. इतकी आहे. मात्र ही वीज केवळ शिखर मागणीच्या वेळीच उपलब्ध होऊ शकते. तसेच वायू वीज निर्मिती केंद्रांची वीज निर्मिती क्षमता 912 मे.वॅ. आहे, प्रत्यक्षात त्यातून 440 मे.वॅ. वीज उपलब्ध होते आहे. या गॅसद्वारा वीज निर्मिती केंद्रातून गॅसच्या उपलब्धतेनुसारच वीज उपलब्ध होते. एकूण 9771 अशी

.... 3डब्ल्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केंद्रे आहेत आणि त्यापैकी केवळ 7180 केंद्रेच चालू आहेत. बाकीची का बंद आहेत याची माहिती मंत्र्यांकडून मिळाली तर फार चांगले होईल. सभापती महोदया, केंद्रीय प्रकल्पातील राज्याचा वाटा 9925 मे.वॅ. विजेचा आहे पण प्रत्यक्षात आपल्याला 2340 मे.वॅ. वीजच आपल्याला मिळते आहे. तर मग हा वाटा इतका कमी आपल्याला का मिळतो ? याचाही खुलासा झाल्यास बरे होईल. त्याच प्रमाणे व्यापारी तत्त्वावर वीज खरेदी - यामध्ये रत्नागिरी वीज निर्मिती कंपनीकडून आपल्याला केवळ 650 मे.वॅ. वीज मिळते आहे. महावितरण कंपनीकडे एकूण विजेची उपलब्धता ही 14416 मे.वॅ. असली तरी प्रत्यक्षात ती मिळते आहे 10370 मे.वॅ. तर हा इतका फरक कशामुळे पडला ? शिवाय यात म्हटले आहे की, 'कमाल मागणीच्या वेळी उपलब्ध.' आणि टाटा 1774, रिलायन्स 500 आणि राज्याची वीज निर्मिती क्षमता 15690 मे.वॅ. इतकी आहे. आजची आमची गरज आहे ती 12 हजाराच्या आसपास आहे. तर मग वीज कमी का पडते ? असा प्रश्न आमच्यासारख्यांच्या समोर उभा राहतो. विजेची मागणी, उपलब्धता व तूट ही मे.वॅ.मध्ये यात दिलेली आहे. ही माहिती "ग्राहकांशी बांधिलकी" या शीर्षकाखाली श्री.प्रमोद देव, अध्यक्ष, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी दिली आहे. त्यात त्यांनी 2005-06 पासूनची माहिती दिलेली आहे. त्यात त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, मागणी होती 14061, उपलब्धता 9856 आणि तूट 20.05 टक्के. 2006-07 मध्ये 14850 ची मागणी, 9450 ची उपलब्धता आणि तूट 5010. त्यानंतर 2007-08 मध्ये 16200 मागणी आहे, प्रत्यक्षात 12380 उपलब्धता आहे. म्हणजे मी अगोदरच सांगितले आहे की, 15 हजार मे.वॅ.ची आपली क्षमता असताना प्रत्यक्षात वीज मिळते आहे ती 12 हजार मे.वॅ. आणि जवळपास 4700 चा तुटवडा आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... 3एक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

भविष्यकाळात काय संभवनीय आहे हे आपले दिवास्वप्न आहे.प्रत्यक्षात जोपर्यंत वीज बाजारात येत नाही तोपर्यंत त्यासंबंधी चर्चा करणे योग्य नाही. कारण आपण याठिकाणी सन 2011-12 पर्यंतची आकडेवारी दिली आहे. सभापती महोदया, "प्रगतीपथावरील विद्युत निर्मिती प्रकल्प" या शिर्षकाखाली आपण माहिती दिली आहे. नवीन परळी टप्पा क्र. 1 हा 250 मेगावॅट प्रकल्प कार्यान्वित आहे.

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : सभागृहाची वेळ 5 वाजेपर्यंत होती. या प्रस्तावावरील चर्चा 3 वाजून 44 मिनिटांनी सुरु झाली असून 6 वाजून 14 मिनिटापर्यंत चालेल. तोपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे. तसेच, या प्रस्तावावर अजून 14 माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे, ते सर्व माननीय सदस्य जरी सभागृहात उपस्थित नसले तरी आता उपस्थित असलेल्या सर्व माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, पारस विस्तार प्रकल्प टप्पा क्र. 1, 250 मेगावॅट हा मार्च 2008 पर्यंत पूर्ण होईल, पारस विस्तार प्रकल्प टप्पा क्र. 2, 250 मेगावॅट हा प्रकल्प जून 2009 पर्यंत पूर्ण होईल, नवीन परळी विस्तार प्रकल्प क्र.2, 250 मेगावॅट हा प्रकल्प एप्रिल 2009 पर्यंत पूर्ण होईल, खापरखेडा विस्तार प्रकल्प 250 मेगावॅट हा प्रकल्प जून 2010 पर्यंत पूर्ण होईल, भुसावळ विस्तार प्रकल्प युनिट 1, 500 मेगावॅट हा प्रकल्प ऑगस्ट 2010 पर्यंत पूर्ण होईल, भुसावळ विस्तार प्रकल्प युनिट 2, 500 मेगावॅट हा प्रकल्प डिसेंबर 2010 पर्यंत पूर्ण होईल. सभापती महोदया, ही उपलब्ध झालेली माहिती भविष्यकालीन आहे. आम्ही भविष्याकडे पहात नाही. आजचे लोड शेडींग कमी कसे होईल, आजचा विजेचा तुटवडा कमी कसा होईल आणि लोकांचे हाल कमी कसे होतील, विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याकरिता वीज कशी उपलब्ध होईल, शेतकऱ्यांना पंप चालविण्यासाठी वीज कशी उपलब्ध होईल असे प्रश्न आज आपल्यासमोर असतांना सन 2012 पर्यंत आपण काय करणार आहोत? त्यासंबंधीचे चित्र रेखाटण्यात अर्थ नाही. आज जास्तीत जास्त वीज कशी उपलब्ध होईल. आणि उपलब्ध असलेली वीज आपण कशी वाचवू शकतो आणि वाचविलेली वीज कुठे खर्च करु शकतो याबाबतची माहिती आपल्याला मिळाली पाहिजे. "टप्पा क्रमांक 3 अंतर्गत प्रस्तावित प्रकल्प" यामध्ये 2010 पर्यंत कार्यान्वित होणाऱ्या प्रकल्पाची माहिती दिली आहे. पारस औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प, परळी औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प, भुसावळ औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प,कोराडी औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प अशी सर्व

DGS/ MMP/ KGS/

श्री. मधुकर सरपोतदार....

माहिती दिली आहे. याठिक्‍ाणी मी वाचून दाखवीत असलेली माहिती ज्यांना उपलब्ध होते ते वाचतात, ज्यांना उपलब्ध होत नाही ते वाचत नाहीत. त्या लोकांना फक्त एकच कळते की,आम्ही अंधारातील जीवन जगत आहोत. आमच्या जीवनामधील अंधार जावून कधीही वीज येणार नाही. अशी अनेक खेडी आज महाराष्ट्राच्या विजेच्या उद्दिष्टापासून मागे राहिली आहेत, त्या गावांमध्ये अजून वीज पोहोचलेली नाही. आपण याठिकाणी प्रत्येक वेळी घोषणा करतो. या राज्यामध्ये 40 हजार खेडी आहेत. त्या प्रत्येक खेडयामध्ये आज अंधाराचे साम्राज्य आहे याचे आम्हाला दुःख होते. आणि म्हणून वीज निर्मितीचा कार्यक्रम राबवितांना माझी सत्ताधारी पक्षाला विनंती आहे की, आपण वस्तुस्थितीला सामोरे गेले पाहिजे. आपल्यावर करावयाची म्हणून मी टीका करीत नाही. आपण वस्तुस्थितीला सामोरे जाऊन त्यामधून मार्ग कसा काढावयाचा यासाठी प्रयत्न करणे हा महत्वाचा भाग आहे. ते प्रयत्न आपण करणार काय? याचे उत्तर अपेक्षित आहे.

सभापती महोदया, ज्याठिकाणी प्रत्यक्ष वीज जनरेट होते त्याबाबत मला सांगितले पाहिजे. आपल्या कार्यक्षमतेविषयी बऱ्याच वेळा उल्लेख केला गेला. आपल्या चंद्रपूरच्या प्लॅाटमध्ये मेंटेनन्स इंजिनिअर म्हणून कॉट्रॅक्टर नेमला आहे, तो क्वॉलिफाईड इंजिनिअर नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:05

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

हा कोणीतरी वशिल्याचा माणूस नेमलेला आहे आणि त्याच्या हाताखाली सगळे क्वॉलीफाईड इंजिनिअर आणि इतर कर्मचारी काम करतात अशी परिस्थिती आहे. याबाबतीत मी नागपूरच्या अधिवेशनामध्ये देखील उल्लेख केला होता. यासंदर्भात कोणती पावले उचलली गेली याची माहिती अजून मिळालेली नाही. अनेक ठिकाणी जनरेटर नादुरुस्त होतात. ते दुरुस्त करुन सुरु केल्यानंतर पुन्हा 15 दिवसांनी ते बंद पडतात. मग परत ते दुरुस्त केल्यावर सहा महिन्यांनी पुन्हा बंद पडतात अशी परिस्थिती सर्व प्रकल्पांच्या ठिकाणी सुरु आहे. अशा ठिकाणी कोणाच्या तरी खास वशिल्याची माणसे नेमण्यात आली आहे. एक साधी गोष्ट आहे की, मी मध्यंतरीच्या काळामध्ये समितीमध्ये एक प्रश्न उपस्थित केला होता आणि त्यावेळी आम्ही कोल इंडियाच्या संबंधित अधिकाऱ्यांनाही समितीसमोर बोलविले होते. कोळशातून जो दगड येतो, तो बेल्टवरुन उचलण्यासाठी श्री.चंडी नावाचा कॉन्ट्रॅक्टर नेमण्यात आला. तो आंध्र प्रदेश मधील आहे. हा कॉन्ट्रॅक्टर 1986-87 पासून जवळजवळ 15 वर्षे तेथे आहे. त्याची मोनॉपॉली असून त्याच्याशिवाय दुसरा कोणी कॉन्ट्रॅक्टर मिळतच नाही अशी महाराष्ट्र राज्यात परिस्थिती निर्माण झालेली आहे. याचा अर्थ असा होतो की, त्याने जी माणसे आणलेली आहेत, ती स्पेशलाईज असतात. तसेच मला असे उत्तर देण्यात आले होते की, हे स्किल्ड वर्क आहे. त्याठिकाणी कन्व्हेटरवरुन कोळसा जातो, त्यावेळी त्यामध्ये आलेला दगड उचलून बाहेर टाकावयाचा. आंध्र प्रदेशमधून स्पेशलाईज माणसे बोलविलेली आहेत. त्यांना फक्त दगडच दिसतो, कोळसा दिसत नाही. अशी त्यांची खास व्यवस्था आहे आणि ते स्कील्ड कामगार आहेत असे मला तुमच्या एका जबाबदार अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले. मला हे समजत नाही की, ज्या कामगारांना कोळसा आणि दगड यातील फरक समजत नाही, ते स्कील्ड कामगार कसे असू शकतात ? तेथे कोणताही अनस्कील्ड माणूस, ज्याच्या कडे कोणतेही स्कील्ड नाही अशी माणसे देखील तेथे काम करु शकतात. पण तरी देखील अशा प्रकारची माहिती देण्यात आली. अशा पध्दतीने वीज मंडळामध्ये ज्याप्रकारे कारभार सुरु आहे, त्यावर लक्ष ठेवण्याची खूप आवश्यकता आहे. पण तसे लक्ष ठेवले जात नाही, त्यामुळे मंडळाचा अशा प्रकारे बराच अनाठायी पैसा खर्च होत आहे. तुम्ही तुमच्या स्टोअरच्या इन्व्हेन्टरीची माहिती घेतली तर असे दिसून येईल की, याठिकाणी खूप मोठया प्रमाणात अनावश्यक वस्तू ठेवल्या जातात, सिमेंटच्या वस्तू ठेवल्या जातात.खूप मोठा साठा करुन ठेवला जातो.स्टोअरमध्ये आवश्यक

. . . .3वाय-2

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

त्या वस्तू जरुर ठेवावयास पाहिजे, त्या ठेवल्याच पाहिजेत. त्याबाबतीत दुमत असण्याचे काही कारण नाही. स्टोअरमध्ये किती प्रकारची इन्व्हेन्टरी ठेवावयाची ? किती महिन्याचा स्टॉक ठेवावयाचा ? याबाबतीत सुध्दा ॲडमिनिस्ट्रेशनच्या दृष्टीकोनातून काही नियम आहेत. हे नियम पाळावयाचे आहेत की नाहीत ? हा प्रश्न आहे. तसेच आपण ज्या वस्तू आणतो, त्या स्टॅण्डर्ड कंपनीच्या आहेत की नाही हे देखील पाहण्याची आवश्यकता आहे. त्यांची क्वॉलिटी चांगली आहे की नाही हे पाहण्याची आवश्यकता आहे. परचेस डिपार्टमेंटकडून करण्यात आलेली खरेदी, या वस्तू वापरणारे लोक या सर्व बाबींकडे मंडळाने लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे. आपण विद्युत मंडळाच्या तीन कंपन्या स्थापन केल्या आहेत. त्या मागील उद्देश हाच होता की, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ हे समर्थपणे काम करीत नाही. अशा वेळी या मंडळाचा कारभार तीन ठिकाणी विभागला तर तेथे जास्त चांगल्या प्रकारचे ॲडमिनिस्ट्रेशन आणून योग्य प्रकारे कामकाज करु शकतो या उद्देशाने तीन कंपन्या निर्माण केल्या. तुम्ही 2002 मध्ये जी श्वेतपत्रिका काढली होती, ती वाचून दाखविली, कारण या कंपन्या स्थापन करताना काय उद्देश होता आणि आज त्यातून काय ॲचीव्ह केले आहे, काय संपादन केले आहे यादृष्टीने विचार करण्याची नितांत आवश्यकता आहे. तसे आपण करणार आहोत काय ? यादृष्टीकोनातून आपण विचार केला पाहिजे. लोकांना वीज मिळत नाही म्हणून लोकांच्या मनामध्ये राग आहे, चीड आहे. त्यामुळे वीज केंद्रावर हल्ले केले जातात.एखाद्या केंद्रावरील अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासणे, त्यांना दगड मारणे किंवा त्यांच्यावर हल्ला करणे याचे मी समर्थन करीत नाही. पण शेवटी लोकांच्या सहनशीलतेच्या पलिकडे गोष्टी गेल्या तर माणसे काय करु शकतात, याचे उत्तर शोधण्याची गरज आहे. लोकांची सहनशीलता संपू नये यासाठी मंडळाच्या अधिकाऱ्यांनी प्रिव्हेन्टीव्ह ॲक्शन घेतल्या पाहिजेत, त्या घेतल्या जात नाहीत. लोकांना कर्मचाऱ्यांकडून योग्य प्रकारे उत्तरे दिली जात नाहीत आणि मग त्याचा परिणाम होऊन लोक आक्रमक होतात. एकदा लोक आक्रमक झाल्यावर त्यांची विचार शक्ती काम करीत नाही, तर त्यांची क्रय शक्ती काम करु लागते. अशा वेळी त्याची पहिली प्रतिक्रिया कोणती होते ? तर अशा वेळी कोणावर तरी हल्ला केला जातो. तसे करुन लोकांच्या मनाला समाधान मिळते, परंतु असे करुन आपण कायद्याच्या कचाटयात अडकत आहोत हे लोक विसरतात. आज राज्यामध्ये खून, बलात्कार इ.प्रकार होत आहेत. याचे एकमेव कारण आहे की,

. . . .3 वाय-3

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

आपला जनतेशी संवाद कमी होत आहे.पोलीस आपले मित्र आहेत असे समजून त्यांच्याशी वागले जात नाही. पण पोलिसांची देखील अशी परिस्थिती झालेली आहे की, ते जनतेशी मित्र म्हणून वागत नाहीत. त्यामुळे आज समाजामध्ये अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की, सगळया ठिकाणी टक्क्याचे काय ते बोला अशी भाषा केली जाते. पोलीस स्टेशनमध्ये एखादी केस आणल्यानंतर मला काय देणार ते बोला असे विचारले जाते.मग ती केस रेकॉर्ड केली जाते.एफ.आय.आर.नोंदविण्यासाठी सुध्दा पैसे द्यावे लागतात अशी राज्यातील परिस्थिती आहे. वीज मंडळाच्या बाबतीत सुध्दा अशाच प्रकारचा अनुभव आहे. काही भागांचा उल्लेख करावयाचा तर मालेगाव, भिवंडी येथील परिस्थिती काय आहे ? तेथे विजेचे कन्झमशन किती आहे ? किती पैसे वसूल होतात ? किती रिकव्हरी शिल्लक आहे ? ही माहिती मिळाली पाहिजे. जर ही माहिती समोर आली तर आपण नक्की कशामध्ये कमी पडतो याचाही विचार केला करता येईल. तसेच वीज निर्मिती केल्यानंतर चोरीमुळे, गळतीमुळे एकंदर किती वीज फुकट जाते याचाही विचार केला पाहिजे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

त्यातील किती वीज गळतीमुळे वाया जातो कोठली लाईन टाकली जातात ,कोठल्या प्रकारचे पोल वापरले जातात, तसेच किती ठिकाणी खड्डे खणले जातात हे सर्व पाहण्याची आवश्यकता आहे. या सर्व गोष्टी आपण तपासून पाहिल्या तर सर्व प्रश्नांची उत्तरे आपल्याला मिळू शकतील. वीज गळतीच्या संदर्भात हा विषय येथे मांडण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, आज आपण वीजेच्या संदर्भात येथे चर्चा घेतली आहे त्याचे एकमेव कारण हे आहे की, आज राज्यातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरु आहे. या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर दिव्याची सोय उपलब्ध होऊ शकेल, तेथील पंखे चालू शकतील या करिता आम्ही माननीय मंत्री महोदयांना विनंती केली होती. परंतु माननीय मंत्री महोदय विद्यार्थ्यांना ही सुविधा देऊ शकले नाही. त्यांची काही प्रॅक्टीकल डिफिकल्टी आहेत हे मला माहीत आहे. अशा प्रकारच्या अडचणी भविष्यामध्ये निर्माण होणार आहे व त्याकरिता आपण उपाययोजना करणे आवश्यक आहे. खरे तर तहान लागल्यावर विहिर खोदण्यासारखा हा प्रकार आहे.

सभापती महोदय,वीजेचे वितरण योग्य प्रकारे व्हावे, जनतेला वीज उपलब्ध व्हावी या दृष्टीकोनातून वीज मंडळाचे विभाजन करण्यात आले व त्याचे रुपांतर 3 कंपन्यांमध्ये करण्यात आले. जनतेला सोयी सुविधा देण्याचा प्राथम्यक्रम ठेवला पाहिजे असा दृष्टीकोन या वीज कंपन्यामधील अधिकाऱ्यांचा असला पाहिजे. परंतु असे होताना दिसत नाही. जनतेच्या समस्या काय आहेत, त्यांच्या काय अडचणी आहेत याची कोणालाच जाणीव नसते. जनतेला सहन कराव्या लागणाऱ्या गोष्टी आपण पाहिल्या तर असे वाटते की, विभागातील जनसंपर्क अधिकारी काय करीत आहेत ?

सभापती महोदय, अनेक वेळा विधी मंडळामध्ये प्रश्न उपस्थित केले जातात. येथे त्यावर चर्चा होते. एकमेकांवर आरोप प्रत्यारोप होतात. मात्र कोणताही कायम स्वरुपी ईलाज केला जात नाही. सभागृहामध्ये जी आश्वासने दिली जातात त्यांची पूर्तता केली जात नाही. माननीय मंत्री महोदय जे आदेश, निर्देश देतात त्यांचे पालन कोणीही करीत नाही.

सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, मी आता थोडयाच कालावधीकरिता सदनामध्ये उपस्थित आहे. आता 24 एप्रिल पासून मी निवृत्त होत आहे. परंतु मला याबाबत

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

काहीही वाईट वाटत नाही. खरे तर सदनात येताना एक प्रकारचा आनंद असतो. मी पूर्वी लोकसभेमध्ये होतो. तेथे काम करताना मला आनंद मिळत होता. त्यावेळी संघर्ष करुन आम्हाला रिझल्टस मिळत होते. तेथे प्रश्न विचारल्यावर त्याचे उत्तर मिळते. त्यामुळे तेथे काम करण्यात मला आनंद वाटत असे. परंतु येथे परिस्थिती अशी आहे की, प्रश्न ऐकल्यावर केवळ होय म्हटले जाते. आश्वासने देतात आणि त्यानंतर ती कोठे विरुन जातात हे कोणालाच माहीत नाही. अशाच पद्धतीने सर्व मंडळांचा कारभार सुरु आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, असेच जर सुरु राहिले की, महाराष्ट्र राज्याचे बिहार होण्यास फार अवधी लागणार नाही.

सभापती महोदय,बिहारमधील विधानसभेत मी गेलेलो आहे. एस्टीमेट कमिटीचा चेअरमन असताना तेथील चीफ सेक्रेटरीशी मी चर्चा केलेली आहे. त्या सर्वांच्या मी मुलाखती घेतल्या आहेत. मी देशातील बऱ्याच अनेक विधानसभेमध्ये गेलेलो आहे. तेथील परिस्थिती प्रत्यक्षात पाहिलेली आहे. Day by day we are deteriorating in the performance of administration. चांगल्या प्रकारचे प्रशासन देशाला देण्याचे काम आयएएसचे असते. भारतीय प्रशासन सेवेने चांगल्या प्रकारचे प्रशासन राज्याला देणे आवश्यक आहे. अशा प्रकारे जर डिटॉरेशनला सुरुवात झाली तर पुढे भविष्यात काय होणार आहे हे मला माहीत नाही.

सभापती महोदय, दरवाढीच्या मुद्यासंदर्भात मी या ठिकाणी बोलू इच्छित आहे. प्रत्येक वेळी 20 टक्के दरवाढ केली जाते. आज रिलायन्स कंपनीने दरवाढ केलेली आहे.प्रत्येक वीज कंपनी वीज दरवाढ करण्याची मागणी करीत असते. सेवा काही नाही मात्र केवळ दरवाढ केली जाते. अशी मोठीच चमत्कारिक परिस्थिती सध्या राज्यामध्ये निर्माण झालेली आहे. आपण जर जनतेला चांगल्या सेवा सुविधा दिल्या तर जनता आपल्याला स्वखुषीने दरवाढ करुन देईल. काही ठिकाणी मिटरचे रिडींग प्रत्यक्षात घेतले जात नाही. जी व्यवस्था निर्माण केली जाते ती यशस्वी होते की नाही हे पाहण्याची आवश्यकता आहे. लोक काम करीत नाही. काम करतो असे केवळ सांगतात परंतु प्रत्यक्षात काहीही करीत नाहीत त्यामुळे आपल्याला रिझल्टस मिळत नाहीत. यालाच आपण ॲडमिनिस्ट्रेशन असे म्हणतो. Once you start compromising with administration then there is no end to it. म्हणून प्रत्येक बाबीमध्ये अनुशासन असणे आवश्यक आहे असे

3..

श्री. मधुकर सरपोतदार....

माझे मत आहे. मी देखील आयुष्यात अनुशासन केलेले आहे. एखाद्याने चूक केली तर त्याला सजा झाली पाहिजे. या बाबत मी आपणाला एक छोटेसे उदाहरण देतो. समजा एखाद्या व्यक्तीने विजेच्या एका लाईव्ह लाईनला हात लावला तर काय होईल ? त्याला विजेचा झटका बसेल. त्यावेळी माझे चुकले,मला माफ करा असे सागितले तर ते चालेल काय ?

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ...

जसे त्या ठिकाणी चालत नाही तसे नेहमीच्या जीवनात सुध्दा चालणार नाही. माणसाने शिस्त ठेवली पाहिजे. या ठिकाणी विजेसारख्या महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु आहे. या सभागृहातील कमी उपस्थिती ही शोकांतिका आहे. या गोष्टीचे आपल्याला दु:ख होते. किती सन्माननीय सदस्यांना याबाबत काळजी आहे ? भार नियमनामुळे शेतकऱ्याच्या पंपाला वीज मिळत नाही त्यामुळे त्याला शेतीला पाणी देता येत नाही. विहिरीतून पाणी उपसता येत नाही. शेतीला पाणी मिळत नाही. जनावरांना पाणी मिळत नाही. अशी परिस्थिती असताना सभागृहामध्ये अशी कमी उपस्थिती आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी, आपण उपस्थित आहात हे मान्य आहे. हे सदन कशासाठी आहे ? ज्यावेळी निवडून यावयाचे असते त्यावेळी कसा घोडेबाजार होतो हे मला माहीत आहे. मी सगळ्या गोष्टी मागे वळून बघतो. आमच्या शिक्षक सहकाऱ्यांनी एक शिफारस दिलेली होती. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेब उपस्थित आहेत. ते नेहमीच उपस्थित असतात पण शिक्षकांचा प्रश्न मिटला की बाकीचे सगळे शिक्षक प्रतिनिधी मित्र सभागृहाच्या बाहेर जातात. शॉक आणि शिस्तीबद्दल बोलताना शिक्षकांचा विषय आला. ज्या शिक्षकांनी संस्कार करावयाचे असतात त्याच शिक्षकाच्या प्रतिनिधींनी असे केले तर कसे चालेल. मी वीज या विषयाला धरुनच बोलत आहे. आपण मागचे अहवाल दिलेले आहेत. विजेच्या बाबतीत खूप बोलण्यासारखे आहे परंतु वेळा थोडा आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच अन्य सन्माननीय सदस्यांना सुध्दा बोलावयाचे आहे. ते अन्य मुद्दे मांडणार आहेत. माझे मुद्दे वेगळे आहेत. एका सन्माननीय सदस्याचा मुद्दा दुसऱ्या सन्माननीय सदस्याने घेऊ नये. सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

श्री. अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, विजेच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. आज वीज हा शब्द अतिशय महत्वाचा आणि परवलीचा झालेला आहे. The life of people is centred around electricity. अशा पध्दतीचे आजचे जीवन आहे. रोटी, कपडा आणि मकान यापेक्षाही आपल्याला विजेची जास्त गरज आहे. विजेची भूक ही भाकरीच्या भुकेपेक्षा जास्त मोठी झालेली आहे. अशा परिस्थितीमध्ये एक आव्हान म्हणून सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी हे खाते स्वीकारलेले आहे. हे एक आव्हान आहे आणि हे आव्हान मी संधी म्हणून स्वीकारत आहे आणि महाराष्ट्रापुढचा विजेचा प्रश्न, विजेची समस्या सोडविण्याच्या संदर्भात तळमळीने प्रयत्न आणि अविश्रांत परिश्रम करण्याच्या संदर्भात त्यांनी या खात्यामध्ये लक्ष घातलेले आहे.

सभापती महोदया, मी फार थोडक्यात माझे विचार मांडणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी, राजकारण न आणता चांगल्या पध्दतीने हा विषय मांडला आणि त्याची आज गरज आहे. विजेच्या दरडोई वापरावरुन त्या राज्याच्या किंवा त्या देशाच्या नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा लक्षात येतो. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीमध्ये प्रत्येक राज्याची माहिती दिलेली आहे. विजेचा कशा पध्दतीने दरडोई वापर करतात हे त्यामध्ये दिलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे विजेच्या वापराच्या संदर्भात महाराष्ट्राचा क्रमांक पहिला राहिलेला नाही. विजेच्या संदर्भात तीन मुद्दे महत्वाचे आहेत. पहिला मुद्दा उत्पादनाचा आहे. दुसरा मुद्दा स्वस्त व दर्जेदार वीज निर्मितीचा आहे. तिसरा मुद्दा पारेषणातील तूट कमी करण्याबाबतचा आहे. आपल्याकडे वीज कमी आहे हा एकच मुद्दा नाही. विजेची दरवाढ होत आहे. पाच रुपये, सहा रुपये, सात रुपये प्रती युनिट दर झालेला आहे. त्यामुळे महाग वीज हा वेगळा एक प्रश्न आपल्यासमोर आहे. ही महाग वीज स्वस्त कशी होईल यासंदर्भात विचार होणे आवश्यक आहे. अणू कराराच्या दृष्टीने किती प्रयत्न झाले हा आजचा विषय नाही. परंतु वीज स्वस्त करण्याच्या संदर्भातील आव्हान आपल्याला स्वीकारावयाचे आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

पारेषणमधील तूट कमी करणे. 12 वर्षापूर्वी या राज्याची पारेषणाची तूट 15 टक्के होती. आदरणीय श्री.शरद पवार हे राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी तत्कालीन ऊर्जा मंत्र्यांना असे सांगितले होते की, 1 टक्का वीज वाचविली तर 200 कोटी रुपये वाचतात. याबाबतीतील आज काय परिस्थिती आहे ते मला माहीत नाही. पण हा विषय महत्वाचा आहे. उत्पादन तुमच्या हातात नसेल परंतु पारेषणातील तूट कमी करणे हे निश्चितपणे आपल्या हातामध्ये आहे. ती तूट टाळता येते. सभापती महोदया, विजेचा तुटवडा केवळ महाराष्ट्रात आहे अशातील भाग नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मघाशी सांगितले की, गुजरात राज्यात 3300 मे.वॅटचा तुटवडा आहे. त्या राज्याची तुलना केली तर महाराष्ट्रात 5500 मे.वॅट इतका तुटवडा आहे ही वस्तुस्थिती आहे. देशाचा विचार केला तर मागील वर्षी 70 हजार मे.वॅट इतका तुटवडा होता आणि यावर्षी 1 लाख मे.वॅट आहे आणि पुढील वर्षात तो 1.5 ते 2 लाख मे.वॅट पर्यंत जाणार आहे. त्यामुळे केंद्र सरकारकडून राज्याला वीज मिळेल अशी आशा करणे उचित होणार नाही. त्याऐवजी आपणच आपली वीज कशी वाचवू शकू यावर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. 1 युनिट वीज वाचविली तर 2 युनिट विजेचे उत्पादन झाले असे म्हणण्याइतपत त्याला महत्व आहे.

सभापती महोदया, वीज निर्मितीसाठी भांडवलाची भूक मोठी आहे. सध्या आहे ते भांडवल कमी पडत आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, मागील काळामध्ये दरवर्षी अर्थसंकल्पात 250 ते 500 कोटी रुपयांपर्यंत तरतूद केली जात होती. मागील 10-12 वर्षात अशाप्रकारची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. तथापि, यावर्षी शासनाने 2500-3000 कोटींची तरतूद केलेली आहे. त्याची गरज होती आणि ती केल्याबद्दल शासनाला धन्यवाद देण्यास काही अडचण नाही. विजेच्या भांडवलाची गरज केवळ अर्थसंकल्पाच्या माध्यमातून पूर्ण होणार नाही. ही गरज खाजगी गुंतवणूकीच्या माध्यमातून भागविणे हे आत्यंतिक महत्वाचे आहे. ज्यावेळी खाजगी गुंतवणूकदार गुंतवणूक करतात त्यावेळी नफ्याचा हिशेब करुनच त्यांनी गुंतवणूक केलेली असते. खाजगी गुंतवणूकीतून किती वीज मिळणार आहे ? हाही एक प्रश्न निर्माण होतो. या माध्यमातून उपलब्ध होणारी वीज आत्यंतिक महागडी असेल आणि ती आपल्याला कशी परवडणार हा महत्वाचा मुद्दा आहे.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.अरुण गुजराथी.....

सभापती महोदया, पवन ऊर्जेच्या माध्यमतून 5 ते 6 हजार मे.वॅाट वीज निर्माण होऊ शकते. काही दिवसांपूर्वी 1 मॅ.वॅाट विजेच्या निर्मितीसाठी 2 कोटी रुपये इतका खर्च येत होता, आता 5 कोटी रुपये खर्च येतो अशी माहिती मिळाली आहे. म्हणजे आता पवन ऊर्जा सुध्दा महाग होत आहे. ही महाग वीज राज्याला परवडणार नाही. जलविद्युत निर्मितीबाबत आपण मागे आहोत, ही वस्तुस्थिती आहे. त्याला भौगोलिक कारण आहे. आपण आहे त्या पाण्याचा वापर योग्य पध्दतीने करु शकत नाही. प्रत्येक धरण बांधत असताना विजेची निर्मिती किती होऊ शकते याचा विचार करणे आवश्यक आहे. विजेची पारेषण तूट 39 टक्के होती ती 26 टक्के झालेली आहे आणि 15 टक्क्यापर्यंत खाली आणण्याचे ध्येय ठेवलेले आहे, असे माझ्या वाचण्यात आले आहे. यामध्ये विजेची चोरी किती आणि गळती किती हे दोन महत्वाचे भाग आहेत. शासनाने विजेची वितरण व्यवस्था मजबूत केली पाहिजे. जोपर्यंत ही व्यवस्था होत नाही तोपर्यंत तूट भरुन काढणे अवघड वाटते. राज्यातील 33 के.व्ही.चे उपकेंद्र, 220 के.व्ही.चे उपकेंद्र यासंबंधीचे मी नियोजन पाहिलेले आहे. एखाद्या ठिकाणी 33 के.व्ही.ची 5-6 उपकेंद्रे असतील त्याची संख्या दुप्पट करण्याचा विचार केला पाहिजे. 220 के.व्ही.ची उपकेंद्रे मजबूत करण्याचा विचार केला पाहिजे. कंडक्टर्समध्ये बदल करावा लागेल, ट्रान्सफॉमर्स बदलावे लागतील. या गोष्टींकडे सरकारने जादा लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:25

(श्री. अरुण गुजराथी....)

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

वितरणासाठी बाहेरचा भांडवलदार येणार नाही. वितरण व्यवस्थेत तो कदाचित गुंतवणूक करणार असेल तर त्यासंदर्भातील माहिती द्यावी. प्रोडक्शनसाठी कोणीही भांडवलदार उभा राहील पण वितरणासाठी कोणीही उभा राहाणार नाही. वितरण व्यवस्थेमधील भांडवली गुंतवणुकीसाठी त्याला 10-12 टक्के व्याज मिळाले तरच तो वितरण व्यवस्थेत येईल. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपल्या राज्यामध्ये विजेची चोरी फार मोठ्या प्रमाणात होते आणि त्यामुळे जे प्रामाणिकपणे वीज बिल भरणारे आहेत त्यांच्यावर दंड आकारला जातो. मघाशी सन्माननीय सदस्यानी फ्युएल ॲडजस्टमेंट चार्जचा उल्लेख केला. फ्युएल ॲडजस्टमेंट क्लॉज हा मागील 20 वर्षापासून आहे. मागील दोन-तीन वर्षापासून विजेची गळती वाढलेली आहे. त्याचा दंड देखील प्रामाणिकपणे वीज बिल भरणा-यांवर टाकला जातो....

श्री. मधुकर सरपोतदार : माझेही म्हणणे तेच होते की, फ्युएल ॲडजस्टमेंट चार्ज हा प्रामाणिकपणे वीज बिल भरणा-यांवर लादला जातो.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, हा टीकेचा भाग आहे असे मी मानत नाही. या विजेच्या संदर्भात आपणाला काय सुधारणा करता येईल याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आपणाला वीज साठवून ठेवता येत नाही. ही वीज आपण साठवून ठेवू शकू का या संदर्भात संशोधन करता येत असेल तर त्याही विषयाकडे पहाणे गरजेचे आहे. काही वेळा रात्रीच्या वेळी वीज जास्त होते आणि ती वाया जाते. या वाया जाणा-या विजेचा वापर आपण कशा पध्दतीने करु शकू हे देखील लक्षात घेणे अत्यंत गरजेचे आहे. माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, अणुऊर्जा ही आपल्याला 9 पैसे युनिट दराने मिळू शकते. म्हणजे ही वीज किती स्वस्त मिळू शकते. अणुऊर्जेचा विषय ही केन्द्र शासनाच्या अखत्यारितील बाब आहे. परंतु अणुऊर्जा स्वस्त मिळू शकते म्हणून तो मुद्दा मी मुद्दाम येथे नमूद केलेला आहे. माननीय ऊर्जा मंत्र्यांनी पुणे पॅटर्न राबविला होता. जितकी विजेची तूट येत होती तितकी ती भरुन काढायची या पॅटर्नप्रमाणे पुण्याला 24 तास वीज मिळत होती. परंतु आता पुण्यामध्येही लोड शेडींग होत आहे. त्यामुळे वर्तमानपत्रातून "पुणे पॅटर्न गेला आणि उणे पॅटर्न आला" अशा मथळयाच्या बातम्या माझ्या वाचनात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरुण गुजराथी...)

आलेल्या आहेत. हा पुणे पॅटर्न पुन्हा सुरु करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. राज्यातील औरंगाबाद, नागपूर या सारख्या 20-30 लाख लोकसंख्या असलेल्या शहरामध्ये तीन-चार तास लोडशेडिंग होणे उचित नाही. याचा अर्थ असा नाही की लोडशेडिंग फक्त ग्रामीण भागातच व्हावे. ग्रामीण भागामध्ये आपण सिंगल फेजिंग करीत आहोत. पुणे पॅटर्न यशस्वी ठरत असेल तर तो राबविण्याच्या दृष्टीने विचार केला पाहिजे. सभापती महोदय, मी या चर्चेच्या माध्यमातून सदनाला सांगू इच्छितो की, 4-6 महिन्यामध्ये वीज निर्माण होऊ शकत नाही, त्यासाठी किमान 4-5 वर्षे लागतात. म्हणून त्या संदर्भात मास्टर प्लॅन असणे महत्वाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी आकडेवारी दिली. माझ्याकडे देखील ती आकडेवारी आहे. मी त्याची पुनरावृत्ती करु इच्छित नाही. परंतु 2012 पर्यन्त विजेच्या बाबतीत आपले राज्य हे सरप्लस असेल. आपल्याकडे 650 मेगावाट सरप्लस वीज राहील. 10-12 वर्षापूर्वी आपण कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजराथ या राज्यांना वीज विकत होतो आणि त्या राज्यांकडून आपल्याला 200-300 कोटी रुपये महसूल मिळत होता. मला आठवते त्यावेळी सभागृहामध्ये असे प्रश्न विचारले जायचे की, शेजारच्या राज्यांना दिलेल्या विजेपोटी त्या राज्यांकडून किती रक्कम येणे बाकी आहे ? ती येण्यासाठी राज्य शासनाने कोणते प्रयत्न केले आहेत ? नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ? आज ती परिस्थिती नाही. आपणाला दुस-यांकडून महागडी वीज घ्यावी लागत आहे. तेव्हा वीज साठवून ठेवता येऊ शकेल का आणि कमी कालावधीत वीज निर्माण करता येऊ शकेल का याबाबतीत संशोधन होऊ शकत असेल तर त्याचाही विचार केला पाहिजे. नॅशलन ग्रीड मधून इतर राज्ये वीज खेचून घेतात आणि महाराष्ट्राच्या विदर्भ, मराठवाड्यातील 10 जिल्हे अंधारात जातात. तेव्हा अशा प्रकारे इतर राज्ये वीज खेचून घेणार नाहीत याबाबीत आपण अतिशय दक्ष राहिले पाहिजे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी....

आणि अशा पध्दतीने वीज खेचून घेता येणार नाही अशा प्रकारची विनंती केंद्र शासनाला राज्य शासनाने केली पाहिजे. राज्य सरकारची काही चूक नसताना वीज खेचून घेण्याच्या प्रकारामुळे अर्धा महाराष्ट्र अंधारात जातो ही गोष्ट मला तरी योग्य वाटत नाही. या ठिकाणी फ्रेन्चाईसी संदर्भात उल्लेख केला गेला. काही शहरामध्ये फ्रेन्चाईसी दिल्या आहेत. माझे तर असे म्हणणे आहे की, फ्रेन्चाईसी वाढविण्यास हरकत नाही. नागपूरला क्रॉम्प्टन ग्रीव्हज्‌ला आपण फ्रेंन्चाईसी दिली आहे. भिवडी येथील टोरॅन्टो कंपनीला फ्रेन्चाईसी दिली आहे. मोठया शहरातील जे मोठे उद्योग आहेत त्यांना फ्रेन्चाईसी दिली तर त्याचा चांगला परिणाम होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी दगड आणि कोळसा यासंबंधीचा विषय उपस्थित केला आहे. कोळसा विकतात आणि दगड विकत घ्यावे लागतात असाही उल्लेख या ठिकाणी केला. परंतु याबाबतीत मी सांगू इच्छितो की, आजची परिस्थिती अशी आहे की, महाराष्ट्रराला जेवढा कोळसा पाहिजे तेवढा कोळसा उपलब्ध नाही. महाराष्ट्राला इतर राज्यातून, इतर देशातून कोसळा विकत घ्यावा लागतो. कोळसा आयात केल्यामुळे वीज निर्मितीची किंमत वाढते. वीज निर्मितीचे क्षेत्र अतिशय कठीण झाले आहे. एक तर वीज निर्मिती होत नाही, वीज निर्मिती केली तर ती अत्यंत महागडी पडते. महागडी वीज निर्मिती करुन देखील ती 24 तास मिळेल याची खात्री नाही. सध्या राज्यात सहा तास, आठ तास लोडशेडींग होत आहे. राज्यातील जनतेने लोडशेडींग स्वीकारलेले आहे. परंतु लोडशेडींगचे आठ तास संपल्या नंतर वीज पुरवठा खंडीत झाला तर आपल्या अधिका-यांकडून सांगितले जाते की, वीज पुरवठा वरुन खंडीत झालेला आहे. हा प्रकार कसा कमी करता येईल यासंबंधी देखील ऊर्जा विभागाने अभ्यास करावा अशी माझी विनंती आहे. राज्यातील जनता लोडशेडींगवर नाराज नाही. परंतु लोडशेडींगचा कालावधी संपल्यानंतर परत अर्ध्या तासात, एक तासात वीज खंडीत झाली असे होऊ नये म्हणून यासंदर्भात काही करता आले तर त्यासाठी प्रयत्न करावा अशी देखील माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पाच वर्षात 30 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन 8290 मे.वॅ.विजेची निर्मिती होईल. ही वीज निर्मिती झाल्यानंतर त्याची पारेषणची जबाबदारी कोणाची राहील यासंबंधीची माहिती माननीय मंत्र्यांनी या ठिकाणी दिली पाहिजे. महानिर्मिती, महावितरण,

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/

श्री. अरुण गुजराथी...

महापारेषण यास विरोध असण्याचे कारण नाही असे मला वाटते. काही सन्माननीय सदस्यांनी महानिर्मिती, महावितरण, महापारेषण यास हरकत घेतली. देशात अनेक ठिकाणी आपल्या पक्षाची सत्ता आहे. त्या ठिकाणच्या शासनाने सुध्दा अशा प्रकारे वेगवेगळे विभाग केले आहेत. महानिर्मिती, महापारेषण, महावितरण अशा कंपन्या निर्माण केल्यामुळे काय लाभ झाला यासबंधीची माहिती सभागृहात सांगितली गेली पाहिजे. या कंपनीचे तीन वेगवेगळे भाग केले त्यामुळे ॲडमिनिस्ट्रेशन कॉस्ट किती कमी झाली ? इफिशियन्सी कशी वाढली ? यासंदर्भातील माहिती सभागृहाला माननीय मंत्र्यांनी देणे गरजेचे आहे. या ठिकाणी सांगितले गेले की, 8290 मेगावॅट वीज निर्माण होणार आहे, त्याचप्रमाणे केंद्रीय प्रकल्पाच्या माध्यमातून 2500 मे.वॅ.वीज मिळेल. खाजगी वीज प्रकल्पातून 300 मे.वॅ.वीज मिळेल. वीज निर्मिती संदर्भात टाटा, रिलायन्स, इस्पात, इस्सार, सिडको, जिन्दाल, जी.एम.आर. इत्यादी कंपन्यांबरोबर सरकारचे सामंजस्य करार झालेले आहेत. त्यासंबंधी पाठपुरावा करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, वीज चोरीच्या बाबतीत अजामीनपात्र गुन्हयाची तरतूद सरकारने केलेली आहे. महाराष्ट्रातच वीज चोरीच्या बाबतीत अटक करतो अशातला भाग नाही. या तरतुदीमुळे देशातील संपूर्ण शेतक-यांवर परिणाम झालेला आहे. वीज चोरी प्रकरणी या राज्यातीलच शेतक-यांना आणि ग्राहकांना अटक झालेली नाही तर देशातील इतर राज्यात देखील वीज चोरी प्रकरणासंदर्भात शेतक-यांना आणि ग्राहकांना अटकेची शिक्षा झालेली आहे. एकदा कायदा केला तर त्या कायद्याची अंमलबजावणी अधिका-यांना करावी लागते. या तरतुदीचा वापर विवेकबुध्दीने करावा अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

सभापती महोदय, या सर्व व्यवस्थेचे ऑडीट आपण करत आहोत. इलेक्ट्रीसिटीचे ऑडीट करताना एनर्जी ऑडीट करावे लागते. एनर्जी ऑडीट करणे महत्वाचे आहे. मागच्या वर्षाचे एनर्जी ऑडीट आणि या वर्षाचे एनर्जी ऑडीटमध्ये पॉईंट ऑफ गेन्स ॲन्ड पॉईंट ऑफ लॉसेस यासबंधीची माहिती सभागृहासमोर कधी तरी आली पाहिजे. आपले फार मोठे अहवाल सभागृहात येतात. सर्वच अहवाल वाचतो अशातला भाग नाही. एनर्जी ऑडीटमुळे काय लाभ झाला हे लक्षात येईल. त्याचप्रमाणे डिस्ट्रीब्यूशनचे ऑडीट, प्रॉडक्शनचे ऑडीट करणे देखील महत्वाचे आहे. या

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/

श्री. अरुण गुजराथी...

ऑडीटच्या माध्यमातून आपल्याला जेवढी कार्यक्षमता वाढविता येईल, जेवढी कॉस्ट कमी करता येईल, वीज निर्मिती चांगल्या प्रकारे कशी करता येईल या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. सरकारकडून जे प्रयत्न केले जात आहेत त्या प्रयत्नांना मी शुभेच्छा देतो आणि माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. वीज समस्या ही केवळ महाराष्ट्रात नसून संपूर्ण देशातच आहे. परंतु वीज निर्मिती क्षेत्रात महाराष्ट्र राज्य हे अधोगतीला लागले आहे हे खरे आहे. खरे पाहता आज विदर्भात सर्वात जास्त वीज निर्मिती केली जाते परंतु प्रत्यक्षात संपूर्ण विदर्भ अंधारात आहे. वेळेअभावी मी फक्त महत्वाचे मुद्दे सांगून माझे भाषण संपविणार आहे. शेतकऱ्यांना धान्य दळण्यासाठी किंवा साफ करण्यासाठी राईस मिलमध्ये जावे लागते. परंतु दिवसा लोडशेडींग असल्यामुळे धान्य दळण्यासाठी शेतकऱ्यांना रात्रभर जागावे लागते ही शोकांतिका आहे. आपल्याला लागणारे खाद्य उदा. गहू, ज्वारी किंवा बाजरी दळण्यासाठी दिवसा वीज नसल्यामुळे गिरणीवर रात्रभर जागावे लागते. 5 रुपये किलोचा ग बीपीएल योजनेमध्ये मिळणारा गहू दळण्यासाठी किलोमागे 5 रुपयापेक्षा जास्त खर्च येतो ही खऱ्या अर्थाने गरीब माणसाची पिळवणूक आहे. लोडशेडींग करताना निश्चित असा कालावधी ठरविणे आवश्यक आहे. सकाळी 12 ते 6 किंवा अन्य निश्चित अशा वेळी लोडशेडींग असले पाहिजे. दिवसाचे लोडशेडींग ठेवले नाही तर शेतकऱ्यांना शेतीच्या दृष्टीने आणि धान्य दळण्याच्या दृष्टीने फायदेशीर होणार आहे. रात्रीचे कष्ट करावे लागणार नाहीत. सध्या सीएलएफचे नवीन बल्ब बाजारामध्ये आले आहेत. अत्यंत चांगले असे बल्ब असून त्यामध्ये विजेची बचत होते. परंतु ते अधिक महाग आहेत त्यामुळे सर्वसामान्य माणसाला ते विकत घेणे परवडत नाही. माझी शासनाला विनंती आहे की हे सीएलएफ बल्ब सामान्य माणसाला परवडतील अशा किंमतीमध्ये शासनाने उपलब्ध करुन दिले पाहिजेत. त्यामुळे वीज सुध्दा वाचेल आणि सामान्य माणसाला खर्चही कमी येईल. सभापती महोदय, माझ्याकडे एक वीज मंडळाचे बिल आहे. त्यामध्ये जे विविध आकार लावण्यात आले आहेत त्यात स्थिर आकार 3000 रु., वीज कर 45 रुपये, वीज शुल्क 599 रुपये इतर 193 रुपये असे बिल आकारण्यात आलेले आहे. फेब्रुवारी महिन्याचे हे बिल आहे आणि जळालेली युनिटस् फक्त 22 आहेत. कदाचित ही प्रिटींग मिस्टेक असू शकेल. परंतु विजेच्या बिलाची जी आकारणी केली जाते त्यामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. फक्त दोन कॉलममध्ये हे बिल असले पाहिजे. एक कॉलम म्हणजे जळालेली युनिटस् आणि दुसरा कॉलम टॅक्सेस. अशा पध्दतीने बिल तयार केले तर ते सामान्य माणसाला समजू शकेल. सध्याच्या बिलामध्ये सामान्य माणसाची फसवूणक होत आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ...

सभापती महोदय, युनिटचे भाव देखील वाढलेले आहेत. 100 युनिटपेक्षा जास्त युनिट वापरली तर पुढील प्रत्येक युनिटला 2 रुपयावरुन 3.70 पैसे मोजावे लागतात. म्हणजे 100 युनिटनंतर प्रत्येक युनिटला 1.70 पैसे जास्त मोजावे लागतात. ही मर्यादा 300 युनिटपर्यंत असून त्यानंतरच्या प्रत्येक युनिटला 5 रुपये प्रमाणे वीजदर आकारला जातो. ही भरमसाठ वाढ रोखण्याकरिता त्यामध्ये स्थिरता असणे आवश्यक आहे. महावितरण कंपनी ही सामान्य माणसाची पिळवणूक करीत आहे. त्यांच्या कार्यपध्दतीत सुधारणा केली पाहिजे. युनिट मोजण्यासाठी फक्त येतात आणि आकडे पाहून बिल पाठवून देतात. हे अन्यायकारक आहे. माझे स्वत:चे वीज बिल मी मंत्रीमहोदयांना दाखविले होते नंतर कार्यकारी अभियंत्यांना सूचना दिल्यानंतर 3000 रुपये त्यातून कमी केले. सामान्य माणसाचा सुध्दा हा अधिकार आहे आणि तो त्याला मिळाला पाहिजे. खऱ्या अर्थाने सामान्य आणि गरीब माणसाला कमीत कमी विजेचे बिल आकारले पाहिजे. विद्युत शॉर्टेज आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु शासन गरीब जनतेला न्याय देणार आहे काय ? माझ्या भागामध्ये दोन पाय जळालेला एक शेतकरी आहे परंतु विद्युत बोर्डाने किंवा राज्य शासनाने त्याला मदत केली नाही ही शोकांतिका आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर...........

विजेच्या धक्क्याने अनेक जनावरे दगावतात त्याबाबत मदत दिली जात नाही. ऊर्जा विभागाचे लाईनमन विजेच्या धक्क्याने दगावतात, त्यांच्या वारसांना आर्थिक मदत दिली जात नाही, अनुकंपा तत्वावर वारसाला नोकरी दिली जात नाही. याबाबत सहानुभूतीने विचार करुन न्याय देण्याची भूमिका घेतली पाहिजे. विद्युत कनेक्शन मिळण्यामध्ये अनेक अडचणी येत आहेत. ही पध्दत अत्यंत क्लिष्ट असून ती सोपी व सुटसुटीत केली पाहिजे. शेतकऱ्यांना अद्यापही मागणी करुन विद्युत कनेक्शन मिळालेले नाही. कॉन्ट्रॅक्टर सांगतो की, साहित्य नाही, केबल नाही, पोल नाही. अशी कारणे सांगून कनेक्शन देण्यामध्ये टाळाटाळ केली जाते. हे प्रकार थांबले पाहिजेत. ज्या साहित्याची आवश्यकता असेल ते साहित्य विभागाने उपलब्ध करुन दिले पाहिजे एवढे बोलून आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, नियम 260 अन्वये माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जो प्रस्ताव मांडला आहे, त्या प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी मंत्रीमहोदयांना कौतुकाचे प्रमाणपत्र दिले आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्याचा कारभार, कार्यक्षमता या विभागामध्ये फार मोठी आहे. माननीय राज्यपाल महोदय दोन्ही सभागृहाच्या संयुक्त बैठकीत म्हणाले की, वीज टंचाईमुळे सोसाव्या लागणाऱ्या अडीअडचणींची शासनाला पूर्ण जाणीव असून ते आवाहन पेलण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल असे सांगून विजेचा काटकसरीने वापर करण्याचे माननीय राज्यपालांनी आवाहन केले त्याबद्दल मी मंत्रीमहोदयांचे अभिनंदन करतो. माननीय राज्यपालांनी या राज्यातील ऊर्जा विभागाची परिस्थिती काय आहे या संदर्भात मंत्रीमहोदयांचे मनापासून कौतुक केले. आज मंत्रीमहोदय इतके हताश आहेत की, विजेच्या प्रश्नावर ही पाचवी किंवा सहावी चर्चा सुरु आहे. त्यांची सगळी भाषणे वाचून आमच्या ती तोंडपाठ झाली आहेत. माननीय केंद्रीय कृषिमंत्री श्री.शरद पवार यांना मी सांगणार आहे, ऊर्जा विभागाचा कार्यभार सक्षमपणे सांभाळणारे यांच्यापेक्षा चांगले मंत्रीमहोदय या सभागृहात, या राज्यात निर्माण झाले आहेत. सन्माननीय मंत्रीमहोदयांचे उत्तर माझ्याकडे उपलब्ध आहे, ते मी पुढे वाचून दाखविणार आहे. हताशपणे त्यांनी मुलाखत दिली होती. ऊर्जामंत्र्यांनी राज्यात गेल्या काही दिवसात नवीन वीजनिर्मिती झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे असे सांगितले आणि पुढचे त्यांचे घोषवाक्य वृत्तपत्रात पूर्णपणे छापून आले आहे. येत्या 2-4 वर्षात लोडशेडिंग बंद होण्याची कोणतीही शक्यता नाही, आपण काहीच करु शकलो नाही हे त्यांनी हताशपणे सांगितले. हा प्रामाणिकपणा म्हटला तर प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे या राज्यात सरकारने 2000 मे.वॅट प्रकल्पाचे कॉन्ट्रॅक्ट दिले आहे, भुसावळ येथील 1000 मे.वॅट व खापरखेडा येथील 500 मे.वॅट प्रकल्पाचा त्यात समावेश आहे. त्याचे काय झाले याचे मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले पाहिजे. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी या अहवालात परिस्थितीचे वर्णन केलेले आहे. त्यात म्हटले आहे की, पाचव्या पंचवार्षिक योजनेत योजनांतर्गत खर्चामध्ये ऊर्जा क्षेत्रावरील खर्चाचे प्रमाण 34 टक्के होते ते दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये 11 टक्क्यावर आले आहे. स्थापित क्षमतेमध्ये 2001 पासून अत्यल्प वाढ झाली, परिणामी विजेची मागणी आणि पुरवठा यात असमानता निर्माण झाली, हे सत्य आहे.

(नंतर श्री.खर्चे.....-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

वार्षिक अहवालामध्ये आपल्या कर्तृत्वाची, खात्याच्या कर्तृत्वाची आणि अधिकाऱ्यांच्या कर्तृत्वाची सुध्दा नोंद घेतलेली आहे. याच अहवालामध्ये सन 2007 आणि चालू वर्षात जानेवारी 2008 मध्ये वीज निर्मितीच्या स्थापित क्षमतेत कोणतीही वाढ झालेली नाही, असे स्पष्ट शब्दात म्हटले आहे. आपण प्रत्येक वेळी आम्हाला टोचून बोलता की, आपली सत्ता असताना आपण काय केले ? आमची सत्ता फक्त साडेचार वर्षे होती, त्यावेळेस एन्रॉनच्या बाबतीत काय झाले, हा सगळा विषय येतो. परंतु आपल्याला सत्तेवर येऊन आता आठ वर्षे झाली आहेत. असे असताना आपण दुसऱ्याच्या लेकरा-बाळांची काळजी करण्यापेक्षा आपला संसार आठ वर्षात किती वाढला हे पहाल की नाही ? की फक्त उधारीवरच सर्व चालविणार? या आठ वर्षात राज्यात विजेच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची स्थापित क्षमता वाढलेली नाही. तसेच या स्थापित क्षमतेसंबंधीचा जो आलेख आहे त्यानुसार सन 1971-81 या दहा वर्षाच्या काळात 10.28 टक्के एवढे प्रमाण होते. सन 1981-91 टक्के या दहा वर्षात हे प्रमाण 10.65 म्हणजे थोडेसेच वर गेले आहे. सन 1991-2001 या काळात मात्र हे प्रमाण 7.6 टक्के एवढे होते सन सन 2001-2006 या पाच वर्षाच्या काळात हे प्रमाण आणखी कमी झालेले आहे. एवढया मोठया प्रमाणात घसरण होत असेल तर महाराष्ट्र राज्य अंधारात जाणार नाही तर काय होणार आहे ? आपल्या पक्षाच्या अध्यक्षांनी मात्र आपल्याला चांगल्या कामाबाबत दाखला दिलेला आहे. आता तर राज्यात लोड शेडिंग हा विषयच उरला नाही, कारण नेहमी नेहमी लोड शेडिंग करुन लोकांना आता त्याची सवयच झालेली आहे, कोणीच काही बोलत नाही त्यामुळे हा विषयच नाही. राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या का होत आहेत, शेतकऱ्यांना कर्जमाफी का द्यावी लागत आहे. त्याचे दुसरे कारण सांगतो की, विजेचा जो वापर आहे त्याचे प्रमाण पाहता घरगुती वीज वापर 5.3 टक्के, वाणिज्यिक वापर 43.4 टक्के, औद्योगिक वीज वापर 3.3 टक्के आणि कृषीसाठी मात्र -12.1 टक्के अशी परिस्थिती आहे. आज कृषीला आपण वीज पुरवू शकत नाही तर शेतकरी आत्महत्त्या करणार नाही तर काय करणार ? कारण आजची अशी परिस्थिती आहे की, शेतकरी आणि कृषी पंपांच्या बाबतीत मात्र वीज निर्मिती कमी होत चालली आहे. राज्याची कमाल मागणीचा विचार केला तर सन 2006-07 मध्ये 30 डिसेंबर, 2006 रोजी 16388 मेगावॅट एवढी होती ती 3112 मेगावॅटचे भारनियमन करुन भागविली. सन 2007-08

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

.....2

श्री. दिवाकर रावते .....

मध्ये डिसेंबर अखेरपर्यंतची कमाल मागणी 17489 मेगावॅट व त्यापेक्षा जास्त होती, ती गरज भागविण्यासाठी 4618 मेगावॅटचे भार नियमन करण्यात आले, फेब्रुवारी, 2007 पर्यंत 16881 मेगावॅट एवढी मागणी होती व ती भरुन काढण्यासाठी 4815 मेगावॅट एवढे भारनियमन करण्यात आले. म्हणजेच एखाद्या राज्याच्या निर्मितीएवढ्या भारनियमनाची परिस्थिती दुर्देवाने आज राज्यात निर्माण झालेली आहे. ग्रामीण विद्युतीकरणाच्या बाबतीत आणि कृषी पंपांच्या बाबतीत तर परिस्थिती आणखीच गंभीर आहे. सन 2006-07 मध्ये 1 लाख 23 हजार 588 कृषी पंपांचे विद्युतीकरण करण्यात आले. राज्यात विद्युतीकरण करण्यात आलेल्या कृषी पंपांची संख्या मार्च 2007 पर्यंत 27.77 लाख इतकी झाली. 31 मार्च 2007 पर्यंत कृषी पंपांची वीज जोडणीची प्रलंबित प्रकरणे 3 लाख आणि प्रत्येक वर्षी 70 हजार नवीन अर्ज जोडणीसाठी येत आहेत. ही शेतकऱ्याच्या विजेच्या मागणीसंदर्भात असलेली गंभीर बाब आहे. विजेच्या बाबतीत शेतीपासून दिवसेंदिवस उत्पन्न कमी येत आहे त्याचे प्रमाण 1.62 टक्के, पाणीपुरवठ्यापासून मिळणारे उत्पन्न 1.53 टक्के एवढे आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सार्वजनिक दिवाबत्तीचे उत्पन्न सुध्दा कमी येत आहे. तसेच शेती आणि ग्रामीण भागातून मिळणारे उत्पन्न मिळणे आता कठीण झाले आहे असा स्पष्ट उल्लेख अहवालात करण्यात आलेला आहे. या ठिकाणी दरवाढीचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी उपस्थित केला होता त्यामुळे दरवाढीच्या संदर्भातील माहिती सन्माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. आता वीज तर मिळत नाही परंतु जी काही तुटपुंजी वीज मिळत आहे त्याकरिता किती दरवाढ होणार आहे याचीही माहिती या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. दरवाढ करीत असतांना घरगुती विजेचा दर, व्यापारी दर काय राहणार आहे आणि कृषीसाठी विजेचा किती दर राहणार आहे यासंदर्भातील खुलासा माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी करण्याची आवश्यकता आहे. वीज दरवाढीची चिंता आता सर्वांना लागलेली आहे.

सभापती महोदय, गेल्या आठ वर्षापासून राज्य शासनाने एक युनीट सुध्दा वीज निर्माण केलेली नाही. अहवालात म्हटले आहे की, "अर्थसंकल्पात पैशांची तरतूद वीज निर्मिती करीता गेल्या 5 वर्षामध्ये करण्यात आलेली नाही." आपल्या भागातील तीन मंत्र्यांकडे चांगली खाती आहेत. अर्थखाते सुध्दा तुकच्याकडेच आहे. वीज निर्मिती करीता पैशाची आवश्यकता आहे हे जरी खरे असले तरी आपल्याकडे अर्थ खाते असतांनाही एक युनीट विजेची निर्मिती का करण्यात आली नाही ? आपण फक्त एवढेच म्हणत राहिलात की, तुम्ही एन्रॉन बुडवला आणि आम्ही एन्रॉन बाहेर काढला. परंतु गेल्या आठ वर्षामध्ये आपण एक सुध्दा युनिट विजेची निर्मिती केली नाही हे सत्य आहे आणि हे सत्य आपण सुध्दा कबूल करतात. यासंदर्भात माझ्याकडे जी माहिती आहे ती सत्य आहे. आपण 2005 मध्ये बडया कंपन्यांशी करार करुन त्यांना विविध सोयीसवलती देऊन 20 हजार कोटी रुपयांचे इरादा पत्र दिले. परंतु हे सारे अजून कागदावरच आहे. आता या प्रकलपांची मुदत 60 महिन्यावरुन 78 महिने करण्याची नामुष्की राज्यसरकारवर आली आहे. 12500 क्षमतेचे 8 इरादापत्र बासनात गुंडाळून ठेवलेले असून त्यामध्ये काहीही प्रगती झालेली नाही. प्रगती न होण्याचे कारण म्हणजे या सर्व कंपन्यांना जमीन देणे, इंधन, पायाभूत सुविधा, मार्ग, पाण्याची सुविधा, विजेचे वहन, 100 टक्के स्टँप डयूटी माफ केलेली आहे. या सोयीसवलती देत असतांना टाटा पॉवर कंपनीला 1500 मे.वॅ., रिलायन्स एनर्जीला 4000 मे.वॅ.,सेंट्रल इंडीया पॉवर कंपनीला

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

....2

श्री. दिवाकर रावते....

1200 मे.वॅ., इस्पात एनर्जीला 1000 मे.वॅ. जिंदाल औष्णीक विद्युत कंपनीला 1000 मे.वॅ.,एस्सार पॉवर कंपनीला 1500 मे.वॅ., स्पेक्ट्रा टेक्नॉलॉजिकल कंपनीला 500 मे.वॅ., जी.एम.आर.जी. एनर्जीला 1000 मे.वॅ. अशी एकूण 12500 मे.वॅ. साठी इरादापत्र दिलेले आहेत. इस्पात कंपनीकडून 350 कोटी रुपये येणे होते ते दिले मिळाले का याचीही माहिती या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. मागील काळात ऊर्जा मंत्री श्री. पद्मसिंह पाटील होते त्यावेळेस त्यांनी सांगितले होते की, आम्ही इस्पात कंपनीला आता वीज निर्मिती करण्यास सांगतीतले आहे. ते रोज 1 कोटी रुपयांची वीज वापरत होते. म्हणून या कंपनीकडून जे 350 कोटी रुपये येणे होते ते त्यांनी दिले आहे की, बुडवले आहे की, ते पैसे आपल्याकरिता वापरणार आहे याचाही खुलासा होण्याची आवश्यकता आहे. महानिर्मिती कंपनीची एकूण क्षमता 9771 मे.वॅ. असून प्रत्यक्षात 7180 मे.वॅ. वीज निर्मिती होते. त्यामुळे त्यांची वीज निर्मिती क्षमतेपेक्षा कमी का होते याचीही माहिती मिळण्याची आवश्यकता आहे. केंद्रीय प्रकल्पातून राज्याचा वाटा 2925 मे.वॅ.ऐवजी 2340 मे.वॅ. मिळतो त्यामुळे वीज निर्मितीमध्ये 585 मे.वॅ. ची जी तुट येते आणि 2000 मे.वॅ. तूट आपल्या वीज निर्मितीमधून येते ती कमी का होते, ही तुट कधी भरुन काढणार याचीही माहिती येण्याची आवश्यकता आहे. आपण म्हटले आहे की, 2008 मध्ये 3820 मे.वॅ. सन 2008-09 मध्ये 700 मे.वॅ. सन 2009-10 मध्ये 4100मे.वॅ. आणि 2010-11 मध्ये 3200 मे.वॅ. विजेची तुट राहणार आहे असे आपण अंदाजित केलेले आहे. त्यामुळे आपण विद्युत निर्मितीक्षमतेत कोठे कमी पडत आहात हे समजत नाही. या ठिकाणी मी फक्त 2-4 महत्वाचे मुद्दे मांडणार आहे. आपल्या राज्यात मोठया प्रमाणात उद्योग येत आहे परंतु आम्हाला हे समजत नाही की, आपल्या राज्यात वीज नसतांना उद्योग कसे काय येत आहेत ?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

या प्रश्नाला उत्तर देत असतांना सभागृहाचे नेते व माननीय उप मुख्यमंत्र्यांनी विजेच्या संदर्भात देखील उल्लेख केला होता. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देत असतांना . त्यांनी असे सांगितले की, -" विजेची टंचाई अशीच ठेवून राज्यामधील उद्योगधंदे आणि शेती तसेच वीजग्राहक यांचे जीवन सुखकारक होऊ शकत नाही. " त्यांनी आपल्याला अशा प्रकारचे सर्टिफिकेट दिलेले आहे, आपले चांगले कौतुक केलेले असून. त्यांनी राजकारण पटलावर आणले आहे. त्यांनी पुढे असेही सागितले आहे की," गेल्या तीन वर्षापासून अत्यंत सक्षमपणाने विजेच्या बाबतीत जे काही निर्णय घेणे आवश्यक आहे ते आम्ही घेतलेले आहेत आणि त्या निर्णयाचा परिणाम असा झाला आहे की, परळी येथील 250 मेगॅवॅटसचे विद्युत निर्मिती केंद्र जून 2009 मध्ये सुरु होत आहे " आत्याबाईच्या मिशांना पीळ मारुन त्यांनी येथे हा उल्लेख केलेला आहे. पुढे त्यांनी असेही सांगितले आहे की, "पारस येथील 250 मेगॅवॅटसचे विद्युत निर्मिती केंद्र 2009 मध्ये पूर्ण् होत आहे. भुसावळ येथील एक हजार मेगॅवॅटसचे विद्युत निर्मिती केंद्र ऑगस्ट 2008 मध्ये पूर्ण होत आहे पुढच्या वर्षीच्या डिसेंबर मध्ये 2000 मेगॅवॅटस विजेची भर महाराष्ट्रात पडणार आहे. पंरतु एकंदर विजेची वाढती मागणी लक्षात घेता कोराडी येथे 660 मेगॅवॅटसचे तीन संच , चंद्रपूर येथील 500 मेगॅवॅटसचे दोन संच सुरु करण्याच्या दृष्टीने या दोन्ही प्रकल्पाचे नियोजन केले असून काही दिवसातच या प्रकल्पाच्या कामांना सुरुवात होणे अपेक्षित आहे." माननीय ऊर्जा मंत्री जे काही उत्तर देणार आहेत ते उत्तर अगोदरच माननीय उप मुख्यमंत्र्यांनी दिलेले आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले आहे की, " परळी, पारस .,भुसावळ येथे अस्तित्वात असलेल्या विद्युत निर्मिती संचाची वाढ करुन 250 मेगॅवॅटस याप्रमाणे प्रत्येक संचातून अतिरिक्त वीज निर्माण केली जाणार असून त्याचे देखील नियोजन करण्यात आलेले आहे." तेव्हा नेमके कोणते नियोजन करण्यात आलेले आहे ? या संदर्भात माननीय उर्जा मंत्र्यांनी उत्तराच्या भाषणात खुलासा करावा.

सभापती महोदय, त्यानंतर त्यांनी पुढे असे सांगितले की, "अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस राज्याला भार नियमनातून मुक्त करणारे धोरण राज्य सरकारने आखलेले आहे. जे.एस.डब्ल्यू.चे 1200 मेगॅवॅटस, आदानीचे 1980 मेगॅवॅटस, एम्कोचे 520 मेगॅवॅटस, वर्धा पॉवरचे 500 मेगॅवॅटस याप्रमाणे विद्युत निर्मितीचे प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. पुढे निर्माण होणारी विजेची वाढीव मागणी लक्षात घेऊन दूरदृष्टी ठेवून अशा प्रकारे प्रकल्पाची उभारणी व निर्मितीची

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रक्रिया महाराष्ट्रात सुरु करण्यात आलेली आहे. अर्थात या प्रकल्पातून वीज निर्माण व्हावयाला काही वर्षाचा कालावधी लागणार आहे.आज जर आपण एखाद्या खेडेगावात गेलो तर तेथे दहा वीस शेतक-यांचे विद्युत पंप असतात. परंतु सगळे गाव प्रत्यक्षात वीज वापरत असते." .एखाद्या गावात 10-20 शेतकऱ्यांकडे विद्युत पंप आहे म्हणजे गावामध्ये वीज आहे. अशा प्रकारचे उदाहरण त्यांनी दिलेले आहे. त्यांनी पुढे सांगितले आहे की," 10-20 शेतकऱ्यांकडे विद्युत पंप आहे परंतु संपूर्ण गाव वीज वापरत असते. त्यामुळे सिंगल फेजिंग केले आणि गावठाणचे फिडर्स सेपरेट केले तर गावामध्ये जास्त वीज मिळू शकेल." गावाला वीज देणार आहात काय , विद्युत पंप चालविणार आहात काय ? यासंबंधी आम्ही काहीही विचारलेले नव्हते. परंतु माननीय उर्जा मंत्र्यांचे संपूर्ण भाषणच माननीय उप मुख्यमंत्र्यांनी अगोदर करुन टाकलेले आहे. ते संपूर्ण भाषण येथे वाचून दाखववयाचे ठरविले तर त्यामध्ये बराच वेळ जाईल म्हणून मी संपूर्ण भाषण वाचून दाखविणार नाही . परंतु त्या भाषणातील काही महत्वाचे मुद्दे सांगणे आवश्यक असल्यामुळे मी त्याचा उल्लेख करणार आहे. त्यांनी असे सांगितले आहे की," शेतीसाठी काही ठराविक तास वीज मिळाली तरी गावामध्ये ती जास्तीत जास्त काळ राहील अशा प्रकारे फिडर्स सेपरेशनचे काम करण्यात आलेले आहे." सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांचा संचार त्यांच्या अंगात झाला आहे काय असे मला वाटावयास लागले आहे. त्यांनी असेही सांगितले आहे की, " सिंगल फेजींगचे काम अत्यंत गतीने सुरु आहे.आज विजेचा प्रश्न ऐरणीवर आलेला असला तरी नजिकच्या काळात यासाठी जे काही करता येणे शक्य आहे, जी महाग वीज विकत घेणे शक्य आहे ती देखील प्रसंगी विकत घेण्याची तयारी आपली आहे. तसेच खाजगी पॉवर आहे तिचाही प्रसंगी वापर करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत" ही खाजगी पॉवर कोणती आहे ? याबाबतीत माननीय ऊर्जा मंत्र्यांनी आम्हाला माहिती द्यावी. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी पुढे असेही सांगितले आहे की, " आज देशामध्ये केवळ एक हजार मेगॅवॅटस वीज ट्रेडेबल आहे. म्हणजे एक हजार मेगॅवॅटस वीज विकत घेण्यासारखी आहे. देशामध्ये जास्तीत जास्त एक हजार मेगॅवॅटस विजेची खरेदी विक्री होऊ शकते. माननीय श्री. सुशील कुमार शिंदे हे केन्द्रीय उर्जा मंत्री आहेत.आणि जी एक हजार मेगॅवॅटस वीज उपलब्ध आहे ती वीज आपल्याला मिळणार आहे काय ? असे त्यांना विचारण्यात

3...



VTG/ SBT/ MMP/ MMP/ KGS/ 17=55

आले होते. परंतु त्यांनी असे सांगितले की, " ही वीज तुम्हाला मिळणार नाही. काही राज्याने ही वीज बूक केलेली आहे"त्यामुळे कितीही रक्कम ही वीज खरेदी करण्यासाठी घेऊन गेलो तरी ती आपल्याला मिळू शकणार नाही.

नंतर श्री.सुंबरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

महाराष्ट्र विजेसाठी तडफडत आहे आणि असे असतानाही केंद्रामध्ये ऊर्जा मंत्री असलेले आपले सन्माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे साहेब म्हणतात की, देशामध्ये ट्रेडेबल असलेली वीज दुसऱ्या राज्यांनी अगोदरच विकत घेतलेली आहे त्यामुळे महाराष्ट्राला ती मिळू शकणार नाही. सभापती महोदय, आमचे माननीय उपमुख्यमंत्री त्या दिवशी आपल्या भाषणात पुढे सांगू लागले की, विजेच्या बाबतीत दुसऱ्या राज्याची परिस्थिती आपल्या पेक्षाही चिंताजनक आहे. त्यासाठी त्यांनी पंजाब, मध्य प्रदेश, राजस्थान वगैरे राज्यांमध्ये विजेची परिस्थिती कशी चिंताजनक आहे याची आकडेवारी, टक्केवारी दिली आणि आम्हाला दिलासा दिला की, आपल्या राज्यामध्ये विजेचा तुटवडा आहे, राज्याला वीज मिळू शकत नाही याबद्दल तुम्ही जास्त दुःखी होऊ नका, जास्त काळजी करू नका. आपल्यापेक्षा दुसऱ्या राज्याची परिस्थिती विजेच्या बाबतीत अधिक बिघडलेली आहे. म्हणजे दुसऱ्याचे दुःख सांगून आपले दुःख हलके करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आणि आपली अशी परिस्थिती असल्याबद्दल वाईट वाटून घेऊ नका असेही त्यांनी सांगितले. आपल्या राज्यात वीज निर्मितीसाठी, वीज आणण्यासाठी आपण काय प्रयत्न केला हे न सांगता आपल्याकडील उद्योगधंदे वाढविण्यासाठी काय केले पाहिजे हेही त्यांनी सांगितले. त्यात त्यांनी सांगितले की, विजेचे वेस्टेज आता परवडणारे नाही. त्यामुळे आवश्यकता नसताना मोठे दिवे लावू नका. सभापती महोदय, या प्रसंगी त्यांनी आम्हाला एक प्रश्न विचारला, अर्थातच विरोधकांना खिंडीत पकडण्यासाठी त्यांनी आम्हाला उत्तर दिले. त्यात त्यांनी म्हटले की, दीड वर्षापूर्वी सन्माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे हे केंद्रात ऊर्जा मंत्री झाल्यानंतर महाराष्ट्राला भरपूर वीज मिळाली आणि म्हणूनच त्याच्या आनंदासाठी, त्यांचे कौतुक करण्यासाठी मोठा कार्यक्रम झाला. केंद्राच्या ग्रीड मधून महाराष्ट्राला तेव्हा 100 मे.वॅ. वीज दिली गेली त्याचे मोठे कौतुक केले गेले. आपली तूट ही 5 हजार मे.वॅ. विजेची असताना केवळ 100 मे.वॅ. वीज आली म्हणून त्यांचे कौतुक केले आणि आम्हाला सांगितले की, केंद्रात आमचे राज्य असताना ती पाच वर्षे ऊर्जा खाते आमच्याकडे होते, म्हणजे सन्माननीय श्री.अनंत गिते आणि श्री.सुरेश प्रभू हे ऊर्जा मंत्री होते पण त्या काळात एकही वीज प्रकल्प महाराष्ट्रात येऊ शकला नाही. सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्यावेळी आमच्यावर हा आरोप केला, तो आम्हाला मान्य आहे. पण मग गेल्या पाच वर्षात आपण किती वीज महाराष्ट्रात आणली, किती वीज निर्मिती प्रकल्प महाराष्ट्रात आणले ? ते आजपर्यंत आम्हाला समजलेले नाही.

..... 4जे 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

मात्र केंद्रीय ऊर्जा मंत्री नामदार श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी नॅशनल ग्रीडमधून महाराष्ट्राला जी 100 मे.वॅ. वीज दिली, ती अतिरिक्त वीज दिल्याबद्दल त्यांचे तोंड भरून कौतुक केले. आणि आम्हाला एवढाच प्रश्न विचारला की, नामदार सुशीलकुमार शिंदे केंद्रीय ऊर्जा मंत्री म्हणून नॅशनल ग्रीड मधून महाराष्ट्राला वीज देऊ शकतात तर मग तुमचे श्री. अनंत गिते आणि श्री.सुरेश प्रभू केंद्रीय ऊर्जा मंत्री असताना राज्याला अतिरिक्त वीज का मिळू शकली नाही ? एन्रॉन कंपनी राज्याला स्वस्त वीज देऊ शकते आहे अशी गोष्ट त्या काळात का घडू शकली नाही ? सभापती महोदय, मला दुर्दैवाने या ठिकाणी नमूद करावेसे वाटते की, तत्कालीन केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री.अनंत गिते यांनी 2001 मध्ये एमपी आणि एनटीपीसीच्या दोन प्रकल्पातून वीज देण्यासंबंधी महाराष्ट्राला सांगितले त्यावेळी आपले श्री.बन्सल साहेब सचिव होते. फार कडक, चोख, कार्यतत्पर असे हे अधिकारी होते. त्यावेळेस या मंडळींनी या विजेच्या संदर्भात गोडबोले समिती देखील तज्ज्ञ म्हणून नेमली होती. पण त्यावेळेस या तज्ज्ञांच्या समितीने सांगितले की, आमच्याकडे वीज मुबलक आहे म्हणून आम्हाला वीज नको आहे. म्हणून मी आबांना विचारू इच्छितो की, असे सांगितल्यानंतर केंद्रीय मंत्री असलेल्या श्री.अनंत गिते यांनी काय करावे ? त्यावेळेस ते 1500 मे.वॅ. वीज देत असताना 'नको' म्हणून सांगितले आणि नंतर 2003 मध्ये 'आता आम्हाला वीज द्या' म्हणून सांगायला गेले तेव्हा ती वीज दुसऱ्याच राज्यांना दिलेली होती. म्हणतात ना दैव देते आणि कर्म नेते तसा हा प्रकार त्यावेळेस घडला होता. सभापती महोदय, विरोधी बाकांवर बसायला लागेल अशी भीती त्यांना वाटू लागल्यानेच ते आमच्यावर असे आरोप करू लागले. असे जर होते तर मग असा अहवाल आपल्या शासनाकडून का गेला ? अशा प्रकारचा अहवाल देऊन महाराष्ट्राला विजेच्या गर्तेत लोटणाऱ्या या सरकारच्या नाकर्तेपणामुळे आज ग्रामीण भागामध्ये सरकारला 18-18 तास लोड शेडींग करावे लागते आहे. ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे ....4के 1 ...

श्री. दिवाकर रावते...

मी तुम्हाला असे सांगणार नाही की, मला तुम्ही वीज द्या, तुम्ही लोड शेडींग काढा. वीज निर्माण झाली नाही तर तुम्ही ती देऊ शकत नाही. एक युनिट किंवा एक मेगावॅट वीज निर्माण होऊ शकत नसेल तर तुम्ही वीज देऊ शकत नाही. प्रत्येकाला विजेची गरज असल्यामुळे पारेषण हा त्यामधील मार्ग आहे,तो आपण प्रत्येकाने अवलंबिला पाहिजे. हा टीकेचा विषय नसून गरजेचा विषय आहे, त्या शिवाय आपण हलू शकत नाही. माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी हे अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या पलिकडे विजेची गरज गेली आहे असे म्हणाले ते सत्य आहे. आणि म्हणून वीज नसेल तर या महाराष्ट्राची व देशाची प्रगती होऊ शकणार नाही. त्यामुळे वीज नसेल तर ती मिळविण्यासाठी चालून आलेली संधी ज्यांच्यामुळे गेली त्या गोडबोलेंवर आपण खटला भरा. या राज्यामध्ये विजेच्या प्रश्नाच्या बाबतीत चुकीचा अहवाल देऊन या महाराष्ट्राचे आठ वर्षे नुकसान झाले आहे ते केवळ लोड शेडींगचे नाही, सर्व प्रकारच्या उत्पादनाचे नुकसान झाले आहे, कृषी उत्पादनाचे नुकसान झाले आहे, अनेक शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या झालेल्या आहेत. या गर्तेमध्ये महाराष्ट्राला लोटणाऱ्या या तज्ज्ञाला आपण धारेवर धरणार नसाल आणि पोसलेल्या पोळाप्रमाणे ते आपले त्यावेळचे सर्व अनुदान आणि सर्व पगार घेऊन जाणार असतील, आणि पुन्हा नव्याने टीका करण्यास आणि लेख लिहिण्यास मोकळे होणार असतील तर या तज्ज्ञांना आपल्याला कुठेतरी धडा शिकवावा लागेल. हा महाराष्ट्र गेल्या आठ वर्षापासून विजेच्या बाबतीत जे भोग भोगत आहे ते अत्यंत गंभीर आहेत. तेव्हा हे सर्व घडत असतांना आपण त्याबाबतीत पावले उचलणार आहात की नाही असा माझा आपणास प्रश्न आहे? बोटचेपेपणाचे धोरण स्वीकारुन आपण या लोकांना कशासाठी वाचवायचे? निवृत्त झाल्यानंतर या तज्ज्ञांचे सर्व उपद्व्याप आज महाराष्ट्राच्या मुळावर आले आहेत. म्हणून मी आपणास एक विनंती करणार आहे की, आता आणीबाणीची परिस्थिती आली आहे, घरामध्ये बसून उपाशीपोटी ढेकर देण्याची पाळी आपल्यावर आली आहे. अशावेळी आपण दबावाला किती बळी पडणार आहात? आपण विजेची चोरी थांबविणार आहात की नाही?

सभापती महोदय, पवन ऊर्जेच्या बाबतीत मी जास्त बोलणार नाही, ते आपल्या भागामध्ये उभे आहेत. आपण बजाज कंपनीला पवन ऊर्जा निर्मितीमध्ये 700 कोटी रुपयांची सबसिडी दिली. मला आपणाकडून माहितीची अपेक्षा आहे. मी आपणाकडे मागून सुध्दा आपण ती मला देत नाही. राज्यामध्ये पवन ऊर्जा प्रकल्प किती ठिकाणी आहेत, त्यामधून किती मेगावॅट विजेची निर्मिती होते,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. दिवाकर रावते...

वीज निर्मिती होत नसली तरी विजेची किती बिले जातात? ही सर्व माहिती देत असतांना हे प्रकल्प कुणाचे आहेत त्यांची आपण एकदा नावे जाहीर करावीत. ज्यामुळे या सदनाला आणि महाराष्ट्राला कळेल की, पवन ऊर्जा प्रकल्प कशाप्रकारे चालतात, आणि त्यांचे पैसे किती जातात? त्यामधून वीज निर्माण होते की नाही? हे परमेश्वर जाणो. कारण ती निर्माण झालेली दिसतच नाही. आणि निर्माण न होणाऱ्या विजेची बिले सुध्दा कशी वसूल केली जातात, आणि ती कुणाच्या खिशामध्ये जातात हा एक संशोधनाचा विषय आहे? आज बलाढय राजकारण निर्माण करुन या राज्यामध्ये आम्ही आव्हानात्मक करीत आहोत असे सांगणारे दर महिन्याला कोटयावधी रुपये घरामध्ये घेऊन चालले आहेत. त्यांची नावे आपण एकदा सभागृहामध्ये जाहीर करा. आणि लोकांना कळले पाहिजे की, न निर्माण होणाऱ्या पवन ऊर्जेमधून सामान्य माणसांचे कोटयावधी रुपये जात आहेत. त्यामधून शेतकऱ्यांचे चार पंप चालत नाहीत. सिंगल फेजिंग, फिडर, ट्रान्सफार्मर हे निर्माण करण्यासाठी आपणास कां ताण पडत आहे? हा प्रश्न निर्माण होईल. या संदर्भात अधिकारी बोलू शकणार नाही. शेवटी राज्यकर्त्यांची इच्छाशक्ती असेल तर अधिकारी सर्वांना वाकवू शकतील. पण राज्यकर्तेच पवन ऊर्जा निर्मिती प्रकल्पामध्ये अडकले असतील तर कुठलाही अधिकारी काहीही करु शकणार नाही. तेव्हा आपल्या निर्मितीमधील ही हतबलता, आपल्या कर्तृत्वामधील ही हतबलता आहे. आणि म्हणून शेतच कुंपण खायला उभे राहिले आहे. हे शेत आहे, कुंपण कोण आहे हे एकदा जाहीर केले तर बरे होईल. नाही तर कधी तरी त्या संदर्भात सुध्दा फक्त पवन ऊर्जा या विषयावर आपल्याला अडीच तासाची चर्चा लावावी लागेल. हा आरोप आणि दोषारोपाचा विषय नाही. परंतु राज्यकर्तेच शेताचे कुंपण खायला लागले आहेत, त्यामध्ये या सरकारमधील मंत्रीसुध्दा बसले आहेत असा माझा अधिकृतपणे आरोप आहे. तेव्हा आमचे असतील, तुमचे असतील जे कुणी असतील त्यांची नावे आपण जाहीर करा. पवन ऊर्जेच्या निमित्ताने कोटयावधी रुपयांचा बळीराजाच्या पैश्याचा घास गिळला जात आहे तो लोकांपुढे येऊ ध्या अशी मी कळकळीची विनंती करतो.

सभापती महोदय, वीजेच्या परिस्थितीमध्ये कुणालाही दयामाया दाखवू नका.ज्याठिकाणी शक्य असेल त्याठिकाणी शक्य असेल तेव्हा आपण वीज ध्या. परंतु आपण आता वीजेची चोरी थांबवावी. ती कुणाचीही असली तरी अत्यंत कडवटपणे आपण थांबवावी. याकरिता आपण एक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. दिवाकर रावते...

कायदा करणार काय असा मला प्रश्न विचारावयाचा आहे? महानगरपालिकेच्या क्षेत्रातील बेकायदा बांधकाम पाडण्यामध्ये नगरसेवकाने हस्तक्षेप केला तर त्याचे पद जाते. त्याप्रमाणे वीजेचा प्रश्न हा राष्ट्रीय प्रश्न आहे, एक युनिट वीज वाचविणे म्हणजे देशाची संपत्ती वाचविण्यासारखे आहे. तेव्हा वीजेच्या चोरीच्या प्रकरणामध्ये आमदार किंवा अन्य कुणीही लोकप्रनिधी हस्तक्षेप करीत असतील तर त्यांचे पद जाईल अशाप्रकारचा कायदा आपण निर्माण करावा. तसे केले तर आपल्याला वीजेची चोरी थांबविता येईल. अन्यथा, काहीही करता येणार नाही अशी परिस्थिती आहे. म्हणून मी अत्यंत तळमळीने सांगत आहे की, आपल्याजवळ वीज असेल तर ती लोकांना देता येईल. आपण किती जरी सांगण्याचा प्रयत्न केला तरी आपल्याजवळ वीज नाही. फक्त वीज निर्मिती किती आणि कशी वाढत जाईल एवढेच सांगितल्यामुळे लोकांना ते सुखावह वाटेल. तेव्हा आपण हा कायदा करण्याच्या बाबतीत विचार करा. या एका शापापासून महाराष्ट्र कधी मुक्त होईल याची आम्ही चातकासारखी वाटत पहात आहोत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 18:10

श्री.दिवाकर रावते . . . .

मी फक्त एवढेच सांगतो की, आम्ही जर सत्तेवर आलो तर दोन वर्षामध्ये हा महाराष्ट्र 100 टक्के भारनियमन मुक्त केल्याशिवाय राहणार नाही आणि आमच्याकडे संकल्पनेचा आराखडा निश्चितपणे तयार आहे. माननीय मंत्री महोदय जर त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास तयार असतील तर आम्ही तो आराखडा त्यांना देण्यास तयार आहोत एवढेच सांगू इच्छितो. धन्यवाद.

-----

. . . .4 एल-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : अद्याप या प्रस्तावाच्या संदर्भात नऊ वक्त्यांची भाषणे व्हावयाची आहेत. आज हा प्रस्ताव दुपारी 3 वाजून 44 मिनिटांनी सुरु झाला असून आता 6 वाजून 14 मिनिटे झालेली आहेत म्हणजे आता या चर्चेसाठी असलेला अडीच तासाचा वेळ पूर्ण होत आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मला एक सूचना केली होती की, आपण आता ही चर्चा थांबवून, ती सोमवारी घेऊ शकतो काय ? तर याबाबतीत मी असा पर्याय काढलेला आहे की, अजून या प्रस्तावाच्या संदर्भात ज्या सन्माननीय सदस्यांची भाषणे व्हावयाची आहेत, ती आज पूर्ण करावीत आणि माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण आणि ज्यांनी हा प्रस्ताव मांडलेला आहे, त्यांचे भाषण या दोन गोष्टींसाठी सोमवारी सकाळी एक तास कामकाज घेता येईल. तसेच आपले इतरही कामकाज पुढे ढकलण्यात आलेले आहे. आता 6 वाजून 11 मिनिटे झालेली आहेत. त्यामुळे मला असे वाटते की, आपण अजून सात किंवा सव्वासात वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज सुरु ठेऊ . . . .

श्री.पांडुरंग फुंडकर (खाली बसून) : सभापती महोदय, मला असे वाटते की, सोमवारी सकाळी या कामकाजासाठी 1 तास ठेवण्यात यावा. कारण सन्माननीय सदस्यांना आपापल्या गावी जावयाचे आहे.

**सभापती** : ठीक आहे. आपण असा निर्णय घेऊ की, . . . .

श्री.दिलीप वळसे-पाटील (खाली बसून) : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्यांची भाषणे होऊ शकणार नाहीत. फक्त माझे उत्तराचे भाषण आणि त्यानंतर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांचा प्रस्ताव असल्याने, त्याचे भाषण एवढेच कामकाज होऊ शकेल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझी अशी सूचना आहे की, सोमवारी सकाळी दीड तास सभागृहाचे कामकाज घ्यावे आणि त्यावेळी ज्या पाच-सहा सन्माननीय सदस्यांची भाषणे राहिलेली आहेत, ती भाषणे पाच-पाच मिनिटांमध्ये होतील. त्यानंतर माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण होईल आणि मग माझे भाषण होईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावावर भाषण करण्यासाठी नावे दिलेली आहेत, त्यातील काही सन्माननीय सदस्य येथे हजर नाहीत. ते सन्माननीय सदस्य सोमवारी सदनामध्ये हजर राहतील आणि मग आम्ही भाषण करण्यासाठी नावे

. . . .4 एल-3

दिलेली असल्याने, आम्हाला भाषण करण्यासाठी संधी देण्यात यावी अशी मागणी करतील, हे मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

श्री.पांडुरंग फुंडकर (खाली बसून) : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सोमवारी सकाळी स्पेशल बैठक घेण्यात यावी.

**सभापती** : सभागृहाची बैठक संपण्यापूर्वी मी सोमवारचा सभागृहाच्या कामकाजाचा कार्यक्रम जाहीर करतो. सभागृहाची बैठक सकाळी 10.00 वाजता घ्यावयाची की 11.00 वाजता घ्यावयाची हे ठरवावे लागेल. मला असे वाटते की, सभागृहाची बैठक सोमवारी सकाळी 10.30 वाजता घ्यावी आणि सकाळी 10.30 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत विजेच्या संदर्भातील प्रस्तावाबाबत चर्चा पूर्ण करण्यात यावी. सुरुवातीला 45 मिनिटांमध्ये राहिलेल्या सात सन्माननीय सदस्यांची भाषणे होतील आणि राहिलेल्या वेळेमध्ये सन्माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण . . . .

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, माझी अशी विनंती आहे की, विजेच्या प्रस्तावावरील चर्चा आणि त्यावरील माझे उत्तराचे भाषण हे कामकाज दुपारच्या सत्रामध्ये ठेवले तर बरे होईल. सकाळच्या सत्रामध्ये दुसरे कामकाज ठेवण्यात यावे.

**सभापती** : त्यादिवशी नियम 260 अन्वये दुसरा प्रस्ताव देखील चर्चेसाठी आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर आजची अर्धवट राहिलेली विजेच्या संदर्भातील चर्चा घेतली तर बरे होईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आजच्या लक्षवेधी सूचना देखील नंतर घेण्यात येणार आहेत.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना आणखी एक दिवस पुढे जाऊ शकतात. शेवटी विजेच्या संबंधातील चर्चा महत्वाची आहे.

श्री.हसन मुश्रीफ (खाली बसून) : सकाळच्या सत्रामध्ये लक्षवेधी सूचना चर्चेसाठी घ्याव्यात.

**सभापती** : अजून शासकीय विधेयकावरील चर्चा शिल्लक आहे. पणनच्या संदर्भातील विधेयकावरील चर्चा देखील तीन-चार दिवस पुढे गेलेली आहे.

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.गायकवाड . . . .

**सभापती** ....

विधानसभा विधेयक क्रमांक 2 - महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (सुधारणा) विधेयक दोन ते तीन दिवसांपासून प्रलंबित आहे. तसेच आजचा हा प्रस्ताव देखील अपूर्ण राहील. सोमवार विरोधी पक्षाच्या एका प्रस्तावावर चर्चा आहे. अशासकीय कामकाज देखील पुढे ढकलण्यात आले आहे. हे कामकाज संपविण्याच्यादृष्टीने आपण काही तरी मार्ग काढला पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : मी या संदर्भात एक सूचना करु इच्छितो. सोमवारचा प्रस्ताव देखील महत्वाचा आहे. सोमवारी विरोधी पक्षाचा एक प्रस्ताव आहे. पणनचे देखील एक बिल प्रलंबित आहे. प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर हे सर्व. कामकाज घेतले तर सर्व कामकाजास न्याय मिळेल असे मला वाटते.

**सभापती** : ठीक आहे. आता उर्वरित लक्षवेधीच्या सूचना व विशेष उल्लेख तसेच 93 ची निवेदने घेण्याकरिता एक विशेष बैठक आपण घेऊ. हे कामकाज पूर्ण करण्याकरिता मंगळवारी किंवा बुधवारी विशेष बैठक घेऊ. सोमवारी सकाळी 10.30 ते 1 वाजेपर्यंत या प्रस्तावावर चर्चा ठेवू व त्यानंतर दुपारी 1.30 नंतर प्रश्नोत्तराचा तास व लेईंगचे कामकाज घेण्यात येईल. या कामकाजानंतर भार नियमनाच्या प्रस्तावावर चर्चा होईल व त्यानंतर विरोधी पक्षाच्या एका प्रस्तावावर चर्चा करण्यात येईल.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 7 एप्रिल, 2008 रोजी सकाळी 10.30 वाजता पुनः भरेल. सकाळी 10.30 ते 1.00 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्यानंतर दुपारी 1.30 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6.00 वाजून 17 मिनिटांनी सोमवार, दिनांक 7 एप्रिल 2008 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

..................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही